# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ

गुलटेकडी, पुणे-४११०३७

दूरशिक्षण विद्याशाखा

एम. ए. मराठी

भाग – १

# विशेष ग्रंथकार अभ्यास – व्यंकटेश माडगुळकर

(M-101)

# प्रस्तावना

आज दूरशिक्षणाची व्याप्ती प्रचंड वाढलेली आहे. उच्च शिक्षणापासून वंचित असलेल्यांसाठी दूरशिक्षणाने शिक्षणाच्या नव्या संधी निर्माण केलेल्या आहेत. ज्ञान सतत अद्ययावत ठेवणे ही आजच्या काळाची गरज आहे. अशा परिस्थितीमध्ये दूरशिक्षणाने वेगाने विकसित होणा-या संज्ञापन तंत्रज्ञानाच्या साहाय्याने फार मोठी किमया साधलेली आहे. दूरशिक्षणातील विद्यार्थी भले दूर अंतरावर असला तरी विद्वानांनी तयार केलेले अध्ययन साहित्य त्याला अध्ययनाचा परीपूर्ण अनुभव देते.

एम.ए. मराठीच्या भाग १ चे अध्ययन साहित्य आपल्या हाती देताना आम्हाला आनंद होत आहे. यंदाच्या वर्षी तुम्ही प्राचीन गद्य पद्य या विषयांतर्गत काही प्राचीन साहित्यिकांच्या साहित्यकृतींचा अभ्यास करणार आहात. तसेच विशेष ग्रंथकार म्हणून व्यंकटेश माडगुळकर यांच्या साहित्याचा आस्वाद तुम्ही घ्याल. या व्यतिरिक्त भारतीय साहित्यशास्त्राचा तसेच ऐतिहासिक व वर्णनात्मक भाषाविज्ञान या काहीशा क्लिष्ट व तांत्रिक विषयाच्या अनुषंगाने भाषेच्या विविध अंगांचा व घटकांचा विचारही तुम्ही या वर्षी कराल.

विद्यार्थी मित्रांनो, वरील विषयांवरील अध्ययन साहित्य तुमच्या अभ्यासाचा पाया तर पक्का करेलच, परंतु परीक्षेच्या दृष्टीनेही तुम्हाला मदत करेल, साहित्यशास्त्र आणि भाषाशास्त्र यासारखे क्लिष्ट विषय या अध्ययन साहित्यामुळे सुगम व सुबोध होतील याची खात्री वाटते. इतकेच नव्हे तर या अभ्यासामुळे तुम्हाला प्राचीन साहित्यात रुची निर्माण होईल तसेच व्यंकटेश माडगुळकरांचे अभ्यासक्रमाबाहेरील साहित्यही वाचण्याची प्रेरणा तुम्हाला मिळेल अशी आशा वाटते.

या अध्ययन साहित्यनिर्मितीसाठी आम्हाला सतत प्रोत्साहित करणाऱ्या व मार्गदर्शन देणाऱ्या मा. कुलगुरू डॉ. दीपक टिळक, दूरशिक्षण विद्याशाखेचे अधिष्ठाता श्री. रत्नाकर चांदेकर तसेच कुलसचिव डॉ. उमेश केसकर यांचे आभार!

वेळात वेळ काढून प्रस्तुत अध्ययन साहित्य तयार करणाऱ्या प्रा. डॉ. वंदना बोकील-कुलकर्णी यांचेही मन:पूर्वक आभार !

आणि तुम्हा सर्वांना हार्दीक शुभेच्छा !

*प्रा. नीलिमा मेहता*

*विभागप्रमुख, दूरशिक्षण विद्याशाखा*

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | प्रास्ताविक | ०१ |
| २ | प्रवास एका लेखकाचा : परिचय | ०५ |
| ३ | प्रवास एका लेखकाचा : विविध पैलू | १० |
| ४ | करुणाष्टक : कथानक व व्यक्तिचित्रे | १४ |
| ५ | करुणाष्टक : वाङ्मयीन वैशिष्ट्ये | २० |
| ६ | करुणाष्टक : शीर्षकाची अन्वर्थकता | २४ |
| ७ | करुणाष्टक : व्यक्तिरेखा | २७ |
| ८ | माणदेशी माणसं – कथानक व व्यक्तिचित्रे | ३२ |
| ९ | माडगूळकरांच्या कथालेखनाचे दलित व ग्रामीण विशेष | ४२ |
| १० | ओझं : ग्रामीण कथा विशेष | ४७ |
| ११ | ओझं : कथानकाचा परिचय | ५० |
| १२ | ओझं : वाङ्मयीन वैशिष्ट्ये | ६१ |
| १३ | बनगरवाडी : कथानक | ६८ |
| १४ | बनगरवाडी : व्यक्तिरेखा | ८२ |
| १५ | बनगरवाडी : वाङ्मयीन वैशिष्ट्ये | ९१ |
| १६ | सत्तान्तर : कथानक | १०२ |
| १७ | सत्तान्तर : व्यक्तिरेखा | १०८ |
| १८ | सत्तान्तर : वाङ्मयीन वैशिष्ट्ये | ११६ |
|  | प्रश्नपेढी | १२४ |

# प्रकरण क्र. १

## प्रास्तविक

**विद्यार्थी मित्रांनो**

'विशेष ग्रंथकार अभ्यास' या विषयाअंतर्गत आपल्याला व्यंकटेश माडगूळकर या अर्वाचीन लेखकाचा विशेष अभ्यास करायचा आहे. या अभ्यासासाठी माडगूळकरांचे सर्व लेखन तुम्ही वाचावे अशी अपेक्षा आहे.

माडगूळकरांचे प्रसिध्द झालेले लेखन खालीलप्रमाणे :

**नाटक :**

पति गेले गं काठेवाडी

बिनबियांचे झाड

नामा सातपुते

सती

गौराई

कुणाचा कुणाला मेळ नाही

तू वेडा कुंभार

बिकट वाट वहिवाट

बनगरवाडी

देवजीने करूणा केली

**कथासंग्रह :**

उंबरठा

जांभळाचे दिवस

माणदेशी माणसं

वारी

गोष्टी घराकडील

कांगारूचे चांगभले

ओझं

बाजार

रानमेवा

काळी आई

गावाकडील गोष्टी

वाघाच्या मागावर

हस्ताचा पाऊस

डोहातील सावल्या

व्यंकटेश माडगूळकर यांची कथा

व्यंकटेश माडगूळकरांच्या दहा कथा

सीताराम एकनाथ

वाळूचा किल्ला

**कादंबरी :**

| | | |
|---|---|---|
| सत्तांतर | करूणाष्टक | कोवळे दिवस |
| चित्रकथी | बनगरवाडी | वावटळ |
| पुढचं पाऊल | छोटा जवान | |

**व्यक्तिचित्रे :**

चित्रे आणि चरित्रे

चरित्ररंग

**आत्मचरित्र :**

प्रवास एका लेखकाचा

**प्रवासवर्णन :**

पांढरी मेंढरे हिरवी कुरणे

**ललितगद्य :**

वाटा

नागझिरा

अशी माणसं अशी साहसं

एक एकर

परवचा

सरवा

जंगलातील दिवस

पांढऱ्यावर काळे

**अनुवादः**

सिंहांच्या देशात

मी आणि माझा बाप

मंतरलेले बेट

सुमिता

रेखाचित्रसंग्रह :

जनावनातील रेखाटणे

याशिवाय 'पुढचं पाऊल', 'सांगत्ये ऐका' यांसारख्या जवळजवळ ३६ चित्रपट कथा त्यांनी लिहिल्या आहेत.

यापैकी 'ओझं' आणि 'माणदेशी माणसं' हे दोन कथासंग्रह, 'बनगरवाडी' 'सत्तांतर', 'करूणाष्टक' ह्या कांदबऱ्या आणि 'प्रवास एका लेखकाचा' हे आत्मचरित्रात्मक लेखन यांचा आपल्याला तपशीलवार अभ्यास करायचा आहे.

तत्पूर्वी व्यंकटेश माडगूळकर यांच्या लेखनाविषयी जाणून घेणे इष्ट ठरेल.

गाडगीळ, गोखले, भावे आणि माडगूळकर या नवकथेच्या प्रवर्तकांनी मराठी कथेला केवळ वेगळे वळणच दिले असे नाही, तर नवे सत्व व नवे सामर्थ्यही प्राप्त करून दिले आहे. शहरी वातावरणापासून दूर अशा माणदेशाच्या मातीचे रंग, रूप लेवून माडगूळकरांची कथा, कांदबरी आणि ललितलेखन अवतरले आहे. ग्रामीण कथा म्हणजे हिरवीगार शेते, आंब्याची राई किंवा मोटेवरचे प्रेम असे समीकरण जेव्हा होते तेव्हा माडगूळकरांनी 'गावाकडच्या गोष्टी' सांगायला सुरूवात केली.

त्यांचा पहिला व्यक्तिचित्रांचा संग्रह 'माणदेशी माणसं' हा १९४१ साली प्रसिध्द झाला. त्यावेळी खऱ्या अस्सल मराठी ग्रामीण कथेची ओळख रसिकांना झाली. त्यानंतर मग 'काळी आई', 'हस्ताचा पाउस', 'घरदार', 'गावाडील गोष्टी', 'उंबरठा', 'वारी', 'वाळूचा किल्ला' इत्यादी अनेक कथासंग्रह प्रसिध्द झाले. या कथांतून त्यांनी जगण्यासाठी धडपडणाऱ्या अनेक ग्रामीण पात्रांना चिरंजिवित्व दिले. ग्रामीण जीवनातील अनुभवाचा कस, त्याची सूक्ष्मता, त्यांनी वेगळेपणाने साकारली. माणदेशातील दारिद्रय, माणसांचे दुःख त्यांनी अतिशय सहानुभूतीने प्रगट केले आहे.

'बनगरवाडी', 'पुढचं पाऊलं','वाळवंट', 'कोवळे दिवस', 'करूणाष्टक', 'सत्तांतर' इत्यादी कादंबऱ्यातून त्यांनी आपले वेगळेपण सिध्द केले आहे. मेंढरांच्या वस्तीत राहणारी माणसे, आणि त्यांचे भावविश्व चितारणारी 'बनगरवाडी' ही कादंबरी. ग्रामीण कादंबरीच्या क्षेत्रात तिने लक्षणीय स्थान मिळवले. गांधीवधानंतरच्या ग्रामीण भागांचे दर्शन 'वावटळ' मधून घडते. ग्रामीण भागातून पळून शहरात आलेल्या शहरी वृत्तीला चटावलेल्या माणसाच्या अस्थिर जीवनाचे वर्णन 'पुढचं पाऊलं' ही कांदबरी करते. 'कोवळे दिवस' व 'करूणाष्टक' या कांदबऱ्या आत्मचरित्रात्मक आहेत. पण स्वतःच्या जीवनाचा सांगोपांग वृत्तांत लिहिणे अशी त्यांची भूमिका नाही. त्यातून तत्कालीन समाजजीवनाचे, स्त्रियांचे जीवन रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे.

राष्ट्रसेवादलासाठी त्यांनी काही नाटके लिहली उदा. 'कुणाचा कुणाला मेळ नाही', 'काळाबरोबर चला' इ.

'तू वेडा कुंभार' 'सती' 'पती गेले गं काठेवाडी' इ. नाटके सामाजिक प्रश्नांचा विचार करणारी असून मानवी मनातील विविध आंदोलने मांडतात.

व्यक्तिगत जीवनातील अनुभव आठवणी त्यांनी आपल्या ललितलेखातून रंगवल्या आहेत. उदा. 'पांढऱ्यावर काळे', 'रानमेवा', 'चित्रे आणि चरित्रे' इ.

पुढचे पाऊल, वंशाचा दिवा, धाकटी जाऊ, सांगत्ये ऐका, मानिनी, रंगपंचमी इ. चित्रपटकथाही त्यांनी लिहिल्या आहेत. जेवढे लिहिले त्यापेक्षा अधिक त्यांनी वाचले. पाश्चात्त्य साहित्यकारांच्या आवडलेल्या साहित्यकृतींची त्यांनी भाषांतरे केली. उदा. सुमिता, सिंहांच्या देशात, मी आणि माझा बाप इ.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, ग्रामीण साहित्यसंमेलन, गोव्याचे साहित्यसंमेलन इत्यादीचे अध्यक्षस्थान भूषविले आहे.

अशा या चतुरस्त्र लेखकाच्या काही साहित्यकृतींचा अभ्यास आपल्याला करायचा आहे.

**– लेखिका**

❖ ❖ ❖

# प्रकरण २

## प्रवास एका लेखकाचा : परिचय

'प्रवास एका लेखकाचा' या आत्मपर लेखसंग्रहात माडगूळकर यांनी त्यांच्या लेखनाची सुरूवात, लेखक म्हणून त्यांची जडणघडण कशी झाली याचा हृदयंगम आलेख काढला आहे. जन्म, बालपण, शिक्षण व गृहस्थाश्रम या क्रमाने लिहिलेले सांकेतिक पध्दतीचे हे आत्मचरित्र नाही. ही सुखदुःखात्मक आठवणींची साखळी आहे. ललित्यपूर्ण शैलीतले आत्मनिवेदन आहे. १९९४ साली हे पुस्तक प्रसिध्द झाले त्यात त्यांनी आपल्या तोवरच्या प्रवासाकडे तटस्थ वृत्तीने पाहिले आहे.

या पुस्तकातून माडगूळकरांचे अष्टपैलू व्यक्तिमत्व प्रकटलेले दिसते. 'लेखक घर बांधतो', 'खोली लिहण्या-वाचण्याची', 'माणदेशी माणसं', 'चरित्र एका कादंबरीचं', 'दप्तर एका लेखकाचे', 'श्रमाचे फळ' 'धायरीच्या खारी', 'भृगु सांगतात की' आणि 'संकल्प एक एकर पिकाचा' या प्रकरणांतून ते विशेषत्वाने प्रत्ययास येते.

माणदेशाच्या वैराण मुलूखात माडगूळकरांनी त्यांची जवळजवळ अठरा वर्षे घालवली. तिथे अंधश्रध्दा होती, दारिद्र्य होते. चूल पेटवण्यासाठी लागणारा विस्तव शेजाऱ्यांकडून आणला जाई. संध्याकाळी दिव्यावर दिवा पेटवूनच घरोघरी काळोख उजळला जाई. तिथे अठरापगड जाती जमातींच्या माणसांशी लेखकाचा संपर्क येई. त्यांच्याबरोबर लेखकाने गावातील उरूस, जत्रा, कुस्त्यांचे फड, कोल्हाट्यांचे खेळ समरस होऊन पहिले. त्यापैकी काही गोष्टीवेल्हाळ होते. ते लिहितात, 'ह्या वयात कुटुंबात मला माया मिळाली त्यांनी मला माया दिली. शहाणपण दिलं आणि गोष्टी सांगण्याचा वसा दिला. श्रावण महिन्यात, तळहातावर चार धान्यदाणे ठेवून माझी आई सुरेख कहाण्या सांगे. आदित्य-राणूबाईची कहाणी, शुक्रवारची कहाणी, रानात गुरं राखणाऱ्या रामाबरोबर कधी गेलो, की सावलीत बसून तो गोष्टी सांगे, चोरांचपाट्या, शिंदळकीच्या, मायेच्या, वडील कधीकधी चकव्याच्या गोष्टी फार रंगून सांगत. गावातल्या देवळात चाललेल्या हरिविजय, रामविजयसारख्या पोथ्या, अधूनमधून होणारी कीर्तनं, पोवाडे, जत्रेच्या रात्री पाहिलेले तमाशे, ऐकलेली ऐकिवे, ह्यातून मी कथन-कसब कळत-नकळत उचललं'. (पृ.१६१ प्रवास एका लेखकाचा)

संस्कारक्षम कोवळ्या वयात केलेल्या वाचनविषयांचे वर्णन त्यांनी शैलीपूर्ण शब्दांत केले आहे. 'किन्हई' नावाच्या गावी त्यांच्या वडिलांची बदली झाली होती. तिथे ज्या भाड्याच्या घरात ते राहात होते तिथे त्या घराच्या माळयावर एका पेटीत खूप पुस्तके होती. 'पंचतंत्र', हरी नारायण आपटे यांच्या कादंबऱ्या, अरबी भाषेतील सुरस आणि चमत्कारिक गोष्टी अशी कितीतरी, या पुस्तकांचा आस्वाद घेताना वाचन नावाची गोष्ट किती आनंददायक असू शकते याचा त्यांनी अपूर्व अनुभव घेतला.

आपण वडील बंधूविषयी - ग.द.माडगूळकर- यांच्याविषयी माडगूळकर लिहितात, ''आमच्या घरात

कलांचं सुगंधी वारं त्यांच्यामुळे आलं. त्यांच्या आधी कोणी कलांकडं फिरकलं नव्हतं. त्या काळात लेखन, वाचन, चित्रकला, नाट्य यांची ओळख मला झाली. गाईमागं वासरू जावं तसा मी वडील बंधूच्या मागं जात असे. हस्तलिखित मासिक काढण्यापासून, नाटक लिहून बसवण्यापर्यंत छंद त्यांनी केले आणि मी बाळडोळ्यांनी ते पाहिले'. (पृ. १६२ प्रवास एका लेखकाचा)

लेखन-वाचनाच्या संस्कारांबरोबरच त्यांच्या जीवनाला कलाटणी देणारा, अनुभवसंपन्न करणारा संस्कार झाला तो राष्ट्रप्रेमाचा! १९४२ च्या राष्ट्रीय चळवळीत ते ओढले गेले. शिक्षण अर्ध्यावर सुटले, अनेक प्रतिकूल प्रसंगातून त्यांना जावे लागले. भ्रमंती करावी लागली. या बऱ्यावाईट अनुभवांविषयी ते लिहितात,''ह्या तीन वर्षांनी मला बरंच प्रौढ केलं. भीती, मरण, भूक, एकाकीपण, बंधुभाव, धैर्य असल्या गोष्टीचं दर्शन मला झालं. माझे अठरा सवंगडी पकडले गेले. त्यांना खूप छळ, मार सोसावा लागला. कुणाला पाच, कुणाला सात वर्षाच्या शिक्षा झाल्या. सगळे जेलमध्ये गेले. मी एकटा राहिलो. माझ्या शिक्षणाची वाताहत झाली. सगळं शिक्षण रस्त्यावर घ्यावं लागलं.''

त्यांनतर वयाच्या तिशी-बत्तीशीत ते मुंबईसारख्या महानगरात होते. अनेक लेखक, संपादक त्यांचे मित्र बनले. त्यात श्री.पु.भागवत, ग.रा.कामत, गंगाधर गाडगीळ असे अनेक नामवंत होते. याच काळात त्यांची 'मौज' साप्ताहिकांतून 'माणदेशी माणसं' रेखाटली. जीवनात परिवर्तन घडले. त्याबद्दल सूचकतेने ते म्हणतात, 'माणदेशाचं बरड माळरानच पाहण्याची ज्या डोळयांना सवय होती, त्यांना आयुष्यात प्रथमच निळा निळा अफाट सागर दिसत होता.'

मुंबईचे घाईगर्दीचे जीवन आणि चाळीतल्या एका खोलीत राहणे न मानवल्यामुळे दोन-अडीच वर्षातच ते पुण्यात स्थायिक झाले. पंचावन्न साली ग्रामीण कार्यक्रमांचे संयोजक म्हणून पुणे आकाशवाणी केंद्रावर त्यांची नेमणूक झाली. त्यांच्या लेखकाला बहर आला. साहित्यविश्वात मान्यता मिळाली. लैकिक यशही प्राप्त झाले 'लेखक घर बांधतो' या प्रकरणात त्यांची आपली स्वतःची 'अक्षर' वास्तू कशी उभी राहिली याचे रोचक वर्णन केले आहे. रात्री पहाटे आणि दुपारी शांतता घरात यावी...सकाळचं कोवळं ऊन घरात रांगलं पाहिजे आणि रात्रीचा चंद्रप्रकाश अंगणात उतरला पाहिजे हे त्यांचे स्वप्न होते. निसर्गाच्या कुशीत, निवांत जागी माधव आचवलांनी डिझाईन केलेले, खास व्यक्तिमत्व असलेले घर उभे राहिले. सुरूवातीपासून या घराला लेखक प्रकाशक आणि संपादक यांचा हातभार कसा लागला त्याचा तपशील लालित्यपूर्ण शैलीत लेखकाने सांगितला आहे. अक्षरसाधनेमुळे 'अक्षर' ही वास्तू उभी राहिली याबद्दलची कृतज्ञता त्यांनी व्यक्त केली आहे.

'चरित्र एका कांदबरीचं', या प्रकरणात लेखकाने 'बनगरवाडी या त्यांच्या कांदबरीलेखनामागची प्रेरणा, पार्श्वभूमी, तिला लाभलेले विलक्षण यश साऱ्याविषयी प्रांजलपणे आणि अलिप्तपणे लिहिले आहे. निंबवड्याला काही काळ त्यांनी शिक्षकाची नोकरी केली. तिथली मेंढरे, तिथली माणसे, तिथला अंधार तिथली उब मिळून त्यांच्या मधील सृजनशील लेखक घडत गेला. गोष्टीवेल्हाळ भावाच्या गप्पांतून, रात्री चावडी-देवळापुढे अंधारात होणाऱ्या गप्पांमधून मनात वेगळे रसायन तयार होई. आपल्या परिसरातून आणि 'स्व' विषयक जाणिवेतून त्यांना बनगरवाडीतील व्यक्तिरेखा सापडल्या. ते म्हणतात,''मला वाटतं, माझ्या बाई आजीचेही काही गुण मी शेकूच्या बायकोला दिले आहेत आणि त्या बाळा बनगरात थोडासा मीही मिसळलो आहे. (पृ. ३७ प्रवास एका लेखकाचा)

चोखंदळ समीक्षकांनी, रसिकांनी, त्र्यं. शं. शेजवलकर, डॉ. इरावती कर्वे, डॉ. सोन्यायमर यांच्यासारख्या प्रज्ञावंतांनी 'बनगरवाडीचे' कौतुक केले याचे त्यांना समाधान वाटले. सर्वसामान्य वाचकांपर्यंत आपली ही साहित्यकृती पोहचली याबद्दल त्यांना कृतार्थता वाटते.

'वावटळ' या कादंबरीवरील स्वतंत्र प्रकरणात त्यांनी या कांदबरीत वास्तव अनुभवाचे चित्रण कसे केले त्याविषयी सांगितले आहे. गांधीहत्येनंतर खेडोपाडी झालेल्या भयाण जाळपोळीचे चित्रण त्यात आहे. गांधीवधात महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात जो ब्राम्हण जमातीविरूध्द उठाव झाला त्याची कथा शंकर नावाच्या एका तरूण ब्राम्हण विद्यार्थ्याच्या तोंडून ऐकवली आहे. पुण्यात अस्थिरता निर्माण झाल्यावर शंकर गाशा गुंडाळून आपल्या मित्रांसमवेत वाटेत बेचिराख झालेल्या गावांना वळसे घालत घरी जात असतो. त्याने अनुभवलेल्या प्रसंगातून संशय, अविश्वास, धैर्य, क्रौर्य,पराकोटीचा अविचारीपणा याचे वर्णन माडगूळकरांनी परखडपणे केले आहे.

'एक कथासंग्रहः बाजार' या प्रकरणात त्यांच्या 'बाजार' ह्या कथासंग्रहाविषयी त्यांनी लिहिलं आहे. तो त्यांचा आवडता कथासंग्रह. याही कथासंग्रहामधील पात्रं त्यांच्या परिसरातील आहेत. पोर वयात, तरूण वयात त्यांना शिकारीचा नाद लागला. निसर्गाचा सहवास मनमुराद लुटता आला. वैदू, फासेपारधी, रामोशी, मांग, कातकरी, भेगा अशा लोकांची साथ-सोबत मिळाली. त्यामधून या संग्रहातील कथा कशा साकार झाल्या, त्याविषयी माडगूळकरांनी सविस्तर लिहिले आहे.

'दप्तर एका लेखकाचे' या प्रकरणात १९४७ ते १९६८ या कालावधीत त्यांना साहित्य, चित्रपट, नाटक आणि आकाशवाणीशी संबंधित अशा अनेक नामवंत सुहृदांनी लिहिलेली पत्रे दिली आहेत. तत्कालीन वाङ्‌मयीन आणि सांस्कृतिक जीवनावर त्यामधून ओझरता प्रकाश पडतो. समकालीन लेखकांशी त्यांचे संबंध कसे जिव्हाळयाचे होते ते उलगडते. 'अभिरूची' मासिकांचे संपादक पु. आ. चित्रे व 'मौज' चे श्री. पु. भागवत यांच्याशी झालेला त्यांचा पत्रव्यवहार हा माडगूळकरांचा लेखनप्रवास समजून घेण्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा ठरतो. प्रा. गंगाधर गाडगीळ, प्रा. आनंद यादव, प्रा.गं.या.निरंतर, शंकर पाटील, ज्ञानेश्वर नाडकर्णी, बाळ सामंत, कुसुमावती देशपांडे, गोपाळकृष्ण भोबे, विंदा.करंदीकर, पु.ल.देशपांडे, गो.नी.दांडेकर, वा.वि.भट मो.ज्ञा.शहाणे, प्रा. अरविंद मंगळरूळकर यांनी लिहलेली पत्रे लेखनाच्या संदर्भातली आहेत. तशीच वैयक्तिक जिव्हाळयाने ओथंबलेली आहेत.

'श्रमाचं फळ' या प्रकरणात त्यांनी आपले शेतीविषयक अनुभव सांगितले आहेत. सुरूवातीलाच ते म्हणताता, "मी शेत घेतलं, ते समाधान, उत्साह, आनंद, ह्यांचं एकरी उत्पन्न किती काढता येतं, ते अजमवण्यासाठी". लेखनाइतकाच त्यांना शेतीत रस आहे, मातीची ओढ आहे. हे या प्रकरणातून जाणवते. स्वतःच्या शेतात केलेल्या परिश्रमाबद्दल आणि इतरांच्या घेतलेल्या सहाय्याबद्दलची माहिती त्यांनी या प्रकरणात दिली आहे. लेखनामुळे मिळणारा सृजनात्मक आनंद आणि शेतीतील हिरवी रोपटी पाहून होणारा आनंद त्यांना सारखाच वाटतो. ते लिहितात, 'संबंध एकरभर डुलणारी ज्वारीची कोवळी रोपटी बघून बरं वाटे. ज्वारीच्या दोन्ही कडांना करडईचे पट्टे टाकलेले होते. ते रेशमी वस्त्राला काठ असावेत,तसे दिसत.'

हळूहळू ज्वारीला कणसं धरली, पण करडईवर मावा पडला. बाजूचे शेतकरी म्हणाले,'ह्या रानात

करडईवर मावा पडतूच' त्यावर ते म्हणतात,'निसर्गाच्या कृपेबरोबरच त्याची अवकृपा थंडपणे स्वीकारण्याची ही शेतकरी वृत्ती पाहून मला संतोष झाला'.

'मग एकदा कवी जसा पुढ्यात कोरा कागद घेऊन बसतो तसा मी हा जमिनीचा तुकडा घेऊन बसे. विचार एकच पांढऱ्यावर काळं आता काय करावं?' या उद्गारातून त्यांच्या भाषाशैलीचा विशेष तर जणवतोच पण लेखनप्रक्रिया आणि शेताची मशागत त्यांना समांतर वाटते हे ही महत्त्वाचे आहे. माती विषयी ममत्व बाळगणाऱ्या समर्थ, सृजनशील साहित्यिकाची चिंतनशीलता पुढील विचारातून जाणवते. ते लिहितात,

''माझ्या हातात चारशे डाळिंबांचे एकशे ऐंशी रूपये आले! खडड़े, रोपं, खतं, कीटकनाशकं, गडयाचा पगार, माझे हेलपाटे, श्रम आणि मूळ जमिनीची किंमत लक्षात घेता जेव्हा मी ही रक्कम पाहिली, तेव्हा वाटलं-ह्यापेक्षा ती सहा महिन्यात एक पुस्तक लिहिलं असतं तर? फायदेशीर सर्जन, कोणतं, हे की ते?

पण मग माझा भूमीशी संबंध राहिला असता का?

माणूस म्हणून सुख शोधायचं, तर जीवनात साधेपणाचे, निरवालस साधेपणाचे, काही लांबलचक पदर आवश्यक आहेत. मला हे मिळाले असते का?

'आत्म्याची गरज भागवण्यासाठी एकाही पैशाची आवश्यकता नसते!' हे वचन फक्त तत्वज्ञांसाठीच आहे का?

एकूण शेती हा धंदा नाही, तो जीवनमार्ग आहे.'' या चिंतनातून त्यांची मातेची, साधेपणाची,. माणूसपणाची ओढ लक्षात येते.

'धायरीच्या खारी' या छोट्या प्रकरणात निसर्गाविषयी, प्राणी-पक्षी यांच्याविषयी त्यांना असणारे प्रेम वाटणारे ममत्व प्रकटले आहे. (तसे त्यांच्या सर्वच लेखनातून ते प्रकटते.) प्राणी आणि माणसे यांच्या सहजीवनाचा मंत्रही जाता जाता त्यांनी सहजपणे सांगितला आहे. ''खारी एअरगननं मारणं किंवा उंदरांसाठी मिळणाऱ्या विषाच्या वड्या वारंवार झाडाच्या बेचक्यात ठेवून त्यांचं आमिष खारी मारण्यासाठी उपयोगात आणणं नको वाटतं. अनैतिकही वाटतं. फळं, फुलं, कोंब हेच खारीचे अन्न आहे. ते कोणी पिकवलं ह्यांच्याशी त्यांना काय कर्तव्य आहे? खारी आणि आपण गुण्यागोविंदानं एकत्र राहिलो, तर आनंदच आहे. (पृ. १२७ प्रवास एका लेखकाचा)

आंबेजोगाई येथे भरलेल्या ५७ व्या साहित्यसंमेलनाचे अध्यक्षस्थान व्यंकटेश माडगूळकर यांनी भूषवले. त्यावेळी त्यांनी केलेले भाषण या पुस्तकात समाविष्ट केले आहे. त्यात त्यांनी बालपणीच्या घटनांचा, संस्कारांचा उल्लेख केलेला आहे. स्वतःच्या लेखनप्रक्रियेविषयी सांगितले आहे. त्यांचे जीवनविषयक तत्वज्ञान सहजपणे त्या भाषणातून प्रकट झाले आहे.

ते म्हणतात,''प्रत्यक्ष जीवन जगत असताना त्या त्या समाजाच्या संदर्भात सामाजिक प्रश्न, संघर्ष अटळ असतात. कलावंत त्याला साक्षी असतोच. त्यापासून तो बाजूला राहू शकत नाही पण तो कोणतेही झेंडे खांद्यावर घेत नाही व त्याची जरूरी नसते''.

वाचन माणसाला समृध्द करते. त्याविषयी ते म्हणतात, 'लेखकाला वाचन हे पोषणद्रव्यच आहे. पण

मुळात प्रतिभा नसली तर मात्र पुतळयाला पोषणद्रव्यं चारून तो जसा सजीव होत नाही, तसा वाचहकी साहित्यिक होणार नाही. अशा या लिखित अक्षरांच्या पलीकडील एक वाचन साहित्यिकाला करायचं असतं, ते मानवी समूहाचं.''

'संकल्प : एक एकर पिकाचा' या प्रकरणात त्यांनी आपल्या गतायुष्याचा मागोवा घेतलेला आहे. चाळीस वर्षाच्या या लेखनप्रवासातील टप्प्यांकडे पाहताना ते उद्‌गारतात, ''माणदेशी माणसं, गावाकडच्या गोष्टी, काळी आई, जांभळाचे दिवस हे कथासंग्रह आणि बनगरवाडी, वावटळ सारख्या कांदबऱ्या, तू वेडा कुंभार हे नाटक ग्रामजीवनाचा मातकट रंग दाखवतात. हा ब्राऊन पिरिअड आहे.''

पुढे मी स्वतःच्या घराभोवती प्रदक्षिणा घातल्या, घरदार, करूणाष्टक, कोवळे दिवस यांना पांढऱ्या मातीचा रंग आहे. ''ह्यानंतरचा रंग प्रामुख्याने हिरवा आहे. मनुष्यवृत्ती सोडून मी रानवनं जवळ केली आहेत. 'रानमेवा', 'नागझिरा', 'जंगलातील दिवस', 'सत्तांतर' ह्यांचा रंग हिरवा आहे. हा ग्रीन पिरिअड आहे. (पृ.१६५ प्रवास एका लेखकाचा)

'प्रवास एका लेखकाचा' हे व्यंकटेश माडगूळकर यांचे आत्मचरित्रपर पुस्तक नितळ पारदर्शी आहे. त्यांच्या निवेदनात ललित्य आहे. या लेखनाला कुठल्याही अभिनिवेशाचा स्पर्श नाही. अतिशय सहज स्वाभाविक आणि ओघवत्या भाषेत ते लिहिले आहे.

❖ ❖ ❖

## प्रकरण ३

# प्रवास एका लेखकाचा : विविध पैलू

'प्रवास एका लेखकाचा' या आत्मचरित्रपर पुस्तकातून व्यंकटेश माडगूळकर यांचे समृद्ध व्यक्तिमत्व प्रकटते. या व्यक्तिमत्त्वाचे विशेष या पाठात आपल्याला पहायचे आहेत.

१) लेखक

२) चित्रकार

३) भटकंतीत रमणारा निसर्गप्रेमी

४) शिकारी

५) शेतकरी

६) कुटुंबवत्सल गृहस्थ

असे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे विलोभनीय पैलू 'प्रवास एका लेखकाचा' या पुस्तकातून दृष्टीस पडतात.

प्रा. म. द. हातकणंगलेकर त्यांच्याविषयी म्हणतात,''मराठीतले ते अनेक ललितकलांमध्ये गती असणारे आणि त्यात गुणवत्तेने वावरणारे साहित्यिक आहेत. या प्रकारचा दुसरा साहित्यिक मराठीत शोधून सापडणे कठीण आहे.''

<u>लेखक</u> म्हणून व्यंकटेश माडगूळकर यांच्या कारकिर्दीची सुरूवात १९४६ साली झाली. १९४८ साली ते मुंबईला राहायला आले. ग.रा.कामत तेव्हा 'सत्यकथा' या मासिकाचे सहाय्यक संपादक होते त्यांच्या खोलीत माडगूळकर राहू लागले. तिथेच त्यांनी 'माणदेशी माणसं' लिहिली. 'मौज' प्रत्येक मंगळवारी निघणार. प्रत्येक मंगळवारी मला एक नवा माणदेशी माणूस शोधावा लागणार, शोधायला कुठं दूर दूर भटकावं लागणार नव्हतं. माणदेशातील माझ्या लहान खेडेगावातील घरं, मळे, वाड्यावरच्या वस्त्या हिंडलो शेजारपाजारची, आठवडा बाजारची ठिकाणं धुंडली की मला माणसंच माणसं भेटणार होती. त्या माणसांच्या गर्दीतून निवड करणं एवढं काम मला करावं लागणार होतं (प्रवास :पृ.२८)

अशी 'मौज' या साप्ताहिकातून त्यांची 'माणदेशी माणसे' प्रसिध्द झाली. ही माणसे इतकी भारतीय इतकी मूलगामी, समाजव्यवस्थेची इतकी प्रातिनिधिक, इतकी मातीशी इमान राखणारी होती की त्यांनी सारा माणदेशी प्रदेश, परंपरा, पर्यावरण शब्दांत जिवंत केले. 'माणदेशी माणसं' ने माडगूळकरांना लेखक म्हणून मान्यता दिली.

आपल्याला कशाप्रकारचे लेखन करायचे आहे, ह्यांची प्रगल्भ जाण त्यांना त्यांच्या लेखनाच्या सुरूवातीपासूनच होती. ते म्हणतात, ''मला जीवनाशी संबद्ध, असं लिहायचं होतं. माणदेश ह्या प्रदेशातले

लोक कसे जगतात, काय विचार करतात, काय भोगतात, काय उपभोगतात, हे मला अनुभवाशी प्रामाणिक राहून सांगायचं होतं ह्या माणसांची जगण्याची दुर्दम्य इच्छा कुठल्याही परिस्थितीत पाय रोवून आला दिवस सुखदुःखासह स्वीकारण्याची त्यांची उमेद, न्यायबुध्दी, चांगल्या वाईटाबद्दलचा वैयक्तिक विधिनिषेध यांचं दर्शन घडवायचं होतं. आपण भाषिक कृती करायची तर हीच. दुसरी काही नाही, असं ठाम वाटून मी माणदेशी माणसांकडे वळलो. लिहिणे हा गंभीरपणे करायचा एक सांस्कृतिक व्यवहार आहे, हे भान या मला त्या वयातही होत''. (पृ. ३०-३१)

त्यानंतर निंबवड्याच्या शाळेत काही दिवस शाळामास्तरची नोकरी त्यांनी केली. तिथल्या अनुभवांवर आधारित बनगरवाडी ही कादंबरी त्यांनी लिहिली. या कादंबरीला महाराष्ट्र सरकारचं पहिलं पारितोषिक मिळालं. तिचं इंग्रजी भाषांतर झालं. डॉ. सोन्यायमर यांनी तिचं जर्मन भाषांतरही केलं. गांधीहत्येनंतर खेडोपाडी झालेल्या भयाण जाळपोळीचे चित्रण 'वावटळ' या कादंबरीत त्यांनी केले आहे. या कादंबरीचे रशियन भाषेतील भाषांतर प्रसिध्द झाले. तिच्या तिथे एक लाख प्रती छापल्या गेल्या.

व्यंकटेश माडगूळकरांच्या प्रतिभेला अनेक वाटा आहेत. अनेक साहित्यप्रकार त्यांनी यशस्वीपणे हाताळले आहेत. कथा, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, स्फुट ललित, माहितीपर शिकारीची वर्णने, चित्रपटकथा इ. शिवाय रेखाटने, चित्रपटातील लहान भूमिका, रेडिओतील कामगिरी असे विविध पैलू त्यांच्या साहित्यिक आणि कलात्मक आविष्काराला आहेत. आणि त्यापैकी काहींचा अगदी ओझरता उल्लेख 'प्रवास एका लेखकाचा' मध्ये आला आहे.

उदा. गंगाधर गाडगीळांच्या एका पत्रात 'मी तुळस तुझ्या अंगणी' या चित्रपटात माडगूळकरांनी केलेल्या एका भूमिकेचा उल्लेख आला आहे. (पृ. ८६) 'भल्याची दुनिया' या चित्रपटातही त्यांनी एक भूमिका केली होती. (पृ.१०३)

**चित्रकार माडगूळकर :** लहान वयातच माडगूळकरांना चित्रकलेचा छंद जडला. 'करूणाष्टक' या कादंबरीत त्यासंबंधाने त्यांनी लिहिले आहे. चित्रकलेची परीक्षा देण्यासाठी ते एकटेच कसे चित्रकला मास्तरच्या घरी राहिले त्याची हकीकत त्यात येते. चवथीची परीक्षा पास झाल्यावर ते तालुक्याला इंग्रजी हायस्कूलमध्ये गेले. त्या शाळेत त्यांना चांगले चित्रकला शिक्षक भेटले. माडगूळकरांना चित्रकलेत बऱ्यापैकी गती होती. पण आजूबाजूचे वातावरण चित्रकलेला पोषक नव्हते. ते लिहितात, 'मी ह्या काळात जर उत्तम चित्रकारांची प्रदर्शनं पाहिली असती, शिल्पप्रदर्शनं पाहिली असती तर, माझी वाट शब्दांकडे न जाता रंगरेषांकडेही वळली असती.' (पृ.१४३) त्यांनी जलरंगातली आणि तैलरंगांतली चित्रही रंगवली. त्यांच्या वडिलांची बदली 'किन्हई' या निसर्गरम्य गावी झाली होती. तिथल्या राजवाड्यात लावलेली मोठमोठी भव्य पोर्ट्रेट्स यांनी पाहिली. रविवर्मा, भरमाप्पा कोटयाळकर, भिव सुतार ह्यांनी रंगवलेली तैलचित्रं पाहिली, चित्रकार व्हावं म्हणून त्यांनी खूप खटपट केली. पण चित्रकलेसाठी रंग, ब्रश, कागद ही महागडी साधनं त्यांना मिळाली नाहीत. त्यामुळे अगदी थोड्या साधनांनी करता येणाऱ्या रेखाचित्रांकडे ते वळले आणि सतत रेखाचित्रे काढीत राहिले.

माडगूळकरांच्या लेखन शैलीत जाणवणारे चित्रदर्शी तपशील म्हणजे त्यांच्यातील या चित्रकाराचीच किमया असेल का? असा विचार मनात येतो. 'मला वाटतं मी लेखणीला कुंचला आणि कोऱ्या कागदाला कॅनव्हास केलं पोर्ट्रेटस आणि लॅण्डस्केप चितारली.' असे त्यांनी म्हटले आहे.

**भटकंतीमध्ये रमणारा निसर्गप्रेमी :**

माणदेशातल्या बाराशे वस्तीच्या एका लहानशा गावात माडगूळकरांचा जन्म झाला. वयाची जवळ जवळ अठरा वर्ष त्यांनी तिथे काढली. वेगवेगळया जाती जमातीच्या खेळगड्यांबरोबर त्यांनी 'वनविद्या' शिकून घेतली. त्यात ओढ्यातल्या धारेतले मासे पकडणे, झाडाच्या ढोलीतली राघूची पिल्लं कशी काढावीत, जनावरांचा माग कसा घ्यावा, गलोलीनं पारवे टिपणे हे सगळं होतं. त्यामुळे निसर्गाची ओढ त्यांना बालपणापासून होती. आपल्या देशातला संपन्न-निसर्ग, रानवनं, वन्य प्राणी, पक्षी हे त्यांना आकर्षून घेतात. 'नित्याच्या नातेवाईकापेक्षा वेगळे नातेवाईक' त्यांना निसर्गात भेटतात. त्याचे प्रत्यंतर त्यांच्या लेखनातून सतत येते. त्यांच्या कथा कादंबऱ्यातून निसर्ग मानवी जीवनाशी एकरूप होऊनच आलेला दिसतो. 'प्रवास एका लेखकाचा' या पुस्तकातही आपल्याला त्यांच्यातील निसर्गप्रेमी भटक्या कलावंताचे दर्शन घडते. घर बांधण्यासाठी जागा निवडताना त्यांनी जो विचार केला त्यातूनही ते स्पष्ट होते ''मी फार जंजाळात न शिरता ठरवलं की जागा शहरातल्या गर्दीच्या भागाला, वाहत्या रस्त्याला फटकूनच असावी, तिथं रात्री, पहाटे आणि दुपारी शांतता घरात यावी. आजूबाजूला बरचं माकळं रान, प्रौढ़ झाडे, गवत, झुडपं असावीत. टेकडीचा आणि वाहत्या खळाळत्या पाण्याचा शेजार असावा. जिथं घर बांधू, ती जागा तरी ऐसपैस पाहिजेच. सकाळचं कोवळं ऊन घरात रांगलं पाहिजे आणि रात्रीचा चंद्रप्रकाश अंगणात उतरला पाहिजे.' (पृ. ५)

पुण्याजवळ त्यांनी एक एकर जमीन विकत घेतली. सुट्टीच्या दिवशी ते तिथे जात, ''खारी शेपट्या उडवीत पळत. वारा भरावत राही. मोकळया रानात हुंदडणाऱ्या वासराला होतो, तसा आनंद मला होई. (पृ. ११०) असे ते लिहितात. त्यावरून त्यांना निसर्ग सान्निध्याची किती अनावर ओढ होती ते जाणवते. स्वतःच्या निसर्गाच्या ओढीविषयी ते लिहितात, ''माणसाला निसर्गापासून वेगळं असं मला कधी पाहताच आलेलं नाही... ज्या तरूण मुलाच्या हातात कधी गळदांडी किंवा बंदूक पडली नाही, ज्यानं नदीतळी, डोंगरजंगलं धुंडाळली नाहीत, त्याच्या शिक्षणात काही अपुरेपणा राहतोच.'' (पृ.१४०)

**शिकारी माडगूळकर :** (पृ. ६८) वर माडगूळकर लिहितात, ''पोरवयात, तरूण वयात मी शिकारीचा नाद केला. ह्या नादात मी बरचं शिकलो, शहाणा झालो, निसर्गातिले एक दोन किंवा कबीराच्या भाषेत सांगायचं झालं तर अडीच अक्षर कळू लागली.'' शिकारीच्या नादापायी ते खूप हिंडले. वैदू, फासेपारधी, रामोशी, मांग, कातकरी बैगा लोकांची संगत-सोबत त्यांना मिळाली. या लोकांची भाषा, त्यांचं जीवन ह्यांच्याशी परिचय झाला. तो त्यांच्या साहित्यातून कसा कसा उमटला ते आपण त्यांच्या कथा-कादंबऱ्यातून अनुभवतो.

**शेतकरी माडगूळकर :** माडगूळकरांच्या घरी जरी शेती होती तरी त्यांचे वडील शेतकरी नव्हते. पण व्यंकटेश माडगूळकरांना आतूनच मातीची ओढ होती. थोडे आर्थिक स्वास्थ्य मिळताच त्यांनी पुण्याजवळ एक एकर शेत विकत घेतलं. 'समाधान आनंद आणि उत्साह ह्यांचं एकरी उत्पन्न किती काढता येतं'- हे अजमवण्यासाठी त्यांनी शेतं घेतलं. 'श्रमाचं फळं' या लेखात त्यांनी या शेताच्या तुकडयाचं बहारदार वर्णन केलं आहे. ते म्हणतात,''एखादा कवी जसा पुण्यात कोरा कागद घेऊन बसतो तसा मी हा जमिनीचा तुकडा पुढ्यात घेऊन बसे. विचार एकच. आता पांढऱ्यावर काळं काय करावं. शेती करताना 'निसर्गाच्या

कृपेबरोबर त्याची अवकृपाही झेलण्याची' शेतकरी वृत्ती त्यांना जाणवली. शेतातली थोडी भाजी ओळखीच्या माणसांना देण्याचा आनंद त्यांनी घेतला. थोडी विक्रिही केली. आपल्या शेतातली डाळिंबे विकून पाहण्याचा प्रयोगही त्यांनी केला.

खड्डे, रोपं, खतं, कीटकनाशकं, गडयाचा पगार, माझे हेलपाटे श्रम आणि मूळ जमिनीची किंमत लक्षातं घेता जेव्हा त्यांनी ती रक्कम पाहिली तेव्हा त्यांच्या मनात आलं - त्यापेक्षा मी सहा महिन्यात एक पुस्तक लिहिलं असतं, तर? फायदेशीर सर्जन कोणतं, हे की ते पण मग माझा भूमीशी संबंध राहिला असता का? माणूस म्हणून सुख शोधायचं तर, जीवनात साधेपणाचे निखालस साधेपणाचे, काही लांबलचक पदर आवश्यक असतात, ते त्यांना या शेतीच्या अनुभवातून मिळाले शेती हा धंदा नाही, तो जीवनमार्ग आहे त्याची जाणीव झाली.

**कुटुंबवत्सल गृहस्थ :** माडगूळकरांच्या पुस्तकांना सरकारी पारितोषिके मिळल्याचे काही हजार रूपये त्यांच्याकडे असतात. त्यांची पुस्तके घ्यावीत व स्वतःचे असे छोटे ग्रंथालय उभारावे असे मनात येताच ही कल्पना ते उत्साहाने पत्नीपाशी बोलतात. सुरूवातीपासून आपल्या घराला लेखक, प्रकाशक, संपादक यांचा हातभार लागला याविषयी ते कृतज्ञता व्यक्त करतात. 'घराला घरपण येते तो आत राहणाऱ्या आणि येणाऱ्या जाणाऱ्या माणसांमुळचं'. अशी त्यांची धारणा आहे. घरात मुलांना त्यांची गुप्त जागा असावी म्हणून ते माळा करतात, कुटुंबवत्सल माणसाला कठीण काळात उपयोगी पडावी म्हणून एक कोठीची खोली काढतात. वडीलधाऱ्या माणसांसाठी एक देवघर, तुळशी-वृंदावन करून घेतात. मुलींचे थाटामाटाने लग्न करतात. आल्या गेल्या वाटसरूला दारात सावलीत बसावे वाटते हे ते समजून घेतात. याचबरोबर अनेक मित्र-माणसे जोडलेला माणसांचा भुकेला, सुखदुःखाकडे सम भावाने पाहाणारा, माझ्या लेखनाची भाषा, गुऱ्हाळावर बोलावून रस द्यावा, तशी लोकांनीच मला दिली, असे नम्रपणे नमूद करणारा काहीसा अलिप्त असा कलावंत माणूस या पुस्तकात दिसतो.

❖ ❖ ❖

# प्रकरण ४

## करुणाष्टक : कथानक व व्यक्तिचित्रे

प्रस्तुत पाठात 'करूणाष्टक' या आत्मपर कादंबरीचं कथानक आपण समजून घेणार आहोत. :

सामान्य माणसाचे आयुष्य असते सामान्यच पण त्यांच्या आयुष्यात ठायीठायी आडकाठी घालून सुख लांब ठेवणारी संकटे जो लढा घ्यायला लावतात, तो मात्र असामान्य असतो. अशीच कठीण परिस्थितीशी झुंजणारी एक आई आणि एकापाठोपाठ एक जन्मलेली तिची आठ मुले यांची कथा म्हणजे 'करूणाष्टक'. चरित्रात्मक किंवा आत्मचरित्रामक धाटणीची म्हणता येईल अशी ही कांदबरी आहे. खरोखर इतर साधारण कुवतीच्या लेखकाच्या लेखणीमधून एक शोककथा किंवा पानांमागून पाने उलटणारी दुःखमालिका उमटली असती, परंतु व्यंकटेश माडगूळकरांची सहज ओधवती भाषा, प्रादेशिकता, सामाजिक वैशिष्टये आणि माणुसकी यांनी परिपूर्ण असलेली लेखनशैली यामुळे 'करूणाष्टक' आपला वेगळा ठसा मराठी कांदबरीवर उमटवून बसले आहे.

पोटासाठी राहते गाव सोडून परक्या गावी नोकरीसाठी जाणारे कुटुंब, इतक्या साध्या प्रसंगापासून या कादंबरीची सुरूवात होते. व्यंकटेश माडगूळकरांच्या लिखाणामध्ये आयुष्याला सामोरे जाण्याची आणि अनुभव घेण्याची असोशी सगळयात पहिल्यांदा जाणवते आणि सलगपणे शेवटपर्यंत टिकूनही राहते या सुरूवातीला बावचळलेले, बावरलेले बाईआजीचे व्यक्तिचित्र समोर येते. मुळापासून उपटून दूसरीकडे रुजवण्याचा प्रयत्न केलेल्या झाडाप्रमाणे या आजीची अवस्थ चित्रित झाली आहे.

नवीन मुलूख्यात पूर्वी माणसे सहजासहजी जात नसत. त्यामुळे आपला राहता गाव व जोडलेली माणसे सोडून 'बेलदारा प्रमाणे' पोटामागे फिरणे आईला मोठे जिवावर येंते. आंईच्या नजरेतून पाहिलेले हे नवे गाव माडगूळकरांना जात्याच अस्ताव्यस्त, कुरूप आणि अनोळखी चेहऱ्याचे वाटले. एका उदार ब्राम्हणाने देऊ केलेले त्याचे पूर्वीचे पँडके चौसोपी घर आईला भुताटकीप्रमाणे वाटे. थोड्या डोंगरउतारावर जाऊन ओढ्यावरून पाणी भरून आणण्याचे कष्टाचे काम करणारी आई पाहणे, हे माडगूळकरांना त्याही वयात भावनिक वेदना देणारे होते. या एकाकी घराच्या आजूबाजूलाही खिंडारे आणि पडझड झालेला परिसरच होता. अपरात्री-पहाटे कधी घरात नाग शिरे तर कधी 'पडकात' म्हणजे घराबाहेर हिरवे वस्त्र नेसलेली ओली बाळंतीण आईस दिसे. तिने अंगाला लावलेल्या सूक्ष्म उटण्याचाही वास येत असे. या वाक्यावरून हा अनुभव बालपणामध्ये लेखकाच्या मनावर किती खोल परिणाम करून गेला असेल याची प्रचीती येते. नवीन गावामधली शाळाही मुलांना आवडली नाही. सदानकदा मुलांना 'बदडणारे' मास्तर न आवडल्यामुळे लेखक वारंवार घरी पळून येत असे.

ओढगस्तीत संसार चालवताना त्या काळी सर्वात कष्ट स्त्रीलाच पडत असत. दिवसभर चाकरी करणे आणि रहाटगाडग्यामधील बाहेरची किरकोळ कामे पाहणे एवढीच पुरूषाची जबाबदारी, स्त्रीवर मात्र घरकाम, पाठोपाठची बाळंतपणे आणि येणाऱ्या अनंत अडचणी! ते अशुभ घर बदलण्याचा कितीही 'धोशा

घेतला तरीही बिनाभाडयाचे, इतक्या सोयीचे दुसरे घर मिळणे आणि ते परवडपणे; दोन्हीही शक्य नव्हते. म्हणून संसार तिथेच सुरू राहिला. त्यातल्या त्यात दादा 'जेलर' झाले आणि आईची स्वप्ने थोडी पालवली. नवऱ्याच्या म्हणजे आपल्याही दिमतीला भाला, लाल पट्टेवाला शिपाई येईल हे जाणून झालेला तिचा आनंद अगदी भाबडा आहे. माडगूळकर म्हणतात, की या बढतीमुळे 'आईच्या ध्यानीमनी लोंबणारा नाग हळूहळू निघून गेला'.

स्त्रिया जात्याच बोलघेवडया आणि चार लोकांमध्ये पटकन मिसळणाऱ्या असतात. त्याच न्यायाने आईनेही या नव्या गावात आपली पाळेमुळे रूजवायला सुरूवात केली. अर्थातच माणसे जोडायला तिला फार वेळ लागलाच नाही. ठसठशीत उठून दिसावीत आणि अगदी पाहिल्यासारखी किंवा पहावीशी वाटावीत अशीच ही काही नवी जोडलेली माणसे वर्णन करतानाची माडगूळकरांची अनुभवांमधली खोली, स्मृतींचा ताजेपणा प्रत्येक शब्दातून प्रत्ययाला येतो.

वाड्यामध्येच शेजारी राहणारे सडेफटींग विठूकाका हे पहिलवान होते. पण गंमत म्हणजे आईला दिसलेल्या नागाचा 'बंदोबस्त' करण्यासाठी ते घेऊन मात्र आले तथाकथित मांत्रिकाला! नाग मात्र त्याला मुळीच सापडला नाही; हा भाग माडगूळकरांना विनोदीच वाटतो. फिरतीवरच असल्यामुळे या विठूकाकांची 'करूणाष्टका' तिल कुटुंबाशी अगदी रोजची घसट नसली तरी ऋणानुबंध मात्र नक्कीच होते. प्लेगची साथ आल्यावर ते दादांना तळमळीने म्हणतात,'काय राहणार असल्या साथीच्या खाईत? अहो, पोरं आहेत चार पदरात तुमच्या, पंत देवावर हवाला, म्हणून भागायचं नाही''.

त्या काळी शहरामध्येच वैद्य. डॉक्टर फारसे नव्हते तर खेडेगावामध्ये कुठून येणार? पडल्या-झडल्या दुखण्या-खुपण्याला घरगुती उपचारच होत असत. असे उपचार करणारा कारंडेमामा आणि त्याची ठसठशीत 'तांबडभडक इरकली लुगडं' नेसणारी बायको उर्फ कारंडेमामी हेही आईच्या आतड्याच्या गोतावळ्यात समाविष्ट झाले. आईच्या बाजूला बसण्याच्या चार दिवसात त्या मामीने मुलांना प्रेमाने पोटभर जेवूखाऊही घातले.

पुराणातच ऐकायला मिळाव्यात अशा काही घटना कधीकधी अतिसामान्य माणसांच्याही आयुष्यात घडतात. त्याचप्रमाणे माडगूळकरांना आई रहस्यभेद करते की, 'तू पाटलीणीचं दूध पिऊन वाढला आहेस'. त्यांचे शिकारीला जाणे, मांसमच्छर खाणे हे सगळे त्या दुधाचे गुण आहेत. असे समर्थनही ती करते! अर्थात ही पाटलीण आई जुन्या, मूळ गावची होती. पण तिचा उल्लेख करणे अतिशय आवश्यक वाटते. कारण अशीच माणसे आईने नव्या गावीही जोडली, त्याचे मूळ कदाचित ह्या हकीकतीत आहे असेही माडगूळकरांना लहानपणीच्या अनुभवांवरून वाटत असावे.

पंधरावीस एकर बागाईत जमिनीचे मालक असणारे तांबेमास्तर आणि त्यांची कनवाळू बायको हेही आईचे सगेसोयरे झाले. वाया काहीही घालवायचे नाही म्हणून एरंडलाची आख्खी बाटली पिऊन टाकणाऱ्या या मास्तरांना जुलाब सुरू झाले. घरगुती औषधांची चांगली माहिती असणाऱ्या आईने त्यांचा त्रास आटोक्यात आणला आणि सख्य जोडून त्यावर जणू शिक्कामोर्तबाच केले. पुढे प्लेगच्या साथीमध्ये याच मास्तरांच्या मळ्यामध्ये जणूकाही परतफेड केल्यासारखा निवारा मिळाला आणि कुटुबावरचे जीवघेणे अरिष्ट टळले.

आणखी एका मावशींशी आईने गोत जोडले. 'मोगराच्या फुलासारख्या' दिसणाऱ्या या सौम्य स्त्रीचा नवरा मात्र तांबरलेल्या डोळ्यांचा, उग्र व्यक्तिमत्वाचा होता. हे नाना आणि त्यांच्या तोंडी असणाऱ्या हरिनामाच्या घोषणासारख्या शिव्या, थोडे मोठे झाल्यावर उंडारणाऱ्या सगळया मुलांना, नाना गांजा ओढतात, याचाही उलगडा झाला आणि त्यांच्या शिव्यांनी भरलेल्या प्रत्येक वाक्यात प्रेमाव्यक्तिरिक्त दूसरे काहीही नाही, याचाही उलगडा झाला.

आणखी सोयरिकीची माणसे म्हणजे सेवानिवृत्त होऊन आता स्वतंत्र वैदयकीय व्यवसाय करणारे जवळजवळ बहिरे गोळे कंपाउडर आणि सावलीसारखा त्यांचा सांभाळ करणारी त्यांची बायको-'गोळीण बाई' या निपुत्रिक जोडप्यावरही प्लेगने पुढे घाला घातला, बहिऱ्या गोळयांना जगात एकटे सोडून त्यांची साथी असणारी बायको चार दिवसांमध्ये प्लेगने तडफाफडकी मरून गेली. तेव्हाही प्लेग झाल्याचे कळूनही पर्वा न करता त्यांना भेटायला निघालेल्या आईला थांबवावे लागले. लेखकाचा मोठा भाऊ निर्वाणीचे, कडक बोलला म्हणून ती गोळीण बाईंना भेटायला जायची थांबली.

जोडलेल्या नव्या माणसांसह सुरळीत म्हणता येणार नाही, पण आयुष्य सुरू झाले आणि पावसाळाही! त्याबरोबरच बाईआजीची तब्येत बिघडली आणि ती थोडयाच काळात अक्षरशः मरणासन्न झाली. एके दिवशी घराला कुलूप लावून आई ओढ्यावर धुणीभांडी करायला गेली असताना एकटीच असहाय्यपणे आजी मरूनही गेली. बेवारशासारखे एकाकीपणे झालेले तिचे मरण आई आणि दादा दोघांच्याही मनाला चटका लावून गेले. तिची मुळे नव्या ठिकाणी रूजलीच नाहीत. जणू हाय खाऊनच तिचा मृत्यू झाला.

आजीच्या मृत्यूनंतरचा सुनेपणा हळूहळू कमी झाला आणि मुलांच्या एकेका आजारपणाचा आईला व्याप होउन बसला. आपल्या सगळया मुलांची तब्येतीप्रमाणे आणि व्यक्तिमत्वाप्रमाणे आईने टोपननावे ठेवली होती. काही नावे दादांनीही ठेवली होती. सगळयात मोठ्यालाच लहानपणाचे असे काही खास टोपननाव ठेवल्याचा उल्लेख करूणाष्टकात दिसत नाही. नाहीतर स्वतः माडगूळकर म्हणजे 'गडदूभाई', चड्डी घालणे पसंत नसणारा 'नागूपंत', तब्येतीने किरकोळ असणारा 'बारीकराव' आणि साखरगड संस्थानाच्या वास्तव्यात जन्माला आलेला तो 'बडे'. नागूपंतांच्या पायाला झालेला भयानक त्वचारोग, त्याचे पाय कायमचे लुळे होताहोता आटोक्यात आला आणि तो बचावला. तसाच हजामत करण्याचा कंटाळा असणारा बारीकराव त्याने डोकेभरून केस वाढवले. त्यात जखमा झाल्या. त्या चिघळून कृमी झाले. रात्रभर जागून त्याच्या जखमी डोक्यातले कृमी वेचणारी आई, हेही असेच एक माडगूळकरांच्या मनावर कोरले गेलेले दृश्य आहे.

एका स्वकीयालाच तुरूंगात बंद करण्याची वेळ आल्यामुळे दादा व्यथित झाले आणि त्यांनी नोकरीत मिळालेली बढती नाकारून पुन्हा पूर्वपद स्वीकारले. लाल पट्टेवाला दिमतीला असल्याचे आईचे स्वप्न मालवले. आपली निराशा तिने 'नशिबाचे भोग' म्हणून स्वीकारली आणि लपवलीही. वास्तविक माहेरची भरपूर सुबता आणि वारसाहक्काने शेतजमीन, घरही तिला मिळाले होते, तरीही हे कष्टाचे आणि आर्थिक चणचणीचे जीवन ती कुरकुर न करता निभावत होती ही लेखकाला फार महत्वाची बाब वाटते. यातच दुष्काळात तेरावा महिना म्हणून की काय, तिला भयंकर अर्धशिशिही सुरू झाली. खुरप्याचे डाग घेणे, गोसाव्याकडून झाडपाल्याचे उपाय करून घेणे असल्या गोष्टी करून घेऊनही ती थांबली नाही, निमित्त

मात्र असणारा आजार पुढे तिला जन्मभर पुरला. वृत्तीने धार्मिक असणाऱ्या आईने कधी कुणाला दारातून रिकाम्या हाती जाऊ दिले नाही. पण दारी आलेल्या गोसाव्यालाच पिठाची याचना करण्याची वेळ जेव्हा आली तेव्हा मात्र ती फार कष्टी झाली. थोडका काळ, नशिबावर आणि कधीना कधीतरी येऊ घातलेल्या लक्ष्मीवरचाही तिचा विश्वास उडाला.

सामान्य माणसाचे आयुष्य अगदी सामान्य असते. पण संकटे एकमेकांचा हात धरून किंवा एकापाठोपाठ येऊ लागली की ते किती खडतर होऊन बसते. याचा प्रत्यय 'करूणाष्टकातून' येतो. आजारपाजार, उपासमार आणि हालाखीचे दिवस जेमतेम संपतात न संपतात तोच प्लेगच्या साथीने सर्वत्र थैमान घातले. अशात फासेपारध्याप्रमाणे झोपडी टाकून, रानात राहूनही या कुटुंबाने दिवस काढले. हाही घेतलेला अनुभव जसा भावला तसाच माडगूळकर शब्दांत आणतात. कुठेही अतिरिक्त करूणा नाही की तक्रारीचा सूर नाही. प्लेगनंतर वडिलांची कचेरी पुन्हा सुरु झाली. पण ती सरकारी बंगल्यात. शाळा सुरू न झाल्यामुळे मुलांचा वेळ रानोमाळ भटकण्यात आणि उंच झाडावर चढण्यासारखे चाळे करण्यात जाऊ लागला. प्लेगच्या निमित्ताने सुटलेले 'पडकातले' भुताटकीचे घर आईच्या नशिबाने कायमचे सुटले आणि बरा शेजारपाजार असलेल्या दुसऱ्या एका घरी हे कुटुंब आता राहू लागले आणि डोक्यात किडे होऊन झालेल्या गंभीर, दुखण्यातून वाचलेला बारीकराव आपल्या काकाबरोबर रहायला आणि शिकायला दुसऱ्या गावी निघून गेला. तेवढ्यातच आईवर पुन्हा पाचवे बाळंतपण होण्याची जबाबदारी येऊन पडली. कुटुंबनियोजनाचा फारसा प्रचार-प्रसार नसलेलाच तो काळ होता. स्त्रियांनी मुले पोटात आणि अंगाखांद्यावर वागवावीत आणि पुरूषांनी फक्त नोकरीधंदा बघावा. या पाचव्या गर्भारपणात, बाळंतपणाला कसे-कुठे जावे. काय करावे याच विवंचनेत आई होती आणि दादा मात्र आपल्या वेगळयाच विश्वात दंग, दोघांच्याही विचारधारेचे हे दोन वेगळे रस्ते त्यांच्या होणाऱ्या संभाषणातून दिसतात म्हणजेच माडगूळकरांच्या लहानपणीच्या आठवणीमधील हाही एक महत्वाचा भाग आहे. आईचे विचार-अनुभव-भावविश्व वेगळे आणि वडिलांचे वेगळे हे बालमनाला जाणवण्याइतपत स्पष्ट होते. अखेरीस आई बाळंतपणाला गेली आणि माडगूळकर वडिलांबरोबर एकटे राहिले. कधी फारसे वाटयाला न आलेले, न येणारे वडील या निमित्ताने त्यांना जवळून अनुभवायाला मिळाले. पिठलभात करण्याच्या नादात केलेले स्वयंपाकाचे मजेदार प्रयोग, पाणी भरून आणण्याच्या नादात स्वतःच विहिरीत अडकून पडण्याचा उद्योग, वडील व त्यांच्या मित्रांबरोबर काढलेल्या सहली, आणि व्यंकटेशस्तोत्र ऐकता ऐकता त्यांच्या कुशीत लागलेली झोप या सगळया त्या अनुभवातल्या गहिऱ्या-गडद-संपन्न छटा म्हणता येतील. याच काळात शिकलेली चित्रकलाही माडगूळकरांच्या लेखणीतून करूणाष्टकात उतरली आहे. ते म्हणतात- बघता बघता ड्रॉईंग बोर्डवरच्या पांढऱ्या कागदावर मोगरा तरारून यायचा!— परीक्षा देण्याआधीच-सारवरगड संस्थानाला बदली झाली आणि या कुटुंबाचे आयुष्य पुन्हा एकदा बदलले.

आतापर्यंतची 'पडका'मधली हलकी घरे, प्लेगची साथ, यातून सारवरगडला झालेली बदली अक्षरशः स्वप्नवत होती. चित्रातल्यासारख्या या गावी या कुटुंबाला आयुष्यातला थोडासा का होईना काळ, पण भरभरून जगता आला. भलेमोठे नाले, लाकडी दरवाजे, पहाऱ्यावरचे रामोशी, चौक, सोपे, वरच्या मजल्यावरच्या बैठकी, हंडया, झुंबरे आणि राजघराणातल्या पुरूषांची जिवंत वाटावी अशी तैलचित्रे हे आणि असे सुरस वर्णन माडगूळकर तपशीलसह जेव्हा करतात तेव्हा असे वाटते की एखादा लहान मुलगाच जणू गोष्टीच्या पुस्तकामधल्या अद्भूतरम्य अनुभवांचे वर्णन करतो आहे. वाडयाची देखभाल करण्याचे काम

त्यांच्या वडिलांना देण्यात आले होते. तिथला नोकरचाकरांचा राबता, मुले, माणसे उतरून बसू शकतील अशी मोठी भांडी असा सगळा अचंब्याचा कारभार होता! इथले सणवार आणि उत्सवही थाटामाटाने डोळे दिपवणारे होते. जत्रा रंगगंधांनी आणि माणसांनी फुललेल्या होत्या. 'करूणाष्टका'तल्या वाळवंटातल्या जीवनप्रवासामधला हा टप्पा जणू काही मृगजळाप्रमाणे होता. नवऱ्याच्या दिमतीला इमानी पट्टेवाला मिळण्याचे आईचे स्वप्न आता खरोखरच पुरे झाले. इतकेच काय, तिच्या स्वतःच्याच नित्य दिमतीला एक 'सखूबाई' आली. या अल्पकाळाच्या परक्या ऐश्वर्याच्या का होईना, पण आधाराने तिने आपल्या धाकटया दिराचे लग्न 'जगदंबेच्या कृपे' ने साग्रसंगीत, थाटामाटात पार पाडले. पुढे या वास्तवातल्या सुखालाही ग्रहण कळा लागली. जामदारखान्यादल्या दागिन्यातून पन्ना रत्न हरवले. अनुभवी लखोबाच्या (पट्टेवाला) कसून केलेल्या शोधामुळे ते सापडले खरे; पण दरम्यानचा काळ कसोटीला उतरवणारा ठरला. यातच माडगूळकरांचे वडील बंधू मॅट्रिक नापास झाले. अपमानित होऊन तो घर सोडून परागंदा झाला. सावरगडशी असणारे लागेबंधही संपले आणि औट घटकेचे ऐश्वर्य उपभोगणारे वहिवाटदार बनलेले लेखकाचे वडील आपल्या मूळ कारकूनपदी पुन्हा रूजू झाले.

दरम्यान आईची बाळांतपणे सुरूच होती. आठवे मूल-मधू जन्मला. कविराज-(गदिमांना) भ्रमंतीच्या अंती अखेरीस सिनेमा स्टुडिओत नोकरी मिळून त्याची कारकीर्द बहरू लागली. आणि चढउताराच्या न्यायाप्रमाणे दादांना नोकरीतून कमी करण्यात आले. उमेदीने खचलेल्या या गृहस्थाने या वेळेपासून आयुष्यात उभारी अशी पुन्हा धरलीच नाही. आई मात्र चिकाटीने आणि चिवटपणे आयुष्याशी झुंजतच राहिली. थोरल्या मुलाला बोलवून तिने कर्जे फेडण्याची विनंती केली. ती फेडली. माडगूळकर म्हणतात, 'आई तिची वाट कधीच खुंटू दयायची नाही' त्याप्रमाणे तिचे परिस्थिती आणि संकटांशी चार हात सुरूच राहिले. माडगूळकरांनी ड्रॉईंगच्या परीक्षेसाठी मास्तरांच्या घराचा आसरा घेतला. हे दिवसही पुन्हा खूप हालाखीचे होते आणि अशातच अनामिक दुखण्याचे निमित्त होऊन हसता -खेळता लहान निरोगी मधू मरण पावला.

पुढे कविराजांनी अमाप यश मिळवले. लग्न ठरवले. ते लग्न थाटात पार पडले. आणि खऱ्या अर्थाने जबाबदारीतून उतारवयाकडे आई दादांचा प्रवास सुरू झाला. ते पुन्हा आपल्या जुन्या गावी, जुन्या वाडयात जाऊन राहिले, 'करूणाष्टकाच्या' अगदी सुरूवातीला जे गाव सोडल्याचा उल्लेख येतो, ते गाव, ते घर आणि त्यावेळची आता उरलेली गोतावळयातली माणसे त्यांना पुन्हा मिळाली. आपले मूळ गाव आणि मूळ पूर्वजांनी बांधलेले घर याविषयीचे प्रेम (कोणाचेही) सर्वश्रुतच आहे. पण माडगूळकरांनी त्यासाठी फार सुंदर शब्द वापरले आहेत,'..त्यात हे घर पार वाडवडिलांनी उभारलेलं असलं, तर तिळाभोवती अनेक सुखद स्मृती चिकटून त्यालाही व्यक्तिमत्व आलेलं असतं!' साखरेच्या कणासारखे मांया करणारे चुलत आजोबा, आणि काटयाप्रमाणे बोचरा दुष्ट स्वभाव असणारी चुलत आजी या लहानपणाच्या आठवणी चित्रातल्या / गोष्टीतल्या पांढऱ्या किंवा काळया रंगातल्या पात्रासारख्या वाटतात. म्हसोबाचे झाड कापून त्याची तुळई घराला घातली. त्या तुळईखाली झोपलेला प्रत्येकजण दरवेळी ओरडत जागा होई. त्याचप्रमाणे 'ताईआई' ही पण एक मजेशीर संतापी ग्रामदेवता. तिचा 'नैवेद्य' चुकला की घरातल्या वस्तू गायब होत!

याच वळणावर शैशव संपून पौगंडावस्था आणि तीही संपून जाणतेपण माडगूळकरांना झाले असावे. त्यांचे घरी कुणालाही न सांगता 'छोडो भारत' चळवळीसाठी निघून जाणे, महायुध्दाचे गांभीर्य समजणे,

स्वातंत्र्याचा आणि ते मिळाले म्हणून जनमानसाला होणाऱ्या आनंदाचा उल्लेख करणे या गोष्टी याची साक्ष देतात. गांधीजींच्या हत्येनंतर झालेली जाळपोळही अशीच जनमानसावर खोल परिणाम करणारी होती. त्या घटनांचे पडसादही 'करूणाष्टक' मधील समग्र आयुष्यांच्या या टप्प्यावर स्पष्ट उमटलेले दिसून येतात. या मोठ्या सामाजिक बदलानंतर माडगूळकरांचे वडील फार जगू शकले नाहीत. ते निवर्तले. जगण्याच्या न जाणे कुठल्या चिकाटीवर आणि पाठबळावर आई मात्र थकल्या देहाने उतारवयातही वाट चालतच राहिली.

पाठोपाठ जन्मलेले हे सगळे मजेमजेशीर टोपणनावाचे भाऊ कमीजास्त प्रमाणात कमवू लागले. कोणत्या ना कोणत्या प्रकारे मार्गी लागले. पण आईच्या पोटच्या दोन्हीही मुलींची मात्र पूर्ण आयुष्यभर वाताहतच झाली. मोठी बहीण कष्टाने-सासुरवासाने मेली. दूसरी मानसिक-बौध्दिक कमतरता घेऊनच निपजली तरी भाग्य उजाडल्यासारखा संसार थाटला. पण तोही औट घटकेचाच खेळ ठरला. आजारी नवरा मेला आणि तीदेखील मनाने खचली आणि मृत्यूला सामोरी गेली. या दोन मुलींच्या वियोगाने आईचा देवावरचा आणि दैवावरचाही विश्वास उडाल्यासारखा झाला. तिने जपमाळ सोडली. सगळयात शेवटचा धक्का तिला बसला तो पुत्रवियोगाचा. तोही थोरल्या, कर्तृत्ववान, दिग्गज मुलाच्या वियोगाचा. त्यानंतर मात्र तिला पुण्यातल्या वास्तव्यात रुचीच उरली नाही. अखेरीस निसर्गनियमाप्रमाणे नियतीने लिहिलेला तिचाही जाण्याचा दिवस उगवला. या जाण्याचा ध्यास तिने पुत्रवियोगापासूनच घेतलेला माडगूळकरांना जाणवलेला दिसतो. ते म्हणतात,''त्याच वेळी तिच्या मनातलं मला कळलं, ह्या पायऱ्या आता पुन्हा कधी काळी ती चढणार नव्हती''. 'करूणाष्टका'चा प्रवास आईच्या मृत्यूपाशी संपतो आणि संपत नाहीही. 'आई गेली की माणसाचं बरचं काही जातं' म्हणजे जे जाते ते जपून ठेवावेसे आसुसून अनुभवलेले. रक्ताच्या, नाळेच्या ओढीचे, उबदार असते. ते रितेपण 'करूणाष्टका'च्या शेवटच्या कोणत्या शब्दांत आहे हे सांगणे अवघड असले तरी ते तिथे ओतप्रोत भरलेले आहे हे नक्की.

❖ ❖ ❖

# प्रकरण ५

## करुणाष्टक : वाङ्मयीन वैशिष्ट्ये

प्रस्तुत पाठात आपण 'करूणाष्टक' मधील भाषाशैली, प्रादोशिकता व दिसून येणारे सामाजिक वातावरण यांचा अभ्यास करावयाचा आहे.

व्यंकटेश माडगूळकरांच्या लेखनामध्ये सगळयात प्रथम जाणवणारी गोष्ट म्हणजे स्वाभाविकता, सहजता आणि भाषेच्या प्रवाहामधले खंड न पडू देणारे सातत्य! १९६२ साली प्रकाशित झालेली ही कादंबरी म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळातील ग्रामीण भागात राहणाऱ्या एका दरिद्री ब्राम्हण कुटुंबाच्या जगण्याची आणि त्या जगण्यातल्या संघर्षाची कहाणी आहे. 'आईची आठ मुले म्हणजे वेगवेगळया प्रकारच्या आठ समस्या होत्या'. अर्थातच हे 'अष्टक' म्हणजे आई', तिची मुले आणि आपापसात घट्ट विणीने बांधलेले त्यांचे आयुष्य आहे. ही सगळी भावंडे एकमेकांपेक्षा वेगळी, त्यांचे स्वभाव-आवडीनिवडी आणि व्यक्तिमत्वे वेगळी आणि सगळया घरादारातल्या लहान-मोठ्यांचे आईपण निभावणारी आई ही विलक्षण जिद्दीची बाई आहे. तिने सातत्याने बरेच काही सोसल्यामुळे तिच्यात जगण्यात चिवटपणा आला आहे. सर्व प्रकारच्या कठीण काळामध्ये ती घरादाराला जगण्याचे बळ देते.

माडगूळकरांच्या सिद्धहस्त लेखणीने ही सगळी व्यक्तिचित्रे अक्षरशः जिवंत केली आहेत. 'करूणाष्टक'ची भाषाशैली पाहताना ती केवळ वाङ्मयाच्या व व्याकरणदृष्टया वेचून वेगळी काढता येत नाही. कारण कांदबरीतील सामाजिक पार्श्वभूमी, काळ व प्रादोशिक वैशिष्टये यांची ती प्रतिनिधी आहे. त्यामुळे या कुटुंबाने ठिकठिकाणी केलेल्या वास्तव्याचा ग्रामीण परिसर, लोकजीवन, लोकरीत, व्यवहार, ब्राम्हणी संस्कार, कौटुंबिक परस्पर संबंध, जगण्यातले चढ-उतार, रागलोभ-सुखदुःखे, जवळीक-दूरावे हे सर्वच या भाषेतून प्रत्ययकारी स्वरूपात सामोरे येतात.

'करूणाष्टका'तील सर्वच पात्रांना सातत्याने माणसे जोडायचा 'छंद' आहे. मूळगाव सोडून जाताना त्यामुळेच ही 'आई' सगळया वडीलधाऱ्यांच्या पाया पडते आणि 'येत्ये हं' म्हणून पदराने डोळे टिपते. आपल्या लहान मुलांइतकीच म्हताऱ्या सासूचीही काळजी घेते. 'आजी आधी काठीसारखी त्यात भेदरलेली' यातून तिचे गरीबडे चित्र डोळयांपुढे उभे राहते. रूळांना अडखळून पडलेली आजी पुढे दुखावणाऱ्या मनगटाला बिब्बे घालत राहते. बिब्बा हा हमखास प्रादेशिक उपाय.

नवीन गावी गेल्यावर 'छडी लागे छमछम' प्रमाणे वागणारे शाळेतले मास्तर माडगळूकरांच्या वाटयाला येतात. हे मास्तर त्यांना गोष्टीतल्या बकासुराप्रमाणे वाटतात आणि मुलांना बदडतात. त्यामुळे शाळा बुडवून रानोमाळ भटकणे हा आवडता उद्योग बनतो. हेही काळानुरूप वैशिष्ट्यच.

नशिबावर गाढ विश्वास, हे करूणाष्टकातील सर्वच पात्रांचे सामाईक स्वभाववैशिष्टय. त्यामुळेच आजीच्या तथाकथित वेडाबद्दल समर्थन करताना आई म्हणते की, नशिबात नसलेल्या धनाच्या हंडयाला तिने

हात लावला आणि त्याची माती झाली. निपुत्रकाच्या वास्तूचे घेतलेले भय, भासामध्ये दिसलेली ओली बाळांतीण, विठूकाकांनी आणलेला थोतांडवादी मांत्रिक ह्या सर्व गोष्टी त्या काळामधले रूढ असणारे विश्वास, अंधश्रध्दा दाखवतात.

ऐश्वर्य आणि सुखाच्या कल्पनाही काळानुरूप वेगवेगळया असतात. आईला आपल्या नवऱ्याला बढती मिळाली म्हणजे आता आपल्या आणि त्याच्याही दिमतीला लाल पट्टेवाला येईल अशी स्वप्ने दिसतात. याच्याकडून मिळणारी सेवा म्हणजे फारतर मुलांना शाळेत आणणे-सोडणे, दळण आणि पाण्याची एखादी घागर आणून देणे इवढीच माफक अपेक्षा! तांब्यांचे जे ऐश्वर्य वर्णन केले आहे. त्यातही कुठे भपका किंवा आधुनिकता नाही. जमीनजुमला, शेतीमाल, इरकली लुगडी, रूपयाएवढे कुंकू आणि ठसठशीत सोन्याचे दागिने. आईच्या सुखवस्तू माहेरचेही वर्णन आहे. पण त्या काळातल्या जनमानसात दाखवण्याच्या श्रीमंतीचे महत्व नव्हतेच. हे पदोपदी दिसते. असणारे ऐश्वर्य असे साधे आणि नसणाऱ्या ऐश्वर्याची वाट बघायची तीही व्रतस्थपणे. मुलांना जेवू घालून शिंक्यामध्ये लक्ष्मीसाठी 'कोर-अर्धी' तरी दशमी ठेवायची म्हणजे नकळत आलीच तर ती उपाशी राहणार नाही! नियतीवर ठाम विश्वास आणि जाऊ तिथे 'आतड्याचा गोतावळा' निर्माण करण्याची तळमळही ह्या माणसांमध्ये कायमची दिसते.

या काळामधली सामान्य माणसाच्या आयुष्यातली अतिशय मौल्यवान चीज म्हणजे उच्च जीवनमूल्ये आणि संस्कार! या कुटुंबाची धाटणी ब्राह्मणी असली तरी ती उदार आहे, सुसंस्कृत आहे. कर्मठ नाही म्हणूनच आई लेखकाला आठवण करून देते की, 'तू पाटलिणीचं दूध पिऊन वाढला आहेस,' चार दिवस बाजूला बसण्याच्या काळात ती जातपात विसरून आपल्या मुलांना कुणबिणेकडे जेवायला पाठवते आणि 'मुंजी होईपर्यंत चालतं' असेही सांगते. दारी आलेल्या याचकाला रिते परत पाठवायचे नाही हे तिचे तत्त्व आहे. पुढे उतारवयात मात्र दारी आलेल्या कुणालाही भसाभसा दान केल्यावरून ती लेकीसुना आणि मुलांचा दोष पत्करते. गांधीहत्येनंतरच्या जाळपोळीत रामोशाला आपले देव आगीपासून 'वाचवायला' सांगते.

'छोडो भारत चळवळ', स्वातंत्र्यप्राप्तीचा काळ, दुसरे महायुध्द, गांधीजींची हत्या या काही महत्वाच्या राजकीय घटनांचे भिन्न भिन्न पडसाद करूणाष्टकातल्या आयुष्यावर उमटले आहेत. पैकी माडगूळकर स्वतः 'छोडो भारत' आंदोलनात सहभागी झ्ले. गांधीजींच्या हत्येनंतरच्या जाळपोळीत तर समाजाच्या सर्व स्तरांना झळ सोसावी लागली. आणि आपण काही अपराध केला नसताना हे दुःख आपल्याच वाट्याला का आले; याची हाय खाऊन दादांनी मनाने मृत्यूला आपलेसे केले. परंतु स्वातंत्र्य मिळणे आणि महायुध्द या दोन्ही मोठ्या घटनांचा लहान गावांमधील सामान्य आयुष्यांवर फारसा काही खोल परिणाम झाला नाही, असे माडगूळकर स्वतःच म्हणतात.

त्या काळातले सणवार, उत्सव-यात्रा, विश्वास देवदेवताही वैशिष्ट्यपूर्ण भासतात. लेखकाच्या आजोबांनी रामोशाच्या विरोधात जाऊन 'म्हसोबा' च्या सावलीचे झाड तोडले आणि त्याची तुळई घराला घातली. मनाला खाणाऱ्या या कृत्यामुळेच की काय; तिच्याखाली झोपणारा कुठल्याही पिढीतला कोणीही झोपेतून किंचाळत जागा होत असेल की काय? तसेच घराला तारणे आणि रक्षण करण्यापेक्षा नैवेद्य चुकला म्हणून रूसणारी 'ताईआई' ही ग्रामदेवता इथे आडात टाकली जाते, एवढेच नाहीतर तिच्यावरच्या रागापायी त्यावर उकीरडाही केला जातो; ही अगदी तत्कालीन विक्षिप्तपणाची मसालेवाईक उदारहणे.

या काळातली आजी सर्रास तपकीर ओढते. पंचक्रोशीत डॉक्टर-वैद्य नसल्यामुळे कितीही मोठया आजार-जखमांवर सहसा झाडपाल्याचेच उपचार होतात. मुलाला एरंडेल देऊन उरलेली बाटली वाया कशी घालवायची म्हणून तांबेमास्तर ती अख्खी पिऊन टाकतात. आणि अर्धशिशीवर उपचार म्हणून आई खुरपे तापवून जनावरासारखं भुवयांवर डाग घेते किंवा चक्क दारी आलेल्या गोसाव्याकडूनही 'तोडगा' करून घेते. आईचा 'ढाणक' सासरा जेव्हा रक्ताची गुळणी एकाएकी येऊन मरतो तेव्हा नक्कीच कुणा वैऱ्याने 'मूठ मारली' आणि घरातली लक्ष्मी 'होत्याची नव्हती' झाली असे ती म्हणते.

शाळेतले मास्तर बकासुरासारखे होते. म्हणून की काय माडगूळकरांचे पाय रानोमाळ भटकणे जास्त पसंत करू लागले. शिक्षण म्हणजे धोंकपट्टी, छडया आणि दरारा अशीच प्रतिमा असण्याचा तो काळ होता. त्यात प्लेगसारखी नैसर्गिक आपत्ती! जीव वाचवणे आणि हातातोंडाची जेमतेम गाठ पाडायचे पाहणे महत्वाचे. त्यामुळे वर्षाकाठी मुले शाळेत किती दिवस जात हा प्रश्नच होता. नागूपंतांची 'आगपैण' बारीकरावांच्या डोक्यातले 'कृमी' ह्यासारखी लहानमोठी आजारपणे म्हणजे पुन्हा शाळेच्या सुट्टीची हमी. त्यामुळे नदी-ओढ्यात डुंबणे, आईबरोबर धुण्याभांडयाच्या वेळी पाणी मनोसोक्त खेळणे, उंच झाडावरची पक्ष्यांची घरटी तपासणे, मोठे वाडे असणाऱ्या खेळगडयांबरोबर धुडगूस घालणे किंवा कुठलीतरी खेळणी बनवण्यासाठी घोडीच्या शेपटीचा केस मिळवताना तिच्या टापेचा तगडा 'प्रसाद' खाणे असेच उद्योग जास्त चाललेले दिसतात. निसर्गाचा सहवास, त्याच्याशी जवळीक आणि त्यावर नितांत प्रेम 'करूणाष्टका'तल्या लहान मुलांमध्येही पुरेपुर दिसून येते. शाळेत न रमणारा माडगूळकरांचा जीव ड्रॉईंगच्या परीक्षेसाठी आणि चित्रकलेसाठी मात्र अगदी आसुसतो. ते म्हणतात,'हे जग नाजूक रेषांचं आणि मऊ खोडरबरांचं, दाट रंगांचं आणि फुगीर स्पंजांचं, मोगऱ्याच्या नाजूक डहाळयाचं आणि कन्हेरीच्या गुलाबी फुलांचं होतं ओल्या कुंचल्याचं आणि रंगीत खडूचं होतं' नाही म्हणायला त्यांचे वडील बंधू अभ्यासात सातत्याने गर्क असलेले दिसतात. ते रात्री कारवोटीला पुस्तके मारून मित्राकडे जातात. पण त्यांचाही कल कर्मठ पुस्तकीपणापेक्षा कलेकडेच जास्त! मॅट्रिकला नापास होणे याची साक्ष देतात.

'करूणाष्टका'तल्या काटकसरी किंबहुना दरिद्री जीवनामध्ये खाण्यापिण्याच्या पदार्थाची यादी येते, तीही अगदी साधीसुधी! पण या साधेपणाला आईच्या, आजीच्या हाताची, घरगुतीपणाची लज्जत आहे. निसर्गात जे मुबलक आणि मोल न मोजता मिळाले, ते स्वीकारण्याची आणि त्याचा उपयोग करण्याची नम्र वृत्ती आहे. इथली आजी रिकाम्या वेळात रानोमाळ जाऊन घोळ, करडा, पात्रा,सरारा अशा भाज्या वेचून आणते आणि शिजवते. शाळेतून आल्यावरचा खाऊ म्हणजे तव्यावर भाजलेल्या शेंगा किंवा हरबरे फारतर तेलतूप कणीक गुळाचा इवलासा लाडू. रोजचे जेवण दशम्यांचे, प्रवासातली शिदोरी टिकाऊ मुगाच्या लाडवाची. आई मात्र बाळंतपणासाठी जेव्हा जाते आणि माडगूळकर काही महिने वडिलांबरोबर एकटे राहतात तेव्हा थोडीफार मजा या खाण्यापिण्यात आणि स्वयंपाकात येते. केलेले पिठले प्रथम प्रयोगात फसते आणि कोष्टाची खळ' होते. तांदूळ नुसतेच भिजतात मग मात्र पिठलेभाताचे एकदा शिकलेले तंत्र आयुष्यभर अडी-अडचणीला पुरून उरते. वडिलांचे मित्रमंडळ आणि त्यांच्या ट्रिपांमधला खाऊही असाच साधा-घरगुती पण चटकदार, कांद्याची थालपिठे, ढबू मिरच्यांची भाजी आणि मसालेदार खिचडी. साखरगडच्या वास्तव्यात मात्र साग्रसंगीत पुरणा-वरणाचा चारीठाव स्वयंपाक येतो.

माडगूळकरांचे व्यक्तिवर्णन पुस्तकात त्यांनी काढलेल्या रेखाचित्रांसारखे आहे. थोडक्यात, पण ठळक आणि बोलके. 'हाताचा मुटका' गालावर ठेवून जेवणाऱ्या मुलांकडे प्रेमाने बघणारी कारंडेमामी, तिचे ठळक कुंकू आणि भडक लुगडे, चकमकीत पितळी थाळया हे सर्व नेपथ्यासह जणू पात्र उभे करणारे आहे. आईचा 'ढाणक' सासरा, बाराबंदी घालणारा पान खाऊन रंगलेल्या ओठांचे-पांढऱ्या शेंडी-मिशांचे प्रेमळ चुलतसासरे ही अशीच ठळक चित्रे. 'मुळं उघडी पडलेल्या वेलीसारखी' बाईआजी, तिचे केविलवाणे मरण आणि पिठात उमटलेले चिमणीचे पाय तिचा 'अस्रापपणा' जास्त अधोरेखित करतात. 'मन चंगा तो काटवट मे गंगा', 'पंतांच्या राज्यात घटकेत सौभाग्यवती, तर घटकेत गंगाभागीरथी' या म्हणी तर आई-दादांची स्वभाववैशिष्ट्ये अगदी एका वाक्यात सांगतात. घारीचे घरटे पाहण्याचा उद्योग केल्याबद्दल ओल्या चिपाडाने मार मिळाला. शहाणपण कधी येणार- या आईने विचारलेल्या प्रश्नावर मोठेपणी माडगूळकरांच्या मनात पडसाद उठतात - 'अंगावर ओढलेल्या चिपाडानांच जर शहाणपण येत असतं, तर समस्त जनावर शहाणपण नसती का शिकली?

माडगूळकरांच्या लेखनातली काही वाक्ये अगदी काव्यमय अनुभव देऊन जातात. ती नमुन्यादाखल सांगता येतील. भुताखेताच्या वावराचे घर सोडून नवीन घरी रहायला आल्यावर तिथला तूपविक्रेता घरमालक त्यांच्या भाषेत 'नित्य पाघळल्यासारखा' हसायचा. तसेच तो 'पोशटकी' म्हणजे पोरसवदा होता. बाईआजी नवीन गावात आली आणि मेली. त्यानंतर आईने नवीन गाव सोडल ते बाळंतपणासाठी. एक मृत्यू आणि एक जन्म. माडगूळकर लिहितात,'जीवनाचा हा महानद केवढा विशाल आणि कसा धोधाट वाहत असतो!' वडिलांना विहिरीवरून पाणी आणून चकित करायचे ठरविले, पण माडगूळकर स्वःच विहिरीत अडकले. वडिलांनी वर शेंदून घेतले. पण नंतर ही आठवण शब्द-बध्द करताना त्यांना वाटते, 'पुढे असा गर्तेत पडण्याचा उद्योग मी आयुष्यात आणखी काही वेळा केला, पण दादा मरून गेले होते. आई सतत दूर होती. मला कोणीही शेंदून वर घेतले नाही. साखरगडला रहायला येण्याचा स्वप्नवत अनुभव शब्दात उमटतो तोही स्वप्नाळू भाषेतच 'गरीबखान्यात झोपी गेलेला एकजण सकाळी जागा झाला आणि आपण राजवाड्यात आहोत' असं त्याला आढळलं 'तसेच तळहातावर भाग्यरेषा असावी, तशी ह्या गावाच्या मधोमध सुंदर, बारा महिने वाहती अशी नदी होती'. साखरगडच्या वाड्याची भव्यता पाहून ते म्हणतात, 'भल्यामोठ्या वडावर चार-सहा चिमण्याच फक्त रहाव्यात, तसे आम्ही या वाडयात रहात होतो'. पुढे मुसलमान ड्राईंगमास्तरांकडे राहण्याच्या अनुभवाबद्दल ते म्हणतात, 'भारतातील ढोक पक्ष्याप्रमाणे, शिक्षकाची ही जातही आता नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. 'तर भावाने हळूच आपली होणारी वाहिनी दाखवल्यावर, अर्धवट वयात असलेल्या त्यांच्या मनात हुरहूर उठते. ती त्यांना 'मासिकावरच्या चित्रा' सारखी वाटते.

पुढे गांधीहत्येनंरच्या जाळपोळीबद्दल ते म्हणतात,'जमाव हा रामायणातल्या कबंध राक्षसासारखा असतो. डोकं नाही. छातीवर डोळा तोही एकच. पाय नाहीत. दोन्ही हात मात्र सहस्त्र योजनं पोचू शकतील, असे लांब, तर आईच्या आयुष्याबद्दल ते म्हणतात, 'वाट चालताना ओझं वागवणं हे स्त्रीच्या भाळी अगदी इतिहासपूर्वकाळापासूनच आलं आहे'.

'करूणाष्टका'तला प्रत्येक अनुभव हा मनापासून घेतलेला आणि तितकाच मनापासून व्यक्तही केलेला आहे, हेच त्याच्यातील यथार्थते मागचे गमक असावे असे वाटते.

❖ ❖ ❖

## प्रकरण ६

# 'करुणाष्टक' या शीर्षकाची अन्वर्थकता

'करूणाष्टक' या कादंबरीचे अंतरंग पाहात असताना प्रकर्षाने जावणते ती निवेदनामधील सहज-स्वाभाविकता आणि प्रामाणिकपणा! या साहित्यकृतीमध्ये व्यंकटेश माडगूळकरांच्या लहानपणाविषयी सहज ओघाने लिहिले गेले आहे.

परिस्थिती आणि जबाबदारी यांच्या ओझ्यामुळे पिचले गेलेले वडील. ते आपली वृद्ध आई, बायको आणि चार मुलांना घेऊन संस्थानच्या 'सरकारी' कचेरीमध्ये नोकरी करण्यासाठी मूळ राहते गाव सोडून परगावी रवाना होतात. येथूनच 'करूणाष्टकाचा' प्रवास सूरुच झाला आहे. पूर्वीच्या काळी स्त्रियांचे आयुष्य म्हणजे जन्म झाला ते माहेरचे गाव आणि जिथे लग्न करून दिले जाई ते सासरचे गाव; एवढेच मर्यादित रहात असे. जास्त करून सासरगावीच त्यांची पाळेमुळे रूजत ती मृत्यू येईपर्यंत, परंतु बदलत्या काळानुसार, कुटुंबाच्या आर्थिक गरजेनुसार, मुलाने परगावी घेतलेली कचेरीतली नोकरी वृद्ध आजीने मनाने स्वीकारली तरी तिला पचनी पडणे जड जाते. एका जमिनीत पूर्ण वाढ झालेला परिपक्व वृक्ष दुसरीकडे समूळ उपटून लावल्यावर त्याचे न रुजणे आणि सुकून संपून जाणे, ह्या आजीच्या व्यक्तिरेखेतून यथार्थपणे चित्रित होते. ''ह्या प्रसंगानंतर मुळं उघडी पडलेल्या बेलीसारखी आजी सुकत सुकत गेली''.

आज पासून पन्नास साठ वर्षापूर्वी सर्वसाधारण घरगृहस्थीचे असणारे ते एक प्रतिनिधीक चित्र आहे. बदलती सामाजिक पार्श्वभूमी, एकापाठोपाठ एक होतच राहणारी मुले, प्लेगसारख्या आरोग्यविषयक समस्या, गांधीजींच्या हत्येनंतर उसळलेल्या दंगलीसारख्या सामाजिक-राजकीय समस्या या सगळयांना तोंड देता देता तत्कालीन कनिष्ठ मध्यमवर्गीय घरांमध्ये साधारण चित्र असेच होते. त्यांना लाभलेला वारसा म्हणजे उच्च जीवनमूल्यांचा, सत्याचा, सचोटीचा आणि ज्ञानाचा होता. म्हणूनच अशा घरातली मुले नुसती कमवती आणि सुखी झाली नाहीत तर नावारूपालाही आली.

'करूणाष्टक' ही आत्मचरित्रात्मक कांदबरी आहे. माडगूळकरांच्या आईवडिलांच्या बहुतांश संसारप्रवासाचे ते शब्दचित्र आहे. त्यांच्या आईच्या जीवनाच्या या वर्णनात शब्दांपलीकडच्या बऱ्याच काही गोष्टी सूचित, ध्वनित होतात. समृद्ध असे बालपण अनुभवलेल्या, अल्पवयातच लग्न होऊन 'भोग नशिबाचे' सुरू झालेल्या, या स्त्रीने कुठे आक्रस्ताळेपणा केलेला नाही. नवरा अथवा मुलांवर राग काढलेला नाही किंवा देवाला अथवा नशिबालाही कसला बोल लावलेला नाही. सासू जोवर जिवंत आहे तोवर तिला 'अर्धवट' देखील म्हणणारी ही स्त्री. तरीदेखील एखाद्या आजारी लहान मुलाचा संभाळ करावा तशी सासूला सांभाळते. आपण बाहेर गेल्यानंतर बेवारशासारखा झालेला सासूचा देहांत तिच्या मनाला खातो. ''अस्राप म्हतारी! देवानं तिला चिमणीच्या जन्माला घातलं!'' असा विश्वास तिला वाटतो.

वाङ्मयामधले कारूण्य फक्त शब्दांमधूनच व्यक्त होणारे नसते. ते अनुभूतीमध्ये असते. ही अनुभूतीच 'करूणाष्टक' मध्ये वारंवार येते व म्हणूनच ते शीर्षक या कादंबरीकरिता अन्यर्थक ठरते. उदा. 'उतारावरून

ढेकूळ गडगडत जावं, तशी आईमागोमाग आजी जात होती.' यातून परिस्थितीमुळे माणसाच्या आयुष्यात येणारी अगतिकता दिसते. जिथे आजीची पाळेमुळे होती, तिथून नाईलाजास्तव उखडल्यासारखे तिला इतक्या वयात यावे लागले. यासाठी वापरलेली ही उपमा अगदी त्या वातावरणाला साजेशी व थोडक्यात बरेच काही सांगणारी आहे.

पन्नाससाठ वर्षापूर्वीच्या त्या काळात माणसांची व्यवसायिक वृत्ती धडाडीची नव्हती. चाकोरीबद्ध, वंशपरंपरागत कामेच सहसा केली जात आणि पुढच्या पिढीलाही 'धोपाटमार्गा सोडू नको' चे हे बाळकडू दिले जाई. अशावेळी आर्थिक सुबत्ता वडीलोपार्जित असल्यास असे. 'करूणाष्टक' मधील आईचे सासरे कर्तृत्ववान होते. तिच्या माहेरी वडिलोपार्जित सुबत्ता होती. या पार्श्वभूमीवर नवऱ्याबरोबरचा तिचा संसार मात्र सतत शारीरिक, आर्थिक कष्टांनी भरलेलाच असतो. नव्या घरी आल्यापासून तिला सतत भास होत, आकृती दिसत, आवाज ऐकू येत. माडगूळकरांनी या भासांची कारणे फार मार्मिक व पटण्यासारखी दिली आहेत. ते म्हणतात, ''वारंवार तिला होणारे नाना प्रकारचे भास हाही तिच्या विलक्षण कल्पनाशक्तीचाच खेळ असला पाहिजे. रोजचं जीवन इतकं काळोखाचं होतं, की त्यातून बाजूला जाण्यासाठीही तिचं मन हा भासाचा खेळ मांडून त्यात रमत असावं. वडिलांची नोकरी संपली. आई गावी रहायला गेली आणि तिथून पुढं हा खेळ कायमचा गुंडाळला गेला''. असे ते नोंदवतात.

आजीच्या अर्धवट असण्याचे कारण देतानाही आई अवसे-पौर्णिमेचे आवाज आणि गुप्तधनाच्या हंडयाचा संदर्भ देते. नशिबात नव्हते म्हणून धनाने भरलेल्या हंडयाला हात (आजीचा) लागताच त्याची माती झाली. 'नशिबात आहे तेवढेच मिळते' ह्या तिच्या स्वीकारामध्येही हतबलता आणि कारूण्यच दिसून येते.

'करूणाष्टक मधली रोगराई आणि सातत्याने मुला-माणसांना होणारे आजारदेखील परिस्थितीच्या दयनीयतेला पुष्टी देणारे ठरतात. तरी त्यांचा बाऊ कुठेही केलेला दिसत नाही. आजारपण आणि रोगराई आणणारा पावसाळादेखील माडगूळकरांना घरातल्याच रडक्या पोरासारखा, म्हणजे नेहमीच्या गोष्टीं सारखाच एक वाटतो. ''एखादं रडवं पोर मांडी घालून बसतं आणि तोंड वर करून तासभर रडतं, तसा हा पाउस कुढा आणि हट्टी होता''..थंडीताप, बाईआजीचा अतिसारामुळे झालेला मृत्यू, लेखकाच्या धाकट्या भावाच्या पायाला ग्रासणारा भयंकर त्वचारोग उर्फ 'आगपैण', आईला झालेली असह्य अर्धशिशी आणि या सगळयांवर अपरिमित जीवित हानी करणारा प्लेग.. सगळया रोगांनां नशिबाचे भोग म्हणून तोंड देणाऱ्या ह्या कुटुंबाच्या प्रमुखाने प्लेगलाही अशीच थंड प्रतिक्रिया नोंदवली. ते शेजारच्यांना म्हणतात,''तुम्ही जाल आपल्या गावी. एकटे आहात. मी बिऱ्हाड उचलून कुठे जाऊ?'' प्लेगला टाळण्यासाठी तांब्यांच्या शेतावर राहण्याकरिता नाईलाजास्तव बांधलेली झोपडीदेखील अशीच वेडीबागडी, बापुडवाणी आहे,''आईचे चार गोड शब्द खर्चून तेवढ्या किमतीत केवढी आणि कशी झोपडी येणार?....ह्या सगळया चांगल्या वस्तीत फक्त आमचीच झोपडी अगदी सुमार होती. रस्त्याकडेला बसलेल्या म्हताऱ्या भिकारणीसारखी ती वाकलेली, दीनवाणी दिसे''.

'करूणाष्टक' मधल्या आईला मुली कमी आणि मुले जास्त. आईला आपली सगळीच मुले सारखी असली तरी तिचे मुलीशी असणारे नाते खास वेगळे, जवळचे असते. लेखकाच्या लहान बहिणीचे शारिरीक, मानसिक स्वास्थ्य ठीक नव्हते. त्यातच लग्नानंतर सारे कांही व्यवस्थित असताना अचानक

नवरा गेल्याने, कोडमडलेली पोटची पोरगी पाहणे आईला जड गेलेले दिसते. तिचे जगापासून अलिप्त होणे आणि आत्महत्येचा मार्ग अवलंबणे नक्कीच यातनादायी ठरते- तिच्या भावंडापेक्षाही तिच्या आईकरिता जास्त यारवेरीज मोठ्या बहिणीच्या संसारात सातत्याने झालेली तिची परवड कायमचीच राहिली. नोकरीच्या नव्या गावी-घरात कोणी नसताना अंथरूणात बाईआजीचा झालेला केविलवाणा अंत आणि मोठया आक्काचा- तळयाकाठी पाय घसरून थोडक्या पाण्यातच डोके बुडून झालेला अंत, या दोन प्रसंगातली अगतिकता सारखी वाटते. दोन मुलींच्या मृत्यूनंतर देवालाही आईने दूर करावे ही गोष्ट लेखकाच्या मनाला लागली आहे.

हक्काची शेतजमीन कुळाच्या घशात जाऊ नये म्हणून गावी पाठवलेला, शिक्षण सुटलेला नागू, उत्तम शिकलेल्या कर्तृत्ववान बडेची झालेली निंदा-नालस्ती आणि आयुष्याच्या अगदी शेवटी सगळयात जास्त खचवणारा थोरल्या दिग्गज मुलांचा मृत्यू- 'करूणाष्टका'मधील हे सत्र नियतीचा स्वीकार दर्शविते. ज्या वेगाने करूणाष्टकात मुलांचे जन्म झाले, त्याच प्रमाणात काहींची जिवावरची आजारपणेही झाली. पण असे म्हटले जाते की, जुनी हाडे बळकट असतात.'' त्या न्यायाने ही आई आणि तिची इतर मुलेही भरपूर जगली. जगल्या नाहीत त्या तिच्या मुली. आणि जितके जगल्या त्यातही दुःखे आणि नशिबाची परीक्षाच जास्त होती. दोन्ही मुलींच्या मृत्यूनंतर डोळयांचे ऑपरेशन झाल्यावरसुद्धा आई म्हणते ''नाही रे, पहिल्यासारखं दिसत.''

तिला आयुष्याच्या ह्या घडीला काय पहायचे असेल असे कोडे लेखकाला पडते. परंतु हे वाक्य तिची जगण्याबद्दलची लालसा उत्कटपणे व्यक्त करते. जसे पदरी आले, तसे आयुष्य स्वीकारणारी आणि निभावून नेणारीच जास्त माणसे 'करूणाष्टका'त आपल्याला भेटतात. ती बहुशः तत्वनिष्ठ, प्रामाणिक, श्रद्धाळू आणि कष्टाळू आहेत. नियती ही सर्वोच्च मानणारी आहेत. त्यांच्या जगण्यात रडगाणे नाही किंवा उधारीचा आवही नाही. यातच 'करूणाष्टक' च्या कथानकाचे प्राणतत्त्व व त्यातले कारूण्य सामावले आहे; असे म्हणता येईल.

❖ ❖ ❖

## प्रकरण ७

# करुणाष्टक : व्यक्तिरेखा

या पाठात 'करूणाष्टक' मधील प्रमुख व्यक्तिरेखांचा परिचय आपण करून घेणार आहोत.

**१) आई :** वडिलांनी नव्या गावी नोकरी घेणे आणि त्यासाठी सर्व कुटुंबकबिल्याने दुसऱ्या गावी जाणे हे आजच्या काळासाठी नवे नाही. परंतु 'करूणाष्टक' मधल्या आईसाठी त्यांची तयारी करणे, तसेच एकदा पोचल्यावर त्या सर्व बदलाला तोंड देणे हे फार जोखमीचे काम होते, असे दिसते. इथून या व्यक्तिरेखेचे समग्र दर्शन होऊ लागते.

प्रत्येक घरातल्या कर्त्या स्त्रीने खमके असण्याची गरज असते असे जणू तिच्या मनावर बिंबवले गेले आहे."...आणि आई, सर्वांचीच आई झाल्यासारखे वागे. आजीची, आमची, दादांचीही" 'करूणाष्टकाच्या सुरूवातीचे हे वाक्य आईच्या व्यक्तिरेखेमधला कणखरपणा दाखवते. तर 'करूणाष्टक' च्या शेवटी आईच्या मृत्यूच्या उल्लेखाआधी दुर्गाबाई भागवताच्या लेखनामधला उल्लेख; त्याच कणखर आईच्या आयुष्याची परवड दाखवतो. काडी-कचरा जमवून बांधलेल्या घरट्यात पिल्ले अलगद रहावी म्हणून गुंतवळीचे अस्तर असणारी पक्षीण स्वतःच त्या गुंत्यात अडकते आणि मरून जाते. माडगूळकर म्हणतात,"प्रत्येक आई, काही प्रमाणात अशीच गुंतवून घेत असली पाहिजे."

या पक्षिणीचे हे रूपक, 'करूणाष्टक' मधील आईच्या व्यक्तिरेखेसाठी तंतोतंत लागू पडते. सुखात बालपण घालवलेल्या, कुलकर्ण्याच्या प्रतिष्ठित घरातल्या ह्या मुलीने लग्नाआधी दूःख पाहिलेच नव्हते. तो सारा काळ वांडपणा, व्रात्यपणा करण्यातच गेला होता. तेराव्या वर्षीच लग्न झाल्यानंतर, मुले व्हायला सुरूवात झाल्यावर व्यक्तिमत्वामधील परिपक्वता मात्र या आईमध्ये पुरेपुर दिसते. पुढे परिस्थितीमुळे त्यात गांभीर्य आणि कणखरपणादेखील येतो.

आई ही व्यक्ती वृत्तीने धार्मिक आहे. घरकाम करताना, उठताबसता देवाचे नाव घेणे, त्याचा धावा करणे याची साक्ष देते. तसेच घरात आलेला भिक्षेकरी काहीच न घेता पुढे जाणे तिला मुळीच रूचत नाही. परंतु घरात उपाशी असणाऱ्या मुलासाठी दारी आलेल्या गोसाव्यांकडेच पिठाची मागणी करणारी ही आई मात्र त्या प्रसंगात दारिद्र्यामुळे अगदी मोडून पडलेली दिसते. एरवी घरची जेवणे झाल्यावर ही स्त्री अचानक येणाऱ्या लक्ष्मीसाठी चतकोर भाकरी तरी शिल्लक ठेवते. पण या प्रसंगात मोडून पडलेली आई, लक्ष्मी आपल्या घरी येईल अशी आशाही सोडून देते. तेव्हा मात्र तिचा देवावरचा आणि नशिबावरचा राग आणि हताशपणा दिसून येतो. गोसाव्याने दिलेल्या पिठाच्या भाकरींचे मुलांचे जेवण झाल्यावर उष्टयाचा पसारा आवरताना "कशाला रे, हा देह जगवायचा मी?' असा प्रश्न ती मुलांना विचारते. अशीच भावना तिला तिच्या दोन्ही मुलींच्या मृत्यूनंतरही येते. तेव्हा तर ती तिच्या खोलीतल्या देवांच्या तसबिरी, जपमाळा इतकेच काय तोंडी असलेल्या करूणाष्टकाचाही त्याग करते.

माडगूळकरांच्या लेखनात एका ठिकाणी असा उल्लेख येतो,''आई काही पंडिता नव्हती.'' पण शिक्षणाचे महत्व तिला मनोमन पटलेले होते. त्यामुळे शिकू इच्छिणाऱ्या गरजूंना मदत करणे हा तिच्या स्वभावधर्मामधला महत्वाचा विशेष होता. स्वतःच्या घरातली सांपत्तिक स्थिती तोळामासा असतानाही कुणा नातेवाईकांची मुलेबाळे आपल्याजवळ ठेवून घेण्यास ती सहजच तयार होते ''माझ्या सहा मुलांत तू सातवा राहशील'' असे म्हणते. अडचणीला कुणाच्याही उपयोगी पडणे, मदतीचा हात पुढे करणे हे तिच्या स्वभावातील औदार्य दाखवते. जातीपातीचा नसणारा आजारी म्हतारा घरावर आल्यावर तो हक्काने म्हणतो, ''काकी मला सांजा खावा वाटतो.'' ही आणि अशी अनेक उदाहरणे तिच्या औदार्याची आणि माणुसकीची साक्ष देतात. ती रूढार्थाने काहीही शिकलेली नसली तरीही तिला मिळाला उच्च जीवनमूल्यांचा, संस्कारांचा आणि सद्सद्विवेकाचा वारसा तिने जपला आणि पुढच्या पिढीपर्यंत पोचवण्याचाही जिवापाड प्रयत्न केला.

नशिबी आलेल्या दारिद्रयाला 'देवाने पदरी घातलेले भोग' म्हणून तिने निमूटपणे सोसले. ह्याचप्रमाणे संस्थानाच्या देवस्थानी राहताना जे ऐश्वर्य जवळून पाहिले, जे अधिकार अनुभवले तेही अगदी मनापासून त्या धामधुमीच्या जोरावर तिने आपल्या दिराचे थाटामाटाने करून घेतले.

पोटासाठी गावोगाव वणवण फिरणे, आपली माणसे, गणगोत सोडून जाणे हे तिला खरे तर मान्य नव्हते. प्रत्येक कौटुंबिक समस्येच्या वेळेस नको इतक्या आलिप्ततेने वागणाऱ्या आपल्या नवऱ्याचा उल्लेख ती तुकारामबोवा असा करते. याचाच अर्थ की ती स्वतः तुकारामाच्या आवलीप्रमाणेच मुलांमाणसांत आणि प्रपंचाच्या सगळया पदरांमध्ये पूर्णपणे गुंतलेली, अडकलेली होती. गुंतवळाच्या अस्तरात अडकणाऱ्या पक्षिणीसारखी!

तिचा सोशिकपणा, श्रध्दाळूपणा आणि नियतीवरचा गाढ विश्वास तिला त्या पिढीमधील 'आई' च्या रूढ प्रतिमेची प्रतिनिधी बनवते. कुटुंबनियोजनाचा खास प्रचार-प्रचार न झालेला असा तो काळ होता. तेव्हा लग्न झाल्यापासून एकापाठोपाठ एक अशा बाळंतपणांमध्ये अडकणाऱ्या स्त्रियांचेच चित्र घरीदारी असे. पण आईने मात्र आपल्या कोणत्याच मुलाचा रागराग केला नाही. तसेच कंटाळाही केला नाही. एकाच्या पायाला झालेली 'आगपैण' उर्फ गंभीर असा त्वचारोग आणि दुसऱ्याच्या वाढलेल्या केसांमध्ये झालेल्या जीवगेण्या जखमा ह्या प्रकारचे आजार हे तत्कालीन-आरोग्याविषयक जागृती न झालेल्या समाजाचे प्रतिनिधी आहेत. परंतु हेही आजार ती सोशिकपणेच निस्तरते. धडधाकट, गोरेगोमटे जन्मलेले गुणी मूल अचानक दोन-अडीचच वर्षाचे असंताना अचानक तडकाफडकी मरुन जाणे तिच्या जिवाला चटका लावते. या अनुभवाला साक्षी असणारे मांडगूळकर लिहितात, ''उतारवयात पुन्हा बाळोती. दुपटी शिवत बसली असताना ती मला म्हणाली,''कशाला रे, इतक्या उशिरा हे पोर आता माझ्या पोटात ओझं घेऊन राहिलय?'' आणि तेच मूल गेल्यावर ती म्हणते, ''बाळा माझ्या, अरे का, रे माझ्या पोटी आलास आणि दोन वर्षांचा होऊन माझ्या मांडीवर गेलास?''

नैराश्याच्या अशा गर्तेत नशिबाच्या सगळया कसोटया, परीक्षांना तोंड देणाऱ्या ह्या स्त्रीला पतीने संस्थानाच्या कुलदैवताची चाकरी घेतल्यानंतर चार दिवसांचे आणि दुसऱ्यांचे का होईना, पण ऐश्वर्य उपभोगायला मिळते. ती अतिशय आनंदी होते, पण हुरळून जात नाही. या थाटामाटाच्या आधारावर ती

दिराचे लग्न उरकून घेते. परंतु देवीच्या दागिन्यातल्या हरवलेल्या पाचूमुळे व्यथित झालेल्या नवऱ्याच्या यातना फक्त तिलाच कळू शकतात. तो पाचू सापडवणाऱ्या लखोबाचा आणि त्याच्या बायकोचा आदरसत्कार ती अतिशय औचित्याने करते. या काळातल्या या दांपत्याच्या वागण्यामध्ये त्यांचे उच्च संस्कार आणि जीवनमूल्येच दिसून येतात.

माडगूळकर 'करूणाष्टक' मध्ये म्हणतात, 'माझ्या आईचा जीवनप्रवास हा परिस्थितीच्या वाळवंटातून केलेला खडतर आणि लांबलचक प्रवास आहे.....मला काही सगळं बघायला मिळालेलं नाही.....बरचसं मी कल्पनेनं जाणून घेतलं आहे.'

कल्पनेनं जाणून घेतलेल्या अनुभवांना आणि त्यांच्या आठवणींना 'करूणाष्टक' मधील 'आई' च्या नात्याची खोली आहे. म्हणूनच ते व्यक्तिचित्र पूर्णतः अनुभवांवर आधारित असूनही वर्णनपर-रूक्ष वाटत नाही की केवळ आईंच्या प्रतिमेचे गोडवे गाणारे वाटत नाही. ते वास्तवदर्शी आणि भावस्पर्शी वाटते.

**२) कविराज :** व्यंकटेश माडगूळकरांचे हे मोठे कविराज बंधू म्हणजे मराठी चित्रसृष्टी व भावगीतांचे विश्व गाजवून सोडणारे गजानन दिगंबर माडगूळकर! इतर भावंडाप्रमाणे त्यांना जन्मजात उच्च बुद्धिमत्ता, संस्कार व जीवनमूल्यांचा संपन्न वारसा लाभलेला होताच. पण देवाने त्यात प्रतिभा व सुजनशीलता या दोन अमोल देण्याचीही भर टाकलेली होती. 'करूणाष्टकात' अगदी सुरूवातीपासून शेवटपर्यंत या वडील भावाचा उल्लेख अतिशय प्रेमाने व आदराने केलेला दिसून येतो. तेच कविराज गदिमा!

नव्या गावी नोकरीसाठी रहायला आल्यानंतर पडक्या घरामध्ये विचित्र, भीतिदायक घटनांची मालिकाच सुरू झाली. पहाटेच्या काळोखात नाग घरात शिरणे, बाईआजीचे असहाय्य एकटे मरण, आईला घराबाहेर मध्यरात्री दिसणारी ओली बाळंतीण, अमावस्या-पौर्णिमेला तिला होणारे भलतेसलते भास. ओल्या बाळंतिणीच्या दर्शनाची ही घटना माडगूळकरांच्या भाषेत सगळ्या भावडांनी धडधडत्या काळजांनी ऐकली.'' तेव्हापासून त्यांच्या मोठया भावाने रात्रीचे घरी झोपणेच सोडून दिले. अभ्यास करण्यासाठी मित्रांकडे घराबाहेर पडलेले त्याचे पाऊल उत्तुंग कर्तृत्व झळकवल्याविशाय घरामध्ये परत पडलेच नाही.

वडीलपणाची एक धार वडील भावाच्या व्यक्तिमत्वात दिसते. प्लेगच्या साथीमध्ये गोळेबाईंना ताप आला. गाठ उठली. नव्या गावात मोठया मुश्किलीने माणसे जोडून ती टिकणारी आई त्यांना भेटायला निघाली. तेव्हा हा मोठा भाऊ रागाने म्हणाला,''...तुम्हाला जीवाची पर्वा नाही; पण आम्हाला आई पाहिजे. असल्या आजारपणात भेटीचा उपचार पाळायचं काही कारण नाही.'' परंतु या बरोबरच मुलाचे मूलपणही दाखवणारे काही किस्से 'करूणाष्टक' मध्ये आहेत. घोडयाच्या शेपटीचा केस ओढल्याबद्दल तिच्या टाचेचा तोंडावर मार खाणे, स्वतः माडगूळकरांना घारीच्या घरटयात काय आहे हे पाहण्यासाठी उंच झाडावर चढायला लावणे, त्यासाठी 'मोराच्या पिसांच्या बक्षिसाची' लालूच दाखवणे या उदाहरणांतून बालपणीचा निरागस अवखळपणा भरलेला आहे. पण अन्यथा हा मोठा भाऊ सतत परिपक्व व जबाबदार दिसत आला आहे.

सारवरगड संस्थानाच्या राजवाडयात राहत असताना देवीच्या दागिन्यातला पाचू हरवला. त्या मानसिक ताणाखाली असतानाच कविराजांचा मॅट्रिकचा 'निकाल' लागला आणि ते नापास झाले. लवकरच हा वडील मुलगा कर्ता होईल आणि हाताशी येईल; कुटुंबाची हलाखीची परिस्थिती सुधारेल, अशी आशा असणारी

आई खूप निराश झाली आणि याला फार टाकून बोलली, ''तुझ्या मनाला लाज कशी वाटत नाही? ....तिकडचं राहिला असतास, माधुकरी मागून जेवला असतास, रस्त्यावरच्या दिव्याखाली बसून अभ्यास केला असतास आणि पुढच्या वर्षी पास होऊन समोर आला असतास तर तुझा अभिमान वाटला असता मला! आज मला तुझी लाज वाटते बघ!'' हे बोलणे ऐकून कविराज गप्प बसले. नेहमीप्रमाणे रात्री मित्राकडे जाण्यासाठी बाहेर पडले. ते परत आलेच नाहीत. त्यांनी कुणाकडे घरच्यांसाठी निरोप ठेवला नाही. की कुणाबरोबर सांगावाही धाडला नाही. मॅट्रिकचे अपयश हा घरच्यांबरोबर त्यांच्या स्वतःसाठी अपयश आणि निराशेचा मोठा धक्का असावा. आणि तोच त्यांज्या आयुष्यातला एक निर्णायक वळण देणारा बिंदूदेखील ठरला असावा. चार महिने तपास करूनही आईला या आपल्या मानी मुलाच्या काहीही पत्ता लागला नाही.

घरातून निघून, दारोदार टक्केटोणपे खाऊन हे कविराज कलापूर (कोल्हापूर) इथल्या सिनेमा स्टुडिओत नोकरीला लागले. कलेच्या क्षेत्रातील त्यांच्या पुढील उत्तुंग कर्तृत्वाची ही जणू काही मुहूर्तमेढच असावी. इतक्या खडतर परिस्थितीत घराबाहेर पडलेला मनुष्य मिळेल तिथे मिळेल ते काम करायला तयार झ्ला असता. पण कविराज ते करण्यास तयार नव्हते. 'कलेच्या क्षेत्रातच काहीतरी कर्तबगारी करून दाखवीन.' अशी त्याची उमेद होती. या एका यशाच्या पायरीनंतर लगेचच वडिलांना सरकारी नोकरीतील चमत्कारिक धोरणामुळे कामावरून काढून टाकण्यात आले. तेव्हा परागंदा असणाऱ्या या मुलाला आईने पत्र पाठवताच तो धावून आला. कर्जे निवारली. आपली वडीलपणा जबाबदारी निभावली. संकट दूर गेले, तसा पुन्हा तो मुशाफिराप्रमाणे आपले कलासक्त कलंदर आयुष्य जगू लागला. सिनेमा स्टुडिओ, छोटया भूमिका, शाहीरांची संगत, संगीत मेळावे आणि गावोगावचे कार्यक्रम करू लागला.

नोकरीच्या गावाहून माडगूळकरांचे कुटुंब मूळ गावी परत गेले. ड्रॉईंगची जवळ आलेली परीक्षा हातची जाऊ नये म्हणून व्यंकटेश माडगूळकर मास्तरांकडे राहिले. धर्माने मुसलमान असलेल्या या मास्तरांकडे देण्यासाठी प्रेम, निवारा आणि गुरूविद्येखेरीज दूसरे काहीच नव्हते. माडूळकरांनी हे दिवस हालाखीत काढले. अशातच अचानक थोरल्या भावाचा सांगलीला कार्यक्रम आहे, असे कळले, तेंव्हा ते तिथे गेले. तेव्हा त्यांनी बऱ्याच दिवसांनंतर पाहिलेल्या आपल्या भावाचे वर्णन फार सुंदर प्रकारे केले आहे. कारकीर्दीच्या चढत्या शिडीवर असणारा एक भाऊ आणि हलाखीत जगणारा दुसरा भाऊ या दोन्ही गोष्टी त्या वर्णनात दिसतात, ''...आणि उधळलेल्या केसांचा उमद्या चेहऱ्याचा, तरणाबांड असा माझा भाऊ मी कितीतरी दिवसांनी पाहिला. मला पाहताच त्याला फार आनंद झाला आणि थोडं वाईटही वाटलं'' पुन्हा परिस्थिती जाणून कविराजांनी पाठच्या भावाचे करता येतील तेवढे मनसोक्त लाड केले, यात त्यांची दिलदार; प्रेमळ वृत्ती दिसते. याच वेळी त्याला 'होणारी वहिनी' देखील दाखवली आणि गुपित वाटून घेतले.

फार पुढे, वडील गेल्यानंतर सगळ्या मुलांची लग्ने झाली. सूना घरात आल्या. भांडयाला भांडी लागू लागली. तेव्हा वैतागून आई आपले मूळ गाव सोडून पुण्याला याच थोरल्या लेकाकडे रहायला आली. मध्येमध्ये बदल म्हणून ती चारएक दिवस माडगूळकरांकडेही रहायला येई; पण तिथे तिला करमत नसे. तिला चारीधाम यात्रा करायची फार इच्छा होती, पण फक्त थोरल्या लेकासोबत ती कधीच पूर्ण झाली नाही.

वयोमानाप्रमाणे आईची आजारपणे, उपचार सुरू झाले आणि कविराजदेखील आजारी पडले. साध्या

खोकल्याने पुढे जीवघेणे रूप घेतले. आईबरोबरच, आपल्या मोठया भावाचे ''एखाद्या भूसनळयाप्रमाणे डोळे दिपवणारे'' कर्तृत्व माडगूळकरांनी जवळून पाहिले. आपल्याला मिळणारे सारे काही घरादाराच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोचवणारा, सगळयांसाठी खपणारा, झटणाराच असा हा भाऊ नव्हता. तर त्याने आपले नाव-गाव महाराष्ट्राच्या सांस्कृतिक नकाशावर मोठे केले होते. कविता घरोघरी पोचवली होती. मानसन्मान मिळवले होते. साक्षर नसणाऱ्या पण सुसंस्कृत अशा आईला ह्या मुलाचा रास्त असा अभिमान होता, त्याचप्रमाणे तो सृजनशील-संवेदनशील माडगूळकरांना देखील होता. साध्या खोकल्याचा न्यूमोनिया झाला. पुढे कॅन्सर झाला आणि कविराजांची प्रकृति पूर्ण ढासळली. थकलेला हा भाऊ पाहून व्यंकटेश माडगूळकर व्यथित झाले. ते लिहितात, ''दीर्घ अशा आजारानं कृश झालेली, वाकलेली आणि नियतीला संपूर्णतः शरण गेलेली अशी माझ्या भावाची हीच मूर्ती आता माझ्या स्मरणात पक्की होऊन राहिली आहे.''

'आदर्श माता' म्हणून आईचा जाहीर सत्कार ठरला. सुरू असलेल्या समारंभातून उठून घरी यावे लागले ते कविराजांचा मृत्यू बघण्यासाठीच. करूणाष्टकातली कविराजांची व्यक्तिरेखा जरी वर्णनानुसार इथेच संपत असली तरी तो आणि तिचा प्रभाव 'करूणाष्टका' मधल्या सगळया आयुष्यावर आणि माडगूळकरांच्या मनावर सखोल असा पडलेला आहे हे अगदी खरे.

❖ ❖ ❖

## प्रकरण ८

# माणदेशी माणसं : कथानक व व्यक्तिचित्रे

विद्यार्थी मित्रांनो,

प्रस्तुत पाठात आपण 'माणदेशी माणसं' या व्यक्तिचित्रसंग्रहातील सर्व व्यक्तींची माहिती करून घेऊ.

**झेल्या :**

मायदेशातील निंबवडे नावाच्या खेडयात राहणारा जालंदर एकनाथ लोहार म्हणजेच 'झेल्या' हा लोहाराचा तेरा चौदा वर्षाचा एक मुलगा. या गावात लेखक जेव्हा तीन महिन्यांसाठी मराठी दुसरी व तिसरीच्या वर्गाला शिकवण्याची शाळेतील नोकरी करीत होते. तेव्हा झेल्याची त्यांच्याशी ओळख होते. ती ओळख कशी कशी होते आणि झेल्या त्यांच्या मनात कसे घर करतो हे लेखक 'झेल्या' या व्यक्तिचित्रणातून रंगविताात.

निवेदक (मास्तर) शाळेच्या नोकरीच्या पहिल्याच दिवशी समोर बसलेल्या मुलांवर नजर फिरवून हजेरी घेतात. मुले हजेरी सांगतात. मराठी दुसरीच्या वर्गात एकूण बारा मुले असतात.

शेवटचे नाव असते जालंदर एकनाथ लोहार. त्याचे नाव पुकारताच 'गैर हजर मास्तर' असा एकच गलका उडतो. अनेक दिवस झाले तो शाळेत येत नाही अशीही माहिती मुले देतात. हजेरीत त्याच्या नावापुढे फुल्याच असतात 'का येत नाही हा शाळेत?' असे विचारल्यावर 'कुनाला ठावं मास्तरं' असे एकजण म्हणतो. 'वाडयात चिंचा पाडतोय' असेहीं एक मुलगा सांगतो. तीन दणकट मुलांना निवेदक त्याला बोलायला पाठवतो. खेडयातील शाळेतील ही पध्दतच असते. मुलगा गैरहजर असेल तर त्याला बोलवून घेऊन चांगले मारायचे. पुन्हा गैरहजर राहिल्यास उलटा टांगीन असा दम द्यायचा. पंधरा मिनिटातच मुले जालंदरला घेऊन येतात. तो वाडयात नेहमीप्रमाणे चिंचा पाडत असतो. मुले त्याला शाळेत चलायला सांगतात तेव्हा तो त्यांना शिव्या देतो. एकही बटन नसलेला कुडत्याला एका हाताशी गळयाशी घट्ट पकडून जालंदर उभा असतो. निवेदक त्याच्याकडे एकवार बघतो. डोक्यावर मळकट पांढरी टोपी, अंगात कसलेतरी डाग पडलेला मळलेला, बाहीवर ठिगळ लावलेला कुडता, तांबडया रंगाची चौकटीची गादीपाटाची चड्डी असा झेल्याचा वेश असतो. चड्डीचे दोन्ही खिसे चिंचा भरल्याने फुगलेलं असतात. शाळेत का येत नाहीस? असं विचारल्यावर तो 'काम असते घरी' असे उत्तर देतो. त्याचे किडलेले काळे दात निवेदकाच्या नजरेतून सुटत नाहीत. म्हैस हिंडवावी लागते. भाता ओढायला लागतो आणि वडील शाळेत जाऊ नकोस असे म्हणतात असे एका झटक्यात झेल्या सांगून टाकतो. झेल्याच्या या सबबी खोटया असतात कारण न्हाव्याचा सदा खरे काय ते सांगतो. झेल्या काहीही काम करीत नाही. गावात उनाडक्या करतो. बापाचे ऐकत नाही. सदाने असे खरे सांगताच 'शाळेबाहेर आलास की जीव घेतो' असे झेल्या चिडून म्हणतो.

झेल्याचा उनाडपणा, गुंडगिरी त्याच्या वागण्या-बोलण्यातून सतत दिसते. अंगातल्या मळकट

कपडयावरून बेफिकीरी दिसते. परंतु मास्तरांसमोर तुटलेल्या बटनांचा कुढता गळयाशी घट्ट धरलेला झेल्या कुठेतरी दुरावलेला, मास्तरांची भीती बाळगणारा वाटतो. आता हे मास्तर आपल्याला बडवणार अशी तयारी झेल्याची झालेली असते. पण 'काम असेल तर तेवढ्यापुरते विचारून जावे' असे मवाळ शब्द कानी पडल्यावर झेल्या गोंधळून जातो. खिशातल्या चिंचा मुकाटयाने टेबलावर काढून ठेवतो. हळूहळू नियमित शाळेत येऊ लागतो. आपण गैरहजर राहिलो तरी मास्तरांनी मारले नाही याचा तो परिणाम असतो. शाळेत कितीही खोडया काढल्या, वात्रटपणा केला तरी मास्तर नुसतेच हसतात. हळूहळू झेल्या मास्तरांचा पट्टशिष्य बनतो.

शाळेच्या मागच्या बाजूला एक छोटी अंधारी खोली असते. त्यातच मास्तर राहात असतात. सकाळी उठून ओढयावर जाऊन अंघोळ करून एक कळशी पाणी पिण्यासाठी खोलीत घेऊन जायचे. चहा करून प्यायचा. शाळेत जायचे. दुपारी भात करून खायचा. रात्री तोच खायचा असा त्यांचा दिनक्रम असतो. कधी उदास वाटले तर चिमणीच्या प्रकाशात काहीतरी वाचावे. याचकाळात झेल्या मास्तरांचा साथीदार बनतो. त्यांच्या खोलीत झोपायला जाऊ लागतो. त्याच्या बाळबुध्दीला पडलेले प्रश्न ऐकून, त्याची उत्तरे देताना मास्तरांच्या जीवाला थोडा विरंगुळा वाटू लागतो.

झेल्या कधी सुभाषबाबूंविषयी विचारी तर कधी नाना पाटलांविषयी विचारी. त्याला धाडसी माणसे आवडत. थंडीचे कधी तरी आपण बिडया ओढतो हे तो नकळतपणे मास्तरांसमोर बोलून जातो. हळूहळू तो मास्तरांना मदत करू लागतो. काडक्याकुटक्यांची मोळी आणणे, सारवणे, पाणी भरणे, भांडी घासणे, बाजार करणे असे मास्तरांचे पडेल ते काम झेल्या करू लागतो. एवढे करून पुन्हा तो अभ्यासाकडेही लक्ष पुरवू लागतो.

मास्तरांचे तीन महिने संपतात. ज्यांच्या जागी ते बदलीचे मास्तर म्हणून रूजू झालेले असतात ते मास्तर आता पुन्हा येणार असतात. हे झेल्याला कळताच 'मी येतो मास्तर तुमच्यासंग!'' असे तो म्हणतो. तालुक्याच्या गावी जाणार आहे असे खोटेच मास्तर त्याला सांगतात. सर्वांना भेटून मास्तर निघतात. त्यांची एक पिशवी हातात घेऊन झेल्याही त्यांच्याबरोबर कडेकडेने चालू लागतो. गावाचा ओढा ओलांडून मास्तर थांबतात. झेल्याला परत जायला सांगताच झेल्या त्यांच्या गळयात पडून रडतो. बाहीने डोळे पुसत पुसत परत गावाकडे निघून जातो. मास्तर आपल्या वाटेने चालू लागतात.

मास्तरांवर झेल्या नकळत जीव जडवतो. त्याच्या मनातली प्रेमाची भूक त्यावरून दिसते.

माडगूळकरांनी झेल्याचे व्यक्तिचित्र जिवंत उभे केले आहे.

**मुलाण्याचा बकस :**

लेखकाला खेडयातून गावी जायचे तर पाच-एक मैल चालून जावे लागे. पक्की सडक नाही. ओबडधोबड गाडीवाट त्यामुळे अंतर प्रवास खडतर असे. आजूबाजूला बोडका माळ. तहान लागली तरी वाटेत कुठे पाणी मिळणार नाही. अशी परिस्थिती. सावलीसाठी मोठी झाडे नाहीत. नेपती-बोरीची लहान झुडपे, साडेतीन मैल संपले की मुलाणकी यायची. 'मुलाणकी' म्हणजे मुलाण्याच्या मालकीच्या चार जमिनी एका तळावर होत्या. छोटया पाण्याच्या ओघळाच्या काठाशी करंजी-लिबांची चार मोठी झाडे होती. निरगूडी-तरवडाचं बन होत तेवढीच सावली. या प्रवासात मुलाकणीतच लेखकाला बकस भेटतो.

बकस फाटक्या अंगलटीचा असतो. पायात सहा आणेवाली टायरची पायताणे घालतो. वीस बावीस वर्षाचा बकस एखादया लहान मुलासारखे बोलतो. त्याच्या चेहऱ्यावरचे भावही लहान मुलासारखेच असतात. तो उगीचच हासतो, डोळे फिरवतो. तो अर्धवट असावा. असा लेखक अंदाज बांधतो. याचे बोलणे बोबडे व जलद असते. स्वतःप्रश्न विचारावेत आणि स्वतःच त्याची उत्तरे दयावीत अशी बकसला सवय असते. म्हणूनच तो लेखकाला पाहून ''बायशीकलं वरनं आला असता तर आत्ता पोचला असता गावात हाय का तुमची? नसल, कुठली असतीया, मग चालत का आला असता! अन असली तरी बिघडल्यावर तिचा काय उपेग, खरं का न्हाई?'' असे विचारतो व स्वतः त्याचे उत्तरही देतो.

त्याचा चेहरा उन्हाने कोळपलेला होता. चिरफडया झालेला कुडता आणि जास्त फाटल्यामुळे जागोजागी चोळण्याला मारलेल्या गाठी असा पोशाख केलेला बकस आई बाप मरून गेल्याने चुलत्यापाशी राहात असतो. आईची त्याला वरचेवर आठवण होत असते. 'बकस मेरा लाल है', 'तुझी शादी करीन' अशी आईची वाक्ये बकसला आठवत. चुलत्याचे रान आणि शेरडी राखणे अशी कामे दिवसभर बकस करी. चुलती नीट बघत नाही. येडसर म्हणते अशी तक्रारही बकस लेखकाजवळ करतो. ती भाकरी देत नाही. उपाशी ठेवते. मर एकदाचा असे म्हणत असते याचे बकसला सतत वाईट वाटते. दिवसभर रानात शेरडया घेऊन येतो आणि रात्री मशीदीत पडतो असे असले तरी आपला कसला त्रास चुलता आणि त्याच्या बायकोला होतो हे बकसला कळत नाही. त्याला पुन्हा पुन्हा हाच प्रश्न पडत असतो.

बकसच्या डोक्यावर फडक्यात बांधलेली भाकरी हातात पाण्याने भरलेले लोटके, दुसऱ्या हातात ढाळे तोडायची कुऱ्हाड, एखादे गुंडाळलेले चऱ्हाट असे त्याचे रुप! पोराडयांच्या घोळक्यातून बकस लळत-लोंबत पाय ओढत चालत असायचा. नांगरणी करताना चुलत्याच्या बरोबर नांगर हाकायचा. पेरणीच्या वेळी चाडयावर मूठ धारायला, कणसात दाणा भरला की पाखरे हाकलण्यासाठी बकस असायचाच. पिकाची राखण करायला रानातच त्याने खोपटे बांधले. शेळी, बैल, कुत्रा असे त्याला सोबतीला असायचे. एवढे राबूनही चार हुरडयांच्या कणसावर सत्ता नाही हे बकसला सतत जाणवत असे. काढणी, मळणी या साऱ्या वेळी बकस राबत होता. वेडसर म्हणून शहाणा चुलता त्याला राबवून घेत होता. एकदा त्याने पाठीवरचे काळे-निळे वळ लेखकाला दाखवले. चुलत्याने त्याला डाग दिले होते. डागल्यावर येड लागलेले माणूस बरे होते म्हणून. अनाथ पोरक्या आणि त्यातही डोक्याने कमी असणाऱ्या बकसच्या आयुष्याची अगतिकता या व्यक्तिचित्रातून जाणवते.

**बन्याबापू :**

माणदेशात लहान खेडयामध्ये पूर्वीच्या वैभवाचे काही अवशेष वाडयांच्या रूपात अजूनही जिवंत असतात. देशमुख-देशपांडे किंवा गायकवाड-धायगुडे यांचे अवाढव्य वाडे गावकऱ्यांनी आश्रय घ्यावा इतके मोठे असतात. आजूबाजूला नवी-जुनी घरे बांधली गेली तरी हे वाडे तग धरून असतात. असाच एक वाडा बन्याबापूचा असतो. कालमानाबरोबर पडझड झालेला.

तीस-चाळीस खण इमारतीत तीनच माणसे राहत असतात. बन्याबापू, त्यांची विधवा सून सरूबाई व बापूंचा एक अडाणी पुतण्या. सोप्यात बन्याबापू एक पानाचा बटवा घेऊन बसतात व तोंडाने वरचेवर 'हरे राम, हरे राम' म्हणतात. त्यांच्या बटव्याला शोभतील अशा चांदीच्या अनेक डब्या त्यात असतात. तंबाखू,

केशर घातलेला चुना, पांढरा कात, सुवासिक सुपारी, काळी तपकीर, लवंग, वेलची, जायफळ अशा जिनसा त्या डबीत असतात. मेणकापडात गुंडाळलेली कळीदार खायची पाने असतात.

सत्तरी उलटलेले बापू खैराच्या खोडासारखे चिवट, टणक, उंचपुरे, बांध्याने नीटनेटके, रंगाने गोरे पान असतात. भव्य कपाळ, तरतरीत नाक आणि पांढरे शुभ्र केस व गाल-मिश्या असे बापू खानदानी थाटाचे दिसतात. कधी काळी त्यांनी अत्तराचे दिवे जाळले असतात आणि पैशाच्या ढिगावर नायकिणी नाचविल्या असतील. पण पूर्वीचे वैभव हळूहळू संपले तरी दहा-पाच जमिनी शिल्लक असतात. आपण इनामदार आहोत हे बापू विसरत नाहीत. व अजूनही इनामदारी खाक्यातच ते राहतात.

घरी आलेल्याचे ते प्रसन्नपणे हसून स्वागत करतात. दोन्ही हात जोडून घवघवीत नमस्कार करतात. सरूबाईंना दोन पेले दूध आणायला सांगतात. नको म्हटले तर बेसनाच्या लाडवांचा आग्रह ते करतात. स्वतः उठून चंदनाचा धूप करतात. अत्तराचा फाया देतात तर कधी जाईजुईची, मोगऱ्याची ओंजळभर फुले देतात. मोठया मुलाच्या जगन्नाथच्या आठवणी सांगतात. मुलगा म्हतारपणी सोडून गेला ही प्रभूचीच मर्जी असणार असे म्हणून 'हरे राम हरे राम' असे नामस्मरण करतात. अनेकदा ते ऐसपैस गप्पा मारतात कधी 'हिटलर' हा मोठा हिंमतवान माणूस' असे मत व्यक्त करतात तर कधी दहा सालच्या बंडातील मंडळी रेवण-सिध्दाच्या डोंगरात राहात होती. हत्यारासहित. अशी माहिती पुरवितात. भुवया उंचावून 'हा महाराजा' असे म्हणतात आणि बोलून झाले की काय खरं ना? असा प्रश्न समोरच्याला विचारतात. शिकारकथा, रानात प्रवास करताना पडलेले चकवे-गुप्त धनाच्या गोष्टी, नवे-जुने राजकारण अनेक थोरा-मोठांच्या गोष्टी असे अनेक विषय बन्याबापू एकदा बोलायला लागले की त्यांच्या बोलण्यात येतात. चुकून एकदा डुक्कर समजून जंगलात गरीब दारक्यालाच मारले असते, याची कथा रंगवून सांगतात. बराच वेळ गप्पा मारून ते चार पावले चालून निरोप दयायला येतात.

तालुक्याच्या गावी ते आठवडयातून एखादी फेरी मारतात. त्यांच्यासाठी सर्व्हिसमोटार थांबलेली असते. मोटारीतील नवखी माणसे कुरकुरत असतात. ड्रायव्हरला चलायला सांगतात. पण ड्रायव्हर त्यांच्याकडे लक्ष न देता बन्याबापूंची वाट बघत थांबतो. अखेर डोक्याला जरीकाही रूमाल, पांढरा स्वच्छ अंगरखा, पांढरा कोट आणि धोतर अशा वेशात बापू लगबगीने येतात. त्यांच्यासाठी ठेवलेल्या 'फ्रंटसीटवर' बसतात. मोटार सुरू झाल्यावर अघळपघळ बोलत राहतात. सगळयांना बटव्यातून विडे काढून देतात.

महारांना बन्याबापूंच्या घरी बक्कळ मिळते म्हणून ते त्यांना मानतात. त्यांचे पडेल ते काम करतात एखाद्या महाराकडून काही चूक झाली तर ते त्याला विटाळ होऊ न देता जोडयाने मारतात.रक्तबंबाळ करतात. परत त्यांच्या जखमेवर पानकणीस लावायला देतात त्यांचा शब्द सहसा कोणी मोडीत नाही. बापूंची दानत आणि त्यांचा अभिमान दोन्ही जगावेगळे आहेत.

महात्मा गांधींच्या वधानंतर जे प्रचंड जाळपोळीचे लोण माणदेशात आले त्यात बापूंचा वाडा आतल्या वस्तूंसह पेटला. अंगावरील एका वस्त्रानिशी बापू सून आणि पुतण्या वाडयाबाहेर पडले. बन्याबापूंच्या डोळयासमोर त्यांचा अवाढव्य वाडा जळून राख झाला. अनेकांनी बापूंना स्वतःच्या घरी राहण्याबद्दल विचारले, आग्रह केला परंतु बापू रानात झोपडी बांधून राहू लागले. बापूंच्या स्वभावातील करारीपणा, स्वाभिमान, दिलदार राजेशाही वृत्ती, खानदानीपणा आणि जुन्या लोकांत आढळणारा कर्मठपणा यांचे मिश्रण आढळते.

**कोंडिंबा गायकवाड :**

माणदेशातला कोंडिबा गायकवाड बलदंड, उरफाटया काळजाचा, असंस्कृत आणि रांगडा आहे. गळयात पेटी, रूंद छातीवर केसांचे जाळे, पिढऱ्यांचे गोळेही वरवंट्यासारखे कठीण असा कोंडिबा थोराड आणि काहीसा उग्र आहे. तो वाटेकरी असल्याने त्याच्याकडे खंड मागायला जेव्हा लेखक जातो तेव्हा त्याच्याशी कोंडिबा अतिशय उर्मटपणे बोलतो. मऊपणा त्यांच्या अंगात नाही. लेखकाचा मळा त्याने खंडाने करायला घेतला ज्यावर त्याचा चांगला गुजराणा होत असतो. संतू नावाच्या त्याच्या मोठया भावाशी त्याचे वैर असते. संतूने कोंडिबाच्या जमिनीच्या बांधाला असलेली दुसऱ्याची जमीन खंडाने करायला घेतल्याने त्या दोघांत सतत भांडणे होत असतात. कोंडिबाची गुरे एक दिवस त्याच्या भावाच्या (संतूच्या) रानात शिरल्यामुळे दोघांत बाचाबाची होते. संतू, त्याची दोन पोरे कोंडिबाच्या अंगावर धावून जातात. त्याच्यावर काठ्या उगारतात. डोक्यावर काठ्या पडू नयेत म्हणून त्या हाताने आडवतो व हातावर काठ्या पडल्याने त्यांचा हात सुजतो. त्याचे कोंडिबाला फारसे काही वाटत नाही. एक फडके तो हाताला गुंडाळून ठेवतो आणि आपले रोजचे काम नेमाने करीत राहतो. दोघा भावातली तेढ कुणा एकाचा मुडदा पाडल्याशिवाय संपायची नाही असे कोंडिबाचे स्पष्ट मत असते. स्वतःची म्हैस स्वतःच्या हाताने रागाच्या भरात मारून टाकणारा कोंडिबा अत्यंत क्रूर आणि रानटी वाटतो. म्हैस एकदा धार देईना म्हणून कोंडिबा तिला बेदम मारतो आणि ती एकदम ओरडून गरागरा फिरून धाडकन खाली पडते व प्राणच सोडते. ही सगळी कथा कोंडिबा सहजगत्या सांगतो. त्याच्या तोंडावर दिलगिरी दिसत नाही. की स्वरात हळहळ जाणवत नाही.

खंड मागण्यासाठी आलेल्या लेखकाला सध्या पैसे नाहीत असे कोंडिबा शांतपणे सांगतो. पुन्हा पैशाचा आग्रह होताच 'पठाणी कायदा आहे का? असेल तर तो कोंडिबापुढे चालायचा नाही' असे गुर्मीत म्हणतो, डोक्यात धोंडा घातला तरी पैसे मिळणार नाहीत कारण पैसेच नाहीत असे ठासून सांगितल्यावर लेखक पैसे न घेताच निघून जातो. दरवर्षी चार-सहा हेलपाटे घातल्याशिवाय कोंडिबा पैसे देत नाही आणि त्याबद्दल त्याला जराही शरमल्यासारखे वाटत नाही.

एकदा त्याच्या रानातून एका महाराने त्याला न विचारता कणसे नेली असता त्यालाही कोंडिबा गुरासारखा मारतो. मारून त्याची पाठ काळी-निळी करतो. महार तडक फौजदाराकडे जातो. पण कोंडिबा फौजदाराला पैसे देतो आणि सुटतो. महाराला न्याय मिळत नाही. स्वतःच्या भावालाही कोंडिबा डोक्यात धोंडा घालून मारतो. तालुक्याच्या कचेरीत जाऊन 'मी भावाला मारले' असे सरळ सांगून जी शिक्षा होते ती मान्य करतो. बायको जेव्हा रडू लागते तेव्हा कोंडिबा डाफरतो की, 'रडायला काय झाले आहे?' यावर्षी पीक चांगले आले आहे. काळजीचे काय कारण? असा कोंडिबा काळीज नसलेल्या माणसासारखा वागतो.

**शिवा माळी :**

शिवा हा प्रायमरी शाळेचा गडी, घंटा देणे, झाडलोट करणे, शाळेपुढच्या बागेची निगा राखणे अशी सगळी कामे तो चोखपणे बजावीत असतो. शिवा आपल्या सच्च्या वागणूकीने सगळया मास्तर लोकांची मर्जी सांभाळून असतो. मास्तरांच्या घरची छोटी कामेही तो अडचणीला करीत असतो. स्वतःचे पैसे खर्च करून कपडे घेण्याची त्याला गरज पडत नसे कारण मास्तरांकडून कोट, धोतर, त्याला मिळत असे.

शिवा अडाणी असला तरी सरावाने घंटा देण्याची वेळ त्याला हळूहळू कळू लागते आणि आकडेही

उमगू लागतात. गावात त्याचे घर नव्हते आणि रानही. म्हणून माळयाच्या जातीत जन्माला येऊनही शेती न करता शिवा सरकारी नोकरी करून प्रपंच चालवीत असतो. त्याची बायको रानात रोजगाराने कामाला जाई आणि पोरगे शाळेत येई किंवा गावात हिंडत बसे. नोकरीबरोबर संसारही प्रामाणिकपणे करणारा शिवा एक दिवस पोलीसांकडून चोरीच्या गुन्हयासाठी पकडला जातो. सगळया गावालाच आश्चर्य वाटते. महादू सोनार आणि शिवा अशा दोघांना पोलीस पकडून नेतात.

शिवा शिक्षा भोगून परत गावात येतो, तेव्हा त्याची बायको मुलाला घेऊन माहेरी निघून जाते. चोरी करणाऱ्या नवऱ्याबरोबर मला संसार करायचा नाही असे तिचे म्हणणे असते. शिवा मुळात अतिशय प्रामाणिक असतो. महादू सोनाराच्या संगतीत हळूहळू त्याला वेगवेगळे नाद लागतात. खूप पैसे कमवावे असे वाटू लागते. बायको दाग-दागिन्यांसाठी सतत कुरकुरत असते आणि महागाईच्या दिवसात दोघांच्या कमाईवर संसार कसबसा सुरू असतो. शिवा रोजच्या कटकटींना कंटाळतो. महादूबरोबर चोरी करायला तयार होतो. घरफोडीचे सांगितल्यावर शिवा सुरूवातीला नाही म्हणतो. कुलुप तोडून ऐवज पळवायचे काम महादूचे आणि बाहेर उभे राहून कोणी येते आहे का हे पाळत ठेवण्याचे काम शिवाचे असे ठरते आणि मग शिवा त्याला तयार होतो. पैशाची त्याला भूल पडते. महादू त्याला फसवतो. तिन्ही घरफोडीत हजारावर रूपये मिळूनही बेचाळीस रूपये मिळाल्याचे सांगून शिवाला निम्मे म्हणजेच साडे एकवीस रूपये मिळतात. महादू महिन्याभरात पकडला जातो. तसा शिवा घाबरतो. त्याच्या काळजाचे पाणी-पाणी होते.

जे घडले ते लेखकाला प्रामाणिकपणे सांगून शिवा माणदेशातून निघून जातो. एकदा अब्रू गेली आता विष खाऊन मरावे किंवा माणदेशातून निघून जावे एवढे दोनच पर्याय शिवाजवळ असतात. त्यातला दुसरा पर्याय तो निवडतो. शिवाच्या रुपाने मुळात साधा, प्रामाणिक, पापभीरु असणाऱ्या माणसाला एखाद्या चुकीमुळे आयुष्यातून उठावे लागते, याचे सुन्न करणारे वास्तव समोर येते.

**तांबोळयाची खाला :**

खाला तांबोळीण ही रंगाने काळी-सावळी, उंचीने ठेंगणी आणि अंगाने भरलेली अशी जहांबाज म्हातारी. जातीने मुसलमान असली तरी तिच्या साडी-चोळी वरून व ती नेसायच्या पध्दतीवरून ती मुसलमान आहे असे वाटत नाही. कानात कुडया, हातात मोहरेची अंगठी घालून पदर डोक्यावरून घेऊन दणादणा चालणारी खाला कुंकू-दातवणाचा व्यापार करणारी एक तांबोळीण आहे.

लेखकाच्या शेजारच्या खोलीतच ती रहायची. खाला एखाद्या मधमाशीप्रमाणे कष्टाळू होती. ती सतत काहीतरी उदयोग करीत रहायची. घरीच दातवण बनवून ती ते विकी. आठवडयाच्या बाजारात ती हळद-कुंकू, बुक्का, दातवण, शेंगदाणे, फुटाणे, चुरमुरे असले जिन्नस घेऊन घराला कुलूप ठोकून खाला टोपली डोक्यावर घेऊन खेडोपाडी निघून जाई. खेडयात दुकाने नसल्याने तिला चार एक रूपयांची कमाई मिळे. पंढरीच्या वारीला ती दातवण घेऊन बसे. त्या काळात तिची फिरती तात्पुरती बंद असे. नागपंचमीला कधी लोकांच्या लाह्या भाजून देई.

लेखक चारदोन पैशाचे शेंगदाणे खालाकडे नेहमी मागत असे. रोख पैसे देऊन तर कधी उधारीने खाला शेंगदाणे चुलीवर भाजून देई. गल्लीतील एक न्हाव्याची म्हातारी, एक पोरवयाची शिंपीण आणि एक दोन बायका सोडल्या तर तिच्याकडे अजून दुसरे कोणीच येत नसे. रात्रीची बासरी वाजवू नये, बोडक्या

बायकांनी बासरी ऐकू नये, उंबऱ्यावर बसू नये असे अनेक संकेत खाला पाळी. आणि कुणी ते पाळत नसेल तर त्याचा आग्रह करी. जातीने मुसलमान असूनही ती अशा हिंदू चालीरीती पाळत असे.

तिच्या नवऱ्याचा चांगला व्यापार होता. पण पैसे मिळायला लागल्यावर तो बदलला. रोज खालाला मारू लागला. घरात एक बाई आणून ठेवली. जोवर शक्य तोवर खालाने सोसले. मग एक दिवस तिने भल्या पहाटे घर सोडले. चार पैसे बाजूला साठवून कुंकू दातवण्याचा व्यापार सुरू केला. कधीतरी नवरा मेल्याची बातमी कानावर आल्यावर ती विधवा म्हणून राहू लागली. तिचा जगण्याचा हव्यास सुटला नाही. ती कष्ट करून धडपडत होती, चार पैसे कमवत होती.

गोडीगुलाबीने रहावे, चार माणसे जोडावी, भलेपणा मिळवावा असे तिचे जगण्याविषयीचे तत्वज्ञान आहे. ती त्याच तत्वाने नाकासमोर आयुष्यभर चालते. डोक्यावरचे दुकान घेऊन वय झाले तरी पाय ओढीत चालत रहाते. साध्यासुध्या बाईतही असणारी विजिगिषा आतला एक पीळ खालाच्या व्यक्तिमत्त्वात दिसतो.

**रघू कारकून :**

रघू मवाळ आणि अतिशय कष्टाळू आहे. त्याचे घराणे कुलकर्ण्याचे आणि वडील कर्तबगार माणूस होते. ते रघूच्या लहानपणीच वारले. पाठोपाठ आईसुध्दा वारली. रघूला मोठा भाऊसुध्दा होता. त्याच्याकडे वडीलांनंतर कुलकर्ण्याचे काम आले. पण त्याने फारसे काही कमावले तर नाहीच उलट होते तेही गमावले. घरात अठराविश्व दारिद्रय आले. रघू शिकत असताना त्याला थोरल्या भावाचा कोट-सदरा घालायला मिळे. वापरून टाकलेला सदरा रघू निमूटपणे वापरे. भावाची बायको रघूचा पदोपदी अपमान करी, त्याला टाकून बोली. रघू म्हणजे तिला गळयातील धोंड वाटे. सातवीपर्यंत रघू कष्ट करून स्वतः चार दोन पैसे कमवून शिकला. थोरामोठयांच्या हातापाया पडून एका मामलेदार कचेरीत बारा रूपये पगारावर चिकटला. तालुक्याच्या गावी जाऊन राहू लागला. भावाचा प्रपंच खेडयात चाले ना म्हणून तो सोलापूरला गेला व रघूला त्याने साधे जाताना विचारलेही नाही.

कासारगल्लीतील एका मोडकळीला आलेल्या घरात रघू राहू लागला तेथे भूत आहे, असा समज असल्याने मालकाने रघूला ते फुकटात दिले होते. जरूरी पुरती दोन-चार भांडी रघूने घेतली. रोज सकाळी उठून शेजाऱ्याच्या आडावर जाऊन चार तांबे पाणी अंगावर ओतून आंघोळ करायची, पाण्याची घागर भरून आणायची, चहा करून प्यायचा आणि कचेरीत जायचे असा त्याचा ठरलेला सकाळचा दिनक्रम होता. दुपारी घरी येऊन चार भाकरी-कालवण करावे खावे आणि थोडा वेळ डुलकी घ्यावी किंवा घर झाडून घ्यावे असे तो ठरवून करीत असे. कचेरीची वेळ झाली की परत पाच वाजेपर्यंत खर्डेघाशी करत असे. संध्याकाळी कधी वाण्याच्या दुकानात तर कधी बाजारपेठेत चक्कर मारून रघू वेळ घालवत असे आणि अंधारल्यावर परत येऊन चार घास खाऊन सूताडयावर पडून राही. अनेक वर्षे त्याचा हाच दिनक्रम होता. घरात सोबतीला कोणी नाही, रघू एकटा होता. भूतासारखा त्या घरात एकटाच भिंतीकडे बघून जगत होता.

मग हळूहळू त्याच्या दिनक्रमात बदल झाला. तो उशीरा उठू लागला, धावपळ करून कशीतरी अंघोळ आटपून कचेरीत जाऊ लागला. चूल पेटवून भाकऱ्या न भाजता शेंगदाणे खाऊ लागला. त्याच्या घरात त्याच्यापेक्षा लहान असलेली टपोरी पोरं बिडया ओढायला येऊ लागली. वेळी-अवेळी चूल पेटवून चहा प्यायला लागली. रघूचा पूर्वीचा दिनक्रम बिघडला. लग्नासाठी त्याने पैसे साठवायचे ठरवले त्यामुळे तो पोट

मारू लागला. कळकट बिटके कपडे, चेहऱ्यावर दैन्य-लाचारी आणि असहायता अशी अजून काही वर्षे गेली. रघूचे लग्नाचे वयही निघून गेले. आपल्या लग्नाचे बघायला कोणी मोठे माणूस नाही, आपण गरीब आहोत, या विचाराने रघू अस्वस्थ होई.

भावाच्या कानापर्यंत ही बातमी जाताच भावानेही शेवटी रघूच्या लग्नाचे मनावर घेतले. मुलगी ठरली व अनेक विघ्ने येऊन शेवटी रघूचे लग्न झाले. रघू बायकोला घेऊन गावी आला व नोकरीवर रूजू झाला. त्याने घर बदलले. त्याचा दिसण्यात, पोषाखात बदल झाला. व रघू पुन्हा एकदा माणसात आला.

महागाईच्या काळात रघूचा संसार सुरू झाला. बायकोची बाळंतपण, दुखणी, दोन पोरांची भर साऱ्याने रघू टेकीला आला. आर्थिक चणचणीने चिंताग्रस्त झाला. लोकांकडून पैसे उधार घेऊ लागला. आणि देणेकऱ्यांना चूकवू लागला. त्याची बायकोही खचली. रोजचे वाद-भांडणे, पोरांचे गोंधळ-रडारड याने रघू वैतागून जाई. कचेरीतून घरी आल्यावर त्याला वेळेच्या वेळी जेवण मिळेनासे झाले. रघूने साऱ्याला वैतागून एके रात्री अफू खाली. आपण मरणार या विचाराने तो खूप घाबरला. डॉक्टरांना बोलावून आणल्यावर त्यांच्या पाया पडून 'वाचवा' असे म्हणू लागला. लहान मुलासारखा रडू लागला.

सगळ्यांना वाटले रघूने गरीबीला कंटाळून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. पण कारण वेगळेच होते. रघूच्या बायकोचे दुसऱ्या माणसाशी सूत जमले होते. एके दिवशी रघूला असे काही आढळले की त्याला मरावेसे वाटले. गरीबी माणसातले माणूसपण कसे मारून टाकते याचे अस्वस्थ करणारे चित्र रघूच्या रुपाने दिसते.

**नामा मास्तर :**

या कथेत माडगूळकरांनी नामा या महाराचे व्यक्तिचित्र रेखाटले आहे. गावात आल्यावर निवेदकाला अचानक नामा भेटतो आणि त्याच्या आयुष्यात मधल्या काळात घडलेले सारे तो निवेदकला सांगतो. लहानपणीच्या आठवणी काढतो. नामा मास्तरच्या स्वभावाचे, वागण्या-बोलण्याचे कितीतरी विशेष माडगूळकर चित्रित करतात.

मिरज ते पंढरपूर खेपा घालणारी सर्व्हिस बस सरूबाईच्या मठाशी थांबते व निवेदक त्यातून उतरून गावाकडे जाऊ लागतो. गावातल्या मारूतीच्या देवळावरून चावडीवरून पुढे येतो. शाळेची इमारत त्याला दिसते. ज्यावर 'लोकलबोर्ड मराठी शाळा, मौजे चोपडी' असे लिहिले असते. ते वाचतानाच त्याला कोणीतरी 'यंकटराव' अशी हाक मारतो. निवेदक मागे वळून पाहतो व नामा मांग याची ओळख त्याला क्षणात पटते. अनेक वर्षांनी भेटलेल्या नामाला जवळ घेऊन 'विसरेन कसा?' असे निवेदक म्हणतो तेव्हा नामाही हरखून जातो.

नामा त्या शाळेत मास्तर असतो. अंबाडी-केकताडीचा वाख करून कुणब्यांना नाडा-सेंदूर पुरविण्याचा आपला पिढीजात धंदा सोडून नामा थोडा शिकतो. नादारी मिळाल्याने कसाबसा सातवी पास होतो, अर्ज करतो आणि खालच्या जातीतला म्हणून त्याची लगेच मास्तर म्हणून नेमणूक होते. शिकला सवरला तरी त्याची भाषा पूर्वीसारखीच असते. शाळेतही तो याच भाषेत शिकवत असतो. त्याने लग्न केले असते. त्याला दोन मुले असतात. कुटुंब गावी ठेवून तो नोकरीसाठी चोपडीच्या शाळेजवळ रहात असतो. शनिवार-रविवार

घरी जाऊन येताना भाकऱ्या बांधून आणत असतो. त्या संपल्या की उरलेले दिवस हातानं करून खात असे.

निवेदक आणि नामा एका हॉटेलमध्ये बसून चहा पितात. शाळेकडे परत जाताना निवेदकाला ते दोघे ज्या शाळेत शिकतात त्या शाळेतील प्रसंगाची आठवण होते.नामा आणि निवेदक मराठी दुसरीच्या वर्गात शिकत असताना नामा फाटकंतुटकं धोतरकुडतं घालून पाटी घेऊन नियमित शाळेत जात असे. निवेदकाशी त्याची चांगली मैत्री असते. निवेदक त्याची स्वतःची पुस्तके, पेन्सिली नामाला देत असे. नामाही मग भोक्यासाठी चरी वळून देत असे. गोफण करुन देत असे. रानातली व्हल्या-पारव्याची अंडी दाखवी. झाडावर चढयला व सूरफाटयाने खेळायला नामानेच शिकवले असते. उत्तम हलगी तो वाजवी आणि लावणीही झोकात म्हणत असे.

एकदा जुने मास्तर जाऊन नवे मास्तर येतात व एके दिवशी ते गाणी म्हणायला मुलांना सांगतात. मुलेही आनंदाने एकेक करत गाणी म्हणातात. कोष्टयाचा रघू अभंग म्हणतो. निवेदक एक कविता म्हणतो. रामा पाठक 'रडवे माझे वदन बघोनी' ही कविता म्हणतो व शेवटी नामावर पाळी येते. नामा उजव्या कानावर हात ठेवून खडया आवाजात लावणी गाऊ लागतो. 'भरज्वानीचं वादळ सुटलं, बाई सुटलं, मला सख्यानं नाही कसं म्हटलं...' हे ऐकून मास्तर त्याला गप्प बसायला सांगतात ओरडतात. लावणी म्हटल्याबद्दल बेदम मारतात. निरगुडीच्या छडया अंगावर ओढल्याने नामा गुरासारखा ओरडतो. शाळा सुटल्यावर ओढ्याकाठी निवेदकासोबत बसून नामा रडतो. कधीच शाळेत जायचे नाही असा निश्चय करतो.

घरी जाऊन बापाला सगळी घडलेली घटना सांगतो, 'आता जाऊच नकोस' शाळेत, असे त्याची आई त्याला जवळ घेऊन म्हणते. पण बाप म्हणतो की असे करून चालणार नाही 'शाळेत जायचेच म्हणजे मार खायलाच हवा.' त्याशिवाय लिहायला-वाचायला येत नसते. मी तुला शिकवून मोठा करणार आहे. तू पण मास्तर हो, असे त्याचा बाप त्याला समजावतो. नामाचे डोळे पुसतो. नामा पुन्हा शाळेत जाऊ लागतो.

ही आठवण अजूनही निवेदकाच्या मनात स्पष्टपणे कोरलेली असते आणि शाळेत पुन्हा पूर्ववत जायला लागणारा मित्र नामाही मनात घर करून राहिले असतो. बोलता-बोलता दोघे पुन्हा शाळेपाशी येतात. नामा शाळा सोडून देतो व मुले गलका करीत बाहेर पडतात. 'परत कधी भेटणार?' या नामाच्या प्रश्नावर निवेदक त्याला म्हणतात, "आता आहे ती नोकरी सोडू नकोस. चार पैसे जमव आणि ट्रेनिंग कॉलेजला जा, आणखी जरा वनवास सोस आणि ट्रेंड हेडमास्तर हो," दोघे एकमेकांचा निरोप घेतात.

एक दोन वर्षांनी कोल्हापूरला निवेदकाला परत नामा भेटतो. तमाशा बघायला म्हणून थिएटरमध्ये निवेदक गेला असता तमाशात त्रिकोण वाजवताना नामा दिसतो. चोपडीच्या शाळेतला मास्तर इथे कसा आला हे न समजून नामाला विचारल्यावर नामा म्हणतो की मास्तरीत चव नाही. मिळकतही नाही. आता मनाजोगता धंदा आहे, मिळकत आहे. राजीनामा दिला आणि तमाशात शिरलो.

**माझा बाप :**

नरसू तेलीचा मुलगा रामू शाळेत शिकत असतो. रामूच्या वर्गाला देशपांडे आरोग्यशास्त्र शिकवीत असतात. ते गंभीर असतात. आणि क्वचित विनोद वगैरे करतात. ते आरोग्यशास्त्र शिकवू लागले की रामूचे डोळे मिटत आणि अनेकदा तो झोपत असे. मास्तरांच्या ते लक्षात आले की ते रामूला उठवत व डोळ्याला

पाणी लावायला सांगत. वर्गात एकदा त्यांनी असेच रामूला झोपेतून उठवून देवी काढल्या आहेत का? असे विचारले व त्याचे दंड बघून त्याच्या वडिलांना पत्र लिहून रामूकडे दिले.

रामू ते पत्र घेऊन बापाकडे नरसूकडे गेला. नरसू तेलाचा घाणा चालवत होता. उन्हाने करपून गेलेल्या त्याच्या अंगावर धोतराखेरीज काही नव्हते. रामूने चिठ्ठी नरसूकडे दिली. ती त्याने वाचली. तो काही क्षण गंभीर झाला. त्याने रामूला जवळ बोलवून त्याचे अंग तपासले व चिठी फाडून टाकली. 'मास्तरला काही कळत नाही' असे म्हणून नरसूने त्यांना चिठ्ठी पाठवली की रामूला ताप नाही, देवी टोचून घ्यायची गरज नाही. देशपांडे मास्तर पुन्हा पत्र पाठवतात व त्यात देवीची लस टोचून घेण्याचा आग्रह धरतात. नरसूला आपला मुलगा ताप आल्याचे खोटेच सांगून मास्तरला फसवतो आहे असे वाटते व त्यामुळे नरसू मुलाला आसुडाने मारतो. मास्तरांना पुन्हा चिठ्ठी पाठवून रामूला आपण मारले असल्याने तो खोटे बोलणार नाही असे त्यातून कळवतो.

आपला बाप हेकेखोर आहे व तो लस टोचू देणार नाही हे रामूला ठाऊक होते. हे चिठ्ठी प्रकरण अजून किती दिवस चालणार या विचाराने रामू वैतागतो. नरसूला अखेर झाला प्रकार मास्तरांच्या अखेरच्या चिठ्ठीवरून लक्षात येतो व तो मास्तरांची चिठ्ठी दिव्यावर धरून जाळतो. सुया टोचून साथी जात नाहीत असे त्याचे ठाम मत असते. आपला आजा व बाप शंभर वर्षे जगले. देवी टोचायचा आग्रह धरला तर रामूची शाळा बंद करावी असे तो ठरवतो. 'माझ्या मुलांची काळजी मला आहे' असा आशय असणारी चिठ्ठी मास्तरांना लिहितो. रामू या प्रकाराने आधीच धास्तावलेला असतो. आपल्याला आता घाण्यावर बसावे लागणार या विचाराने तो व्याकुळ होतो. जड पावलांनी चिठ्ठी घेऊन शाळेकडे जाण्यास निघतो. त्याची आई मागून धापा टाकत येते व त्याला विचारते की, तू टोचून घेशील का? मी दवाखान्यात नेते. रामू तयार होतो. नरसूला हे कळणार नाही याची ते दोघे पुरेपूर काळजी घेतात. दवाखान्यात जाऊन लस टोचून घेतात.

देवीची साथ संपते नरसू फूशारकीने म्हणतो,'' सांग तुझ्या मास्तरला मी अजून जिवंत आहे म्हणून आणि म्हणावं माझा बापही आहे. गाढव साले. देवा शपथ मी सांगतो, पोरा तुझा तो मास्तरच एके दिवशी साथीत पटकन् मरेल!''

यावर रामू व त्याची आई हळूच हसतात.

**शिदा चांभार :**

शिदा चांभार उंचीने बुटका, पण हाडापेराने थोराड आहे. रंगाने काळाभोर आणि स्वभावाने मोठा बेरकी आहे. त्याच्या तोंडावरूनच हा माणूस धूर्त आणि लुच्चा असावा, असे वाटते. शिदा गरीब पण माजोरी आहे. डोक्यावर गुंडाळलेले मुंडासे अंगात मळकट सदरा त्यावर निळा ढगळ लोकरी कोट तोही जागोजागी पांढऱ्या दोऱ्याने रफू केलेला. खाकी तांबडया काठाचे जाड धोतर देशमुखासारखे नेसलेले. याचे टोक एका हातात धरून आणि दुसऱ्या हातात एखादा नवा जुना चप्पलजोड घेऊन तो घाईघाईने इकडून तिकडे जाताना निवेदकाला दिसतो. वहाणा खूपच फाटक्या असतात. तेव्हा निवेदक एकदा त्याला बोलावतो. पायताण सांधून आणायला सांगतो.

❖ ❖ ❖

## प्रकरण ९

# माडगूळकरांच्या कथा लेखनाचे दलित व ग्रामीण विशेष

प्रस्तुत पाठात आपण व्यंकटेश माडगूळकरांच्या कथालेखनाचे दलित व ग्रामीण विशेष समजून घ्यायचे आहेत.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात सामाजिक परिवर्तनाला गती मिळाली. त्याचाच एक परिणाम म्हणून वाङ्‌मयीन क्षेत्रात अनेक ग्रामीण आणि दलित लेखक उदयास आले. कथा, कविता, आत्मचरित्र, एकांकिका अशा वैविध्यपूर्ण वाङ्‌मयप्रकारातून दलितांचे जीवन, त्यांचा संघर्ष आणि माणूस म्हणून जगताना त्यांना करावा लागणारा झगडा याचे चित्रण या लेखकांनी केले.

या पार्श्वभूमीवर गो. मा. पवार यांनी व्यंकटेश माडगूळकर यांच्या ग्रामीण व दलित कथांचे संपादन केले ते माडगूळकरांच्या वैशिष्टयपूर्ण लेखनामुळेच.

'ओझ' या संग्रहातील दलित कथांचे विशेष अधिक स्पष्टपणे मांडता येतात ते त्या कथांना लाभलेल्या ग्रामीण पार्श्वभूमीमुळे! जी व्यक्तिचित्रे माडगूळकरांनी कथेत रंगविली आहेत, ती खेडयात रहात असल्याने एका विशिष्ट पध्दतीची आहेत. जे प्रश्न कथेतून मांडले आहेत ते प्रश्न निर्माण होण्यास वातावरण आणि तिथला विशिष्ट समाज कारणीभूत आहे. म्हणूनच ग्रामीण आणि दलित असे दोन्ही विशेष महत्त्वाचे आहेत.

### कथांचे विषय बनलेल्या व्यक्ती

संग्रहातील सर्व कथांचे विषय बनलेल्या व्यक्ती या महार, मांग, व्हरल, रामोशी, वडार, सोनार, पारधी, नंदीवाले, कातकरी, वैदू, माकडवाले, गोसावी अशा दलित व भटक्या जातीतील आहेत.. 'देवा सटवा महार' या कथेतील देवा महार आहे. दलित मनाचा सवर्णाविरूध्दचा प्रक्षोभ या कथेत प्रकट होतो. गणा हा नांद्रेकराच्या तमाशात ढोलकी वाजवण्याचे काम करणारा, गणा महार या कथेचा नायक आहे. तर 'गोडे पाणी' या कथेतील पाण्यासाठी विहीर खोदणारे हिरीरीने पुढे येणारे गणा, संदीपन, हे देखील दलितच आहेत. कथेतील व्यक्तिरेखांमधील अनेक व्यक्तिरेखा व कथेचे नायक जसे दलित आहेत तसेच कथेचे विषयही दलितांच्या जीवनाशी निगडीत आहेत. किंबहुना असेच म्हणता येईल की कथेचे विषय हे देखिल दलित कथेचे वैशिष्टय ठरते.

**कथेचे विषय :**

दलित वर्गीयांना सवर्ण कसे वागवतात आणि सवर्ण-दलित यांच्यातील संबंध कसे असतात या विषयाच्या अनेक कथा या संग्रहात आहेत.

रामा मैलकुली, शिदा चांभार, देवा, गोविंदा कातकरी, गोपा व्हरव अशी कितीतरी व्यक्तिचित्रे त्यांनी कथांतून रंगवली आहेत. जिवंत केली आहेत. सवर्ण, ब्राह्मण, मराठा, दलित, बलुतेदार हे सगळेच

गावगड्याचे घटक असतात. एकमेकांवर अवलंबून असतात. आज हे चित्र फक्त खेड्यापाड्यातच, तेही काही प्रमाणातच दिसते. शहरातून त्याचा मागमूसही उरलेला नाही. आता ग्रामजीवनाचे काही विशेष आपण समजून घेऊ.

**कथेतील वातावरण :** माडगूळकरांनी संवेदनशीलता ग्रामजीवनातील वैशिष्ट्यांनी घडलेली आहे. ग्रामजीवनाचे सूक्ष्म निरीक्षण आणि त्यातून डोळयापुढे उभे राहणारे वातावरण हा त्यांच्या कथांचा महत्त्वाचा विशेष आहे. खेड्यांचे, खेड्यातील महार वस्तीचे, वडारवाडीचे, तिथल्या घरांचे, माणसांचे आणि निसर्गाचे वर्णन जिथे जिथे येते तिथे है वैशिष्ट्य ठळकपणे नजरेत भरते.

उदा. 'देवा सटवा महार' या कथेतील देवा हा तराळ गावात देवी काढणारा डॉक्टर येणार म्हणून दिवसभर पाटलाच्या हुकमावरून उपाशी पोटी राबतो, साऱ्यांना चावडीवर येण्यासाठी अनेकदा सांगून येतो. तरीही शेवटी कोणीच आले नाही म्हणून चिडून डॉक्टर देवा तराळळच शिव्या घालतो. त्याचा अपमान करतो. संपूर्ण दलितांनाच त्यांच्या जातीवरून वाटेल ते बोलतो! हे सहन न होऊन देवा डॉक्टरवर पायताण उगारतो अखेरीस त्याला तुरूंगात जावे लागते.

'गोडे पाणी' या कथेत दलितांवर संपूर्ण गावच कसा अन्याय करतो आणि सवर्ण स्वतःचा स्वार्थ कसा साधतात याचे चित्रण केले आहे. दलितांच्या वस्तीत पाण्याचा प्रश्न असतो व एक विहीर बांधून तो प्रश्न सोडवण्याचा ते प्रयत्न करतात. संपूर्ण गावात विहीरींना खारे पाणी असताना दलितांनी बांधलेल्या विहीरीला मात्र गोडे पाणी लागते. हे समजताच गावकऱ्यांची बुध्दी फिरते. ज्या जागेवर विहीर बांधली ती जागा दुसऱ्याची आहे व त्यासाठी गाव कोर्टात जाईल आणि कोर्ट काय तो निर्णय देईल असा दम गावकरी महार मंडळींना भरतात. सगळे घाबरलेले महार गावकऱ्यांच्या पाया पडतात. कोर्टात न जाण्याची विनंती करतात.गावकरी केलेल्या कष्टाबद्दल महारांना अतिशय थोडे पैसे देतात व गोडया पाण्याची विहीर आपल्या ताब्यात घेतात. संपूर्ण गाव दलितांवर अन्याय कसा करतो, याचे विदारक चित्र या कथेत माडगूळकरांनी रेखाटले आहे.

दोन व्यक्तींमधील भांडण जातीय भांडणाच्या पातळीवर येते. आणि गाव अल्पसंख्यांक अस्पृश्य जातीला कसे नामोहरम करते याचे चित्र 'आडिट' या कथेत दिसते. या कथेतील गोपा व्हरल पूर्वी दरिद्री असतो पण त्याच्याकडे दोन बोकडे येतात आणि तो गावात तोऱ्यात हिंडू फिरू लागतो. गणा चलपते जेव्हा त्याच्याकडे बोकड विकत घ्यायला जातो, तेव्हा 'तुम्हाला परवडणार नाही त्यापेक्षा रेडा कापून खा' असे गोपा त्यांना म्हणतो. त्यांच्या दोघांच्या भांडणाचे रूपांतर एका मोठया वादात होते. गणा, पाटलाला सर्व सांगून व्हरलांना चावडीवर बोलावून जाब विचारतो. मराठयांना महारासारखा रेडा खायला सांगून गोपाने त्यांना महारच बनविलें आणि याची शिक्षा त्याला मिळालीच पाहिजे यावर सगळया सवर्णांचे एकमत होते. व सगळे मिळून व्हरलांना बेदम मारतात. दुसऱ्या दिवशी गोपा वीस रूपयांचे बोकड सोळा रूपयात गणालाच विकतो. गोपाची आगतिकता आणि सवर्णांच्या हातात असलेली सत्ता व ताकद याचे चित्रण माडगूळकर यथार्थपणे करतात.

**दलितांच्या वाटेला आलेले दारिद्रय :**

समाजरचनेला बळी पडलेल्या दलितांच्या जीवनात दारिद्रय कसे व्यापून राहिलेले आहे याचेही चित्रण

माडगूळकर अनेक कथांतून करतात. त्यांच्या घरांचे, वस्तीचे, व्यक्तीचे चित्रण करताना केलेले वर्णन जीवनातील दारिद्र्याचा निर्देश करते.

उदाः 'धर्मा रामोशी' कथेतील धर्मा आयुष्यभर काबाड कष्ट करतो. तरीही त्याच्या म्हातारपणात त्याला चार घास खायला अन्नही मिळत नाही. उकडलेल्या भाजीचा लगदा, तांबडया रंगाची भाकरी यावर त्याला स्वतःची गुजराण करावी लागते. त्याच्या मुलीला अंग झाकायला धड कपडेही नसतात. म्हणून ती कोणासमोर येतही नसते. धर्माला जुने धोतर मिळाल्यावर त्याचा लुगडयासारखा वापर करून ते नेसते. अन्ना आणि वस्त्र यांसारख्या अतिशय प्राथमिक गरजाही भागवू न शकणारा रामोशी माडगूळकर कथेत परिणामकारकरीत्या रंगवतात. जिथे रोजचे अन्नही धड मिळत नाही तिथे चांगले-चुगले कोण खायला घालणार? 'रामा मैलकुली' या कथेतील रामाला जेव्हा मऊसूत पोळया, लिंबाचे लोणचे, लसणाची चटणी असे अन्न निवेदक देतो तेव्हा तो ते आपल्या भाच्यासाठी ठेवून देतो. भाच्याला ते खायला मिळावे म्हणून स्वतः ते खात नाही. किंवा 'आडिट' या कथेतला गोपा व्हरल कुणी पानाचा विडा दिला तर उशीरापर्यंत तोंडात घोळवत असतो. इतकेच नाही तर मध्येच तहान लागली तर तोंडातला चोथा काढून दगडावर ठेवी आणि पाणी पिवून झाले की तोंडात टाकत असे.

कथांमधील व्यक्तींच्या अंगावरचे मळके कपडे, घरांची वर्णने, काशाची भांडी, गाडगी-मडकी, एखाद्याचे कालवण आणि त्याबरोबर भाकरी असे रोजचे अर्धवट जेवण अशा कितीतरी गोष्टी दलितांच्या जीवनातील परिस्थिती अत्यंत दारिद्र्याची असल्याचे सांगतात.

दलितांच्या आयुष्यात सततच्या दारिद्र्यामुळे माणसांचा कसा भावनिक कोंडमारा होतो ते 'ओझं' या कथेत पहायला मिळते. ज्या गोष्टी आनंददायी असतात, ज्यातून आयुष्य जगण्याची प्रेरणा मिळू शकते अशा गोष्टी सुध्दा एक मोठं संकट होऊ शकते. त्यातून मनाचा कोंडमारा होतो आणि जीवघेणी ओढाताण होते. 'ओझ' मधील लाडाबाईचे आठवे बाळंतपण जवळ आले असते आणि ते झोपडपट्टीत करणे शक्य नसते. नवऱ्यांची इच्छा असते की एखादी छोटी-मोठी चोरी लाडाबाईने करावी व जेलमध्ये जावे. तेथे बाळंतपण चांगले होईल. पण ते लाडाबाईला पटत नसते. गरीब झालो म्हणून अब्रू सोडावी का असा तिला प्रश्न पडत असतो. कुठल्यातरी एका क्षणी ती चोरीचा निर्णय घेऊन तसा प्रयत्नही करते पण पकडली गेल्यावर तिच्या परिस्थितीकडे पाहून तिला सोडून देण्यात येते आणि लाडाबाईही जीव मुठीत घेऊन परत झोपडपट्टीत येते. वाटेल ते झाले तरी इथेच झाडाखाली बाळंतपण करण्याचा निर्णय घेते. जगणं हेच 'ओझं' होऊन गेले अशा लाडाबाईचे चित्रण माडगूळकर परिणामकारकपणे करतात.. दारिद्र्याचा शाप असलेल्या दलितांचे असे चित्रण अनेक कथातून दिसते.

सवर्णांनी अन्याय केला म्हणून किंवा सतत दारिद्र्य असल्यानें दलितांचे जगणे दुःखाने व्यापलेले आहे असे जरी कथांतून दिसत असले तरी दलितांच्या दुःखाचे कारण जीवाभावाची माणसे, त्यांच्याच जातीतील माणसे आहेत असेही काही कथातून प्रत्ययास येते. अनेकदा स्वतःची जात, त्या जातीचा पिढयानपिढया चालत आलेला व्यवसाय, समाजाची भीती, स्वतःच्या वाडवडिलांच्या अब्रूचा सतत केलेला टोकाचा विचार आणि शिक्षणाचा अभाव ही कारणेदेखील दलितांचे जीवन दुःखमय करतात.

उदाः राव्या व भाव्या हे दरोडेखोर भाऊ एकमेकांवर जीवापाड प्रेम करीत असतात. भाव्या कर्तबगार

असतो. व तो थोरल्या भावाच्या मुलावर आपल्या मुलासारखे खूप प्रेम करत असतो. त्याला खारकेचा खुराक देऊन आपल्या धंद्यात निष्णात करतो. परंतु एकमेकांत बेबनाव निर्माण होतो व ते दोघे एकमेकांचा जीव घ्यायला तयार होतात व शेवटी त्यातूनच दोघे भाऊ व मार्तंड असे तिघांचेही जीव जातात. शेवटी 'पडकं खोपटं' तेवढं शिल्लक राहते जे त्या तिघांच्याही आयुष्याचे प्रतीक ठरते.

'बनगरवाडीच्या वस्तीत' या कथेतही बाप मेल्यावर वडराची लक्षी काळया वडाराचा आधार घेते. त्याच्या बरोबर राहू लागते. तो तिला फसवतो. दारू पिऊन रोज तिला मारतो, तिचा छळ करतो व एकदा नशेत तिच्या जीवावरच उठतो. लांडग्याला दोन्ही हाताने धरणारी बहादूर लक्षी काळयासमोर मात्र अतिशय केवीलवाणी असते.

सततचे हालाखीचे जगणे असले तरीही, अपमानित जीणे असले तरीही कुटुंबातील माणसांचे नातेसंबंध त्यातील प्रेम, ओलावा हे अखंडितपणे आबाधित असल्याचे अनेक कथांमधून दिसते. दलितवर्गातील विविध वृत्ती-प्रवृत्तीची अनेक माणसे कथांमधून भेटतात. 'देवा सटवा महार' कथेतील देवा अतिशय प्रेमळ असून त्याचे तीन मुलगे व बायको राणी यांच्यावर प्रेम आहे. श्रद्धाळू देवा उपासतापास करणारा आहे. आणि आपल्या कुटुंबासाठी काबाडकष्ट करणारा आहे. दारिद्रय आणि अपमानित जगणे याच्याशी संघर्ष करताना सुध्दा त्याचे कुटुंबविषयीचे प्रेम जिवंत आहे.

मुंबईत तमाशात ढोलकी वाजविणारा 'गणा महार' गावकी सोडून गावातून आला आहे. तमाशाच्या नादाला लागून कित्येकांचे संसार सोडून गेलेले त्याने पाहिले आहेत. मुंबईत अनेक दिवस त्याने उपाशी राहून, आठ आठ कोस चालून खूप कष्ट करून काढले आहेत. बराच काळ संघर्ष करूनही त्याने तमाशाचा नाद सोडला नाही. अशा परिस्थितीत बायको मुले यांना घेऊनच फिरला, संसार गावाकडेही ठेवला नाही. बायको, मुलांवरच्या प्रेमामुळे त्याचा संसार टिकून राहिला. गणाला त्याच्या पोराचे भविष्य उज्वल दिसते व तो ढोलकी वाजविणार, परंपरा चालू ठेवणार आणि फडाचा मालक होणार असे त्याला वाटते.

रामा मैलकुल्याची बायको त्याला सोडून गेल्यावर रामा आपल्या विधवा बहिणीवर व भाच्यावर माया करून जगत असतो. अंमलदाराबरोबर कामाला निघताना तो भाच्याच्या पोटावर हळूच गंमतीने चापट मारतो व त्याच्या धुळीने माखलेल्या तोंडाचा प्रेमाने मुका घेतो. माणसाला प्रेमाची, मायेची किती ओढ असते ते रामाच्या या कृतीतून दिसून येते. अंमलदाराने दिलेले मोकळे पिठले, मऊ सूत पोळी, चटणी हे सारे रामा न खाता आपल्या भाच्यासाठी बांधून घरी नेतो.

'वारी' कथेमध्येही कुटुंबातील प्रेम व अतूट नातेसंबधाचे असेच दर्शन घडते. वारीसाठी निघालेल्या अर्जुनाला सुरूवातीस मुलगा व सून काहीसा विरोध करतात इतक्या लांब जायचे, गर्दी यात कसा निभाव लागणार असे वाटून लांबूनच नमस्कार करण्याचे सुचवतात. परंतु आता विठोबाचे मंदिर दलितांनाही खुले आहे तर मरायच्या आधी पांडुरंगाच्या पायावर डोके ठेवण्याची इच्छा अर्जुन म्हतारा बोलून दाखवितो व शेवटी मुलगा-सून त्यांच्या जाण्याची तयारी करतात. सून अंगावरची धडुती सवळेच्या मातीने खळणी करते-मुलगा त्यांचा जोडा फाटलेला असतो तो शिवून आणतो. सून भरपूर शिदोरी बांधून देते. अर्जुनाचाही पाय जाण्यासाठी निघत नाही. नातवंडेही बत्तासे-मुरमुरे आणण्याचा हट्ट अर्जुनापाशी धरतात. असे प्रेमाचे चित्रण माडगूळकर 'वारी' या कथेत करतात त्याचबरोबर दलितांना पंढरीच्या विठोबाचे देऊळ खुले झालेले

असूनही अर्जुनला देवळात जाण्याची हिंमत होत नाही, यांतील करूण विरोधाचेही चित्रण करतात. अर्जुनच्या मनातील दलितपण संपत नाही. तो देवळात न जाताच माघारी फिरतो. दलितांच्या जीवनातील छोटेछाटे आनंद दाखविण्याचा प्रयत्न करतात.

## प्रकरण १०

# ओझं : ग्रामीण कथाविशेष

प्रस्तुत पाठात व्यंकटेश माडगूळकरांच्या 'ओझं' या कथासंग्रहातील कथांमधून दिसणारे ग्रामीण जीवनाचे विशेष पहावयाचे आहेत.

प्रस्तुत कथासंग्रहामधील सर्व कथांची पार्श्वभूमी ग्रामीण आहे. केवळ 'गणा महार' या कथेतील गणा लेखकाला मुंबईत भेटला आहे.

ग्रामजीवनाचा अविभाज्य भाग असलेले दलित आणि बलुतेदार हेच त्यांच्या कथाचे नायक आहेत धर्मा रामोशी, गणा महार, नामा मास्तर ग्रामीण इ. ग्रामीण जीवनावर लिहिण्याचे प्रयत्न त्यांच्यापूर्वी मराठी कथाक्षेत्रात झाले नाहीत असे नाही. पण ते बहुतेक अत्यंत कृत्रिम आणि रसहीन होते. ग्रामीण जीवनाशी समरस व्हायला ते लेखक असमर्थ ठरले मधून मधून ग्रामीण शब्दांची पेरणी करत आणि नायक-नायिकांचे वेष बदलून मराठी लघुकथेतील सांकेतिक विषयच त्या कथातून मांडले होते.

माडगूळकरांची कथा मात्र अस्सल ग्रामीण आहे. माणदेशाच्या मातीत तिची पाळेमुळे खोल गेलेली आहेत, त्यामुळे ती अकृत्रिम झाली आहे. गंगाधर गाडगीळ म्हणतात, ''त्या जीवनाचे जे वळण तेच त्याच्या लघुकथेचेही वळण आहे. असे असल्यामुळे त्या जीवनातील जी माणसे तीच त्या लघुकथेतील माणसे आहेंत. त्या जीवनाची जी भाषा तीच त्या लघुकथेतील भाषा आहे. असे असल्यामुळे त्यांच्या लघुकथेला विलक्षण सामर्थ्य प्राप्त झाले आहे. (खडक आणि पाणी पृ. १३२)

माणदेशातल्या माणसांच्या वृत्तीतला साधेपणा, सोशिकपणा, हट्टीपणा, त्यांच्या जीवनाची गती आणि त्याची वळणे ही सारी माडगूळकरांच्या कथेचे विषयच नाहीत तर प्रकृतीही आहेत. त्यांच्या कथेत जीवनातले कारूण्य ओतप्रोत भरले आहे. जीवनातले हे कारूण्य कशामुळे निर्माण होते. एक तर ते दारिद्रयामुळे निर्माण होते. त्यांच्या कथेतील जवळ जवळ सर्वच पात्रांचा हा दारिद्रयाचा शाप आहे. पण ती पात्रे त्या दारिद्रयाबद्दल तक्रार करीत नाहीत. ते मुकाटयाने सोसतात. पुष्कळदा मनातल्या नैसर्गिक ओढीप्रमाणे त्यांच्या कथांतली पात्रे वागत जातात आणि अखेर परिस्थितीच्या भिंतीवर त्यांचे डोके आपटून फुटते. (उ.नि.पृ. १३३)

'' नुकतीच दिवेलागण झाली होती. रानातून परतलेल्या कुरवाड्याच्या बायकांनी ......... फडफडत होते.'' (देवा सटवा महार, पृ.१)

किंवा

'वडारवाडीच्या वस्तीत या कथेतील-

* वडरवाडी आणि नायगाव यांची ताटातूट....मढक्यांनी थाटलेला संसार होता'' (पृ.६७. 'वडारवाडीच्या

वस्तीत')

हे वर्णन गावातील नेमके ठिकाण, वातावरण अधोरेखित करते.

'गोडे पाणी' या कथेची सुरूवातही अशीच ग्रामीण वातावरणाची पार्श्वभूमी निर्माण करणारी आहे.

• ''उन्हाळयाचे दिवस होते.... ही माणसे बोलत होती. (पृ. १० 'गोडे पाणी' सुरूवातीचे चार परिच्छेद)

माडगूळकरांनी हे कथांतून केलेले ग्रामीण वातावरणाचे वर्णन केवळ वर्णन म्हणून येतच नाही. या कथा ग्रामीण आहेत. म्हणूनही ते वर्णन माडगूळकर करीत नाहीत. तर ज्या कथा त्यांनी लिहिल्या आहेत त्यातील माणसे कोणत्या वातावरणातून वावरतात, जगतात हे अधोरेखित करण्यासाठी गावाचे नाव, निसर्गाचे रूप, झोपडयांची अवस्था, विविध आवाजाचे संदर्भ काळ-वेळाचे संदर्भ यांची तपशीलवार माहिती येते.

घरं, झोपडया यांचेही जे वर्णन माडगूळकर करतात त्यातून गावातील बलुतेदार-दलित त्यांची आर्थिक परिस्थिती तर दिसतेच परंतु त्या वर्णनाने त्या-त्या कथेतील आशयाचा परिणाम वाचकावर अधिक सखोल होतो.

उदा. 'रामा मैलकुली' या कथेतील रामाच्या खोपटाचं वर्णन कितीतरी तपशीलांसकट केले आहे. ते पहा.

'रामाचं खोपटं भारीच बुटकं होतं.....नाकानं आवाज करीत होती'' (पृ. ११ 'रामा मैलकुली)

**कथेचे बीज / कथेचा आशय / विषय हे अस्सल ग्रामीण आहेत :**

माडगूळकरांच्या संग्रहातील कथा अस्सल ग्रामीण आहेत कारण त्यातील व्यक्तिरेखा पात्रे, घटना-प्रसंग, वातावरण, भाषा हे सर्व कथेचे घटक अस्सल ग्रामीण आहेत. उदा. 'गोडे पाणी' या कथेतील महार विहीर खोदतात आणि कष्टाने बांधलेल्या विहीरीला गोडे पाणी लागते तेव्हा स्वार्थापोटी सवर्ण ती विहीर स्वतःच्या ताब्यात घेतात ही संपूर्ण घटना केवळ ग्रामीण भागातच घडू शकते.

'देवा सटवा महार' मधील देवा हा देवी काढण्याच्या डॉक्टरवर संतापाने वहाण उगारतो व त्याकरिता तुरुंगात जातो हे देखील एखादया खेडयातच घडू शकते. सडकेची वज राखण्याचे काम असणारी सरकारी नोकरी करणारा 'रामा मैलकुली' व्हरलवाडयात राहतो.

या कथांमधील संघर्ष, संघर्ष निर्माण होण्याची कारणे, त्यामधील प्रश्न, त्यातील पात्रांच्या प्रतिक्रिया हे सगळे ग्रामजीवनाशी संबंधित आहे. 'अखेर ....' मधील आकण्या, शिदा, 'गोडे पाणी' तील संदीपान, गणा, 'देवा...मधील देवा, 'वडारवाडीच्या....' मधील लक्षी, काळया,' 'धर्मा रामोशी' मधील धर्मा 'गणा महार', 'शिदा चांभार', 'आडिट' मधला गोपा व्हरलं, 'पढकं...' मधील भाव्या-राव्या, 'गोविंदा कातकरी' ही सर्व व्यक्तिमत्वे गावाकडचीच आहेत. त्यांची मानसिकता, त्यांच्या प्रतिक्रियेमधून सतत दिसत राहते.

उदा. ''दादा.... न्हवं!'' (पृ. ६२ 'अखेर आकण्या....) असे शिदा म्हणतो.

स्वतः अब्रू राखून जगणाऱ्या शिवाला भर चौकात चावडीवर आकण्याला उचलून आपटला त्याचा राग

आलेला आहे. 'आडिट' मधील गोपा व्हरल, जरा स्वतःकडे चार पैसे आल्यावर तोऱ्यात वागू लागतो व गणा चलपतेला दाम परवडणार नाही असे ठसक्यात सांगून त्याचा अपमान करतो. सतत दलितांना पायाखालचा चेंडू समजणाऱ्या सवर्णांचा अपमान करण्याची एखादीच संधी जेव्हा मिळते तेव्हा ती न सोडता तिचा पुरेपूर वापर करण्याची इच्छा एखादया गोप्याला होते. हे मनुष्यस्वभावाला धरुन आहे.

खेडोपाडी दलितांचे व सवर्णाचे एकमेकांवाचून आडते म्हणून त्यांना एकमेकांना धरूनच रहावे लागते. कितीही अपमानस्पद जगणे वाटयाला आले तरी पोटाला मिळणाऱ्या भाकरीकरीता सवर्णांचे ऐकावे लागते तर कधी महारावाचून अनेक कामे अडतात म्हणून सवर्णांना त्यांना हाताशी धरावे लागते. यातून कधी संघर्षाची वेळ येते कधी नात्यातले प्रेम आणि माणूसकीचे दर्शन घडते. उदा. 'अखेर....' मध्ये शेवटी आकण्या, कुऱ्हाडीने लाकूड फोडण्याचा प्रयत्न करणाऱ्या दमलेल्या दादा कुलकर्णींच्या वाडयात येतो आणि लाकडे फोडून देतो. शेवटी म्हणतो-''सरा बाजूला... आलोचं' (पृ. ६६ 'अखेर-')

'धर्मा रामोशी' मध्ये निवेदकाची आई निवेदकाला म्हणते ''मी बरा उपाशी मरू.... मीठमिरचीला'' (पृ. १५. 'धर्मा रामोशी')

माणूसपण कुठेतरी जिवंत असल्याचा प्रत्यय या कथांतून येतो. इतकेच नव्हे तर माडगूळकर त्याचे अत्यंत संवेदनशीलतेने चित्रण करतात.

* कथेतील व्यक्तिचित्रे ज्या पध्दतीचा पूर्वापार चालत आलेला व्यवसाय करतात (उदा. चांभार तराळकी, व्हरल, कारकरी, मैलकुली) त्यातून त्यांचा संपूर्ण गावाशी संबंध जोडला गेला आहे. त्यांच्या रोजच्या जगण्यात अनेक छोटे-छोटे प्रश्न आहेत पण तरीही ते त्यावर मात करून जगू पाहात आहेत. माणसाच्या जगण्याचा प्रत्यय जसा काही कथांत येतो तसाच व्यवहारात आशावादाला स्थान नाही असेही काही कथांच्या शेवटी दिसून येते.

ग्रामजीवन, शेतकऱ्यांचे जीवन, ग्रामजीवनाची रहाटी, तिथल्या परंपरा, ह्यांचे अतिशय उत्तम आणि व्यापक असे चित्रण इथे दिसते. जातीजमातींचा एक मोठा पट प्रकटतो. धनगर, मराठा, लोहार, न्हावी, महार, मांग, रामोशी, व्हरल, वडार इ. आणि गावावर जगणारे फिरते पारधी, नंदीवाले, वैदू, माकडाचे वगैरे - इतक्या जातींच्या लोकांचं चित्रण आपल्याला अन्य कोणा लेखकाच्या लेखनात आढळत नाही असे प्रा. हातकणंगलेकर यांनी म्हटले आहे. त्याचे प्रत्यंतर या कथांतून येते.

❖ ❖ ❖

# प्रकरण ११

## ओझं : कथानक परिचय

**प्रत्येक कथेचे कथानक :**

'ओझं' या व्यंकटेश माडगूळकर लिखित आणि गो. मा. पवार संपादित कथासंग्रहात दलित व ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविणाऱ्या एकूण पंधरा कथा आहेत. या सर्व कथांमधून माडगूळकर यांनी ग्रामीण जीवन आणि स्पृश्यास्पृश्य बलुतेदार यांचे यथार्थ दर्शन घेतले आहे. गावाबाहेर स्वतंत्र वस्ती करून राहणाऱ्या दलितवर्गाचा गावाशी असणारा संबंध, गावाचे त्यांच्याशी असलेले संबंध, प्रथा, चालीरीती याचे उत्तम चित्रण माडगूळकर कथांतून करतात.

**देवा सटवा महार :**

देवा हा अतिशय सज्जन माणूस असतो. जातीने महार असणारा देवा तराळकीचे काम निष्ठेने करत असतो. दिवसभर काबाड कष्ट करून, गावकऱ्यांचे मन न मोडता प्रत्येकाचे काम करणारा देवा मिळेल त्या भाकर तुकडयावर समाधानाने जगत असतो. तीन मुले आणि बायको यांचा प्रपंच पुढे नेत असतो. एक दिवस गावात देवी काढणारा डॉक्टर म्हणजेच 'देवी डागदर' येणार असल्याचे कळते व तशी दवंडी देऊन देवा भाकरतुकडा खाऊन रात्री सर्वांबरोबर तक्कयात बसायला जातो. तेथे मुंबईत गवंडी कामासाठी बरेच दिवस राहिलेला मारूती महार त्याला भेटतो. त्याला सारेजण 'मारूती ? म्हणून ओळखत असतात. तो लोकांना काही 'ग्यानाचे शब्द' सांगत असतो.

"आता काय अपनावर विंग्रज सरकारचं राज व्हई. क्राँग्रेसच्या लोकांनी त्येच्यापासनं राज जितून घेतलं हाय. गांधी बाबा आन न्हेरू या दोघांच्या हातात समदा कारभार हाय...." गांधी बाबांना महार, चांभार, वडार असली भेदभावाची भाषा पसंत नाही. हे बोलणे ऐकून देवा भारावून जातो. महार लोकांना आता खूप चांगले दिवस येणार असल्याचा विश्वास मारूती त्याला देतो. 'आपला जातवाला' बाबासाहेब आंबेडकर तिकडे दिल्लीला 'परदान' झाला आणि तो गांधी-नेहरू यांच्या मांडीला मांडी लावून बसतोय हे मारूतीचे बोलणे ऐकून तर देवाचे हृदय भरून येते. आपली मुलेबाळे शिकतील, नोकऱ्या करतील या आनंदाने देवा हरखून जातो आणि त्याच आनंदात झिंगत घरी येऊन झोपतो.

सकाळी पहिला तारा उगवायच्या आतच देवाची बायको त्याला उठवते आणि देवा मुंडासे गुंडाळून घोंगडे लपेटून बाहेर पडतो. चावडीसमोरचे पटांगण झाडून-लोटून चक्क करतो. दिवस उजाडल्यावर तालुक्याच्या गावाहून येणाऱ्या देवी डॉक्टरचा छकडा तळवडयाच्या वेशीत शिरतो. डॉक्टर आल्याचे सांगायला पाटील देवाला गावात पाठवतात. देवा सगळयांना सांगतो परंतु चार सहा बायकासुध्दा मुलांना घेऊन येत नाहीत. पाटलाची बोलणी खाऊन देवा परत गावकऱ्यांना निरोप सांगून येतो. दिवस पार डोक्यावर येतो. तरीही चावडीपाशी कोणीही येत नाही. दरम्यान डॉक्टर पाटलाच्या घरी जाऊन जेवण करून येतो. देवा

गुरूवारचा उपवास करीत असल्याने उपाशी पोटी हिंडून त्याचा जीव कावून जातो. पाटील पुन्हा देवाला धायगुडयाची वस्ती, बाबराचा मळा आणि संत तुकारामाची व रामा कांबळयांच्या वस्तीत जाऊन डॉक्टर आल्याचे सांगायला पाठवतो. गावाच्या चारी बाजूला विखुरलेल्या या वस्त्यातून देवा हिंडून येतो. सगळयांना चावडीवर चलण्याचे सांगतो परंतु सगळे चावडीवर यायला टाळतात. देवी डॉक्टरच्या देवी काढल्याने पोरे दगावतात या भीतीने मुले घेऊन बायका येत नाहीत. देवाकडून मात्र सगळे आपापली कामे करून घेतात. कुणी लाकूड फोडून घेते तर कोणी मोट घालवायला त्याला थांबून घेते. शेवटी देवा माघारी येतो. तेव्हा दिवसाचा तिसरा प्रहर झालेला असतो. डॉक्टरांचा पारा चढलेला असतो. तो देवावर ओरडतो.

"बकबक बंद कर, धेडाची जात, लेका तू गेला नसशील वस्तीवर, मला माहिती आहे. कुठं पानं-तंबाखू खाऊन चार गप्पा हाणून आला असशील हरामजादा! मला बनवतोय....." देवा शपथ घेऊन जाऊन आल्याचे पुन्हा पुन्हा सांगतो. त्यावर डॉक्टर त्याला वाईट शिव्यांची लाखोली वाहतो. महारांवर तो आपले तोंडसुख घेतो. एकाएकी देवा डोळे वटारतो. पायातले धुळीने भरलेले तुटके पायताण उचलून तो ओरडतो, "आरं एं बाबलीच्या चावडीचं जोतं उतरून खाली ये. शिव्या देनार तुजं थोबाड फोडतो ह्या तुटक्या जोडयानं!" देवा महाराने देवी डॉक्टरला जोडा काढल्याच्या अचाट कर्तुकीने गाव ढवळून निघतो. देवा आता तुरूंगात जाणार यात शंका नसते. देवाला मात्र विश्वास असतो की दिल्लीत बसलेल्या आपल्या जातवाल्या बाबासाहेबांना हे सांगितले तर ते आपली तक्रार ऐकून घेतील. कुणीही यावं आणि आपल्याला चेंडूसारखं ठेचलावं हे काही खरं नाही. डॉक्टर जरी सरकारकडे गेला तरी आपणही ठामपणे खरं काय ते सांगायचे असे देवा ठरवतो.

काही दिवसांनी पोलीस देवाला घेऊन जातात. देवाची बायको मोल मजुरी करून पोरे बाळे जगवते. तराळकी दुसऱ्या महाराकडे जाते. तळवडे गाव व्यवस्थित नांदत राहते.

**धर्मा रामोशी :**

गावकरी अणि दलित यांच्यातले संबंध नेहमीच तणावाचे असतात असे नाही तर त्यांच्यात एक प्रेमाचा, माणूसकीचा धागाही असू शकतो. त्यांच्यातील प्रेमाच्या संबंधावर प्रकाश टाकणारी ही कथा आहे. कथेत फार मोठा घटनाक्रम नाही. धर्मा रामोशी हा दलित समाजातला एक वय झालेला थकलेला इसम. त्याच्या मुलीला तिच्या नवऱ्याने सोडून दिल्याने ती वडिलांकडेच राहते. धर्माचे वय झाल्याने त्याच्याने कामे होत नाहीत. घरात खायला अन्न नाही अशी अत्यंत हालाखीची अवस्था. ही अवस्था कथेतील ब्राम्हण निवेदकाला समजते. त्याला हळहळ वाटते. तो एकदा धर्माकडे आंब मागायला गेला असता, त्याला धर्मा पालेभाजीचा उकडलेला लगदा! आणि तांबडया रंगाची तीन चतकोर भाकरी खाताना दिसतो. धर्माची लेक बजा आंब घेऊन बाहेरही येत नाही. धर्मा मग स्वतःची हालाखीची परिस्थिती निवेदकाला सांगतो.

निवेदक धर्माविषयी स्वतःच्या आईकडे बोलतो कारण अनेक वर्षापासून धर्मा त्यांच्या घरी कामासाठी येत जात असतो. त्यावर आई म्हणते की मी धर्माला उपाशी मरू देणार नाही. एकदा आईचे केसातील सोन्याचे हरवलेले फूल धर्माने शोधून दिले असते आणि तेही भाकरीसुध्दा न खाता रात्री बाहेर पडून पहाटेपर्यंत घरी परत येऊन.

ती धर्माला चार-आठ पायली धान्य घेऊन जायला सांगते आणि बजीला रोजचे दळण दळून आणण्याचे

काम देते. त्याचे पैसे मीउनिरचीला होतील असा उद्देश त्यामागचा असतो. थकलेला धर्मा रोजचे दळावयाचे धान्य घ्यायला येत असतो. थंडीचे दिवस सुरू होतात. धर्माचा त्रास अजूनच वाढतो तो एकदा धीर करून निवेदकाला जुने धोतर मागतो. निवेदक लगेचच बऱ्यापैकी एक धोतर देऊन टाकतो. नंतर रोजचे दळण न्यायला बजा येते. तिला पाहिल्यावर निवेदकाला कळते की इतके दिवस बजी का येत नव्हती आणि आंब दयायलाही ती का बाहेर नाही आली. धर्माला दिलेले धोतर बजी लुगडयासारखे नेसते. तिला अंगावर कपडा देखील नसल्याने ती बाहेरही पडत नसते. धोतर मिळते तेव्हा तिला बाहेर पडता येते.

**रामा मैलकुली :**

रामा एका छोटयाशा गावात राहतो व मैलकुल्याचे काम करतो. निवेदकाने मैलाच्या दगडावर आकडे टाकण्याचे काम घेतलेले असते. म्हणून तो रामाच्या गावात जाऊन त्याला व्हरलवाडयातून शोधतो व त्याच्याबरोबर आकडे टाकायला गावाबाहेर पडतो. त्याची रामाबरोबर झालेली मैत्री व त्यांच्यातील संवाद यावरून रमाचे व्यक्तिमत्त्व उकलत जाते.

निवेदक रामाचे घर शोधण्यात व्हरलवाडयात जातो. शेवग्याच्या झाडासमोर त्याचे खोपट असते. त्या खोपटासमोर बसून त्याची बहीण परात घासत असते व तिचे पोरगे भाकरीचा तुकडा हातात घेऊन उभे असते. निवेदकाला पाहून ते पोरगे आईला कोणीतरी आल्याचे सांगते. स्वतः अम्मलदार घरी आल्याचे कळताच बहीण गोंधळून जाते. रामा निवेदकालाच घ्यायला एस. टी वर गेलेला असतो आल्यावर निवेदक त्याच्या खोपट्याच्या आत जातो. खड्डे पडलेली खडबडीत जमीन, लाकडी झाकणाने झाकलेला पाण्याचा रांजण, कोपऱ्यात बांधलेली शेळी यावरून निवेदकाला रामाची परिस्थिती लक्षात येते. भाकरी फडक्यात बांधून रामा निघतो. निवेदकाच्या हातातील ओझे बघून त्याला विचारतो, ''काय शिवण्यासारखं न्हाई नव्हं? माझ्यापांशी द्या की नसलं तर मोकळाचं हाय मी!'' जेवणाचा आणि रंगाचा असे दोन डबे असल्याचे निवेदक सांगतो व त्यावर जेवायचा डबा काढून घ्या असे रामा सुचवतो. 'मी शिवाशिव पाळत नाही' असे निवेदकाने सांगितले तरी रामा काही वेळाने ओझे हातात घेतो. दोघेही रस्ता चालू लागतात.

पिढीजात व्हरलकी सोडून सरकारी नोकरीकडे कसा काय वळलास असे, रामाला विचारताच कातडे महाग झाल्याचे व रोख पैसे कोणी देत नसल्याचे रामा सांगतो. मिळेल त्या पैशात कसा तरी प्रपंच चालतो असेही रामा सांगतो. स्वतःचा प्रपंच नसल्याने, जरा सोपे जाते अशी पुस्ती जोडल्यावर 'लगीन केलसं का नाही? असे निवेदक विचारतो, डोक्याच मुंडासं काढून रामा स्वतःची कर्मकहाणी सांगू लागतो.

सांगलीकडील रूपाने चांगली असणारी बायको रामा करतो खरी. परंतु रामाची आर्थिक परिस्थिती पाहून ती रामाला मुंबईत गिरणीत नोकरी करून पैसे कमवण्याचा सल्ला देते. रामा ते नाकारतो. तशी ती एक दिवस त्याला सोडून निघून जाते.

काम करता - करता बोलण्यातून निवेदकाला रामाची कहाणी समजते.

सडके शेजारच्या मळयात बसून मग दोघे जेवतात, निवेदक स्वतः कडील चपाती, पिठलं चटणी व लोणचे रामाला देतो. नाही म्हणत ते रामा ठेवून देतो. स्वतः न खाता स्वतःच्या भाच्यासाठी ते फडक्यात गुंडाळून घेतो.

तुमच वय किती असे विचारून रामा म्हणतो, ''मला बी ईस आन् आट झाली. पर तुमी झाला अम्मलदार आन् आमी मातुरं व्हायलो हे असे जलमभर हे असच! दरिद्री व्हावून आमी मसणवाटेला जायचं - मनात म्हणतो, देवा चंडाळ कारे अस?'

यावर निवेदकापाशी उत्तर नाही. चार वर्षाचे झाल्यावर गुरं राखायला लागतात रानोमाळ हिंडावे लागते तेव्हा भाकरी मिळते अशी परिस्थिती असताना कुठून शाळा शिकणार? असा रामाचा प्रश्न असतो.

निवेदक रामाच्या या प्रश्नांची उत्तरं शोधायचा प्रयत्न करू लागतो.

वारी :

म्हातारा अर्जुना थकलेला असतो. स्वतःची आबाळ होते म्हणून कधीही न कुरकुरणारा अर्जुना सून जे देईल ते खात असतो. आपले दिवस आता भरत आले ते जाणवून तो संसारातून स्वतःचे मन काढून घेतो. देवळात जाऊन तो भजन-कीर्तनात तो रमू लागतो. आजवर जे कष्ट केले पोरांसाठी पण आता परमेश्वराचा चरणी सगळे चित्त लावून त्याचेच स्मरण करून शेवटचा श्वास घ्यावा असे त्याला मनोमन वाटत असे, याच विचारात असता एक दिवस तो लेक व सुनेकडे आपल्याला पंढरीच्या वारीला जायचे असल्याचे बोलतो. लेक-सून एवढा म्हातारा बाप हा एकटा कसा काय जाणार म्हणून काळजीत पडतात व नकार देतात. परंतु बापाची इच्छा आहे तर आपण तेवढी पुरी करावी या हेतूने मुलगा जाण्यासाठी परवानगी देतो. इतकेच नाही तर चांगले कपडे थोडे शिवून देतो, सून भाकऱ्यांची शिदोरी बरोबर देते व नीट जाण्याचे सांगते. अशा रीतीने अर्जुनाची वारीला जाण्याची तयारी होते आणि अखेरीस नातवंडाच्या पाठीवरून हात फिरवून अर्जुना निघतो.

सडकेने - पाऊलवाटेने चालत चालत कधी थांबत मुक्काम करत करत अर्जुना पंढरपूरात पोचतो. त्याच्या मनात येते, या पंढरीत किती संत आले-गेले कित्येकांचे पाय इथे लागले...धन्य ती पंढरी! चंद्रभागेच्या दर्शनाने त्याचा शीण पार जातो. कित्येक भक्त चंद्रभागेत स्नान करीत असतात. अर्जुनालाही त्यात सामील व्हावेसे वाटले. पण आपल्या अमंगल अंगाचे पाणी त्या सर्वांना लागेल या विचाराने तो मागे सरकतो. मग गोपाळपुऱ्या कडील बाजूने तो शेवटी खाली जातो. महाराचे पाणी कोणाच्या अंगावर जात नाही ना याची खात्री करून मग चंद्रभागेत उतरतो, स्नान करतो. महाद्वारापाशी येऊन देवासाठी साखर-कापूर घेऊन चोखामेळ्याच्या समाधीपाशी येतो, तेथे एक मुलगा बसलेला असतो. 'ही समाधी म्हणजे हरिजनांचे देवस्थान' या हो या......' असे तो ज्याला त्याला सांगत असतो. अर्जुना तेथे डोके टेकवतो. कापूर लावून साखर ठेवतो. एक पैसा ओवाळून पोरापुढे टाकतो.अर्जुना मागे फिरून बघतो आणि त्याला गळयात माळा घातलेला रामा दिसतो 'घालीनं लोटांगण वंदीन चरणं' म्हणत नाचणारा नामदेव त्याला दिसतो. मग तो नामदेवाची पांयरी ओलांडून आत जातच नाही. तो परमेश्वराजवळ म्हणतो, हा विटलेला देह घेऊन मी कसा आत येऊ? माझे पूर्वज जे वागले तसाच मीही वागीन. सरकारने जरी आम्हाला आत जाण्याची परवानगी दिली तरी मी कशी पायरी सोडू? वहीवाट कशी मोडू? माझ्याच्याने ते शक्य होणार नाही मी इथूनच तुझे दर्शन घेऊन जातो, असे म्हणून अर्जुना तिथेच साष्टांग नमस्कार घालून आडवा होतो. डोळे मिटतो सगळयांना क्षणभर वाटते म्हातारा मेला असावा.

अर्जुना डोळे पुसत उठतो, पोरांसाठी बत्तासे आणि सुनेसाठी कुंकू घेऊन परत आपल्या गावी जातो.

**आडिट :**

गोपा व्हरल हा सुरूवातीला इतर व्हरलांसारखाच दरिद्री असतो. कातडी कोरून त्यावर त्यांचे पोट भरत नसते. कुणी साधा पानाचा विडा दिला तरी तो उशीरपर्यंत तोंडात घोळवत ठेवत असतो व मधेच तहान लागली असता तोंडातला चोथा दगडावर काढून ठेवून पाणी पिऊन झाल्यावर पुन्हा तोंडात टाकत असतो.

दहा-पाच रूपयात विकत घेतलेली त्याची पाट मोठी होते. दोन सुरेख बोकडे जन्माला येतात व गोपा व्हरल थोडा गबर होतो. कणाकोंडा चालून गोपा त्यांचा नीट संभाळ करतो त्यामुळे ती चांगली टणटणीत होतात व त्या जोरावर गोपा तालेवाराच्या तोऱ्यात वागू लागतो. तंबाखू खात, विडया ओढत गावातून फिरू लागतो.

एक दिवस गोपा उन्हात बसलेला असताना गणा चलपते त्यांच्याकडे येतो. बोकड विकत घ्यायला आलेल्या गाणाशी गोप्या तोऱ्यातच बोलतो, 'तुम्हाला दाम परवडणार नाही' अशी भाषा वापरतो. वीस रूपयाला ते बोकड मागूनही गोप्या ते दयायला नकार देतो. व 'मग रेडा कापून खा की एखादा..' असे उद्धटपणे त्याला म्हणतो. त्यावर गणा अतिशय चिडतो. व 'तुला देशोधडीला करीन' अशी धमकी देऊन पाटलाकडे जाऊन झाला प्रकार त्याला सांगतो. गोप्याने 'रेडा खा असे सांगून तुम्हा-आम्हाला महार ठरवले' चावडीवर सर्व व्हरलांना बोलवतो. रात्री चावडीवर जमल्यावरही गोपा सरळपणे बोलत नाही. त्यामुळे पाटिल व मराठा मंडळी अधिकच चिडतात. व्हरलांना ते बेदम मारतात. तालमीत शरीर कमावलेली तरूण मराठ्यांची पोरं व्हरलांची हाडे खिळखिळी करून टाकतात. व्हरलांवर झालेल्या अनपेक्षित हल्ल्यांने सगळे व्हरलं धाबरतात, मार खातात व शेवटी कशी तरी वाट धरून वस्तीवर परत येतात. उजवा हात मोडलेला, कपाळ फुटलेले, जागोजागी झालेल्या माराजे अंग सुजलेले या अवस्थेत दुसऱ्या दिवशी बोकड घेऊन गोपा चलपतेच्या घरी येतो. गणा चलपते बोकड वीस ऐवजी सोळा रूपयातच मागतो. गोपा गयावया करतो. हात मोडलाच त्यावर औषध-पाणी करावे लागेल म्हणून तरी वीस रूपये द्या असे म्हणून गोपा गणापुढे डोके टेकवतो.

गोपाची अगतिकता कथेच्या शेवटी दिसून येते. दोघांमधले भांडण 'जातीय भांडणाचे' स्वरूप घेते व गावातील सवर्ण मूठभर व्हरलांवर अन्याय करतात, त्यांना बेदम मारतात.

**अखेर आकण्या घरी आला :**

आकण्या हा गावातील महार आबा कुलकर्णी यांच्या घरात सतत वावरत असतो. त्यांची सांगितलेली कामे करीत असतो. निवेदकाच्या घराचे आबा कुलकर्णी यांच्या घराशी पिढीजात वैर असते. म्हणून आकण्या आबा कुलकर्ण्याची बाजू घेऊन निवेदकाशी तंबून वागत असतो, त्यांनी सांगितलेली कामे उडवून लावीत असतो. निवेदकाच्या मते, 'महार भलतेचं माजले होते' या अशा आकण्याचा एकदा काटा काढायचा असे निवेदक ठरवितो. आबाच्या घरासमोरच आकण्याला उंच धरून आपटायचा असे तो ठरवितो. आकण्याचा अंगावर मात्र त्याची एकही खूण राहाता कामा नये याची खबरदारी घेण्याचेही ठरवितो.

एक दिवस चावडीपुढे कोल्हाट्याचा खेळ येतो. पावसाचे दिवस असतात. पाऊस जरा थांबल्याने पोरे खेळ पहायला चावडीपाशी जमतात. निवेदकही तेथे जाऊन बसतो. साऱ्यांचे लक्ष खेळात असते तेव्हा

निवेदकाची नजर आकण्याला शोधत असते. चावडीसमोरच कुलकर्ण्यांचे घर असते. आबा कुलकर्णी समोरच्या सोफ्यातच कागदपत्र तपाशीत बसलेला असतो. अकस्मात आकण्या येतो. निवेदकाला तो दिसतो. निवेदक त्याला चालताना मुद्दाम ठरवून धक्का देतो, त्याला घसटून जातो व ओरडतो 'माजलास काय रे धेडा?' धक्का मारून जातोस? शिवतोस मला, माजलास!' क्षणाचाही विलंब न करता आकण्याला उचलून खाली आपटतो.

आबा हातातील वह्या फेकून धावत येऊन आकण्याची बाजू घेतात. 'पोरगं' मेलं असतं, काय न्याय आहे का अन्याय? असे निवेदकास विचारतो. निवेदक मधे न पडण्याचे त्याला सांगतो. कोल्हाटयाचा खेळ बंद पडतो. माणसे गोळा होतात. आकण्या चावडीसमोर जाऊन न्याय मागतो. चावडीसमोर निवेदक व इतर महारांच्यात अधिक बाचाबाची होते व निवेदक शेवटी घरी जातो. महाराला मारले हे चुकले असे निवेदकाचे वडील दादा त्याला सांगतात व महाराला शिवल्याने आंघोळ करायला लावतात.

दरम्यान सगळे महार निवेदकाच्या वाडयात अंगणात जमून दादांसमोर बसतात व घडलेल्या प्रकाराबद्दल बोलू लागतात. 'तुमच्या लेकानं अन्याय केलय आकण्याला घरी बोलवून मारला असला तरी चाललं असतं पण चावडीपुढे मारला हे बरे केले नाही असे त्यांचे म्हणणे असते.'आजपासून तुमच्या घरचे काम करायला महार यायचे नाहीत' असे सर्वजण एकमताने सांगतात.

खेडयात महाराअभावी कित्येक गोष्टी अडतात. लाकूड फोडणं, रानातून कडबा आणणं, कुठं परगावी निरोप घेऊन जाणं-सतरा कामं असतात जी महार करतात. दादांना हे माहिती असते म्हणून ते आता काय धोरणाने वागायचे ते ठरवतात व महारांना म्हणतात,'तुम्ही रागात आहात. शांत चित्तानं विचार करा मग काय ते सांगा'.

तिसऱ्या प्रहरी काय ते येऊन सांगा असे म्हणून दादा सगळयांना जायला सांगतात. तिसऱ्या प्रहरीही महार येऊन तेच सांगतात. दादा त्यांना बजावतात की आज आबा कुलकर्ण्यांचे काम बघतोय उद्या पाळी माझ्यावर येईल आणि तराळाची काठी घेऊन तुमच्यापैकी एकाला माझ्याच पुढं उभं रहावं लागेल.. विचार करा. यावरही जवाचं तवां बघता येईलं असं म्हणून महार निर्णयाशी ठाम राहतात. दादा संतापतात 'मग असं कर शिदा गुडघ्याचं पागुटं टकुऱ्यावर ठेव आणि म्हन काम होणार नाही आणि जा असे ते रागावून म्हणतात.

त्यांच्या या वाक्यासरशी महार चूपचाप बसून राहतात. एकेक करत सगळेजण तुमच्याच तुकडयावर जगलोय, तुमच्याशी वैर कसं धरणार असे म्हणू लागतात, पडतं घेतात. आकण्याची समजूत काढण्यासाठी हे केले असे सांगतात. हे ऐकताच आकण्या चिडतो व तुम्ही काहीही ठरवा पण मी वाड्यात पाऊल ठेवणार नाही असे सांगून निघून जातो.

या घटनेनंतर वर्ष-सहा महिन्यांनी एकदा दुपारी दादा कुऱ्हाड घेऊन लाकूड फोडत असतात. कठीण लाकूड त्यांच्याकडून फूटत नसते. म्हतारा जीव धामाधूम होतो. हे सारे आकण्या वाडयाच्या बाहेरून बघत असतो. त्याला राहावत नाही व तो आत येऊन दादांना म्हणतो, ''सरा बाजूला, तुमी लाकूड फोडायला आमी काय कुठं गेलू होतो?' आमास्नी काय रोगडा आलाय? शेवटी आकण्या घरी परत येतो.

**वडारवाडीच्या वस्तीत :**

पाचपंचवीस झोपडया आणि ओबडधोबड बांधणीची घरे असा पसारा असलेली वडारवाडी पंढरपूरास जाणाऱ्या मोटाररस्त्याच्या कडेला वसलेली आहे.रस्त्याच्या कडेला कडूलिंबाचे झाड आहे व त्यावर फांदीला एक लांडगा अडकवून ठेवला आहे. पेंढा भरलेल्या लांडग्याच्या अजस्त्र धूडाकडे नवा प्रवासी थांबून पहातो. त्या लिंबाच्या सावलीतच एक झोपडी आहे आणि त्यातच लक्षीचा गाडग्या मडक्यांचा संसार थाटला आहे लक्षी आणि तिचा बाप त्यात रेंगाळत संसार करत होते.

लक्षी तरूण होती तर तिचा बाप सत्तरी उलटलेला म्हातारा होता. लक्षी दिवसभर शेण गोळा करून त्याच्या गवऱ्या थापून त्या विकी. ती तिच्या बापासारखीच अंगापिंडाने धिप्पाड होती. लक्षीकडे मेंढरे होती. त्यातला हऱ्या मेंढया म्हणजे लक्षीचा जीव होता. त्याला चाळकांडा-भाकर तुकडा दिल्याने तो शिंगाडा मेंढा माजून टिक्कार झाला होता. नायगावच्या गुरांच्या जत्रेत मेंढयांच्या झुंजीत हऱ्याचा गेली तीन वर्षे पहिला नंबर यायचा.

एक दिवस लक्षीचा बाप गावी गेला असताना रात्री लक्षीला बाहेरची मेंढरे धडपडत असल्याचे जाणवते. हऱ्या मेंढा कसायाकडे न्यावे तसा ओरडताना ऐकू येतो. लक्षी बाहेर जाऊन बघते तो एक लांडगा मेंढरू ओढण्यासाठी बाहेरून कुडाला ढुश्या मारत असतो. लक्षी झडप घालून कुळातून आत आलेले लांडग्यांचे दोन पाय धरते. लांडगा स्वतःला सोडवून घेण्याचा खूप प्रयत्न करतो. परंतु लक्षी त्याचे पाय सोडत नाही. उलट घट्ट पकडून जोरजोरात ओरडू लागते. वडारवाडीतील पोरे काठ्या घेऊन धावत येतात व कासराने लांडगा आवळून पकडतात. लक्षीचे सगळीकडे कौतुक होते. काही दिवसांनी ते ओसरते. हऱ्यावर मात्र याचा परिणाम खोलवर होतो. रानात बागडणारा, शेतात घुसणारा नासधूस करणारा हऱ्या गरीब मेंढरासारखा वागू लागतो. लक्षीने आपले प्राण वाचवले या लक्षीच्या उपकाराने दबल्यासारखा होतो.

लक्षीचा बाप हऱ्याचा चांगुलपणा बघायला फार दिवस जिवंत राहात नाही. एक दिवस लिंबाच्या झाडाला टेकून तो डोळे मिटतो. लक्षी ऊर बडवत बापाच्या प्रेतावर पडते, रडू लागते. कुडाच्या भोकातून हऱ्या मेंढा हे पाहतो. लक्षीच्या रडण्याचेच अधिक दुःखी होतो. लक्षी आठ-दहा दिवस घरीच बसते. कुणीतरी तिला जेवण आणून देते तर कुणी मेंढरांपुढे चारा टाकते. शेवटी तिचे दुःख ओसरते. ती मेंढरांना घेऊन एक दिवस रानात जाते. हऱ्या रानभर खूप आनंदाने रानभर बागडतो. लक्षीबरोबर एक तरणा माणूस बोलताना त्याला दिसते. काही दिवसांनी तो माणूस-काळया घरीही यायला लागतो. लक्षी त्याने दिलेले कपडे घालून भिंगरीगत फिरू लागते. नान ढंग करायला शिकलेली लक्षी आता हऱ्याकडेही लक्ष देत नाही काळयासाठी गोड धोड करून त्याला दगडावरच्या खाणीवर डबा पोचवण्यात ती गर्क असते. हऱ्या हे सारे पाहून मनातून दुःखी होतो.

नव्या नव्हाळीचे दिवस संपतात. लक्षीचे नशीब पालटते. काळया मिळालेले पैसे दारुत उडवायला लागतो. रात्री भांडणे, मारामाऱ्या करीत घरी येऊ लागतो. लक्षीला नशेत बेदम मारु लागतो. लक्षी सहन करते पण आता ती हऱ्याकडे लक्ष देऊ लागते.

एक दिवस असाच काळया दारूच्या नशेत झोकांडया खात घरात शिरतो. 'कुठे गेली होती दिवसभर?' असे त्याने लक्षीला विचारताच 'मसणात' असे वैतागून ती म्हणते व त्याला भाजी-भाकरी वाढते. काळया

चिडतो. ताटली फेकून देतो 'मला सागुती पाहिजे' असे तिच्या अंगावर ओरडतो, 'दारातला मेंढा कापतो म्हणजे सागुती करता येईल' असे त्याने म्हणताच लक्षी धावून त्याच्या हातातली कुऱ्हाड काढून घेते. तसा काळयाचा पारा चढतो व तो लक्षीला ठोसे लगावतो. लक्षी विव्हळत खाली पडते. हऱ्या सारे कुडातून पाहात असतो. तो उसळी मारतो व दावे सोडून मुंढी खाली घालून काळयावर धावून जातो. त्याच्या गुडघ्यावर शिंग मारतो. नंतर डोक्यात मारतो. काळया जागेवरच रक्तबंबाळ होतो, मरतो, लक्षीचा वनवास संपतो.

जिवंत लांडगा पकडलेली लक्षी आणि काळयाला मारलेला हऱ्या सुखाने वडारवाडीच्या वस्तीत नांदू लागतात.

**ओझं :**

मुंबईतील पुलाच्या आडोश्याला वसलेल्या गलिच्छ वस्तीत लाडाबाई व तिचा नवरा राहात असतात. प्रचंड रहदारी, सतत वाहनांचे आवाज, बायकांचे कलकलाट, पोरासोरांचा गोंधळ आणि वस्तीतली घाण या साऱ्यातच त्यांचा संसार सुरू असतो. लाडाबाईचे बाळंतपण जवळ आलेले असते आणि त्याचीच चिंता तिच्या नवऱ्याला लागलेली असते.

एक दिवस लाडाबाई सतरा रंगाची चिरगुटं पुढयात टाकून बसली असता 'आता जुळं होणार की काय?' या चिंतेने तिचे काळीज थरथरते व ती ही खेप सातवी की आठवी ते आठवू लागते. एक पोरं पोटातून गेलेलंच जन्माला आलं एक पोरगी दहा दिवसांची झाली न मेली. एक मधेच नासलं दोन जगली. नाम्या आठ वर्षाचा झाला व रूसून निघून गेला. जगन्याला हॉटेलात नोकरी लागली म्हणून तोही गेला. सोनी तेरा वर्षाची झाल्यावर एकाचा हात धरून पळून गेली. लाडाबाई जन्माला घातलेल्या लेकरांचा हिशेब जुळवत असतानाच तिचा नवरा सोमा रद्दी विकून सात आणे खिशात घेऊन घरात शिरतो. दारोदार हिंडून रद्दी जमा करून ती विकून तो स्वतःचा संसार कसाबसा रेटत असते. त्यात लाडाबाईंच्या बाळंतपणाची चिंता त्याला स्वस्थ बसू देत नसते. सोमाचे म्हणणे असते की तिने बारीक सारीक चोरी करून तुरुंगात जावे म्हणजे तिचे बाळंतपण नीट होईल शिक्षा फार व्हायची नाही. उलट बाळंतपणाची सोय होईल. लाडाबाईला हे पटत नसते पैसा नाही म्हणून चोरी करून तुरूंगात जावे, स्वतःची अब्रू सोडावी हे तिला मुळीच पटत नसते. सोमा तिची समजून काढतो की पावसाळा तोंडावर आलाय, घर सगळीकडून गळणार. त्यात आजारपण आले तर कसे करणार? लाडाबाई यावर काहीच बोलत नाही. रात्रभर विचार करते. बायका बाळंतपणासाठी माहेरी जातात. आपण तुरूंगात कसे जायचे? शेवटी विठ्ठलावर सारा भार टाकून झोपी जाते.

दुसऱ्या दिवशी दुपारी लाडाबाई खांद्यावर पोतं टाकून बाहेर पडते व चांगली वस्ती गाठून त्यातून हिंडू लागते. रिकामे डबे बाटली गोळा करता करता एखादी चोरी करायचा तिचा विचार असतो. फिरता फिरता ती एका बंगल्याच्या आवारात शिरते. बंगल्यात कुत्रा नसतो व रखवालदारही नसतो. लाडाबाई खिडकीतून डोकावून काय चोरता येईल ते पाहू लागते टेबलावर चांदीचा तांब्या व भांडे तिला दिसते ती अंदाज घेऊन दार उघडून आत जाते व तांब्या-भांडे उचलून पोत्यात घालते. तिचे काळीज धाडधाड उडत असते. दार हलकेच ओढून ती बाहेर येते. तरीही बंगल्याची मालकीण जागी होतच नाही. आपली चोरी कोणी पाहिलीच नाही या विचाराने लाडाबाई गोंधळून जाते. इकडेतिकडे बघत ती भराभरा फाटकाकडे येते. तेवढयात

मालकीण बाईंना उठवून लाडाबाईने तांब्या-भांडे चोरल्याचे सांगतो. चौकीत घेऊन जातो अरोही बाईंना म्हणतो. लाडाबाई घाबरते. तिला धाम फुटतो. मालकीण तांब्या-भांडे आपल्या ताब्यात घेते. तिला मूल-बाळ नसते. ती लाडाबाईकडे बघून तिला 'कितवा महिना' असे प्रेमाने विचारते. लाडाबाईला रडूच फुटते. 'दिवस भरत आले आहेत माझे, मला मारू नका' असे ती अगतिकपणे म्हणते. मालकीण तिला सोडून देते. लाडाबाई ''लई उपकार झाले बगा! पुन्ना न्हाई मी अशी करायची'' असे म्हणून मागं न बघता घराकडे परतते. संध्याकाळी सोमाला सांगून टाकते की मी झाडाच्या आडुश्याला बाळंत होईन, नदीच्या पाण्यात पोर धुवेन पण तुरूंगात जाणार नाही.

**पडकं खोपटं :**

राव्या आणि भाव्या हे दोन सख्खे भाऊ मांगवाडयात रहात असतात. ऐन तारूण्यात त्यांनी सातारा जिल्हयात धुमाकूळ घातला असतो. ते दरोडेखोर असतात. सावकरांच्या झोपा त्यांनी उडवलेल्या असतात. भाव्या-राव्या हे दोघेच मांग टोळीत असतात. बाकी बेरड, कैकाडी यांचा भरणा टोळीत असतो. राव्या-भाव्याच्या मागे जंगल हुसकत शिपाई मेटाकुटीला आले असतात. तरीही ते दोघे कोणाच्याच हाताला लागत नसतात. राव्या थोरला असतो. भाव्या जे हातात मिळेल ते राव्याला देत असतो. चाळीशीपर्यंत त्यांचा हा उद्योग सुरू असतो. एकदा राव्या पोलिसांना सापडतो. त्याला पोलीस बेदम मारतात तेव्हा भाव्या हजर होऊन मुद्देमाल दाखवतो व राव्याला पाच वर्षांची तर भाव्याला चौदा वर्षांची शिक्षा होते. त्यांच्या मागे टोळी चोहीकडे पांगते.

.पाच वर्षांनी राव्या तुरूंगातून सुटतो. त्याच्या खोपटात येतो. त्याची बायको देवाघरी गेली असते. आणि नऊ वर्षांचा मार्तंडा नावाचा पोरगा गावातील तुकडयावर जगत असतो. राव्या त्याला छातीशी धरून पुन्हा या फंदात न पडण्याचे ठरवतो. खोपटे नीट करतो. एक गाय घेतो. शेतकऱ्यांना नाडा, सौंदूर, दावी विकू लागतो व चारचौघांसारखा उजळ माथ्याने मांगवाडयात राहू लागतो. पोराला पैलवान करायचे ठरवितो. पुरून ठेवलेल्या सोन्या नाण्यातले थोडेच काढून आणतो.

सहा वर्षांनी तीन वर्षांची सूट मिळून भाव्या सुटून येतो, घरी येतो. राव्याला त्याच्या येण्याने आधार मिळतो. भाव्याने लग्न केले नसते. त्यालाही भावाशिवाय, मार्तंडाशिवाय जिवाचे असे कोणीच नसते. काही दिवस जातात. पण गावकीत भाव्याचे मन रमत नाही. तो राव्याच्या मागे लागतो की, मार्तंडाला माझ्याकडे दे मी त्याला पैलवान करतो आणि माझे कौशल्य शिकवतो मागाचं पोर नाव काढेल माझं नाव पुढे चालवेल, सततच्या या भुणभुणीने राव्या शेवटी हो म्हणून मार्तंडाला त्याच्या स्वाधीन करतो. मार्तंडा बघता बघता तयार होतो. भाव्या त्याला घेऊन रात्री अपरात्री बाहेर पडू लागतो व आपले कसब शिकवू लागतो. मार्तंडाची तालीम व राव्या-भाव्याची एकजूट पाहून काही मांग मनात जळू लागतात. पोलसही काही मागांना हाताशी धरून तिघांच्या मनात एकमेकांविषयी विष कालवतात. राव्या-भाव्याला एकमेकांच्या मनात काळबेरे आहे असे वाटू लागते. त्यांच्या नजरेत खुनशीपणा दिसू लागतो. ते सतत भांडू लागतात. रोजच्या मारामारीने मांगवाडा कंटाळतो. पंचापुढे नेऊन प्रश्न सोडवायचा असे सगळे ठरवतात. पंचापुढेही त्यांच्यात वाद होतात. भांडणे विकोपाला जातात व तेथेच आठ दिवसांच्या आत काकाचे मुंडके धडावेगळे करण्याची शपथ मार्तंडा घेतो. त्याचा पण ऐकून सगळीकडे खळबळ माजते.

तीन-चार दिवसातच भाव्या परागंदा होतो. सहा-सात दिवस झाले तरी तो कुठे दिसत नाही. मार्तंडाला वाटते भाव्या घाबरून पळाला, पण राव्याला ठाऊक असते की भाव्या घाबरून पळून जाणाऱ्यातला नाही. तो पोराला सावध रहायला सांगतो. आठवा दिवस उजाडतो. मार्तंडा गावच्या बाजारात पैरणीसाठी कापड आणायला जातो. बापाने दिलेली कुऱ्हाड सोबत असते. बाजारात गर्दी असते. मार्तंडा कापड घेऊन पैरणी शिवायला टाकतो. अडीच-तीन तासात पैरणी शिवून मिळणार म्हणून तो बाजारात वेळ काढतो. परत यायला पार संध्याकाळ होते. लेंगरवाडीला जाणारी पाऊलवाट वळसे घेत घेत जाणारी असते. हळूहळू अंधार होतो. मार्तंडा रस्त्याने एकटाच चालला असतो. क्षणभर तो घाबरतो काही दगाफटका तर होणार नाही ना असे त्याला वाटते. खिशातली कुऱ्हाड काढून ती दांडयाला लावून धीमेपणाने चालू लागतो. आकरओढा लागतो आणि एक शीळ ऐकू येते. भाव्या अंधारात साथीदारांना घेऊन मार्तंडावर कुऱ्हाडीचे वार करतो. मार्तंडाला काहीच करण्याची संधीही मिळत नाही.

सकाळी मार्तंडाचा बाप त्याची वाट बघत असतो त्याला वाटते रात्र झाली म्हणून गावातच कोणाकडे थांबला आपला लेक. सकाळी उठून येईल. दोन दिवस जातात मार्तंडा येत नाही राव्याच्या मनात विविध विचार येऊ लागतात. कसेतरी चार घास खाऊन तो झोपतो. मध्यरात्री एकाएकी उठतो. कुऱ्हाड घेऊन तो भाव्याच्या खोपटापाशी येतो. अंगणात घोंगडे पांघरून भाव्या झोपला असतो. त्याच्या अंगावरचे घोंगडे काढून राव्या त्याला मार्तंडा कुठे आहे ते विचारतो. भाव्या घाबरतो. तुझ्या साथीदारांनी त्याला मारला असे राव्या म्हणताच भाव्याला कळत नाही की त्याला सारे खरे कसे समजले, ''तूच तुझ्या वागणूकीने तोडलास त्याला' असे भाव्या म्हणतो. राव्या त्याच्या मानेवर कुऱ्हाड घालतो भाव्या राव्याचा गळा दाबून धरतो. म्हातारा राव्या तडफडत जागीच मरतो. भाव्याही वार लागल्याने विव्हळत मरतो.

भाव्या-राव्या आणि मार्तंडा यांचा असा शेवट होतो.

**गोडे पाणी :**

उन्हाळ्याचे दिवस असतात. महारवाडा दुपारच्या उन्हाने अधिकच शांत असतो. तक्क्याच्या समोर एक कडुलिंबाचे मोठे झाड असते व त्याला टेकून पाच सहा महार मंडळी बसलेली असतात. उन्हाळ्यात पाण्याची जी आबाळ होते. त्यावर हळूहळू चर्चा सुरू होते. गणा, संदीपान आणि साऱ्यांचेच असे मत असते की हा पाण्याचा प्रश्न सोडवला पाहिजे. नदीवरून पाणी आणणे अवघड होते. सगळया गावातच पाण्याचा प्रश्न बिकट होतो. पण पिण्याचे चार घागरी पाणी भरले की मराठा-वाणी लोकांकडे आड होत्या. त्याचे खारे पाणी ते वापरायला घेत. महारांचा प्रश्न पिण्याचा आणि वापरायच्या पाण्यांच्या असा दोन्हींचा होता. अन्न-वस्त्राचीही ददाद होती. तिथे आता पाणीही पुरेसे नव्हते. वेताळनाना हा महारवाडयातला म्हतारा कारभारी. त्याने आड काढायचा उपाय सुचवला त्यावर गणा म्हणतो 'आडाला पाणी लागेलचं कशावरून?' सगळया गावाला लागतं तर आपल्यालाही लागेल या आशेवर आड काढायचे ठरते. पण आड खोदणार कोण यावर बरीच चर्चा होऊन सगळयांनी मिळून आड तयार करण्याचे ठरते. वेताळनाना आड खोदण्याच्या कामाची मुख्य जबाबदारी घेतो. पुढे होतो व सारेचं त्याला दुजोरा देतात. ज्या जागेत आड खोदायचा ठरते. ती जागा सुकादादा जाधव या एका गावकऱ्याची असते. तो मरून बरीच वर्षे झालेली असतात. आणि त्याची मुले दूर गावी राहात असतात. तरीही वेताळनाना त्याच्या नावांतल्या नातेवाईकांची परवानगी घ्यायचे ठरवितो व त्यांच्याकडे जाण्याचे ठरवून सर्वजण तक्क्यावरून उठून आपापल्या दिशेला पांगतात.

दुसऱ्या दिवशी सकाळी आठ-दहा जणांसह वेताळनाना यदू-बकूच्या वाड्यात शिरतात. इतकी सगळी एकत्र जमून आली आहेत. तेव्हा काहीतरी काम असणार हे तो ओळखतो. बराच वेळ आंघोळ करून शेवटी तो महारांपुढे घेऊन त्यांना येण्याचे कारण विचारतो. गणा, वेताळनाना हळूहळू विषयाकडे वळत पाण्याचा प्रश्न फार बिकट असल्याचे यदू-बकूला सांगतात मग पुन्हा इकडचं-तिकडचं बोलणे होते. आड खोदायची असल्याचे हळूच वेताळनाना सांगतो. जागेच्या परवानगी बद्दल कोणीच बोलत नाही असे पाहून संकऱ्या एकदम मुद्दयाचे बोलून मोकळा होतो. खरेदीपत्रं करा व जागेची किंमत सांगा असे थेट यदू बकू पाटलाला सांगितल्याने तो क्षणभर दचकतो. 'अरे माळावर बोंबलायला पाटलाची परवानगी कशाला?' असे म्हणून 'जा खोदा आड' अशी परवानगी महारांना देतो. महारमंडळी संतुष्ट होऊन वाड्यात परततात.

ठरल्याप्रमाणे कुदळं हाणली जाते. भूमिपूजा होते. मोठी विहीर पाडायचा विचार ठरतो. खांदायला सुरूवात होते. रोज सकाळपासून संध्याकाळ पर्यंत खांदकाम सुरू असते. दोन हात चार हात करता करता विहीर हळूहळू खोल जायला लागते. बायका पोरे पाट्या उचलायला मदत करू लागतात. गावात त्याची चर्चा होते, पण महार आड करीत आहेत, स्वतःचा तर करेनात की यापलीकडे कोणाला त्यात आधिक स्वारस्य नसते. एक दिवस कुदळीसरशी पडलेले भोक पाण्याने भरते आणि मंडळी जयजयकार करतात. बातमी महारवाड्यात पोचते व सगळा वाडा विहीरीपाशी जमा होतो. पाण्याची यथासांग पूजा होते व वेताळनाना पहिल्यांदा पाणी पितो पाणी गोड असते. सर्वजणांना आश्चर्य वाटते व आनंदही होतो.

महारांच्या विहीरीला पाणी लागले यावर गावकऱ्यांचा विश्वास बसत नाही. पाणी गोडे असल्याची बातमी गावभर पसरते. सगळे गाव संध्याकाळी देवळापाशी जमते. व पाण्याची चौकशी सुरू होते. वेताळनाना पाणी लागल्याचे व ते गोड असल्याचे मारूतीच्या पायरीला शिवून सांगतो. दुसऱ्याची जागा दांडगाव्याने घेऊन त्यात विहीर काढल्याबद्दल तुम्हाला शिक्षा करायला हवी असे वाणी म्हणतो. पाटीलही मग महारांना परवानगी देणारा मी कोण अशी भूमिका घेतो. सगळे महार आता घाबरतात. कोर्टात मामला जाणार असे सांगताच तसे न करण्यासाठी गयावया करतात.

रात्रभर तक्क्यापुढे बसून खल करतात. आणि सकाळी उठून मुख्य गावकऱ्यांचे पाय धरतात. विनवण्या करतात. गावकरी केल्या कामाचे थोडे पैसे महारांच्या हाती ठेवून विहीर आपल्या ताब्यात घेतात. ती बांधून घेऊन त्यावर आड बसवतात. महारवाड्याच्या बाजूने काटेरी तार लावून विहीर आपल्या हद्दीत करून घेतात. कधी एखाद्या महारणीने एखादी घागर पाणी मागितले तर 'यांच्यावर उपकार करायची सोय नाही' असे वाण्या-बामणाच्या बायका चिडून म्हणतात.

❖ ❖ ❖

## प्रकरण १२

# ओझं : वाङ्मयीन वैशिष्ट्ये

'ओझं' या कथासंग्रहातून दिसणारे माडगूळकरांच्या भाषाशैलीचे विशेष या पाठात पहायचे आहेत.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात म्हणजे १९४७-४८ मध्ये माडगूळकरांच्या काही कथा व 'माणदेशी माणसं' प्रसिध्द झाले. आज पंचावन वर्षानंतर त्यांच्या कथा वाचताना त्या कथेतील प्रश्नाचे रूप/स्वरूप जसेच्या तसे राहिलेले नाही तरीही त्या कथा आजही 'कथा' म्हणून निश्चितच परिणामकारक वाटतात.

आशय/विषय, वातावरण, व्यक्तिचित्रण, यांबरोबर भाषेची अनेक वैशिष्टये या कथांमधून दिसतात. 'शैली' हा त्यांच्या कथेचा फार महत्वाचा विशेष ठरतो. त्याचा येथे विस्ताराने विचार करू.

**निवेदनशैलीचे विशेष :**

१) कालानुक्रमे निवेदन

२) निवेदनातील भावनाप्रकटीकरणावरील नियंत्रण

३) तृतीय पुरूषी निवेदन - अनेक कथांमध्ये

प्रथम पुरूषी निवेदन - तुरळक.

४) निवेदनातील भाषा ही देखील दलित-ग्रामीण जीवनाशी एकरूपता साधणारी आहे.

५) निवेदनाच्या भाषेतील लय-क्रियापदांची पुनर्योजना इ.

**१) कालानुक्रमे निवेदन :**

पारंपरिक गोष्टीचे रूप माडगूळकरांनी टिकवून ठेवले आहे ते कालानुक्रमे कथा लिहून, त्यांच्या कथेचे हे अभिजातपण म्हणावे लागेल. निवेदनाचा ओघ कुठेही खंडित न करता सलगपणे कथा लिहून ती आधिक परिणामकारक करणे हे सर्वात कठीण असते. पुर्वनिवेदनाची योजना करून परिणाम साधणे सोपे ठरते. कालानुक्रमे चित्रित केलेल्या घटनांतून माडगूळकर आशय अधिक अर्थपूर्ण ठरवितात.

उदा. 'देवा सटवा महार' या कथेतील काबाडकष्ट करण्याचा देवाच्या जीवनात खळबळ माजणारी एक घटना घडते. ती घटना, तो घडल्याचा क्षण कथेत अगदी शेवटाला येतो. कालानुक्रमे-एक संध्याकाळ असा कालक्रम कथेत येतो. दिवेलागणीला थकून भागून देवा घरी येतो. दुसऱ्या दिवशी देवी काढणारा डॉक्टर येणार असल्याचे बायकोला सांगून जेवतो व तक्क्यावर रात्रीचा जरा वेळ बसतो. दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून नेमलेले काम पुरे करतो. दिवसभर राबतो. पाटलाच्या सांगण्यावरून डॉक्टर आल्याचे गावात चार-चारदा सांगून येतो. सरतेशेवटी डॉक्टरांच्या प्रतिक्रियेमुळे पायातील वहाण काढून संताप व्यक्त करतो.

त्यानंतर माडगूळकर '' त्यानंतर आता काही दिवस ......नांदते आहे''. (पृ. ११ 'देवा सटवा महार') असे निवेदन लिहीतात. इतकेच नाही तर त्याच पुढे ''.....आणि दक्षिणी ...... संभव नाही!'' असे लिहून कलानुक्रमे सांगितलेल्या कथेत परिणामाच्या दृष्टीने भर घालतात. व आशय अधिक सघन करतात.

'रामा मैलकुली' या कथेत प्रथम पुरूषी निवेदक रामाच्या गावात शिरतो इथपासून ते दुसऱ्या जेवणापर्यंत इतकाच काळ चित्रित केला आहे. त्यात रामाचा सगळा जीवनपटच उलगडला आहे. त्याचं दिसणं, त्याचं व्यक्तिमत्व, त्याची मानसिकता, त्याच्यांत असलेला प्रेमळपणा, त्यांची कधीही बदलू शकणारी परिस्थिती त्यातून निर्माण झालेली आगतिकता तरीही त्याच्या ठायी असलेली चिवटपणा हे सगळे कथेतून एका लयीत चित्रित केले आहे. कथेतील संवादात अचूक जागी आलेले निवेदन याचे उत्तम उदाहरण असलेली ही कथा आहे. उदाः रामा व निवेदक दोघेही गावातून बाहेर पडून सडकेला लागतात. एकमेकांशी बोलतात व पुन्हा शांतपणे चालू लागतात. माडगूळकर ते कसं लिहीतात ते बघू :

दोघंही गावाबाहेर .....

ह्या मी घेतू!''

ह्या संवादानंतर पुढचे निवेदन .... त्यानं जाणीव दिली ...''मैलाचा धोंडा आला बघा''

रामाच्या रूपाचं तपशीलवार तरीही संयत वर्णन, त्याचा पेहराव, त्याच्याविषयीचा अंदाज असे निवेदन लेखक करतो व मैलाचा दगड येता क्षणी ते निवेदन संपते व परत संवादाला सुरूवात होते. अशी अनेक उदाहरणे बाकीच्या कथांमधून विखुरलेली दिसतील.

**२) निवेदनातील भावना प्रकटीकरणावरील नियंत्रण :**

कधीकधी एखाद्या घटना-प्रसंगाचे निवेदन करताना अनेकदा त्या प्रसंगांशी संबंध नसलेले तपशीलही येतात. ते देण्याचा मोह लेखकाला आवरता येत नाही. त्या तपशीलाने वातावरण, आशय, संवाद, व्यक्तिरेखा यांपैकी कशावरच अधिक प्रकाश नाही किंवा यापैकी कशातच हे तपशील धनात्मक भर घालत नाहीत. असे तपशील काढून टाकणे पुन्हा महत्वाचे असते. कथेतील निवेदनात असे तपशील कमी-जास्त स्वरूपात येण्याची शक्यता असते. माडगूळकरांच्या कथांतील निवेदनाचे एक अत्यंत महत्वाचे वैशिष्टय असे सांगता येईल की या तपशीलांकडे त्यांचे सतत लक्ष असते, म्हणूनच भावनांचे प्रकटीकरण करताना, लेखक म्हणून निवेदन करताना ते सतत नियंत्रणावर भर देतात. कुठलीही जाणीव तीव्र स्वरूपात वाचकाला व्हावी असे जिथे-जिथे त्यांना वाटते. तिथे-तिथे ते वर्णनाचा वापर न करता अतिशय सूचक अशी एखादीच उपमा योजतात- व तेवढेच लिहून पुढे जातात.

उदाः 'ओझं' या कथेतील लडाबाई ज्या वस्तीत राहते तिचे वर्णन माडगूळकर पानभर करीत नाहीत. ४-५ ओळीतून त्या व्यक्तीचे गलिच्छ चित्र डोळयासमोर ते उभे करतात. कसे ते पाहू.

''पुलाच्या आडोशानं .......आवाज सारखा होत होता'' (पृ. १२३. 'ओझं)

या वर्णनात भिंतीच्या आडोशाला बसलेल्या लेकुरवाळया डुकरीणीसारखी' अशी उपमा त्या वस्तीला माडगूळकर देतात व त्यातून त्या वस्तीतील, घाणीचा, अस्वच्छतेचा, गलिच्छपणाचा प्रत्यय येतो.

'धर्मा रामोशी' कथेतील धर्माची मुलगी बजा ही कधीही निवेदकासमोर आलेली नसते. कथेच्या शेवटी ती दळण घ्यायला म्हणून आईकडे येते. तिला पाहून निवेदक तिच्याकडे धर्माची चौकशी करतो. व शेवटी माडगूळकर इतकेच लिहीतात.

''.......अणि इतके दिवस .....उपयोग केला होता'' (पृ. १७ 'धर्मा रामोशी')

येथे कथा संपते धर्माच्या परिस्थितीचे सतत बारीकसारीक तपशील टिपणारा निवेदक कथेच्या शेवटी बजाच्या अंगावरचे स्वतःचे धोतर पाहून केवळ आवाक होतो. व आधीच्या अनेक प्रश्नांची त्याला जणू उत्तरेच मिळतात म्हणूनच तो अधिक काही निवेदन करीतच नाही, 'मी अंतर्मुख झालो, गहिवरलो मला सगळे उमगले' असे काहीही पुढे निवेदनात येत नाही. भावनांचे असे संयमित प्रकटीकरण कथांमधून जागोजागी आढळते.

'वडारवाडीच्या वस्तीत' या कथेत लक्षीचाबाप मरतो. व त्याचे दुःख लक्षीला होतो. त्याचे निवेदन माडगूळकर कसे करतात व त्या निवेदनात 'इतर केस पिकलेल्या वडारणी व पोरे' यांचा तपशील कशा प्रकारे येतो. आणि त्या दुःखद प्रसंगात भर घालतो ते बघू.

''एके दिवशी .....अवती भवती उभी होती'' (पृ. ७०, 'वडारवाडीच्या वस्तीत') अशा पद्धतीने आणखीही उदाहरणांची भर तुम्ही घालू शकाल.

**तृतीय पुरूषी निवेदन :**

संग्रहातील 'देवा सटवा महार', 'वारी', 'आडिट', 'पडकं खोपट', 'वडारवाडीच्या वस्तीत', 'गोडे पाणी' 'गोविंदा कातकरी', 'ओझं' या कथा तृतीय पुरूषी निवेदनातील आहेत व सात कथा प्रथम पुरूषी निवेदनातील आहेत.

तृतीय पुरूषी निवेदक हा 'सर्वसाक्षी' निवेदक असतो. एकाचवेळी अनेक ठिकाणी तो साक्षीभावाने हजर असतो. त्याचमुळे बाह्य घटनांची तपशिलवार नोंद जशी तो करतो तशीच पात्रांच्या मनात चाललेल्या विचारांची भावनांचीही दखल घेतो. तर प्रथम पुरूषी निवेदनात विश्वासाहर्ता आपोआपच निर्माण होते.

**निवेदनाची भाषा**

माडगूळकरांच्या सर्व कथांमधील निवेदनाची भाषा ही त्या कथेतील दलित-ग्रामीण जीवनाशी एकरूप होणारी आहे. ग्रामीण भाषेतील अनेक शब्द त्यामध्ये सतत येतात. म्हणूनच कथातील निवेदन व त्यातील संवाद यांच्या भाषेत फार मोठी तफावत दिसत नाही उलट ते एकमेकांना पूरक असेच कार्य कथेत करतात. उदाः ''नुकतीच दिवेलागण.....घालून बसल्या होत्या. (पृ.१ 'देवा सटवा महार')

किंवा

'चांदणी उगवायलाच राणीने देवाला जागे केले'

या प्रत्येक निवेदनात 'काडवटात', 'बेदरापासून', 'चांदणी उगवयलाच' असे अनेक शब्दप्रयोग माडगूळकर सहजपणे योजतात.

व्हंडीच्या भाकऱ्या, शेलकी मंडळी, जोत्यावर बसली, रस्ते राड झाले होते, पावसाची बुरबुर, कडसु पडायला, थोबाड चिंबवील, वाकळेवर अंग टाकले, असे अनेक वाक्यप्रयोग जागोजागी येतात व माडगूळकरांच्या कथेतील अस्सल ग्रामीण विशेष सतत जाणवून देतात.

खेडोपाडी बसलेल्या ज्या दलित-ग्रामीण माणसांविषयी, त्यांच्या प्रश्नांविषयी लिहायचे त्या माणसांची भाषा आणि त्यांचे रोजच्या जीवनातले बोली भाषेतील शब्द हे कथेत येणे अपरिहार्यच ठरते. माडगूळकरांच्या कथांतही ते अपरिहार्यपणे येते.

**निवेदनाच्या भाषेतील लय :**

भाषेतील लय हा देखील माडगूळकरांच्या लेखनशैलीचा विशेष म्हणावा लागेल. गद्याच्या अंगभूत लयीत असलेल्या सामर्थ्याचा वेगळा प्रत्यय त्यांच्या लेखनात येतो. गद्यलयीतून ते विशिष्ट भाववृत्ती निर्माण करतात जी आशयाशी नाते निर्माण करते.

उदा. 'वारी' या कथेतील अर्जुनाचे केलेले वर्णन-पहा.

''आता अर्जुना थकला होता. आता त्याचे भरत आले होते....फिरवीत होता. (पृ.४४, 'वारी')

या संपूर्ण परिच्छेदात 'होता' या क्रियापदांची रूपे पुन्हा पुन्हा वापरून गद्याला एक लय प्राप्त करून दिली आहे. या लयीतून अर्जुनाचा एकटेपणा, उदास भाव आणि थकलेपणा जाणवत राहतो.

'धर्मा रामोशी' या कथेची सुरूवातही अशीच एका लयबध्द निवेदनाने होते. ''सांज व्हावी -ऊन-सावली परस्परांत मिसळून विसावावी,.....शतपावली घालावी. (पृ. १२ 'धर्मा रामोशी')

'व्हावी', 'विसावावी' 'घालावी' अशा क्रियापदांनी लय साधलेली आहे.

अतिशय सरळ-सोपी वाक्यरचना, छोटी छोटी वाक्ये हे देखील माडगूळकरांच्या भाषेचे वैशिष्टय आहे.

उदा : ''अर्जुनाचा लेक आणि सून ही भली पोरे होती. म्हताऱ्याला त्यांनी कधी हिडीसफिडीस केले............कष्ट केले'' (पृ. ४४, 'वारी')

किंवा

'अखेर आकण्या घरी आला' या कथेतील हा उताराही याचेच उदाहरण आहे. ''चावडीपुढं कोल्हाटयाचा ......हेरीत होते'' (पृ. ५९ व ६० 'अखेर......')

छोटया वाक्यरचनेतून वर्णन अतिशय चपखल व तपशीलवारपणे माडगूळकर करतात. चित्रपटात कॅमेरा इकडून-तिकडे फिरावा व संपूर्ण दृश्य सलगपणे दिसावे तसा हा प्रसंग माडगूळकरांनी रंगवलेला आहे. ज्या व्यक्तींचा तपशीलाने उल्लेख येतो, त्या व्यक्ती पुढे घडणाऱ्या घटना-प्रसंगात सहभागी झालेल्या आहेत. म्हणजेच त्यांचा उल्लेख लेखक निवेदनात करतो. त्यांना केवळ उल्लेखाकरिता अथवा तपशील भरण्यासाठी वापरलेले नाही तर पुढे ती पात्रे, ते तपशील कथेत महत्वाची भूमिका करतात कधी प्रत्यक्षरीत्या जरी तशी भूमिका नसली तरी अप्रत्यक्षपणे प्रमुख पात्राशी / घटनेशी / आशयाशी त्यांचा निश्चित स्वरूपाचा संबंध असतो.

उदाः 'अखेर' मधील कुलकर्णी व त्यांचे तीन भाऊ किंवा 'वडारवाडीच्या वस्तीत' मधील ऱ्या मेंढयाचे केलेले वर्णन. 'देवा सटवा महार' मधील देवी काढणाऱ्या डॉक्टरचे वर्णन त्याचा 'रावसाहेब' म्हणून केलेला उल्लेख.

वरील सर्व तपशील हे कथेत घडणाऱ्या घटनांसाठी महत्त्वाचे आहेत.

**कथेतील संवाद, व त्याची वैशिष्टये :**

संवादाचा विचार करण्यासाठी संग्रहातील कथांचे वर्गीकरण करणे आवश्यक ठरेल. व्यक्तिचित्रात्मक कथा. (ज्यात व्यक्ती केंद्रस्थानी आहे) आणि इतर कथा.

'देवा सटवा....' 'धर्मा रामोशी', 'रामा मैलकुली', 'नामा मास्तर', 'गंगा महार', 'शिदा चांभार', 'वडारवाडीच्या वस्तीत', 'पडकं खोपटं' या कथांमध्ये निवेदनाचे प्रमाण साठ हक्के व संवादाचे चाळीस टक्के असे आहे. तर इतर कथांत ते उलटे आहे . एखाद्याच व्यक्तीविषयी, तिच्या जगण्याविषयी, तिच्या परिस्थितेचे चित्रण जेव्हा कथेत येते तेव्हा त्या कथेतील संवादात निवेदक व ती व्यक्ती एवढेच सहभागी असतात. तेथे निवेदकांची भाषा व त्या व्यक्तीची (उदा- धर्मा, नामा, शिदा आणि गणा) भाषा असे भाषेच्या संदर्भातले महत्वाचे भेद लक्षात घ्यावे लागतात. जात, व्यवसाय यांच्याशी निगडीत अशी भाषा माडगूळकरांच्या या कथांत दिसते.

उदाः 'देवा....कथेतील देवा म्हणतो, ''पंतसरकार म्होरं न्हाई, तर पाक दिल्लीच्या.....म्हंजे हाय काय?.....पाटलाचं काम.....हाय!'' (पृ. १० व ११ 'देवा सटवा महार')

किंवा 'नामा मास्तर' मधील नाना म्हणतो, ''शनवार....आणतो करून!'' (पृ.२७)

'शिंदा चांभार' कथेतील इरसाल शिंदा सतत जेम बोलतो त्यावरून त्याचा इरसालपणा दिसतो. ''त्याला काय बकुत....वागायचं!'' (पृ.३३ 'शिदा चांभार')

'गोडे पाणी', 'आडीट', 'अखेर'.., यांसारख्या कथेत अनेक व्यक्तिचित्रे रंगवलेली आहेत. त्यांची भाषा, भाषेत वापरलेले वाक्यप्रचार, म्हणी यांवरून माडगूळकरांच्या संवादाची वैशिष्टये आधिक ठळकपणे सांगता येतील.

'गोडे पाणी' या कथेतील गणा, संदीपान, वेताळनाना जे बोलतात त्यात-जित्याची खोड मेल्याबिगार सुटत नाय, कुत्र्याचं शेपूट वाकडं ते वाकडवं, जळामंदी ऱ्हाऊन माशाशी वैर कसं करतूस? हत्तीसंग इटीदांडू खेळायला ताकद हाय का? अशा म्हणी ठिकठिकाणी येतात.

माडगूळकर कथेतील निवेदनात अनेकदा तपशीलावर वर्णन न करता एखादी अचूक उपमा योजावत व हवा असलेला परिणाम साधतात. त्यांच्या उपमा कधी प्रसंगाचे वर्णन करताना येतात तर कधी व्यक्तिचित्रं रेखाटताना येतात.

उदा. गोविंदा कातकरीविषयी सांगतात एके ठिकाणी 'सावली जावी तसा गोविंदा जंगलातून जातो' असा उल्लेख येतो.

'कडयावरून सुटलेला धोंडा यावा तसा बाहेर आला', बुळबुळीत साबण आल्या हाताच्या पकडीतून निसटावा तसा निसटला', झुडपावर पतंग अडकावा तसा अडकला', उंदीर बाहेर येतात तसे ढिगातून कातकरी बाहेर येतात', 'वठल्या झाडासारखा दिसतो, 'करवंदासारखा काळा', वैरणीचा भारा उचलावा तसा उचलला', अशा अनेक उपमा माडगूळकर देतात.

कचाचा, धसासा, उजळ-श्यामल असे काही वैशिष्टयपूर्ण नवे शब्दही माडगूळकरांच्या कथांतून दिसतात. ते माणूस, वनस्पती आणि पशू यांचा एकात्म स्वरूपात अनुभव घेतात. त्यांच्या या संवेदनशीलतेचे वैशिष्टय त्यांच्या शब्द प्रयोगातून, उपमांमधून दिसून येते. उदाः गणा भपटयाचे वर्णन करताना ते म्हणतात, 'त्याच्या हरेक अवयव उत्तम खतपाणी मिळालेल्या झाडासारखा होता', 'बनगरवाडीत' उन्हातून जात असताना निवेदक सांगतो की, 'गार सावली बघताच मी तापलेल्या कोंबडयांसारखा तिच्यात जाऊन बसलो', ऐबूचे वर्णन करताना, इधभात खाऊन मांजर झोपतं तसा ऐबू झोपला' असे केले जाते, 'बनगरवाडीच्या वस्तीत' या कथेत लक्षी कोकाटीसारखी कलकलू लागली-असे वर्णन येते.

माणदेशातील 'मराठी बोली' हा त्यांच्या भाषाशैलीचा महत्वाचा विशेष आहे. 'ज्या बाइलीला खाण्यापेण्याच्या आबाळीने गडी खराप झाला' असे ते सहज लिहितात. शुध्द ग्रांथिक भाषेपेक्षा बोली नेहमीच जिवंतपणे आणि रसरशीतपणे अनुभव व्यक्त करतात, तमासगिराची ढंगदार, मोमिनाची मुसलमान, कुलकर्ण्याची तेढी, अशा बोलीच्या नानापरी ते वापरतात. आवश्यक तिथे वाक्यात माडगूळकर प्रमाणभाषेचाही वापर करतात. 'तारेवर चिमण्या बसाव्या तशी पोरं दाटीवाटीनं बसली' 'हातातला कंदीलच तेवढा भुताच्या दिवटीसारख्या अधांतरी जात राहिला'- अशी प्रतिमा ते सहज वापरतात. त्यांची संवेदनाप्रधान भाषा अनुभव साक्षात उभा करते. 'मग मुसलमानाचे धीट पोर पुढे झाले आणि आपले नकटे नाक खाजवीत ओरडले,' अरं, वांडर, वांडर हुप, तुझ्या शेंडीला शेरभर तूप!' 'किंवा' एका गावकऱ्यापुढं बदकन धोंडा पडला'.

ठसठशीत आणि विविध प्रकृतीची व्यक्तीचित्रे हे त्यांच्या कथेचे आणखी एका वैशिष्टय. ही माणसे ओबडधोबड आणि कणखर व्यक्तिमत्वाची असतात. ती जशी असतात तशीच चित्रित करण्याचे अमोघ सामर्थ्य माडगूळकरांच्या लेखणीत आहे.

''त्यांच्या कथेत कथानकापेक्षा पात्रांना आधिक महत्त्वाचे स्थान आहे. कथानकाची कृत्रिम रचना करण्याचा प्रयत्न ते करीत नाहीत. त्यांच्या कथाविषयानेच त्यांच्या कथानकांची रचना आपोआप ठरते. माडगूळकरांच्या कथांत कथानकाच्या रचनेला स्वयंभू महत्त्व नसले तरी घटनांना मात्र महत्व असते. ह्याचे कारण गोरवल्यांच्या प्रमाणे माडगूळकर पात्रांच्या मनात शिरून लिहित नाहीत. ते बाहेरून कथा लिहीतात. शिवाय भाव्यांप्रमाणे ते कथाविषयावर स्वतःचे भाष्य असे क्वचित करतात. त्यामुळे त्यांना जे सांगायचे असते ते घटनांच्या द्वारेच सांगावे लागते त्यामुळे अर्थात. त्यांच्या कथांत घटनांना अधिक महत्त्व असते.''

साधीसुधी, अलंकार अगर चमत्कृती यांचा मुळीच सोस नसलेली, सरळ गाभ्यालाच हात घालणारी त्यांची शैली सुचवते खूप. मेंढरांचा, जोधळ्यांच्या शेताचा, घरट्याचा असे वेगळे वास ते बारकाईने व्यक्त करतात, रसगंधाचा अनुभव देतात.

त्यांच्या भाषेविषयी अरविंद गोरवले म्हणतात, ''भाषेचा अस्सल मराठी वाण, शब्दांची मोजकी व

नेमकी ठेवण, दोन चार वाक्यात निसर्ग अगर व्यक्ती सजीव करण्याचे सामर्थ्य, अटोपशीर पण बोलके संवाद, स्वप्नाळू, भावविवश व बोधपूर्ण लेखनापासून मुक्त निवेदन, खिळवून टाकणारे जीवनदर्शन ....'' त्यांची कथा घडवते.

❖ ❖ ❖

# प्रकरण १३
# बनगरवाडी : कथानक

प्रस्तुत पाठात आपण 'बनगरवाडी' या कादंबरीचा अभ्यास करायचा आहे.

'बनगरवाडी' ही व्यंकटेश माडगूळकर यांची अतिशय गाजलेली कादंबरी! या कादंबरीच्या जवळपास पंधरा-सोळा आवृत्या निघाल्या. या कादंबरीवर 'बनगरवाडी' ह्याच नावाने चित्रपटही काढण्यात आला. प्रामुख्याने धनगरांची वस्ती असलेल्या 'बनगरवाडी' ह्या छोट्याशा खेडयात शाळामास्तर म्हणून एका पोरसवदा तरूणाची नियुक्ती होते. शाळेत शिकण्याबरोबर वाडीतील जीवनाशी समरस होणाऱ्या व वाडीतील लोकांच्या उपयोगी पडणाऱ्या ह्या तरूणाला भेटलेली वैशिष्टयपूर्ण माणसे येणारे अनुभव यांचे चित्रं ह्या कादंबरीत आहे.

वास्तविक 'बनगरवाडी' मधला तरूण चळवळीत भाग घेणारा आहे. पण तो मास्तर म्हणून जेव्हा बनगरवाडीत धनगरांच्या गावात निवांतपणे आपली नोकरी बजावत राहतो. तेव्हा त्याचे चिंतन स्वातंत्र्यचळवळी संबंधी नसते. ते माणूस, प्राणी आणि निसर्ग याविषयी असते, तीन वर्षाच्या तेथील वास्तव्यात तो आठ-दहा माणसे जवळून पाहातो. त्यात घटना फार नाहीत (अंजीचे प्रकरण, जगन्याचे प्रकरण, पंत सरकारची भेट, पैशाची चोरी- एवढ्याच घटना.) पण गावाचे जगणे दुष्काळात देशांतरी जाणारी माणसे, मूकपणे जगणारी मेंढरे हाच या कादंबरीचा विषय आहे.

अविनाश सप्रे ह्या कादंबरीबद्दल प्रदक्षिणा-खंड-२ मध्ये म्हणतात, ''व्यंकटेश माडगूळकर यांची 'बनगरवाडी' (१९५५) हा मराठीतील कांदबरीलेखनाचा एक सहजसुंदर आविष्कार आहे. अस्सल, खराखुरा आणि जातिवंत अनुभव यातून प्रत्ययाला येतो. (स्वातंत्र्योत्तर मराठी कांदबरी प्रवृत्ती प्रवाह. पृ.१८०)

**कथानकः**

कथानक म्हणजे लेखकाने / कादंबरीकाराने केलेली व्यक्तींच्या कृतीची, प्रसंगाची, घटनांची जुळणी. कथानक ही एक रचना असते.

'गोष्ट' आणि 'कथानक' यात फरक आहे. गोष्ट ही सरळ रेषेसारखी असते. एका घटनेनंतर दुसरी घटना अशा प्रकारचा क्रम गोष्टीत असतो. कथानकात मात्र स्थलकालासंबंधी असा क्रम पाळला जातोच असे नाही. वाचकाच्या मनात सतत उत्कंठा निर्माण व्हावी अशा प्रकारे कथानकाची रचना केली जाते.

इ, एम. फॉस्टर यांनी गोष्ट (स्टोरी) आणि कथानक (प्लॉट) यांच्यातला फरक स्पष्ट करताना एक उदारहण दिले आहे, जे सर्वश्रुत आहे. 'राजा मेला आणि त्यानंतर राणी मरण पावली' ही गोष्ट आहे. परंतु 'राजा मेला आणि नंतर त्या दुःखाने राणी मृत्यू पावली.' हे कथानक आहे. गोष्टीत पुढे काय झाले हा प्रश्न असतो तर कथानकात असे का झाले हा प्रश्न असतो कांदबरीचे कथानक विशिष्ट कालमर्यादेत घडत असते. कथानकाची जुळणी कशी करायची हे कांदबरीकाराच्या कलात्मक हेतूशी निगडीत असते.

लेखक व्यंकटेश माडगूळकर ह्यांच्या 'माडगूळे' ह्या जन्मगावापासून जवळच असलेल्या लेंगरवाडीला त्यांनी 'बनगरवाडी' हे नाव दिले. माडगूळकरांच्या मनातल्या खडकावर बसलेली 'बनगरवाडी' व तेथील रहिवासी यांचं जिवंत चित्रण, ह्या कांदबरीतून प्रत्ययाला येतं.

'बनगरवाडी'च कथानक घडतं तो काल साधारणपणे स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीचा आहे. बनगरवाडीत बहुतेक वस्ती धनगरांची असते. काळयाभोर रंगाचे हे धनगर नेहमी उघडेच वावरत. बाहेरच्या जगाचे त्यांना विशेष ज्ञान नव्हते व ते नव्हते याची त्यांना विशेष जाणीवही नव्हती. पहाटे लवकर उठून मेंढरांना चरायला घेवून जाणे. मेंढरांच्या लेंडयांचा ढीग खतासाठी तयार करणे, मेंढरे चरत असताना दिवसभर त्यांच्यामागे हिंडणे. दुपारच्या वेळी विहीरीवर आळीपाळीने आंघोळी करून सोबत आणलेली भाकरी खाणे व संध्याकाळी मेंढरांना घेऊन परत घरी येणे हाच त्यांचा मुख्य उद्योग असायचा. मेंढरं चरायला नेताना सोबत ते एखादे कुत्रेही न्यायचे. शंभर मेंढरांमागे एका धनगर असायचा.

संध्याकाळी घरी आल्यावर 'मेंढरं जुळवणे' हा एक मोठा अर्ध्या तासाचा कार्यक्रम असायचा. मेंढरे चरायला नेताना त्यांची पोरे घरीच असत. मेंढया घरी आल्यानंतर पोराला शोधायच्या आणि पोरं आईला. त्यामुळे त्यांचा मे-मे असा एकच गोंधळ सुरू असायचा. साऱ्या गावभरच हा गोंधळ सुरू राही. मेंढक्याला म्हणजे धनगराला ह्या गोंधळात शिरून ही मेंढरे जुळवावी लागत. प्रत्येक मेंढीजवळ तिचे पोर आणून ते कासेला लावून घ्यावे लागे मग हा लगका शांत होई. मेंढ्या पोरांची अंगे चाटू लागत. पांढऱ्या घट्ट दुधाने पोरांची तोंडे माखून जात.

मेंढरे जुळवून झाली की, मेंढका धनगरीने केलेल्या ऊन ऊन भाकरी व कोरडयास खायला बसे. जेवण किंवा भोजन हा शब्द त्यांना माहित नव्हता. जेवण म्हटले की एखादादुसरा पदार्थ जास्ती येतो. त्याची धनगरांना जरूरी नव्हती. दोन्ही वेळा ते फक्त भाकरी खात. कधी चटणीशी तर कधी हिरव्या भाजीच्या पाल्याशी तर कधी कांद्याशी भाकरी खाऊन झाल्यावर धनगर चावडीपाशी जमत. तिथे अंधारातच धुळीत बसून त्यांच्या गप्पा चालत. त्या मेंढरांबद्दल असत. किंवा पाऊसपाण्याबद्दल! घरी परतून मेंढरांच्या वाडयाजवळ मेंढके झोपायचे. त्याचे कुत्रे त्यांच्या पायाजवळ असे. दोघांचीही झोप सावध असे. धनगरीण घरात लहान पोराला घेऊन झोपे.

अशा ह्या बनगरवाडीत शाळामास्तर म्हणून ह्या कांदबरीच्या नायकाचे आगमन होते. ह्या कांदबरीचे निवेदन ह्या शाळामास्तराने केलेले आहे. हयाचे नाव राजाराम विठ्ठल सोंदणीकर असे असते. बनगरवाडी जवळच्या 'विभूतवाडी' ह्या गावातून तो आला असतो. पहाटे लवकर उठून दशम्यांची पिशवी पाठीला बांधून नायक चालतच वाडीला यायला निघतो. चालताना त्यांच्या मनात गावाबद्दल तिथल्या माणसांबद्दलचे विचार येतं असतात. ते गाव कसे असेल, माणसे आपल्याशी कशी वागतील यासंबंधीचे विचार त्याला भंडावत असतात. बनगरवाडीला येण्याची त्याची ही पहिलीच वेळ असते. त्या काळी वाहतुकीची साधने फार नसत. 'गाव तिथे एस.टी' सुरू झालेली नसते. त्यामुळे राजारामचा म्हणजे नायकाचा प्रवास पायीच होत असतो. आता उन्हं चांगलचं तापू लागलं असतं. भूक व तहानेने जीव व्याकुल झालेला असतो. तरी तो नेटाने चालत राहतो.

चालता चालता आजूबाजूला नांगरलेल्या जमिनी तर कुठे पडिक जमिनी दिसू लागतात. त्यावरून

गाव जवळ आल्याचे नायकाला कळते. हळूहळू तो वस्तीच्या जवळ येऊन पोचतो. आजूबाजूला सपाट मोकळा माळ बाजरीची तांबडी राने आणि मध्येच गबाळे पडावे तशी पडलेली तीस-पस्तीस घरे मातीची किंवा धाब्याची असतात. छपरे खपलीच्या काडाने शाकारली असतात. वाडीत रस्ते असे नसतातच. घरे बांधून उरलेली जागा रस्ता म्हणून चालण्यासाठी वापरली जात असते. घरापुढे मुले खेळत असतात. गावातील लोकांच्या सवयीप्रमाणे काही घरातील बायका नायकाकडे डोकावून पाहतात. पोरे त्याला पाहून आत पळतात. पुढे गेल्यावर पटांगणात एक लिंबाचे झाड दिसते. त्यांच्या भोवती पार असतो. दमलेला नायक झाडाच्या सावलीत जाऊन बसतो. त्याला जेवायचे असते. पाणी हवे असते. पण आजूबाजूला कोणी दिसत नाही.

जरा वेळाने अंगात गोल सदरा घातलेला डोक्याला तांबडया रंगाचा पटका बांधलेला व हातात भाला घेतलेला एक माणूस येताना दिसतो. आपण मास्तर असल्याचे त्याला नायक सांगतो. पण त्या माणसाला ते खरे पटत नाही. आणि हतं काय करायचा मास्तरा' असे तुच्छतेने तो बोलतो. इथे पोर नाहीत व शाळाही चालत नाही. सरकारला हे माहित नाही का? वगैरे बोलून तो निघून जातो. नायकाला खूप निराश वाटू लागते. नवीन नोकरीवर नवीन गावात येताना त्याने कितीतरी स्वप्ने पाहिली असतात. मोठया उमेदीने तो आला असतो. मुलांना चांगले शिक्षण द्यावे, चांगले नाव कमवावे अशा त्याच्या इच्छा आकांक्षांच्या चक्काचूर होतो. इथे कशाला आलो असे त्याला वाटू लागते. एकटेपणा जाणवू लागतो. पण थोडयाच वेळात एक खूप वय झालेला म्हातारा माणूस काठी टेकत रानाकडून येतो. नायकाला तो न्याहाळून पाहतो व आपुलकीने विचारतो "हतं का बसला रे बाबा?"

आपण मास्तर असल्याचे नायक त्याला सांगतो. तेव्हा तो त्याला शाळा दाखवतो. नातीकडून त्याच्यासाठी पाणी मागवतो. त्याचे बोलणे नायकाच्या जखमेवर फुंकर घालणारे असते. वाडीत पुष्कळ पोरं आहेत व ती शाळेत येतील असेही तो म्हणतो. नायकाला त्यामुळे पुष्कळच धीर येतो. त्याच्या मनावरचं उदासीनतेचं सावट दूर होतं. तो शाळेत येतो. शाळा बऱ्याच दिवसापासून बंद असल्यामुळे जमीन उखणलेली असते, धूळ, माती, चिमण्यांची विष्ठा यांनी भरून गेलेली असते. म्हातारा आपल्या घोंगडयानेच ती जमीन साफ करतो. व त्याला बसायला सांगतो. ह्या म्हाताऱ्या गृहस्थाला 'कारभारी' म्हणतात. त्याला गावात बराच मान आहे. हे नायकाला रात्री चावडीजवळ बरेच गावकरी जमल्यावर कळतं. कारभारी त्याची जुजबी चौकशी करतो. 'तू आमच्यापैकीच हायेस! म्हणून त्याच्या पाठीवरून हात फिरवतो. त्याच्या आपुलकीने नायकाला धीर येतो. त्याच्या आपुलकीने नायकाला धीर येतो. भाकरी खाऊन तो शाळेतच विश्रांती घेतो. संध्याकाळ होईपर्यंत त्याला जाग येत नाही.

संध्याकाळी रानातून परत येणाऱ्या मेंढरांच्या गळ्याचा आवाज सर्वदूर पसरला असतो. धूळ उडत असते. नायक जागा होतो. दूपारी शांत, निर्जीव वाटणारी बनगरवाडी आता एकदम जिवंत वाटत असते. अंधार पडल्यावर कोणीतरी येऊन समोरच एका बाजूला असलेल्या मारूतीच्या देवळात दिवा लावते. नायकाच्या मनात विचार चालू असतात. आता तीन वर्षे तरी त्याला इथेच रहायचे असते. हेच आपले गाव, याच लोकांमध्ये मिसळायचे, शाळेचे महत्त्व या लोकांना पटवून द्यायचे. या परक्या, अनोळखी लोकांत कसे होणार? इत्यादी विचारांनी तो व्याकुळ होतो.

थोडया वेळात अंधारातून कारभारी येतो. कारभाऱ्यानं त्याच्यासाठी दूध आणलं असतं कारभारी त्याची चौकशी करतो, हळूहळू इतर गावकरी जमतात. कारभारी त्यांच्याजवळ शाळेचा विषय काढतो. मास्तर आल्याचे सांगतो. पण शाळा, शिक्षण याविषयी सगळयांच्या मनात अनास्थाच असते. 'कुठं हायेत गावाला पोरं?' असं विचारून ते त्यांची उदासीनता दाखवतात. पण कारभारी चांगला खमक्या असतो. व त्याला शाळेचे महत्व पटलेले असते. गावकऱ्यांना, त्यांना कळेल अशा भाषेत प्रश्न विचारून तो निरूत्तर करतो व शेवटी माझा सखा, तुमचा तुका असे करत दहाबारा मुलांना शाळेत पाठवायला वाडीतले लोक तयार होतात. नायकही त्यांना शाळेचे महत्व सांगतो. मुलांना लिहावाचायला आल्याने त्यांचा फायदा होईल वगैरे सांगतो.

दुसऱ्या दिवसापासून शाळा सुरू करण्याचे ठरतं. मग लोकांच्या मेंढराच्या, कुरणाच्या, हवापाण्याच्या गप्पा सुरू होतात. थकलेला नायक कारभाऱ्याची रजा घेतो व आत जाऊन झोपतो.

कारभारी नायकाला एक लहानसे घर देतो. गावी जाऊन तो थोडी भांडी-कुंडी आणतो, दगडांची चूल मांडतो व हाताने भाकरी करून खाऊ लागतो.

शाळा सुरू होते. पण यथातथाच. मुलांना शाळेची गोडी नसते. आणि मुलांना शाळेत पाठवण्यापेक्षा मेंढरामागे रानात पाठवणेच लोकांना महत्त्वाचे वाटते. आलेली मुले काहीतरी निमित्त करून घरी निघून जात. त्यांना थोडे जरी रागावले तरी ती रडू लागत व त्यांची आई येउन त्यांना घेऊन जाई व नायकालाच रागावी - 'तुला पोरबालं नाहीत का?' म्हणे. एकंदरीत शाळा म्हणजे सगळा आनंदच होता. मुलांना शाळेची सवय होण्याची वाट पाहणे एवढेच नायकाच्या हातात असते. ते तो करतो हळूहळू सगळे सुरळीत होईल असे त्याला वाटत असते.

पण एका रात्री, नायकाला सर्वप्रथम भेटलेला भालाईत, ज्याचे नाव दादू बालटया असते. तो येतो व नायकाला धमकी देऊन जातो. गावच्या इतर भानगडींमध्ये लक्ष न घालण्याचे सांगतो. आधीच्या मास्तराला आपण कसे मारले, तेही इथेच राहत होता वगैरे त्याच्या तोंडून ऐकून नायकाला सहाजिकच भीती वाटते. कोणीतरी यावे असे त्याला वाटू लागते. दादू धमकी देऊन निघून जातो. हा दादू बालटया म्हणजे टिवल्या-भावल्या करणारा, ह्याची टोपी त्याच्या डोक्यावर ठेवणारा माणूस असतो. लिहावाचायला येत असल्याने व तालुक्यातील आधिकाऱ्यांशी थोडी ओळख असल्याने तो गावात दादागिरी करत असतो. हे सारे नायकाला कळलेले असते. पण सध्या तरी तो काहीच करू शकत नसतो. अंधारात तो बसून राहतो.

त्याच वेळी मजबूत शरीरयष्टीचा एक दांडगा, तरूण आत येतो. हा गावोगाव भटकणारा एक अनाथ असा वीसबावीस वयाचा तरूण असतो. त्याचं नाव आयबू असतं, चावडीवर त्याला मास्तरच्या सोबतीला रहायला गावकऱ्यांनी सांगितलं असतं, त्याप्रमाणे तो आला असतो. नायकाला त्याचा आधार वाटतो. व त्यांच्याशी जुनी ओळख असल्यासारखे वाटते. सकाळच्या न्याहरीसाठी ठेवलेली भाकर नायक त्याला तेल, तिखट घालून देतो. ती खाऊन आयबू बसल्याबसल्याच घोरू लागतो.

नायकाला एक साथीदार मिळतो. दादूला आता घाबरायचे नाही असे तो मनोमन ठरवतो व खोलीचे दार उघडे ठेवून निश्चिंत मनाने झोपी जातो.

हळूहळू आठदहा मुले नियमितपणे शाळेत येऊ लागतात. ग.म.भ.न शिकू लागतात. पण या मुलांना स्वच्छतेबद्दलच्या साध्यासाध्या गोष्टीही माहीत नसतात. तोंड न धुता तशीच ती शाळेत येतात. पाटीला थुंकी लावतात. नायक त्यांना सुधारण्याचे प्रयत्न करतो. सता नावाचा एक मुलगा मात्र हुशार असतो. त्याला शिक्षणाची, अभ्यासाची आवड असते. बिरा धनगराचा हा मुलगा सातवीपर्यंत तरी शिकायचं म्हणतो. नायक त्याच्याकडे विशेष लक्ष देऊ लागतो.

आयबू मुलाणी, आनंदा रामोशी आणि रामा बनगर हे काहीही उद्योग करत नसलेले तिघे जण नियमाने शाळेत येऊन बसतात. आयबूला कधीकधी बकरं कापण्याचं काम करावं लागत असतं त्या बदल्यात तो रोज चार घरी भाकरी व कालवण मागून आपली गुजराण करत असतो. त्याच्या गरजा फार कमी असतात. त्याला झोपायला कोणतीही जागा चालते. आनंदा रामोशी कुणाच्या तरी शेतातून वांगी, ज्वारीबाजरीची कणसं असं काहीतरी चोरून आणत असे व त्यावरच त्याचा उदरनिर्वाह चालत असे. या बारीकसारीक चोऱ्या तो मालकाकडे जाऊन कधीतरी कबूल करून टाकत असे. त्याचा हा स्वभाव कळल्याने त्याला कोणी काही करत नसत. कधीतरी तो शिकार करून ससा, घोरपड मारून रानात शिजवून खात असे.

रामा बनगरही काहीच उद्योग करीत नसे. मेंढरं चरायला नेण्याचं काम त्याचा मुलगा नाहीतर बाप काकुबा करीत असे. एकदा रामा नायकाकडे राणी छाप रूपया आणून देतो. आता तो व्यवहारात नसतो. पण तालुक्याला जर तो चालत असेल तर चालवून आणावा म्हणून तो नायकाकडे देतो. नायक गावी गेल्यावर येताना रूपया मोडून आणतो. चांदीचा रूपया असल्याने त्याचे आलेले अठरा आणे तो रामाला देतो. नायकाने चुकुन आपल्याला दोन आणे जास्त दिले असं वाटून तो ते परत करतो. पण ते तुझेच आहेत असं सांगून नायक ते पैसे घेत नाही. नंतर रामा त्याला पुन्हा रूपया देतो. तेही तो मोडून आणतो. पानतंबाखूला चार आणे घेण्याचा रामा नायकाला आग्रह करतो, पण नायक ते घेत नाही. या प्रसंगातून रामाचा प्रामाणिकपणा व नायकाची निस्पृह वृत्ती दिसते.

नायकाला गावातले लोक बरीचं कामे सांगू लागतात. शाळा फारशी नियमित नसते. त्यामुळे नायक गावातील कामे करतो. पत्रं लिहून देतो, अर्ज लिहून देणे, तालुक्याला जाऊन पत्रे पास्ट करें, मनीऑर्डर करणे, इत्यादी. मास्तर शिकलेला आहे तेव्हा लोक कोणती ही अडचण, समस्या घेऊन त्याच्याकडे येतात. बायकोची भांडणे, मेंढरू चोरी जाणे अशा कोणत्याही तक्रारीचं निकारण 'मास्तर' करू शकतो असा लोकांचा समज असतो.

पावसाळा येतो, मृगाच्या पावसाने हवेत गारवा येतो. जमिनीतून गवताचे कोंब वर येतात. थोडी उघाड झाल्यावर लोकांची पेरणीची गडबड सुरू होते. एक दिवस शेकूबा नायकाकडे येतो. व पेरणीसाठी एका बैलाची सोय करून द्यावी म्हणून नायकाच्या मागे लागतो. नायकाला ते अर्थातच शक्य नसते. नंतर नायकाला कळते की शेकूकडील एका बैलाच्या जोडीला शेकूच्या बायकोने स्वतः मानेवर ज़ू घेऊन पेरणी करायला लावली. या घटनेने सगळेच आश्चर्यचकीत होतात.

रामा बनगराने दिलेले तीनशेचाळीस रूपये नायक गावाहून येताना मोडून आणतो. गावात येतो तेव्हा संध्याकाळ झालेली असते. पैशाची जोखीम मोठी म्हणून ते पैसे नायकाने दशम्यांच्या पिशवीत ठेवले,

असतात. चालून चालून थकलेला नायक घरी आल्यावर बघतो तो पिशवीत पैशाचे गाठोडे, दशम्यांची पिशवी नसते. तो अतिशय घाबरतो. त्याला काहीच सुचेनासे होते. चिंताग्रस्त होऊन तो सारे सामान पुनः पुनः तपासून बघतो. वाटेत तर पैशाचे गाठोडे पडले नसेल ना? की भाकरीच्या वासाने कुत्र्याने गाठोडे नेले असेल? भोळा दिसणाऱ्या आयबूने तर पैसे घेतले नसतील? अनेक विचार, अनेक प्रश्न त्यांच्या मनात येतात. पैसे घरातून कोणी नेले असावेत? सारखा हाच विचार येत राहतो. आयबूच्या वागण्यात काही वेगळे, संकोच दिसत नसते. आता रामाचे पैसे कसे व कुठून द्यायचे? पैसे चोरी गेले असे रामाला सांगितले तर तो कसा विश्वास ठेवणार? पैसे आपणच हडपले असेल सगळयांना वाटणार. सगळा चांगुलपणा, मिळावलेला विश्वास वाया जाणार. कसेबसे तो दिवस रेटत राहतो. सुट्टीत घरी गेल्यावर तो वडिलांना हे सांगतो. वडील त्याला ही जोखीम पत्करल्याबद्दल दोष देतात. पैसे चोरीला गेले असे मालकाला सांगण्याचा सल्ला देतात. पण सर्व बाजूंनी विचार करुन ही हा सल्ला त्याला बरोबर वाटत नाही. चोरीच्या तपासासाठी गावात पोलीस आले तर गावातल्या लोकांना त्रास होईल. कर्ज घेऊन पैसे परत द्यावेत असाही विचार तो करतो. पण त्याला कर्ज ही मिळत नाही. दादूने तर हे कारस्थान केले नसेल ना? असेही त्याच्या मनात येते. गाव सोडून जाण्याचे विचार ही येतात व तो स्वतः वर चिडतो.

अशातच एक दिवस कारभाऱ्याची नात अंजी लाजत लाजत नायकाकडे येते. आता ती वयात आली असते. ती नायकाकडे एक खण व जुनी चोळी देते आणि शनिवारी तालुक्याहून चोळी शिवून आणायला सांगते. तिला कारभाऱ्यापासून ही गोष्ट लपवायची असते. त्याच्या चोरून पैसे साठवून आपण देत असल्याने कारभाऱ्याला हे सांगू नये असे ही सांगते व नायक हो नाही म्हणायच्या आतच निघूनही जाते.

आई मात्र त्याची चिंता पाहून त्याला धीर देते व आपल्या नावावर असलेले घर विकून त्याचे चारपाचशे रूपये येतील त्यातून रामाचे पैसे परत करण्यास सांगते. आपल्या पाठीशी आई आहे व आपण पैसे परत करु शकू या विचाराने त्याची काळजी बरीच कमी होते. वाडीला परत आल्यावर रात्री चावडीसमोर हे सांगायचे तो ठरवतो. पण त्याआधी कारभाऱ्याचा या बाबतीत सल्ला घ्यावा असा विचार करुन तो आयबूला कारभाऱ्याला बोलावयला पाठवतो पण तो येत नाही. नायक स्वतः त्याच्याकडे जातो तेव्हा त्याच्याशी बोलण्याचे नाकारुन कारभारी बाहेर निघून जातो. भाकऱ्या बडवत असलेली अंजी त्याला सांगते की, दादू बालटयानं कारभाऱ्याला काहीतरी सांगितलंय. व त्यामुळे त्याने अबोला धरलाय आधीच काळजीत असलेला नायक दुःखी व अपमानित होऊन परत घरी येतो. आयबूजवळ तो हे बोलतो. तेव्हा आयबू ही सांगतो की दादू बालटया तुमच्यावर फार जळतो. कारण तुम्ही गावात आल्यापासून त्याच्या टगेपणाला कुणी विचारत नसतं.

नायक विचारात पडतो. एखाद्या खलनायकासारखा हा दादू आपल्या का मागं लागलाय ? रामा बनगराच्या पैशांच्या संकटाबरोबर हे दुसरे एक संकट उभे राहते. गावातल्या वजनदार माणसाच्या मनात बालटयाने आपल्याबद्दल विष परले. आता कारभारी आपल्याशी नीट वागत नाही. काय करावे? अशा सर्व विचारांनी उदास मनःस्थितीत बसला असताना अचानक नाटकात ट्रान्सफर सीन उघडावा तसे होते. आनंदा रामोशी आत येतो व पैसे नेल्याचे सांगतो. ते पैसे परत आणून देतो. नायकाच्या जिवाला लागलेला घोर संपतो. '' दशम्या नेण्यासाठी पिशवी नेली. त्यात एवढे रुपये बघून ते पैसे घेण्याची लालूच निर्माण झाली. पण नंतर माझंच मन मला खाऊ लागल्याने पैसे परत आणून दिले '' असं तो सांगतो.

नायक अवाक् होतो. या मूर्ख माणसाच्या कृत्यामुळे किती दिवस अनेक यातना आपण भोगल्या या विचाराने त्याला आनंदाचा राग येतो. संतापाने तो त्याला हाकलून देतो. 'असंगाशी संग आणि प्राणाशी गाठ' याचा त्याला प्रत्यय देतो. त्याच्या गळयाला लागलेला तात आता सुटला असतो. लगेच तो ते रुपये घेऊन रामाच्या हवाली करतो. व त्याला पैसे नुसते घरात न ठेवता गुंतवायला सांगतो. रामा त्याची मेंढरं घेतो.

एका मोठया संकटातून नायकाची सुटका होते.

बाजरीच पिक तयार होतं. ज्यांची शेत असतात ते राखणीसाठी शेतात जाऊ लागतात. दसऱ्याला सोन्याबरोबर बाजरीची कणसंही वाटण्यात येतात. नंतर ज्वारी ही तयार होते. भुईमूग, तूर तयार होते. मेंढरं गुबगुबीत दिसू लागतात. तरुण, म्हातारे ज्वारीचा हुरडा खाऊ लागतात. हरबरा, करंडा निघतो.

सुगी संपल्यावर लोकांना निवांतपणा मिळतो. मग वाडीत कोल्हाटी, दरवेशी यांचे खेळ सुरु होतात. लोक हे खेळ बघून मन रिझवू लगतात. खूष होऊन कोल्हाटी, गारुडी, दरवेशी यांना धान्य देऊ लागतात. धनगरांची पोरे गोळा होतात व गजी नाचू लागतात. काळया छाटणी घालून रंगीबेरंगी रुमाल हातात घेऊन ते फेर धरतात. ढोल, झांज्या वाजू लागतात. धनगरांचा नाच सुरु होतो. हलके हलके वेग वाढतो. सगळे देहभान विसरतात. नाचणारे व पाहणारे. सगळी बनगरवाडीच नाचू लागते.

एक दिवस नायक विहिरीकडे आंघोळीसाठी जात असता कारभारी त्याच्या मागोमाग येतो. नायका मागोमाग तो ही पायऱ्या उतरून विहीरीत येतो. वर दोन पायऱ्या सोडून बसतो. व नायकाशी बोलणं सुरु करतो. एकाच गावात राहून अबोला धरुन राहणं चांगल नाही असं तो म्हणतो. बोलणं तर कारभाऱ्यानेच बंद केले असतं. नायक तसं बोलून दाखवतो. कारभाऱ्याच्या बोलण्यारून कळतं की, नायकाने अंजीला चोळी आणून दिली असं दादू बालटयानं कारभाऱ्याला सांगितल असतं. नायक तर हे विसरूनही गेला असतो. पण बालटयाने मात्र ते पाहून त्याचंच भांडवल करून कारभाऱ्याचे कान फुंकले असतात. अंजीने पैसे दिले व खण आणून दिला. चोळी शिवून आणून दिली. ही. गोष्ट अंजीनच कारभाऱ्यापासून लपवून ठेवायला सांगिल्यामुळे कारभाऱ्याकडे हे बोललो नाही वगैरे खुलासा होतो. नायकाच्या निर्मळ वागण्याची कारभाऱ्याला खात्री पटते. नायकावर पाळत ठेवली असल्याचं व काही वावगं, वाईट दिसलां नसल्याचं ही कारभारी बोलतो. नायक रागावून कारभाऱ्याशी बोलतो व घरी निघून येतो. दिवसभर त्याचा राग शांत होत नाही. गावातल्या लोकांच्या आपण उपयोगी पडतो, त्यांची कामे करतो. पण त्याचा असा उलटा परिणाम झाला. आपल चारित्र्य स्वच्छ, निर्मळ असून आपल्या वर शिंतोडे उडवले गेले याचा त्याला खूप मनस्ताप होतो. बालटयाला चांगला चोप द्यावा, त्याचा सूड घ्यावा असे त्याला सारखे वाटू लागते. पण त्याच्यासारख्या दुबळया माणसाला ते शक्य नसते.

आयबूला मात्र नायकाच्या बदललेल्या मनः स्थितीचा अंदाज येतो. पण काय झाले असावे ते न कळल्याने तो त्याच्या भोवती भोवती करतो. शेवटी रात्री नायक त्याला सांगतो

''आयबूला, बालटयानं फार डाळ नासली गडया!''

बालटयाने काय केले ते तो आयबूला सांगतो. आयबूच्या तोंडून शिवी बाहेर पडते. बालटया इतका डरसालपणा करील, इतका लांब पोचेल असं त्यालाही वाटत नसतं. अंजीवरून बालटया गावात आपली

बदनामी करील व आपल्याला मारहाण करील असे नायकाला वाटू लागते. त्याने पूर्वी दिलेली धनकी नायकाला आठवते. छोटया गावात काटयाचा नायटा कसा होतो ते त्याला माहीत असते. बराच वेळ त्याला झोप येत नाही.

त्यानंतर तीन-चार दिवसांनी एका रात्री अचानक चावडीजवळ चाललेल्या गलबल्याने त्याला जाग येते. तो आयबूला ही उठवतो. जाऊन पाहतात तो चावडीजवळ बरीच माणसं जमलेली असतात. आणि बालटया धुळीत पडून धापा टाकत असतो. त्याचे कपडे फाटले असतात. त्याला कोणी तरी बेदम मारले असते. नायक पुढे होऊन त्याला धुळीतून उचलून घरात न्यायला सांगतो. दोघंतिघं त्याला उचलून घरात नेतात. त्याला वारा घालतात. चेहऱ्यावर पाणी शिंपडतात. तेव्हा तो धापा टाकायचा थांबतो. त्याची म्हातारी रडत असते. तिला कारभारी गप्पा बसवतो. कोणी मारलं ते विचारलं तर त्याला काहीच सांगता येत नाही. हा भानामतीचा प्रकार असावा असं कोणीतरी म्हणतं. पण नायक आवाज चढवून सांगतो की, 'भानामती वगैरे काही नाही, थोडा, दम खाऊन तो उठून बसला की काय झाला ते कळेल' पण सकाळ झाल्यावर ही बालटया उठून बसत नाही. हळूहळू गर्दी कमी होते. लोक आपापल्या उद्योगाला लागतात. '' आपल्या अंगावर घोंगडी टाकून आपल्याला मारलं, मारणारे दिसले नाहीत'' वगैरे बालटया सांगतो. कोणावर संशय आहे कां विचारल्यावर नाही सांगतो. रामा म्हणतो की याच्या हजार भानगडी असतात. कुणी परगावच्या माणसान मारलं असेल.

आठ-पंधरा दिवस झाले तरी बालटया अंथरुणाला खिळून राहतो. त्याला भुताने घोळसलं असं गावातले लोक बोलू लागतात.

या प्रकारणावर पडदा पडतो.

एक दिवस नायकाच्या मनात येतं की, गावात एक पक्की अशी इमारत असावी. गावातून वर्गणी गोळा करून ती बांधावी. शाळेला दोन खणांची इमारत होती व शाळेचा व्याप वाढण्याची शक्यता कमी होती. तेव्हा तालीम बांधावी. मुलांना खेळायला, गावकऱ्यांना बसायला, त्यांचे ढोल, लेझीम ठेवायला जागा होईल. एखादा मोठा अधिकारी आला तर त्याला उतरायला या तालमीचा उपयोग होईल. आपली एक आठवण राहील. असा विचार करुन नायक रामोशी पाठवून गावकऱ्यांना चावडीवर बोलावतो. इकडचे तिकडचे बोलणे झाल्यावर आपला विचार सांगतो. लोकात कुजबुज सुरु होते. नायक त्यांना मोठयाने बोलायला सांगतो. मग लोक बोलू लागतात. त्यांना तालमीची गरज वाटत नसते. गावात कुठे पहिलवान आहेत? शाळा आहे तीच किती दिवस-चालणार आहे? कोण शिकून मोठा अंमलदार होणार आहे ? नेहमीप्रमाणेच कोणत्याही नवीन गोष्टीसाठी त्यांचा नन्नाचा पाढा असतो.

पण कारभारी त्यांना समजावतो. आज कोणी पहिलवान नसला तरी पोरं तालमीत खेळतील त्यांतूनच एखादा पहिलवान तयार होईल. नायक त्यांना सांगतो की, तुम्ही ढोल, झांजा घेऊन नाचता. त्या वस्तू इकडे तिकडे कुठेतरी पडल्या असतात. त्या नीट एका ठिकाणी राहतील. वगैरे. गावातल्या वृध्द लोकांना बोलवून नायक पुन्हा पुन्हा त्यांना तालमीचं महत्त्व समजावतो. इतर गावांची उदाहरण देतो. व त्यांच्याकडून होकार मिळवतो. ती मंडळी मग गावकऱ्यांना तयार करतात तालमीची गोष्ट गावकऱ्यांच्या गळी उतरवण्यात नायकाला यश येतं.

ज्यांना रोख रक्कम देणं शक्य नसेल त्यांनी आपल्या शेतातले झाड द्यावे, बैल, गाडी कामासाठी द्यावे असे ठरते. कामाला सुरवात होते. उद्घाटनाला राजाला बोलावू असे सांगून नायक त्यांचा उत्साह वाढवतो. गवंडी, सुतार, वडार जमतात. डोंगरावरुन मोठे मोठे दगड आणणे, वडारांनी ते पाडणे इत्यादी कामं सुरु होतात.

सद्या वाणी म्हणून असलेल्या एका वाण्याचं रिकामं पडझड झालेला घर पाहून त्या जागेवर तालीम बांधायचं निश्चित होतं. सद्या वाणी आता हयात नसतो. लोकांकडून झाडे गोळा करणे सुरु होते. झाड मिळाले की ते तोडायचे, गाडीतून तालमीच्या जागेवर आणायचे, सुताराला द्यायचे, मग त्यातून सुतार त्याला लागेल तसे लाकूड घेऊन दारं, खिडक्या व इतर गोष्टी बनवायला लागे. नायक सगळे उत्साहाने करत असतो. पण कधी कधी तो वैतागतो. कारण लोक झाड सुखासुखी देत नाहीत. दिलं तरी कधी ते पोखरलेलं असतं. कधी गाडी बैल मिळायला त्रास होतो. खरं तर हे गावासाठीचं काम असतं. नायक ते स्वतः- साठी करत नसतो. तरी लोक असे वागतात. ' घर पहावं बांधून ' या म्हणीचं प्रत्यंतर त्याला येत असतं.

बाळा बनगर तर झाड देण्याचं सपशेल नाकारतो. नायक त्याच्याकडे जाऊन आल्यावर कारभारी, आनंदा वैगरे दोघेतिघे जण त्याच्याकडे जातात. कारभारी त्याला समाजावतो पण तो ऐकत नाही. शेवटी वाडी त्याला वाळीत टाकते.

नायक तहानभूक, झोप विसरुन तालमीच्या कामाच्या मागे लागतो. त्याच्याबरोबर आयबू, आनंदा रामा बनगर, कारभारी सगळेच धावपळ करत असतात. तालमीची इमारत हा आजूबाजूच्या गावांचा कुतुहलाचा विषय होतो. काही लोक नायकाला नावंही ठेवत असतात. पैसे खायला मिळावेत म्हणून तो हे करतो आहे असेही लोक बोलत असतात. पण नायक तिकडे दुर्लक्ष करुन तालमीच्या कामाकडे लक्ष देत असतो तरी कामाला म्हणावा तसा वेग नसतो. कातावून नायक वर सरकारात लिहून कळवतो की 'तालमीचे काम पूर्ण झाले आहे. तेव्हा हुजुरांनी उद्घाटनासाठी येण्याची कृपा करावी.' आणि वाडीतल्या लोकांना सांगतो की, ''याच महिन्यात सरकारस्वारी येणार आहे, तेव्हा काम ताबडतोब पूर्ण करा नाहीतर त्यांना सांगा की आमच्याच्याने हे बांधकाम होतं नाही. आम्हाला माफ करावे.''

नायकाने सरकारात कळवले असते. त्याचे उत्तर येते. वीस एप्रिल रोजी सरकार स्वारी येऊन उद्घाटन करील. त्यानंतर हालचालींना वेग येतो. एक दिवसाआड तालुक्याहून अधिकारी येऊ लागतात. पाहणी करू लागतात. वाडीपर्यंत येणारा रस्ता चांगला करण्यात येते. वाडीची स्वच्छता होते, भटक्या कुत्रांना मारून टाकण्यात येते. गावकरी खाखूनसुरवून घरे स्वच्छ करतात. तालमीचे कामही पुरे होत येते. शेवटच्या मिनिटापर्यंत धावपळ सुरु असते.

शेवटी उद्घाटनाचा दिवस उजाडतो. सारे गाव रात्री जागेच असते. तालमीच्या छपराचे काम राहिलेले असते. ते गॅसबत्त्या लावून पूर्ण केले जाते. लोकांमध्ये एक अभूतपूर्व असा उत्साह संचारतो. राजेसरकारांना एकवीस बैलांच्या रथातून आणायचे ठरले असते, त्याप्रमाणे रथ शृंगारला जातो. एका शिंगवाल्याला उंच झाडावर बसवले जाते. राजाची मोटर मैला-दोन मैलावर आली की त्याने शिंग फुंकून इशारा करायचा असे ठरले असते.

आठ-सव्वाआठच्या सुमारास शिंग वाजते. 'सरकार आले म्हणून सगळयांची एकच धावाधाव सुरू होते. राजा गावात येताच गावच्या पाटलाने नारळ-रूपया घेऊन त्यांना सामोरे जायचे असा रिवाज असतो. वाडीला कोणी पाटील नसतो. तेव्हा नायक हे काम कारभाऱ्याकडे सोपवतो. कारभारी कोरा अंगरखा व तांबडे भडक मुंडासे बांधून तयार असतो. सुवासिनी आरती घेऊन तयार असतात. आणि सरकारस्वारीचे आगमन होते. सरकारची तांबडी पाटी असलेली कोरी चकचकीत गाडी वेशीजवळ येऊन उभी राहते. नायक लगबगीने पुढे होतो. शिक्षणाधिकारी त्याची ओळख करून देतात. नायक त्यांना नमस्कार करतो. ते ही 'जय देवा' म्हणून नमस्कार करतात. धनगर जमिनीला हात लावून आपल्या राजाला नमस्कार करतात. तांबडी पगडी, खादीचा पांढराशुभ्र लांब कोट, शुभ्र सुरवार व तांबडाभडक जोडा घातलेल्या राजाची मिरवणूक निघते. कारभारी त्यांना सामोरे होत नारळ-रूपया असलेले ताट पुढे करतात. ताटाला हात लावून राजा कारभाऱ्याच्या खांद्यावर हात ठेवतो व त्याला '' काय पाटील? बरे आहे ना?'' विचारतो कारभारी आनंदून अदबशीरपणे उत्तर देतो. '' होय जी सरकार !''

राजा गावात येतो. सुवासिनी आरत्या ओवाळतात. तालमीचे बंद दार राजाच्या हस्ते उघडले जाते. शिंगे वाजतात. वाजंत्री वाजतात. राजा नायकाला बोलावून त्याचे कौतुक करतो. नाव विचारतो. मामलेदार सांगतात की, '' आपल्या इथल्या बारनिशी कारकुनाचा हा मुलगा आहे. '' '' चांगले आहे, उत्तम आहे '' म्हणत राजा नायकाची पाठ थोपटतो. त्याचा ऊर आनंदाने भरून येतो. तालमीतल्या मारुतीला महाराज स्वतः नारळ फोडतात. नायक छोटेसे भाषण करतो. त्यात गावकऱ्यांनी केलेल्या परिश्रमाचे, केलेल्या सहकार्याचे कौतुक करतो व राजाने आशीर्वाद द्यावा अशी विनंती करतो. राजाचे भाषण होते. प्रसंगोचित अशा भाषणात राजा गावकऱ्यांचे, नायकाचे कौतुक करतो. 'ज्ञानाबरोबर बलोपासना हवीच ' हे विचार हया वाडीपर्यंत पोचल्याबद्दल आनंद व्यक्त करतो.

आभार प्रदर्शन, वंदेमातरम् होऊन कार्यक्रम संपतो. राजाची गाडी व इतर अधिकारी निघून जातात. धनगर जागोजागी उभे राहून राजाबद्दल बोलत राहतात. समारंभ संपला तरी त्यांचा आनंद संपला नसतो.

गावात तालीम बांधण्याचं नायकाचं स्वप्न अशा प्रकारे पूर्ण होतं, तालमीत पोरं येऊन जोरबैठका काढू लागतात. इतर खेळ खेळू लागतात. मोठी माणसेसुध्दा तांबडया मातीत अंगे घोळसू लागतात. शाळा नियामितपणे सुरु होते. तालमीचे बांधकाम सुरु असता उंचावरुन पडलेल्या आयबूचा हात मोडला असतो. तो जगन्या रामोशी येऊन चोळून नीट करुन देतो.

छोटयाशा बनगरवाडीत अनेक घटना घडत असतात. एक दिवस कारभाऱ्याची तब्येत बिघडते. रात्री त्याला एक स्वप्न पडलं असतं. आपण आता जाणार हे त्याला कळतं. तो नायकाची व इतर सर्वांची भेट घेतो. अंजीला शेकूबाच्या हवाली करतो. संध्याकाळी त्याला वांत्या, जुलाब होऊ लागतात. घरगुती इलाज केले जातात. पण सकाळी कारभारी सर्वांना सोडून निघून जातो. वाडी सुनी सुनी होते. नायकाला उदास, एकाकी वाटू लागते. शाळा, तालीम यात रस वाटेनासा होतो.

मावल्या आईची जत्रा भरते. वाळीत टाकलेल्या बाळा बनगराला पुजारी प्रसादाचा गुलाल लावत नाही. तेव्हा तो काकुळतीला येतो. त्याने आतापर्यंत खूप त्रास सहन केला असतो. तो गावकऱ्यांची माफी मागतो. त्याच्या डोळयांना धारा लागतात. म्हातारा काकुबा त्याला गुलाल लावायला सांगतो. इतर लोकही

तयार होतात. बाळाला परत वाडीत घेतलं जातं. त्याला गुलाल लावल्या जातो. ' मावल्याआईचं चांगभलं ' म्हणून सगळे ओरडतात. धुळा धनगराच्या अंगात देवी येते. तिला प्रश्न विचारले जातात. पाऊस येईल का म्हणून विचारलं जातं. नंतर देवीपुढे बकरे कापले जातात. त्याचं कालवण जेवायला येतात. देवीच्या ' चांगभलं ' चा घोष होतो. जत्रा समाप्त होते.

धुळा धनगराच्या अंगात आलेल्या देवीनं 'पाऊस पडेल' असं सांगितलं असल तरी त्यावर्षी बनगरवाडीत पाऊस पडत नाही. सगळी नक्षत्रे कोरडी जातात. विहिरीचे पाणी आटते. वाडीतला हेळ आटतो. पिण्यासाठी पाणी मिळायची मारामार होते. हेळात मिळणाऱ्या थोडया पाण्यासाठी लोक पहाटे उठून भांडू लागतात.

जनावरांना, मेंढरांना खायला चारा उरत नाही. ती बारीक होतात. चरबी वाळून जाते. कावळे, चिमण्या असे पक्षी दिसेनासे होतात. रानात खायला न मिळाल्याने रानातले उंदीर गावात येतात. ते धनगरांच्या घोंगडया, सुपं इत्यादी कुरतडून खाऊ लागतात. ज्यांच्याजवळ थोडा पैसा असतो, ते शेजारच्या गावातून धान्य आणतात. पण ज्यांची पोटे हातावर असतात त्यांना उपास घडू लागतात. शाळा, तालीम ओस पडते. माणदेशच्या पाचवीला पुजलेला दुष्काळ येतो. सगळा जिल्हाच दुष्काळाच्या तावडीत सापडतो.

अशक्त झालेली मेंढरे निरनिराळे रोग होऊन मरू लागतात. काही धनगर मेंढरं विकायला नेतात, बैल विकायला नेतात. त्यांनाही नंतर भाव येत नाही. म्हाताऱ्या बैलाला विकायला शेकू घेऊन जातो. पण खाटकाला विकायची पाळी येते तेव्हा शेकू त्याला परत घरी आणतो. बिरा धनगराची सगळी मेंढरे रोगाने मरतात. आनंदा रामोशी नायकाकडे येतो व गाव सोडून जगायला दुसरीकडे जात असल्याचे सांगतो. तो पण वाळून गेला असतो. जाताना तो सांगतो की, 'त्या रात्री बालटयाला मी व आयबूने मिळून मारले, कारण तो तुम्हाला फार त्रास देऊ लागला होता'.

रामोशांच्या नंतर वाडीतले मेंढकेही गाव सोडून जाऊ लागतात. म्हातारा काकुबा मात्र रामाबरोबर जात नाही. तेव्हा त्याला भाकरी करून घालायला रामा बायकोला ठेवून जातो. काकुबाच्या म्हणण्याप्रमाणे दोन मेंढरेही ठेवतो. आणि रामा व त्याचा पोरगा निघून जातात. काही दिवस तग धरून शेतकरी ही जातात. बाळा बनगर, शेकूबा, त्याची बायको सगळी जातात. बाळाच्या पाठीवर बसून बालटयासुद्धा जातो. वाडी भकास होते. संध्याकाळी येणारा मेंढरांचा आवाज आता येईनासा होतो. वाडी निर्जीव वाटू लागते. हलती बोलती वाडी निस्तब्ध होते. शाळा, तालीम तिथेच राहते. झाडे, घरे राहतात. पण तिथे वावरणारी माणसे मात्र नाहीशी होतात. दूर निघून जातात. केवळ एकाच वर्षी पाऊस येत नाही आणि वाडीची धूळधाण होते.

वारा घोंघावत राहतो. सगळीकडे धूळ पसरते घरांच्या बंद दारांवर वारा धडका मारू लागतो. गावात कोणी दिसेनासे झाल्याने चिमण्या, कावळे, बगळे येईनासे होतात. धीट झालेला लांडगा गावात फिरू लागतो.

नायक सगळी हकीगत वर सरकारात कळवत असतो. तो आणि आयबू कसेतरी दिवस काढत असतात. काकुबा कधी तरी नायकाकडे येऊन बसतो. पण फारसं काही बोलणं होत नाही. जणू आता बोलण्यासारखं काहीच उरलं नसतं. आणि एक दिवस नायकाला वरून आदेश मिळतो की त्याने वाडीतली शाळा बंद करुन तालुक्याच्या प्रायमरी शाळेत रुजू व्हावे.

आयबू नायकाचे सामान आवरतो. एका पोत्यात भरतो. शाळेला कुलूप लागते. तालमीला कुलूप लागते. काकुबाकडे जाऊन त्याचा निरोप घेऊन नायक व आयबू वाडीबाहेर पडतात. सामान घेऊन निघतात. नायकाच्या घरी त्याचे सामान टाकून आयबू परत येणार असतो. तो आता काय करील, कुठे आसरा घेईल हा प्रश्नच असतो. दोघे चालत राहतात. उजाड बनगरवाडी मागे राहते. दिसेनाशी होते.

नायक परत जातो.

**उपकथानकं :-**

'बनगरवाडी' हया कादंबरीत मुख्य कथानकाबरोबर काही उपकथानकंही आहेत. यातून वाडीतील लोकांच्या जीवनावर, त्यांच्यात असलेल्या समजुतीवर, त्यांच्या समस्यांवर प्रकाश पडतो. छोटया वाडीतील बनगरांच्या जीवनतील नाटयमयता माडगूळकर यांनी कुशलतेने चित्रित केली आहे.

१) वाडीतला शेकू नावाचा एक शेतकरी एकदा नायकाकडे येतो, व पेरणीसाठी एका बैलाची गरज असल्याचे सांगतो शाळा मास्तर म्हणून गावात आलेल्या ह्या नायकाला गावकरी 'प्रत्येक समस्येवरचं उत्तर' मानू लागले असतात. नायक त्याला परोपरीने सांगतो  की माझ्याजळ बैल नाही. आणि कुणापाशी आहे ते सांग म्हणजे मी त्याला सांगून तुला बैल द्यायला लावीन. पण ज्याच्याजवळ बैल असतात त्यांना ही पेरणी करायची असते. त्यामुळे शेकूला कोण बैल देणार? शेकू निघून जातो. नायक विचारात पडतो की, आपण यांच्या मुलांना शाळेत 'ग-म-भ-न' लिहायला शिकवतो. पण यांच्या गरजा वेगळया आहेत. आयबूला कुटुंब पाहिजे, शेकूला बैल पाहिजे. आपण या बाबतीत काय करू शकतो ?

बैल न मिळाल्याने पेरणी वेळेवर झाली नाही तर उपाशी राहायची वेळ येईल या विचाराने शेकू काळजीत पडतो. तेव्हा त्याची मजबूत शरीरयष्टीची व त्याच्यापेक्षा हातभर उंच असलेली त्याची बायको त्याला पेरणीची तयारी करायला सांगते. व बैलाच्या जोडीला स्वतः खांद्यावर जूं घेऊन बैलाच्या बरोबरीने टिपण ओढते. एका बाजूला बैल आणि दुसऱ्या बाजूला बायको अशी चाललेली पेरणी गावातले लोक पाहतात, तेव्हा सर्वच नवल करतात. कौतुक करतात. काही कुचेष्टाही करतात. रात्री शेकू तिची दुसरी पाठ पायाने तुडवून चेपतो.

२) याच शेकूकडे कारभारी मरताना आपल्या नातीला अंजीला सोपवतो. चांगला मुलगा बघून तिचं लग्न करुन देणं हे शेकूने करायला इवं असतं पण त्याऐवजी पस्तिशीचा शेकू अंजीच्या नादी लागतो. तिच्यासाठी लुगडं आणतो, चोळी आणतो. तिच्याशी दुसरं लग्न करायचं ठरवतो. तेव्हा त्याची बायको नायकाकडे येते आणि शेकूला त्याने चार उपदेशाच्या गोष्टी सांगाव्यात म्हणून विनवते. नायक विचारात पडतो. हे अवघड जागेच दुखणं असतं. शेकूची ही खाजगी बाब असते. त्याला कसं आणि काय समजवावं? बैलाच्या बरोबरीने औत ओढणारी ही ऊंच, धिप्पाड बाई नवऱ्याच्या अशा वागण्याने दुःखी होऊन अश्रू ढाळीत असते. मनात असूनही नायक त्याला काही सांगू शकत नाही. गावात हे प्रकरण चेष्टेचा विषय बनते. जाणती माणसे शेकूवर नाराज होतात. शेकूची बायको वेगळी राहू लागते.

पण अचानकच सुंठीवाचून खोकला जातो. रानात काम करत असलेल्या अंजीची शेजारच्या गावातल्या एका तरुण मेंढक्याशी गाठ पडते. त्याचं आणि अंजीचं सूत जमतं आणि शेकूबरोबर घेतलेली शपथ मोडून

अंजी त्या मेंढक्याबरोबर निघून जाते. शेकूला सोडून दुसरा नवरा करते. त्यानंतर आठदहा दिवसांनी टोपलंभरुन गाजरं घेऊन शेकूची बायको नायकाकडे येते. तिचा चेहरा आनंदाने फुलला असतो. ती नायकाला म्हणते- '' मास्तर, आलं आमचं खुळं माघारी ! ''

३) शाळेत सता नावाचा एक मुलगा अभ्यासात चांगला असतो आवडीने अभ्यास करत असतो. नायकाला हा मुलगा आवडतो. सातवीपर्यंत शिकायची इच्छाही त्याने बोलून दाखवली असते. पण बिरा धनगर त्याला शिकू देईल कां ? याबाबत नायकाच्या मनात शंकाच असते.

मेंढरं चरायला घेऊन गेला असता हा सता कुऱ्हाडीने लांडग्याला मारतो. मेंढराला पकडून नेण्याऱ्या ह्या लांडग्यावर कुत्रा भुंकू लागतो व लांडग्याच्या मागे लागतो. त्यांच्या झटापटीत कुत्र्याची शक्ती कमी पडल्याने लांडगा त्याच्या अंगावर उडी घेतो. आपल्या कुत्र्याला लांडग्याने मारलेले बघून सता चिडून लांडग्यावर कुऱ्हाडीचे घाव घालतो व त्याला मारतो. पण कुत्रेही मरते. मेंढरु तर मेलेलेच असते. कुत्र्याला खड्डयात पुरून सता घरी येतो.

त्याच्या ह्या पराक्रमाबद्दल त्याची पाठ थोपटावी व म्हणून नायक त्याच्या घरी जातो. पण सता आता पोर राहिला नाही, मोठा झाला आहे तेव्हा त्याने आता आपल्याला उद्योगात मदत करावी, म्हणून बिरा धनगर त्याची शाळा बंद करतो. नायकाला तसे सांगतो. नायक त्याला खूप समजावतो पण त्याचा काही उपयोग होत नाही. सताही शाळेत येण्याबाबत विशेष आग्रह धरीत नाही. शेवटी निराश मनाने नायक परत येतो. हुशार मुलाची शाळा सुटल्याची खंत त्याला वाटत राहते.

४) तालीम बांधायची ठरल्यावर जागेचा शोध घेताना नायकाला एका जागा योग्य वाटते. ते एक रिकामे व पडके घर असते. गावकरी ती सद्या वाण्याची जागा असल्याचं सांगतात. आणि तो आता जिवंत नसतो. चहा बिडीच्या व्यसनापायी त्याने आपला सर्वनाश करा करुन घेतला ते गावकरी सांगतात. सद्या वाण्याची परिस्थिती चांगली असते. पण तो न जेवताखाता दिवसभर नुसता चहा पीत राहतो व विडया फुंकत राहतो. हे व्यसन तो एकटा न करता लोकांना बोलवून त्यांना चहा विडया देतो. म्हाताऱ्या आईचे ऐकत नाही. त्याची सर्व इस्टेट यातच खलास होते. त्याची तब्येत ढासळते आणि एक दिवस तो मरुन जातो. चहाचं व्यसनही माणसाला जीवनातून उठवतं.

५) तालमीचे बांधकाम करताना आयबूला अपघात होतो. त्याच्या मोडलेल्या हाताचे हाड नीट बसवण्यासाठी आनंदा जगन्या नावाच्या एका रामोश्याला आणतो. हा तरुण व चांगला देखणा असतो. आयबूच्या हाताला चोळून चोळून तो हात ठीक करतो. आयबू हिंडूफिरू लागतो. पण जगन्या दुसरीच एक भानगड उपस्थित करतो.

शेजारच्या गावातल्या एक मराठा बाईशी सूत जमवून तो तिला पळवून आणतो. तिचा पती मरण पावला असतो व बाकी नात्यातले कोणी नसते. पण आपल्या जातीतील बाई रामोश्याने पळवली हे त्या वांगी गावातील लोकांना सहन होत नाही. दहापंधरा जण वाडीत येऊन रामोश्यांच्या वस्तीवर हल्ला करतात. आनंदा व नायक त्यांना तालमीत आणतो. त्यांच्याशी बोलतो. जगन्याला पकडून त्यांच्या ताब्यात देण्याचं आनंदा रामोशी कबूल करतो. ही गोष्ट रामोश्यांनाही कमी पणाची आहे असं त्याला वाटत असतं. ती मंडळी निघून जातात. आनंदा पळून गेलेल्या जगन्याचा शोध घेतो. व त्याला जखमी करुन वांगी गावात

त्या बाईसह घेऊन जातो. जगन्याला घेऊन जायला ती मंडळी सांगतात. त्या बाईला मारहाण करतात. जगन्याला परत वाडीत आणले जाते. झाडपाल्याची औषधं वापरुन जगन्याची जखम रामोशी बरी करतात. वांगी गावचे लोक त्या बाईचे नाक कापून तिला हाकलून देतात. वाडीत येऊन ती रडते. पण तिला कोणी ठेवून घेत नाही. एके दिवशी ती वाडीतून निघून जाते. नंतर ती कोणाला दिसत नाही.

❖ ❖ ❖

# प्रकरण १४

## बनगरवाडी : व्यक्तिरेखा

प्रस्तुत पाठात आपल्याला बनगवाडीमधील व्यक्तिरेखा - परिचय- करून घ्यायचा आहे

कादंबरीत कथानक जेवढे महत्त्वाचे तेवढीच पात्रेही महत्त्वाची असतात. पात्रे कृती करतात आणि त्यातूनच कथानकाला गती मिळते. कादंबरीकाराच्या मनात जेव्हा कथानक साकार होते तेव्हा ते पात्रांसहच साकार होते. कादंबरीतील पात्रे ही कादंबरीकाराची 'निर्मिती' असते. या निर्मितीमागे कादंबरीकाराचा विशिष्ट हेतू असतो. त्यामुळे कादंबरीत विविध पात्रे असले तरी त्या हेतुनुसार त्यांना वेगवेगळे महत्त्व दिलेले असते. काही विशेष महत्त्वाची असतात तर काही कमी महत्त्वाची. पण अजिबात उपयोग नाही असे उपरे पात्र कादंबरीकार निर्मित नाही.

'बनगरवाडी' ही कादंबरी धनगरांच्या जीवनावर आधारित आहे. या वाडीत शाळामास्तर म्हणून आलेल्या तरुणाला भेटणाऱ्या व्यक्ती व आलेल्या अनुभवांचे शब्दचित्र या कादंबरीत रेखाटले आहे. हा शाळामास्तर वाडीतील जीवनाशी एकरूप होतो. तेथील लोकांच्या गरजा, समस्या जाणून घेतो. त्यांना सर्व प्रकारची मदत, शक्य होईल तशी करतो. हा शाळामास्तर आणि त्याला पहिल्या दिवसापासून मदत करणारा, गावात विशेष मान असलेला कारभारी ह्या या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा आहेत.

**१) राजाराम विठ्ठल सौदणीकर :** हे या नायकाचं नाव. पंतसरकारात बारनिशी कारकून असलेल्या सौदणीकरांचा हा मुलगा असतो. ह्याची अंगकाठी किरकोळ असते व वयही फार नसते. उंचीही बेताचीच असते. नोकरीचा त्याचा हा पहिलाच अनुभव असतो. मनात अनेक स्वप्ने, इच्छा आकांक्षा घेऊन तो बनगरवाडीत येतो.

तो कष्टाळू असतो. नोकरीच्या गावी येण्यासाठी भल्या पहाटे उठून तो पायीचं निघतो. लेंगा व धुवट रंगाचा शर्ट असा पोषाख करून तो अनवाणी पायांनी चालतो. भूक लागली तरी लांब टांगा टाकत चालत राहतो.

छोटया गावातच त्याचे जीवन गेल्यामुळे त्याला गावाबद्दल, गावातील लोकांबद्दल माहिती असते. आजूबाजूला नांगरुन पडलेले जमिनीचे तुकडे दिसू लागल्यावर गाव आल्याचे त्याच्या लक्षात येते.

तो खूप भावनाप्रधान असतो. गावात आल्यावर लिंबाच्या सावलीत बसला असताना भालाईत त्याच्याशी तुच्छतेनं बोलतो. '' इथं काय करायची शाळा ? पोरं कुठं हायेत ? '' असे बोलून तो निघून जातो. त्याच्या या बोलण्याचा नायकाच्या मनावर लगेच परिणाम होतो. तो निराश होतो. आपण या गावात उगीच आलो, इथे आपल्याने नोकरी होणार नाही, इथे शाळा भरणार नाही, मुले येणार नाहीत असे विचार मनात येऊन तो उदास होतो. त्याला एकाकी वाटू लागते. पण थोडयाच वेळात कारभारी येऊन त्याच्याशी प्रेमाने बोलतो. त्याला ' बाळा ' म्हणून संबोधतो. त्याची चौकशी करतो. त्याला शाळा दाखवून शाळेत बसायला

सांगतो. या गोष्टीने त्याला लगेच धीर येतो व आपण अगदीच एकाकी नाही, आपलेही कोणीतरी आहे असे त्याला वाटू लागते.

वाडीत शाळा चालवायची, मुलांना शिकवायचे, गावातील माणसांचा विश्वास संपादन करायचा. त्यांचे प्रेम मिळवायचे. अशी अनेक स्वप्ने आशी बाळगून तो आला असतो. तो त्याप्रमाणे वागायला लागतो. शाळा सुरू करतो. लोकांना शाळेचे महत्त्व सांगतो. सोबत म्हणून त्याच्याकडे पाठवलेल्या आयबूला तो आपल्या भाकरीतली भाकरी खायला देतो. तो झोपल्यावर त्याच्या अंगावर आपले धोंगडे टाकतो. वाडीतील लोकांची निरनिराळी कामे तो करतो. उदा :- पत्र, अर्ज लिहून देणे, मनीऑर्डर करणे त्यांच्या तक्रारीचे निवारण करण्याचा प्रयत्न करणे, तालुक्याला जाऊन रुपयाची मोड आणून देणे इत्यादी, चलनात नसलेल्या रुपयाची मोड दिल्यावर पानतंबाखूसाठी रामाने दिलेले पैसे तो घेत नाही. त्याची निरीच्छ वृत्ती यातून दिसते.

तो सरळमार्गी, पापभीरु व प्रामाणिक असतो. दादू बालटया त्याला धमकी देऊन जातो तेव्हा तो घाबरतो. तसेच रामाचे मोड आणलेले रूपये चोरीला गेल्यावर आपल्यावर चोरीचा आळ येईल, मिळवलेले नाव, प्रतिष्ठा धुळीला मिळेल या शंकानी तो कासावीस होतो. कर्ज घेऊन पैसे भरायचीही तो तयारी करतो. वडील त्याला ही बाब सर्वांना सांगून तक्रार द्यायला सांगतात तेव्हाही वाडीतील लोकांना पोलीसांचा त्रास होईल म्हणून तसे करत नाही.

पापभीरू व सरळमार्गी असला तरी तो स्वाभिमानी असतो. कारणाशिवाय कारभारी त्याच्याशी अबोला धरतो तेव्हा त्याला या गोष्टीची चुटपुट लागून राहिली तरी पुन्हा तो कारभाऱ्याशी बोलायला जात नाही. बालटयाच्या सांगण्यावरून कारभारी त्याच्यावर संशय घेतो तेव्हा तो संतापतो. तरी नंतर तो कारभाऱ्याशी बोलू लागतो.

त्याला घराची ओढ असते. त्यासाठी तो शनिवारी सकाळची शाळा झाल्यावर पायपीट करत विभूतवाडीला जातो. सोमवारी परत सहा कोसांचे अंतर तुडवत वाडीला परततो.

तो धडपड्या स्वभावाचा व प्रयत्नवादी असतो. गावासाठी चांगले काहीतरी करण्याची त्याला तळमळ असते. तसेच गावात काय करता येईल व सरकारकडून कशासाठी मदत मिळू शकेल या साऱ्याचा तो विचार करतो व तालीम बांधायचे मनाशी ठरवल्यावर सभा घेऊन आपली कल्पना सगळयांना सांगतो. लोक ऐकणार नाहीत हे कळल्यावर ही तो प्रयत्न करत राहतो. गावातील वृध्द मंडळीना वारंवार भेटून ही गोष्टी पटवून देतो. तालीम बांधून पुरी होण्यासाठी खूप कष्ट घेतो. सद्या वाण्याच्या पडक्या घरावर कुऱ्हाड चालवायला लोक तयार नसतात तेव्हा तो स्वतः शाळेतल्या मुलांना तिथे घेऊन जातो व कामाला सुरवात करतो. 'केल्याने होत आहे रे ' यावर त्याचा विश्वास असतो.

गावातील लोकांकडे झाडे मागण्यासाठी पुन्हा पुन्हा जातो कधी चातुर्याने तो लोकांकडून कामं करवून होतो. आपण उद्घाटनाला राजाला बोलवू असे तो लोकांना सांगतो. आपल्या या लहानशा वाडीत राजा येईल या कल्पनेने लोक उत्साहाने कामाला लागतात.

गावकऱ्यांच्या सुखदुःखाशी तो समरस होतो. त्यामुळेच बैल मागण्यापासून तो खाजगी भानगडी

पर्यंत प्रत्येक बाबतीत लोक त्याच्याकडे येतात. त्याच्यावाचून त्यांचे पान हलेनासे होते. त्याला त्रास देणाऱ्या दादू बालटयाला आयबू व आनंदा त्याला कळू न देता परस्पर चोप देतात.

सुरूवातीला त्याच्या अंगात थोडा भित्रेपण असला तरी नंतर तो चांगला धीट होतो. रामोश्याच्या वस्तीत येऊन मारहाण करणाऱ्या वांगी गावच्या लोकांना तो धाडसीपणे सामोरा जातो. व मारहाण करण्याबद्दल त्यांना जाब विचारतो. त्यांना तालमीत घेऊन जातो. त्यांच्याशी बोलणे करतो. व ही भानगड मिटवण्याचा प्रयत्न करतो.

दुष्काळ पडल्याने, पाण्याचं दुर्भिक्ष निर्माण झाल्याने ओस पडलेली वाडी पाहून त्याला वाईट वाटतं. शाळा बंद असल्याचं तो सरकारात कळवतो. तालुक्याच्या गावी रुजू होण्याचा आदेश मिळाल्यावर तो जड अंतः करणाने बनगरवाडीचा निरोप घेतो.

आदर्श नायकाची ही व्यक्तिरेखा माडगूळकरांनी कौशल्याने रंगवली आहे. दीर्घकाळ स्मरणात राहील अशी ही व्यक्तिरेखा आहे.

कारभारी :-

बनगरवाडीतील समजूतदार, वयोवृध्द, अशी ही व्यक्तिरेखा. बनगरवाडीला शिक्षक म्हणून आलेल्या नायकाला सर्वप्रथम आधार वाटतो तो कारभाऱ्याचाच.

कारभारी काळयाभोर रंगाचा व सडसडीत अंगकाठीचा असतो. दाढीमिशा, भुवया व छातीवरचे केस पिकून पांढरे झालेले असतात. शरीरावर सुरकुत्या पडलेल्या असतात. हातापायावरच्या शिरा फुगलेल्या असतात. अर्धे धोतर, डोक्याला मुंडासे एवढाच त्याचा पोषाख असतो. पायात जोडे असतात.

कारभाऱ्याला गावात मान असतो. तो प्रेमळ व विचारी असतो. उन्हाळयाच्या दिवसात, लिंबाच्या पारावर एकटाच बसलेल्या नायकाला तो प्रेमाने विचारतो '' हतं का बसला रे बाळा ? '' आपण मास्तर आहे असं सांगितल्यावर कारभारी त्याला शाळेत बसायला सांगतो. त्याची विचारपूस करतो. नातीला त्याच्यासाठी पाणी आणायला सांगतो. शाळेत मुलं येतील म्हणून धीर देतो. संध्याकाळी त्याच्यासाठी शेरडाचं दूध आणतो. आनंदा रामोशाला अंधारात बसलेल्या नायकासाठी चिमणी आणायला सांगतो. मदत करण्याचा त्याचा स्वभाव यातून दिसतो.

चावडीजवळ जमलेल्या लोकांना मास्तर आला असल्याचे व मुलांना उद्यापासून शाळेत पाठवा म्हणून सांगतो. त्या अशिक्षित लोकांना शिक्षणाचे महत्त्व कळत नसते. त्यामुळे ती अनेक शंका उपस्थित करतात. पोरं कुठे हायेत ? शाळेत आली तर पोटाला काय खातील ? वगैरे. पण प्रत्येक कामात ' तिरकसतुंबा ' घालणाऱ्या लोकांना कारभारी पुरून उरतो. ' ज्या गावच्या बोरी, त्याच गावच्या बाभळी ' असल्याने कारभारी त्यांना गप्प बसवतो. शेवटी मुलांना शाळेत पाठवायला गावकरी तयार होतात. नंतर तो नायकाला राहण्यासाठी एक लहानसे घर सुध्दा देतो.

तो सत्शील व इभ्रतीला जपणारा असतो. वयात आलेल्या नातीची, अंजीची त्याला काळजी असते नायकाने त्याचे मत चांगले झालेले असते तरी ' नायकाबद्दल अंजीला चोळी आणून दिली ' असे दादू बालटया सांगतो तेव्हा बिथरतो. व अंजीला खूप मार देतो आणि नायकाशी बोलणं बंद करतो. तरी फक्त

बालटयावर विश्वास ठेवत नाही. नायकावर तो पाळत ठेवतो. जेव्हा त्याला काहीच वावगं किंवा बोट ठेवण्याजोगं दिसत नाही. तेव्हा तो नायकाशी स्वतः बोलायला येतो. व खरंखोटे काय ते जाणून घेतो. आपण अबोला धरल्यानंततर नायकाने त्याचं कारण विचारलं नाही व त्यानेही बोलणं सोडून दिलं याचं त्याला वाईट वाटतं. नंतर तो नायकाशी पुनः मोकळेपणाने व आपुलकीने वागतो. यातून त्याच्या मनाचा मोठेपण दिसून येतो.

नायकाच्या मनात तालीम बांधायचं येतं तेव्हा वाडीतले लोक नेहमीप्रमाणेच विरोध करतात. तेव्हा कारभारी परत त्यांना समजावतो. तालीम झाली तर फायदाच होईल. आज पहिलवान कोणी नसला तरी मुलांना खेळायला जोरबैठका मारायला जागा होईल वगैरे सांगून त्यांची मने वळवतो. वाडीबद्दल व वाडीतील लोकांबद्दल त्याला वाटणारी कळकळ यातून दिसते. कारण शाळा किंवा तालीम होण्यात त्याचा स्वतःचा असा काही फायदा नसतो.

त्याच्या या समजूदारपणामुळेच त्याला वाडीच्या कारभाऱ्याचं पद मिळालेलं असतं. तालीम बांधताना आलेल्या अडचणींनी वैतागलेल्या नायकाला देखील तोच समजावतो. '' इमारत बांधायची म्हणजे अडचणी येणार, त्रास होणार. तू जर हे अर्धवट सोडलंस तर इमारत काही पूर्ण होणार नाही आता जे काम हातात घेतलय ते पूर्ण करू. '' तो नुसता बोलून थांबत नाही तर शक्य होईल ती मदत ही करतो. समजूदारपणाबरोबर च तो करारी ही असतो. बाळा बनगर तालमीसाठी झाड द्यायला तयार होत नाही तेव्हा तो स्वतः नायकाबरोबर त्याच्याकडे जातो. पण बाळा अरेरावीने बोलतो व मला वाडीची जरूर नाही असे म्हणतो तेव्हा कारभारी त्याला करारीपणाने उत्तर देतो की, ' जे बोललास तसे वागून दाखव.' बाळाच्या अंगावर धावून जाणाऱ्या आनंदाला, रामाला आवरतो.

तालमीच्या उद्‌घाटनाच्या कार्यक्रमाच्या वेळीही तो सर्व गोष्टीत लक्ष घालतो. पंतसरकारांना सामोरे जाण्यासाठी नवीन अंगरखा व तांबडेभडक मुंडासे घालून येतो. नारळ रूपयाचं ताट घेऊन सामोरा जातो व त्यांना अदबीने उत्तर देतो.

असा हा संयमित, समतोल वृत्तीचा कारभारी वांत्या जुलाबाच्या दुखण्याने एकाच दिवसात मरण पावतो. त्याला आपले मरण कळते. त्यामुळे तो सर्वांना भेटून व सर्वांचा निरोप घेऊन येतो. अंजीची व्यवस्था शेकुबाकडे करतो. त्याच्यासाठी रडणाऱ्या लोकांचे स्वतःच सांत्वन करतो '' प्रत्यक्ष पंतसरकारने माझ्या खांद्यावर हात ठेवला. आता माझे काय राहिले आहे ? '' असे म्हणत सुखासमाधान डोळे मिटतो. वाडी सुनी होऊन जाते. नायकाला उदास, एकाकी वाटू लागते.

## गौण व्यक्तिरेखा

**१) दादू बालटया :-**

समाजात वेगवेगळया प्रकारची, वृत्तीची, स्वभावाची माणसे वावरत असतात. सज्जन, सत्प्रवृत्त लोकांबरोबरच खलप्रवृत्तीची माणसेही समाजात असतात. बनगरवाडी ही त्याला अपवाद नसते. दादू बालटया हा वाडीतला एक टग्या, दुष्ट प्रवृत्तीचा माणूस असतो. टिवल्याबावल्या करणे, याची टोपी त्याच्या डोक्यावर ठेवणे हाच त्याचा उद्योग असतो. थोडे फार लिहितावाचता येत असल्याने आणि तालुक्यातील अधिकाऱ्यांशी ओळख असल्याने तो गुर्मीत वावरत असतो.

नायकाला तो सुरुवातीलाच भेटतो. मोठा आणि लांबोडका चेहरा असलेल्या बालटयाची गालाची हाडे वर आली असतात. मिशांचे केस धुरकटाऱ्यासारखे दिसत असतात. अंगात गोल सदरा आणि डोक्याला तांबडा पटका असा त्याचा वेष असतो. कमरेला धोतर असते व हातात उंच भाला असतो. त्याला चिलीम ओढायची आणि सारखं थुंकायची सवय असते. चांगल्या गोष्टीवर, चांगले काही घडण्यावर त्याचा विश्वास नसतो. गावात नवीन कोणी आलेले त्याला खपत नसते. कारण नवीन माणसाचा प्रभाव पडला तर आपल्याला कोणी विचारणार नाही असे त्याला वाटत असते.

त्याच्या या नतद्रष्टपणाचा फटका नायकाला बसतो. लिंबाच्या सावलीत बसलेल्या, थकल्या भागलेल्या पोरसवदा नायकाला बघून तो त्याला दटावणीच्या सुरात विचारतो '' काय अंडीवाला हायेस का गा ? '' नायकाने मास्तर आहे असं सांगितल्यावरही त्याला काहीच फरक पडत नाही. वाडीत मास्तर आलेला त्याला नको असतो. त्यामुळे तो तुच्छतेने बोलून त्याला नाउमेद करतो. इथे मास्तरची गरज नाही. इथे शाळा चालणार नाही. वाडीत शाळेत जाणारी मुलं नाहीत. असं असून इथ मास्तर पाठवणं म्हणजे ' रिक्कामा फाजीलपणा' असं तो बोलतो. जाताना सवयीप्रमाणे थुंकतो.

एवढे करुन तो थांबत नाही. शाळा सुरु झाली असते. आणि मास्तरला राहायला कारभाऱ्याने घरही दिले असते. एका रात्री तो नायकाच्या घरी जाऊन त्याला घाबरवून सोडतो. आधीच्या इथेच राहणाऱ्या मास्तरला आपण कसे मारले, तो गावातल्या भानगडीत लक्ष घालत होता. वगैरे गोष्टी तो नायकाला सांगतो. आणि त्याला धमकी देतो की; त्याने जर शाळेत शिकवण्यापलीकडे वाडीतील इतर गोष्टीत लक्ष घातले तर त्यालाही बेदम मारण्यात येईल वगैरे बोलून तो निघून जातो.

या धमकीनंतर ही नायकाचे बस्तान नीट बसलेले पाहून तो त्याचा काटा काढायची संधी शोधत राहतो आणि त्याच्या सुदैवाने व नायकाच्या दुर्दैवाने ती त्याला मिळते. कारभाऱ्याच्या नातीने नायकाला तालुक्याहून चोळी शिवून आणायला सांगितले असते. व कारभाऱ्याच्या चोरुन तिने खणाचे पैसे जमवले असल्याने ही गोष्टी कारभाऱ्याला न सांगण्याबद्दल ती नायकाला सांगते. अंजीला नायक चोळी देताना नेमका बालटया पाहतो व कारभाऱ्याकडे चुगली करतो. सरळ स्वभावाच्या कारभाऱ्याला ते काही काळापुरते खरे वाटते. तो अंजीला मार देतो आणि नायकाशी अबोला धरतो.

पण सत्य फार काळ लपून राहत नाही. कारभाऱ्याला खरी गोष्टी कळते. तो नायकाला सर्व सांगतो आणि अबोला सोडतो. ही घटना आयबूला कळते. तेव्हा तो व आनंदा मिळून एका रात्री त्याला खूप मारतात. तो अंथरुणालाच खिळतो एवढे झाल्यावरही त्याचा दुष्ट स्वभाव बद्दलत नाही. दुष्काळामुळे गाव सोडून जाताना तो नायकाला म्हणतो ' मी चाललो, पर, तुला बघून घीन' अशी धमकी देतो. मास्तरनेच आपल्याला मारले. आपले हातपाय तोडले असं त्याला वाटत असतं. कारण ' चोराच्या मनात चांदण.'

त्याला मारलेलं पाहून गावात कोणालाही वाईट वाटत नाही. उलट रामा बनगर म्हणतो की, याच्या हजार भानगडी असतात. कुणा परगावच्या माणसानं मारल असणार. पण आयबू व आनंदा त्याला जन्माची अद्दल घडवतात.

२) आनंदा रामोशी

बनगरवाडी जसे धनगर राहत असतात तसेच रामोशीही. त्यांची एका बाजूला वस्ती असते. आनंदा तिथेच राहत असतो. आनंदा व इतर रामोशी काहीही कामधंदा करीत नसत. तरी त्यांचे पोट भरत असे.

आनंदा रामोशी बुटका आणि अंगाने बारीक होता. त्याचे वय पस्तीस-चाळीस असावे. दाढी कायम वाढलेली असे. आखुड चड्डी, अंगात नुसता कोट आणि डोक्यावर गांधी टोपी असा त्याचा वेष असतो आनंदा, आयबू व रामा बनगरासोबत रोज शाळेत येऊन बसत असे. ते इथे बसून वेळ कां घालवतात असे नायकाला वाटत असे. पण नंतर त्याला कळते की, ते वेळ घालवण्यासाठी शाळेत येऊन बसतात.

खांद्यावर एक घोंगडे घेऊन आनंदा रानातून फिरत राही व कोणाच्या तरी शेतातून वांगी, मिरच्या चारदोन कणसे असं काहीतरी चोरून आणी. चारदोन कणसे चोरीला गेल्याचे मालकाला कळत नसे. आणि चोरी केल्यानंतर आठ-दहा दिवसानी आनंदा मालकाकडे जाऊन चोरी कबूल करून टाकी. मालक काही म्हणाला तर त्याचा युक्तीवाद तयार असे. ' पाखरं, किडामुंगी खातात त्यांना तुम्ही काही म्हणत नाही. तसंच मी खालूं असं म्हणून ते विसरून जा आणि कबूल केल्यावर चोरीचा डाग जातो.

कधीकधी रानात जाऊन ससा, घोरपड असे प्राणी मारून आणी व रानातच सोबत्यांसोबत ते खाई. वर्षानुवर्षे त्याचा हाच धंदा होता.

त्याची एक चोरी मात्र नायकाच्या गळयाला तात लावणारी ठरते. वाडीतील रामा बनगराचे तीनशे चाळीस रूपये नायक गावाकडून मोडून आणतो. वाटेत कुणी चोराने घेऊ नये म्हणून दशम्यांच्या पिशवीत ठेवतो. घरी आल्यावर थकव्याने त्याचा डोळा लागतो. तेवढया वेळात त्याची दशम्याची पिशवी आनंदा घेऊन जातो. पण काही दिवसानंतर त्यातील दोन-तीन रूपये खर्च करून बाकीचे सर्व रूपये परत आणून देतो. आपल्याला चोरी करायची नव्हती. भूक लागली होती व तुम्ही झोपला असल्याने दशम्यांची पिशवी नेली. रूपये दिसल्यावर ते घेण्याची इच्छा झाली. पण नंतर मनाला टोचणी लागून राहिल्याने पैसे परत आणून दिले असा तो खुलासा करतो. शिक्षा केली. तुरूंगात टाकले तर त्याला तयार होतो. जिवाला नसता घोर लावून ठेवल्याबद्दल नायक संतापाने त्याला हाकलून देतो.

बेरडपणा, चोऱ्या करणे याबरोबरच प्रामाणिकपणा, थोडा चांगुलपणा असं विचित्र मिश्रण असलेल्या स्वभावाचा आनंदा असतो. तसेच नायकाचा चांगुलपणा व परोपकारी स्वभाव याबाबत त्याची खात्री असते. त्यामुळे नायकाला त्रास देणाऱ्या दादू बालटयाला तो आयबूच्या साथीने बेदम मार देतो. दादू अंथरूणालाच खिळतो. ही गोष्ट तो व आयबू गुप्त ठेवतात. शेवटी वाडी सोडून जाताना तो हे नायकाला सांगतो.

त्याच्या वस्तीत राहणारा जगन्या रामोशी शेजारच्या वांगी गावातील एका मराठा व विधवा असलेल्या बाईशी सूत जमवून त्या बाईसह पळून जातो. वांगी गावातले मराठे वस्तीवर हल्ला करतात. तेव्हा आनंदा जगन्याला शोधून त्यांच्या हवाली करण्याचे कबूल करतो. त्याप्रमाणे जगन्याचा पाठलाग करतो. व जखमी अवस्थेत त्या गावकऱ्यांच्या ताब्यात देतो. मराठा जातीतली बाई जगन्याने पळवून आणणे म्हणजे रामोश्याच्या जातीला कमीपणा आहे असे त्याला वाटते. आनंदाचा धाडसीपणा यातून दिसतो.

नायकाचे पैसे चोरण्याचा गुन्हा केला असला तरी नंतर तो नायकाशी चांगले वागतो. तालीम

बांधण्याच्या कामात नायकाला मदत करतो. पडेल ती कामे करतो चोरी करणे सोडले तर त्याच्यात इतर वाईट गुण नसतात. चोरी करण्यामागे त्याला स्वतःचे तत्त्वज्ञान असते. जगन्याला मारण्यात त्याला काही गैर वाटत नाही. काळा व पांढरा असे दोन्ही रंग असलेली ही व्यक्तिरेखा आहे.

### ३) आयबू मुलाणी

बनगरवाडीत आल्यावर नायकाला कारभारी एक छोटेसे घर देतो. चार भांडीकुडी आणून नायक आपले बिऱ्हाड मांडून राहू लागतो. त्याला एक सोबती मिळतो. एका रात्री नायकाकडे वीसबावीस वर्षांचा एक तरुण येतो व सांगतो की मी आयबू आहे. तो एरवतपूरचा राहणारा असतो व गावोगाव भटकता भटकता वाडीत आला असतो. त्याला जवळचं असं कोणीच नसतं. गावकऱ्यांच्या सांगण्यावरुन तो नायकासोबत राहण्यासाठी येतो.

याचा चेहरा हसरा, फुगीर गालांचा असतो. डोळे बारीक असतात. नाक लालसर असते. कुडता अनेक जागी फाटलेला आणि मुसलमानी चोळणा असा त्याचा वेष असतो. अंगाने तो चांगला दांडगा, मजबूत शरीराचा असतो.

याच्या गरजा फारच थोडया असतात. पोटाला भाकरी मिळाली की झाले. दिवसभर तो नायकासोबत शाळेत बसून राहतो. वाडीतल्या लोकांना बकरे कापण्यासाठी आयबूच्या रूपात एक माणूस मिळतो. त्याबदल्यात वाडी त्याला दोन वेळा जेऊ घालते रोज चार घरी भाकरी व कालवण मागून आणायचे व कुठेतरी बसून ते खायचे. त्याला अंथरूणपांघरूणाची ही गरज नसते. तो कुठेही झोपत असे. चावडी, मोकळे मैदान नाहीतर नायकाचे घर तर होतेच.

वाडीत नायकाबरोबर राहू लागल्यावर तो वाडीतलाच एक बसून जातो. वाडीच्या जीवनाशी सुखदुःखाशी तो समरस होतो. नायकाबद्दल त्याला आपुलकी वाटू लागली असते. आणि कृतज्ञता हा मोठा गुण त्याच्या अंगी असतो.

नायकाला तो अनेक प्रकारे उपयोगी पडतो. शेकूबा बैलासाठी नायकाला खूपच गळ घालतो तेव्हा आयबूच त्याला वाटेला लावतो. भाकरी मागण्यासाठी गावात हिंडत असल्याने त्याला गावातल्या बऱ्याच गोष्टी माहिती असतात. दादू बालटयाच्या टगेपणाला गावात मास्तर आल्यापासून कोणी विचारत नाही. त्यामुळे तो मास्तरवर जळतो हे तोच नायकाला सांगतो. नायकाने बोलावणे पाठवल्यावर कारभारी येत नाही व सवड नाही असे उत्तर देतो तेव्हा आयबूला कारभाऱ्याचा राग येतो.

बालटयाने कारभाऱ्याकडे नायकाची खोटीनाटी चुगली केल्याचं आणि नायकाचा व अंजीचा वाईट संबंध आहे असं बालटयानं कारभाऱ्याला सांगितल्याचं कळल्यावर तो खूप चिडतो. व एका रात्री संधी साधून तो व आनंदा मिळून बालटयाला गुरासारखं बडवतात. तो अंथरुण धरतो.

वाळीत टाकलेल्या बाळा बनगराचा मुलगा आयबूला बकरा कापण्यासाठी बोलवायला येतो तेव्हा तो जात नाही ' तुझ्या शेरपायलीची मला गरज नाही ' म्हणून बाणेदारपणा दाखवतो व वाडीला, नायकाला साथ देतो.

तालमीच्या प्रत्यक्ष बांधकामात अनेक कामे करून तो बारीक होतो. पायपीट करून त्याच्या पायाला

कुरपे होतात. तरी शेवटपर्यंत तो कामं करत राहतो. तालमीवर पेंड टाकण्याचे काम सुरु असताता मात्र तो पडतो व त्याचा हात मोडतो. त्यामुळे त्याला तालमीच्या उद्घाटन समारंभात भाग घेता येत नाही. राजा येऊन गेल्याचे कळल्यावर आपल्याला राजा पाहायला मिळाला नाही याचे त्याला वाईट वाटते. जगन्या रामोशी येऊन त्याचा हात ठीक करून देतो.

वाडीत दुष्काळ पडल्यावर नायकाला वाडीतली शाळा बंद करुन तालुक्याच्या गावी रुजू होण्याचा आदेश येतो. नायक जायला निघतो तेव्हा आयबू त्याचे सामान डोक्यावर घेऊन त्याला सोबत करतो.

एकंदरीत वयाने तरुण व मनाने लहान मुलासारख निरागस, निष्पाप व नायकाला जीव लावणारा असा हा आयबू मुलाणी असतो.

**४) काकुबा धनगर :-**

काकुबा हा वाडीतील साठ-सत्तर वय असलेला म्हातारा. केस पिकून पांढरे झालेले. चेहऱ्यावर सुरकुत्याचे जाळे. रामा बनगर याचा मुलगा काकुबाला इतर धनगरांप्रमाणे चिलीम ओढायची सवय असते.

आठ वर्षाचा असल्यापासून काकुबा मेंढरांमागे जात असतो व आता इतकं वय झाल्यावर ही तो तेच काम करीत असतो. त्याशिवाय दुसरं काही त्याला येत नसतं. त्यामुळे मेंढरं ओळखण्यात तर तो तरबेज झाला होताच, पण आसपास एखादा लांडगा वावरत असला तर त्याला लांडग्याचा वास येत असे व तो इतर मेंढक्यांना सावध करत असे.

नव्याने मेंढरं करणाऱ्या एका धनगराने काकुबाची चार मेंढरे नेली व काही दिवसानी काकुबाला सांगितलं की, तुझी सगळी मेंढरं मेलीत व त्यांची काही पिलही नाहीत. काकुबाला हे खरं वाटलं नाही. तेव्हा त्या धनगराच्या वाडयात गेला व आपल्या मेंढराची पिलं त्याने बरोबर ओळखली. खजिल झालेल्या त्या धनगरानेही ही गोष्टी कबूल केली.

या काकुबाला बसल्याबसल्याच झोप घ्यायची सवय असते. आडवं होण्याची गरज त्याला वाटत नाही. दुष्काळ पडल्यावर रामा बनगर वाडी सोडून जाण्याचे ठरवतो तेव्हा काकुबा मात्र त्याच्याबरोबर जात नाही. एवढा आटापिटा करून जगावं असं आपलं आता वय राहिलं नाही. असं तो रामाला सांगतो. आपली माती इथेच पडेल असं सांगतो. त्याला भाकरी करून घालायला रामा बायकोला ठेवून जातो. म्हातारा काकुबा वाडीतच राहतो.

**शेकुबा धनगर व त्याची बायको :-**

शेकुबा हा वाडीतील तीस-पस्तिशीचा एक धनगर. त्याची थोडी शेतीही असते. अंगाने तो किरकोळच असतो. त्याची बायको मात्र उंच, धिप्पाड व ताकदवान् असते. त्याच्या बरोबरीने तीही शेतातली कामे करीत असते. एकदा पेरणी करण्यासाठी शेकुची बैलाची गरज भागवली जात नाही. कारण बैल असलेल्या सगळयांनाच पेरण्या करायच्या असतात. नायकाकडेही तो बैल मागायला येतो. पण नायक कुठून बैल देणार ? तेव्हा शेकूची बायको त्याला एका बाजूने बैलाला जुंपायला सांगते. व दुसऱ्या बाजूने स्वतःच्या खांद्यावर जूं घेऊन बैलाबरोबर टिपण ओढत राहते. व अशा प्रकारे शेकुची पेरणीची चिंता दूर करते. रात्री शेकु तिच्या दुसऱ्या पाठीवर उभा राहून तिची पाठ तुडवतो.

पुढे कारभाऱ्याच्या मृत्युनंतर त्याची नात अंजी शेकुकडे राहते तेव्हा तो तिच्या नादी लागतो. आणि तिच्याशी दुसरे लग्न करायचे ठरवतो. नवऱ्याबरोबरीने शेतात कामं करणारी, बैलाबरोबर औत ओढणारी त्याची बायको दीनवाणी होऊन अश्रू ढाळू लागते. वेगळी राहू लागते. पण काही दिवसांनी अंजीला शेजारच्या येडशी गावच्या ग्ळयात आलेला मेंढका भेटतो. आणि त्याच्याशी लग्न करुन ती निघून जाते. आनंदित झालेली शेकुची बायको नायकाला म्हणते- '' मास्तर, आलं आमचं खुळं माघारी. ! ''

बनगरवाडी मध्ये अशा वैशिष्टयपूर्ण व्यक्तिरेखा आहेत.

याशिवाय बारा-तेरा वर्षे वयाचा, मन लावून अभ्यास करणारा, शिकायची इच्छा असलेला आणि रानात मेंढरू उचलून त्या लांडग्याला नागे जाऊन, कुऱ्हाडीचे घावा घालून त्या लाडग्याला मारणारा शूर सता आहे नंतर मात्र त्याची शाळा सुटते व मेंढरं राखायचे काम तो करू लागतो.

तालीम बांधण्यासाठी सारे गावकरी झटत असता, तालमीसाठी झाड देण्यास नकार देऊन वाडीशी वैर घेणारा बाळा बनगर आहे. वाडीने त्याला वाळीत टाकल्यावर मात्र तो हवालदिल होतो. मावल्याईच्या जत्रेत त्याला प्रसादाचा गुलालही लावला जात नाही तेव्हा तो रडकुंडीला येऊन वाडीची माफी मागतो. काकुबा त्याला वाडीत परत घेण्याचा निर्णय घेतो. इतर लोकही तो ऐकतात. अशा वैविध्यपूर्ण आणि जिवंत अशा पात्रांनी ही कादंबरी वैशिष्ट्यपूर्ण झाली आहे.

❖ ❖ ❖

# प्रकरण १५

## बनगरवाडी : वाङ्मयीन वैशिष्ट्ये

'बनगरवाडी'ची वाङ्मयीन वैशिष्ट्यं :- आपण प्रस्तुत पाठात पाहणार आहोत.

'बनगरवाडी' ह्या शीर्षकावरुनच ह्या कादंबरीच्या, कथानबद्दल, ते कथानक कुठे घडले त्या प्रदेशाबद्दल कल्पना येते. लेखक व्यंकटेश माडगूळकर ज्या प्रदेशात जन्मले. वाढले तो प्रदेश म्हणजे माणदेश हा होय. या माणदेशाला या कादंबरीत एक व्यक्तिमत्त्व प्राप्त झाले आहे. हा प्रदेश या कादंबरीचा एक अविभाज्य असा भाग आहे. या कादंबरीतील घटना घडतात त्या माणदेशातील धनगरांची वस्ती असलेल्या वाडीत. माडगूळे ह्या लेखकाच्या जन्मगावापासून जवळच असलेल्या या वाडीचं नाव लेंगरवाडी होतं. तिला माडगूळकरांनी ' बनगरवाडी ' हे नाव दिलं. या प्रदेशाबद्दलचे, तेथे राहणाऱ्या लोकांबद्दलचे तपशीलवार वर्णन या कादंबरीत आहे. लेखकाच्या सूक्ष्म निरीक्षणशक्तीचा त्यातून प्रत्यय येतो. या प्रदेशातील जीवननाटय आणि अनुभव या कादंबरीत जिवंतपणे चित्रित झाले आहेत.

या प्रदेशाची, येथील लोकजीवनची वैशिष्टये पुढीलप्रमाणे या कादंबरीतून दिसून येतात.

१) या प्रदेशाची रचना, येथील निसर्ग

२) येथील लोकजीवन, राहणीमान, रितीरिवाज इत्यादी.

३) भाषाशैली.

**प्रदेशरचना, निसर्ग**

हा प्रदेश मुख्यतः कमी पाऊस पडणारा प्रदेश आहे. व त्यामुळे ओसाड असलेला दिसून येतो. जिकडे तिकडे पिवळया करडया रंगांचे भगभगीत माळ दिसून येतात. हे माळ दगडगोटयांनी भरलेले असतात. पाऊस कमी असल्याने हा प्रदेश हिरव्यागार वनराजीने नटलेला नाही. झुळझुळ वाहणाऱ्या, विशाल पात्र असलेल्या नद्या या प्रदेशात नाहीत. क्वचित कुठे नेपतीबोराटीची झुडपे असतात. आणि वाडीला जाणारी वाट दगडगोटे असलेली व धुळीने भरलेली अशी असते. येथील निसर्गाचे वर्णन कादंबरीत असे येतो.

१) क्वचित कुठे खोलगट भागांत झाडाझुडपांचे हिरवे ठिपके दिसत होते. (पृ.२)

२) वाटेवरची धूळ पायाला गार लागू लागली. (पृ.१)

३) झाडेझुडपे, दगडगोट यांना आकार आला. (पृ.१)

४) माळावर वाळून पडलेले गवत सूर्याच्या पहिल्या किरणांनी उबदारले. (पृ.२)

या प्रदेशात आढळून येतात लिंबाची व बाभळीची झाडे.कारण ही झाडे कमी पावसातही वाढतात. उन्हातून लांबवर चालत आलेला नायक लिंबाची सावली पाहून त्या झाडाखाली बसतो. तालमीच्या

इमारतीसाठी नायक बाळा बनगराकडे झाड मागायला जातो ते झाड लिंबाचे असते. अंजीला रानात काम करताना दुसऱ्या गावातील मेंढका भेटतो तो बाभळीचे झाड सावळताना.

मेंढरांना चरायला नेण्याचे कुरण वाडीपासून तीन मैल लांब असते. पाण्याची टंचाई असल्याचं नायक व कारभारी यांच्या संवादातून सूचित होतं. तहानलेला नायक कारभाऱ्याला पाण्याविषयी विचारतो तेव्हा तो उत्तर देतो '' पाण्याची वरड हाय गा वाडीला. उन्हाळयात पार वाळवणा हुतं. '' चरायला गेलेल्या मेंढरांना सुकलेला ओढयाओधळीला असलेले पाणी प्यावे लागते. पिण्याच्या पाण्यासाठी इथे विहिरी खोदलेल्या असतात. तसेच गावात दगडचुन्याने बांधलेला हेळ असतो.

पाऊस पडतो तेव्हा मात्र सगळीकडे हिरवेगार होते. जिकडे तिकडे गवत उगवते. या गवताचे वर्णन कादंबरीत केले आहे. उदा- '' अंगणात, माळवरावर, छपरांवर-जिथे उगवू नये तिथे गवत उगवू लागले. सर्वत्र झगझगीत पोपटी रंग दिसू लागतात.

पाऊस पडल्यावर बारीक बारीक बेडक्या दिसू लागतात. उडया मारु लागतात. त्याच्यावर कावळे झडपा घालू लागतात. तर पंख असलेले किडे उडू लागतात. त्यांना चिमण्या-कावळे खाऊ लागतात. विटकरी व काळया रंगाचे वाणी इकडेतिकडे फिरू लागतात.

नांगरल्या जमिनीतील ढेकळे विरघळतात. जमिनी पाणी पिऊन घेतात. लहानमोठी डबकी साचतात आणि त्यात निळयाकाळया आकाशाचे प्रतिबिंब दिसू लागते. मेंढरांच्या, लोकांच्या पायाला चिखल लागू लागतो काळे कोतवाल पक्षी घोगरा आवाज काढू लागतात. पावसामुळे सृष्टीत होणाऱ्या बदलाचे वर्णन अशा प्रकारे या कादंबरी येते.

वाडीजवळ रानात ससे, लांडगे, घोरपडी असे प्राणी असतात. लांडगे मेंढराला घेऊन जातात तेव्हा गावातले दहापाच लोक त्यांच्या मागे जातात. पण लांडगा सापडतोच असे नाही सतासारखा वाडीतला मुलगा लांडग्याला कुऱ्हाडीने मारतो. रामोशी रानातल्या ससा, घोरपडीची शिकार करतात.

चिमण्या, कावळे, बगळे हे सगळीकडे आढळणारे पक्षी माणदेशात दिसतात. पिक तयार झाल्यावर पिकांमधले दाणे खायला हे पक्षी येतात. तसेच काही परदेशी पक्षीही येतात. रामोशी या पाखरांची शिकार करु लागतात.

या प्रदेशातील प्रमुख पिक म्हणजे बाजरी व ज्वारी त्यासोबत तुरीचे पीक ही घेतले जाते. हुलगा मूग-मटकी अशी कडधान्येही पिकतात. या तयार होणऱ्या पिकांचे सुंदर वर्णन या कादंबरीत केले आहे. उदा- ''हिरव्या ताटांवर तपकिरी रंगाची कणेस सर्वत्र डुलू लागली आणि लवकरच जांभळया फुलोऱ्यांनी फुलून गेली. हुलग्यांला जोम आला. तुरीच्या उभार झाडांवर सावळया शेंगा दाण्यांनी भरु लागल्या''

''दरम्यान श्रावणमासी पेरलेली ज्वारी बळावली. काळया रानांतून ज्वारीची धाटे गुडघ्यामांडीला आली.

''हरबऱ्याला पोचट घाटे लोंबू लागले. हिरवे बाटूक खाऊन जनावरे गोटीसारखी गोल गरगरीत झाली.''

बाजरीचे पीक तयार झाल्यावर नंतर ज्वारी, हरबरा ही पिके येतात. बाजरीची नवी कणसे दसऱ्याला सोन्याबरोबर वाटली जातात. ज्वारीचा हुरडा लहानथोर, बायामाणसे सगळेच आवडीने खातात.थंडी पडू लागली की लोक शेकोटी पेटवू लागतात व काळया घोंगडीने अंग झाकून घेतात.

एखादे वर्ष या प्रदेशात असे येते की, पाऊस या प्रदेशाला हूलकावणी देऊन निघून जातो. नक्षत्रांमागून नक्षत्रे कोरडी जातात. वाडीवर दुष्काळाचे सावट पडते. अन्नधान्य व पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण होते. रानातले ओधळ, ओढे आटून जातात. विहिरींचे पाणी आटते. कारण जमिनीतही खोलवर पाणी नसते. गुराढोरांना, मेंढरांना चारा मिळायची मारामार होते. जनावरे रोड होतात. मेंढरांची चरबी वाळून जातो त्यांच्यात रोगराई पसरते. तर काही गुरांना, मेंढरांना बाजारात नेऊन विकावे लागते. हातावरची पोटे असणाऱ्यांबरोबर, घरातले धान्य संपल्यावर सगळयांवर उपासमारी वेळ येते. तेव्हा गावकरी आपली मेंढरं, गुरंढोरं घेऊन 'जगायला' बाहेर पडतात. वाडी ओस पडते.

**लोकजीवनः-**

बनगरवाडीत बहुतेक वस्ती धनगरांची असते. याशिवाय काही शेतकरी, रामोशीही वाडीत राहत असतात. या लोकांच्या जगण्याचे, त्यांच्या समजुतींचे, त्यांच्यातील रागलोभ, हेवेदावे, त्यांच्या परंपरा, अंधश्रध्दा या सगळयाचे बारकावे लेखकाने टिपले आहेत.

हे धनगर रंगाने काळेभोर असतात. दाढी वाढलेली, यांचा वेष म्हणजे धोतर, वर सदरा वगैरे काही नाही. तो कधीतरी घालायचा. डोक्याला मुंडासे नाहीतर पटका.

यांची वस्ती म्हणजे आजूबाजूला मोकळा माळ व बाजरीची राने. आणि मध्येच तीस-पस्तीस घरे. वाडीत रस्ते असे नसतातच. घरे बांधून उरलेली जागा चालण्यासाठी वापरली जात असते. घरे बहुतेक मातीची असतात, काही धाब्याची ही असतात. प्रत्येक घरापुढे अंगण असते. सांडपाण्यावर वाढलेली शेवग्यासारखी झाडे असतात. घराच्या मागच्या बाजूला मेंढरांसाठी बाभळीच्या काटयांचे कूड घातलेले वाडे असतात. पाऊस पडला की ही घरे गळू लागत मग घरात जागजागी भांडी ठेवावी लागत.

ह्या धनगरांचे जीवन कष्टमय असते. यांची सकाळ उजाडे तीच मेंढरांच्या गलग्याने. पहाट झाल्यापासून जागे झालेले मेंढके मेंढरांच्या पोरांना मोकळे करुन देत असत. वाडा स्वच्छ झाडून लेंडयांचा ढीग एका ठिकाणी गोळा करीत. पोरांचे दूध पिणे झालेले असले की, त्यांना परत बांधून टाकायचे. धनगरणीने केलेली ऊनऊन भाकरी खाऊन मेंढरांना घेऊन रानात जायचे असा सकाळचा वेळ जाता असे. रानात जाताना राखण करण्यासाठी सोबत कुत्रेही असायचे. उन तापू लागण्यापूर्वीच मेंढके रानात गेलेले असत.

दुपारी हे विहिरीवर आंधोळी करत. भाकरी खात आणि मग आळीपाळीने थोडी डुलकी घेत. उन्ह उतरु लागले की मेंढरे घेऊन परत येत घरी असलेल्या धनगरांच्या बायका टकळीवर सूत काढण्याचे काम करत. मेंढरं घरी आली की चूल पेटवून स्वयंपाकाला लागत. मेंढके मेंढर जुळण्याचे काम करत. मग भाकरी व कोरडयास खाऊन अंगावर कांबळे घेऊन हे मेंढके चावडीपाशी जमत. थोडया पाऊसपाण्याच्या, इकडच्या तिकडच्या गप्पा होऊन घरी येऊन झोपत.

**वातारणनिर्मिती :-**

कादंबरीमध्ये वास्तवाचा प्रत्यय यावा म्हणून कादंबरीतील पात्रे ज्या प्रदेशात वावरतात, त्याचा ठसा वाचकाच्या मनावर उमटावा असा प्रयत्न कादंबरीकर करत असतो. ही पात्रे ज्या प्रदेशात वावरत असतात त्यालाच वातावरण म्हटले जाते. कादंबरीला असणारी स्थल कालाची चौकट, भौगोलिक, सांस्कृतिक परिसर, पात्रे वावरतात ती घरे, रस्ते, आजूबाजूची राने, जंगले हे सर्व वातावरणाचा भाग म्हणून येते.

'बनगरवाडी' ह्या शीर्षकावरुनच 'बनगर' म्हणजे धनगरांची वस्ती असे रुप मनासमोर येते. माणदेशातील माडगूळे ह्या गावाजवळ ही वाडी आहे. नायक ह्या वाडीत एक शिक्षक म्हणून यायला निघतो त्या प्रसंगापासून या कादंबरीची सुरवात होते. या कादंबरीत येणारा प्रदेश कथानकाचा एक अविभाज्य भाग आहे. कादंबरीत प्रदेश अत्यंत सजीव असा साकारला आहे. कादंबरीचा आशय मनाला भिडेल असा झाला आहे.

**वाडीकडे जाणार रस्ता, गाव**

दशम्यांची पिशवी पाठीला घेऊन चालतच बनगरवाडीला निघालेल्या नायकाच्या निवेदनातून वाटेचे व उमलणाऱ्या पहाटेचे सुंदर वर्णन येते.

अद्याप सर्व काळोख भरुन राहिला असतो. चांदण्यांच्या उजेडात गाडीवाट फिक्कट दिसत असते. वेळेचा अंदाज बांधता येत नसतो. रातकिडे किरकिर करत असतात. गार वारा वाहत असतो. बाभळी. तरवट या झुडपांचा वास येत असतो. हळूहळू उजाडू लागते. चांदण्या दिसेनाशा होतात. रातकिडयांचे गाणे थांबते. झाडेझुडपे, दगडगोटे यांना आकार येऊ लागतो. तांबडापिवळा सूर्य माळाआडून वर येतो. हिरवट प्रकाशाला पिवळट झळाळी येते. पक्षी जागे होतात व त्यांचे सुस्वर कानी येऊ लागतात. कीटकही जागे होऊन उडया मारु लागताता. खाद्य शोधू लागतात.

सगळीकडे पिवळयाकरडया रंगाचे भगभगीत माळ दिसू लागतात. क्वचित कुठे हिरवी झाडे झुडपे दर्शन देतात. शेतकरी व त्यांच्या बायकाही रानात जात. रामोशी मात्र काही उद्योग करीत नसत. कोणाकोणाच्या शेतातून कणसं, वांगी अशा चोऱ्या करून तर कधी रानातील एखादा प्राणी मारून यांची गुजराण होई.

या लोकांच्या गरजा फार थोड्या असतात. भाकरी हेच त्यांचं मुख्य अन्न असतं. भाकरीसोबत असली तर भाजी नाहीतर चटणी, कांदा, मिरची असं काहीही त्यांना चालत असे. चावडीसमोर ही मंडळी अंधारातच बसत. त्या काळी गावामध्ये वीज नव्हतीच. पण साध्या दिव्याचीही गरज त्यांना वाटत नसे. करमणूक म्हणून हे मेंढराच्या गळयात घुंगरू बांधून त्याला काठीवरुन उड्या मारायला शिकवत. त्याला जरा भाकरीचा तुकडा वगैरे खाऊ घालत.

सुगी संपली की कोल्हाट्याचे, दरवेशाचे, गारूड्याचे खेळ बघत. त्यांना थोडे धान्य देत. ढोल, झांजा, लेझीम घेऊन त्यांचा नाच होत असे. चांदण्या रात्री तरुण पोरे लोंपाट खेळत असत. कोणी लेझीम खेळत तर कोणी पटांगणातले मोठमोठे दगडगोटे नाल उचलून जमिनीवर टाकून आपल्या शक्तीचा अंदाज घेत. वाडीत लग्न सार्वजनिक, सामूहिकरित्या करत असत. त्यामुळे जेवणाचा खर्च कोणा एकालाच करावा

लागत नसे. दरवर्षी एखादा मुहूर्त बघून सगळी लग्न एकाच दिवशी लावण्यात येत. एखादा अडचणीत असला तर सर्व मिळून खर्चाचा बोजा उचलत.

भांडणतंटा झाला तर तो वाडीतच मिटवला जाई. कारभारी, काकूबा अशी वृद्ध मंडळी व मास्तर मिळून न्याय करत तो मानला जाई.अपील करणे म्हणजे धनगरांच्या महादैवताला बोलावणे आणि सर्वांना जेवण देणे हे करावे लागे. त्यामुळे कोणी अपील करत नसे.

जातिभेद पाळला जात असे. आपापल्या जातीतच लग्न होत. पुरुष दुसरं लग्न करु शकत असे. दुसऱ्या जातीतील विधवा बाई पळवून आणलेली चालत नाही. दोघांनाही जबर शिक्षा असते. हे जीवन्या रामोशाच्या प्रकरणावरुन लक्षात येते. एखाद्याला नविन मेंढरे करायची असली तर ती विकत घ्यावी लागत नसत. खोबऱ्याची वाटी व त्यावर भांडारा घालून मेंढक्याकडे जाऊन त्याला द्यायची व सांगायचं 'मी बेणं करतोय.' मग तो मेंढका एकदोन मेंढरे याला फुकट देतो. दहापाच मेंढरे जमवून सुरवात होत असे. मात्र बियाणे म्हणून आणलेली मेंढरे विकायची नाहीत, कापायची नाहीत असा त्यांच्यात नियम असतो. व तो ते पाळतात.

त्यांच्यात समजूती, श्रद्धा, अंधश्रद्धा असतात. भानामती, देवऋषी, देवी अंगात येणे इत्यादींवर विश्वास असतो. परंपरेने चालत आलेल्या समजूती असतात. उदा. लांडग्यानं मेंढरू नेलं तर मेंढरांना साथीचा रोग होत नाही.

शिक्षण, शाळा यांचे महत्त्व नसते. या वाडीतील माणसे स्थितीशील असतात. पोरं जास्त शिकली तर रानात मेंढरांमागे जाणार नाहीत. म्हणून शिक्षणाला विरोध असतो. 'ठेविले अनंते तैसेची राहावे' अशी वृत्ती असते. बाहेरच्या जागाचे ज्ञान नसते व ते नाही याची जाणीवही नसते.

तरी एकंदरीत ही माणसे साधी, एकमार्गी असतात. रागलोभ, द्वेष, या भावना असल्या तरी त्या टोकाच्या नसतात. दादू बालटयासारख्या एखाद्या माणसाला शिक्षा केली तरी कारभाऱ्यासारखा माणूस त्याला माफ करतो. दुसऱ्या बाईच्या नादी लागलेल्या नवऱ्याबरोबर शेकूची बायको पुन्हा संसार करू लागते. कारभाऱ्यासारखा वृद्ध शांतपणे व समाधानाने मरणाला समोरा जातो.

या लोकजीवनातील ही वैशिष्ट्ये त्यातील तपशील हे कथानकाच्या ओघात आलेले आहेत हे विशेष. हा प्रदेश, ह्यातील माणसे सजीवपणे डोळ्यासमोर साकारू लागतात.

ह्या कादंबरीत पानोपानी माडगुळकरांनी केलेली रेखाटने आहेत. ही वाडीतल्या माणसांची, बायकांची आहेत, तशीच चरणाऱ्या मेंढरांची, धनगरांच्या झोपड्यांची, घरांपुढील कोंबड्यांची आहेत. त्याने ह्या कादंबरीला, प्रदेशाला अधिक जिवंतपणा आला आहे.

**भाषाशैली**

भाषा हा कादंबरीचा एक महत्त्वाचा घटक आहे. कादंबरी ही लेखकाची निर्मिती असते. ती एक कलाकृती असते. लेखक तिथे भाषेचा सहेतुक वापर करतो. अर्थात असा वापर करताना कादंबरीकाराने जे विशिष्ट विश्व कल्पिले आहे, त्या विश्वाची, त्यात वावरणाऱ्या माणसांची जी संस्कृती आहे, तिला अनुरुप अशी भाषा वापरावी अशी अपेक्षा असते.

ह्या कादंबरीत व्यंकटेश माडगूळकर ह्यांनी नागरी व बोली अशी दोन्ही भाषांचा वापर केला आहे. निवेदनासाठी नागरी व संवादांसाठी माणदेशातील बोली भाषेचा वापर केला आहे. जर निवेदन बोली भाषेत केले असते तर शहरी वाचकांना भाषा समजजायला कठीण गेली असती व कादंबरी जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोचली नसती. संवाद नागरी भाषेत लिहिले असते तर पात्रे कृत्रिम वाटली असती. भाषेचा हा समतोल माडगूळकर यांनी व्यवस्थितपणे सांभाळला आहे. संवादामध्ये नायक सुशिक्षित असल्याने त्याची भाषा शुद्ध व शहरी आहे. उदा. पाणी कुठंय ते सांगा, म्हणजे जेवण करीन भाकरी आणल्यात बरोबर.

''मला तुमच्याशी थोडं बोलायचं होतं बाबा. एक जरुरीची गोष्ट सांगायची होती.''

वाडीतील इतर लोक बोलीभाषेत बोलतात.

उदा. ''एकलेच हाय का मास्तर?''

''मोजून बगा, मी तीन रुपयं धा आनं खाऊन बसलोय. ते काय माघारी देनार न्हाई पर बाकी तुमचं सगळं रुपयं तसचं हायेत.''

पंतसरकारच्या तोंडीही नागरी भाषा आहे. बोलीभाषेतील संवादांमध्ये असलेल्या नैसर्गिक गोडव्याने भाषेला वेगळंच सौंदर्य प्राप्त झाले आहे. संवादात बोलीभाषेचा ठसका असून ते चटकदार आहेत. बोलीभाषेच्या वापरामुळे पात्र त्यांच्या सहजरुपात अवतरली आहेत.

माडगूळकरांची शैली ओघवती आणि चित्रमय आहे. वाडी, माणसं, मेंढर, शेतं यांच्या वर्णनात सूक्ष्म तपशील दिले आहेत. निसर्ग यात सजीवपणे रेखाटला आहे. ऋतुतील बदल, त्यामुळे परिसरातले बदलते वातावरण, वाडीतील लोकांवर त्याचा होणारा परिणाम हे त्यांनी अतिशय सूक्ष्मपणे टिपले आहेत. उदा. ''अगोदर भगभगीत असलेले हे माळ उन्हाळ्यामुळे अधिक भगभगीत दिसत होते.''

''मुरमुटयाच्या बुंध्यावर बसून राहिलेले हिरव्या झगझगीत रंगाचे भुंगे मुरमुटीची तुरट पाने खाऊ लागले.''

''चिमणीचा तांबडा उजेड बालटयाच्या हाडक्या तोंडावर पडला होता. मिशा पिंजारल्या होत्या आणि विडीने काळा पडलेला ओठ त्याने फारोळया दातांखाली दाबला होता.''

काडाने शाकारलेली घरे गळू लागली. सुरेख सारवलेली जमीन ठिकठिकाणी ओली होऊन उखणू लागली, तेव्हा धनगरणी चडफडल्या आणि गळणाऱ्या जागी त्यांनी लहानमोठी भांडी ठेवून दिली.

पृ. ३५ ते ३६ वर पावसाने झालेला बदल वर्णन केला आहे. पृ.५७ ते ६१वर वाडीतील शेतात तयार होणाऱ्या पिकांचे, कणसे शेतात आल्यावर, त्यातून धान्य कसे काढले जाते, नंतर शेत कसे दिसू लागते वगैरेचे वर्णन येते.

पृ. १२० पासून पृ. १३० पर्यंत दुष्काळाचे, त्याने ओस पडत जाणाऱ्या वाडीचे वर्णन आले आहे.

उपमांचा वापर करताना या प्रदेशाला साजेशा उपमा दिल्या आहेत; त्यामुळे हा प्रदेश मनावर अधिकच ठसतो. उदा. ''ती गार सावली बघताच, तापलेल्या कोंबड्यासारखा मी तिच्यात बसलो.''

२) ''दूधभात खाऊन मांजर झोपते, तसा आयबू झोपला.''

३) ''त्याचे तेल संपत आल्या दिव्यासारखे डोळे बघितले आणि ती धीराने म्हणाली.''

४) ''वाऱ्याच्या झुळकीवर भुस्सा बाजूला गेला आणि मोत्यासारख्या ज्वारीची रास पडली.'' ''जमिनीप्रमाणे आभाळातही पांढरी मेंढरे वाड्याकडे चालली होती.''

ह्या प्रदेशातल्या काही म्हणींचा वापर यात केला आहे.

१) ''धनगरी वेड सहा महिने जाणार नाही!'' पृ. ७४

२) ''बोडकीला बावाचा धाक काय रं राम्या?'' पृ.८४

३) ''घर बघावं बांधून!'' पृ.७८

४) ''जनाची न्हाई, मनाची तरी लाज पायजे''.

भीजपाऊस, तिरकसतुंबा, हेळ, भेंडाळलेली, इत्यादी - काही वेगळे शब्द - यांचाही वापर त्या प्रदेशाला जिवंत करतो.

**निवेदन -**

निवेदन हा कादंबरीचा महत्त्वाचा घटक आहे. कादंबरी हा खूप मोठा काळ व अवकाश व्यापणारा कथात्म साहित्यप्रकार आहे. त्यामुळे कादंबरीत पात्रेही अनेक असतात. कादंबरीतल्या आशयाला नेमके पेलण्यासाठी प्रस्तुतीकरणाच्या अनेक पद्धती वापराव्या लागतात. निवेदन, वर्णन, संभाषण, भाष्य ह्या प्रस्तुतीकरणाच्या पद्धती आहेत.तसेच दैनंदिनी, पत्रे इत्यादी माध्यमे आहेत. कादंबरीकार गरजेनुसार या सर्व पद्धतींचा वापर करतो.

निवेदनाच्या दोन पद्धती आहेत.

**१) प्रथमपुरुषी निवेदन -** प्रथमपुरुषी निवेदन हे कादंबरीतील एका पात्राने केलेले असते. उदा. 'पण लक्षात कोण घेतो' मध्ये 'यमू' या स्त्रीपात्राद्वारे केलेले निवेदन किंवा 'भंगलेले देऊळ' मधील अनु या पात्राद्वारे केलेले निवेदन हा एक प्रकारे आत्माविष्कार असतो. या निवेदनामुळे आपली स्वतःची जीवनदृष्टी व्यक्त करण्याची संधी लेखकाला लाभते.

**२) तृतीयपुरुषी निवेदन -** या प्रकाराच्या निवेदनातील निवेदक हा सर्वसाक्षी असतो. पात्रांपासून अलग राहून त्यांच्या हालचालींचे, क्रियांचे, लकबींचे तो वर्णन करतो. तसेच पात्रांच्या मनोव्यापारांशी, मानसिक संवेदनांशी तो समरस होतो. बहुसंख्य कादंबऱ्या या पद्धतीने लिहिलेल्या असतात.

ह्या कादंबरीतील निवेदन प्रथमपुरुषी आहे. वाडीत शाळामास्तर म्हणून आलेल्या नायकाच्या तोंडून व त्याच्या दृष्टिकोनातून कथानक उलगडत गेलेले आहे. असे असले तरी निवेदक म्हणून या कादंबरीत काही वर्णनांमध्ये लेखकाचे अस्तित्व जाणवते.

पृ. २०, २१,२२ वरील, धनगरांची दिनचर्या, पृ. ३५ ते ३६ वरील पावसाचे वर्णन, पृ. ६३, ६५ वरील

सनाची हकीकत, पृ. १०२ ते १०८ वरील जगन्याची पाठलागाची व त्याला पकडून दिल्याची हकीकत यांमध्ये निवदकाने केलेली वर्णने आहेत.

निवेदन नागरी भाषेत असले तरी बोलीभाषेतील काही शब्द निवेदनात आल्याने भाषेला एक वेगळाच बाज प्राप्त झाला आहे.

उदा. 'उबदारले', 'हरेक', 'ध्यानी आले नाही' 'माळावरच्या बिळांतून घोरपडींनी मुंडकी बाहेर काढली.' 'बाहेर चांद उगवला होता.' जीव धाकधूक करणे, कणसे खुडून ती 'चारी', हेंळ इ.

निवेदनाबरोबरच लेखकाचं भाष्यही कादंबरीत काही ठिकाणी आलं आहे. जे लेखकाचे विचार व्यक्त करतात.

१) 'मुले शाळेत आली तर त्यांना पोटाला कुणी घालावे, कसे हा प्रश्न मला कधी जाणवला नव्हता. लहान मुलांना आईबाप मिळवून खाऊ घालतात, अशी माझी समजूत होती.''

२) 'पण मला राहून राहून वाटले की 'ग-म-भ-न' लिहायला शिकविणे एवढेच आपण करतोय, पण यांची गरज वेगळी आहे.'

३) 'एक वेळ पाणी पडले नाही, एक पावसाळा दिसला नाही, आणि वाडी खलास झाली.'

दगडगोटयांनी भरलेल्या माळांमधून, धुळीने भरलेली वाट असते. सूर्य वर चढल्यानंतर पाखरांचा कलकलाट कमी होतो. आसपास जमिनीचे तांबडे, तर कुठे काळे तुकडे दिसू लागतात. पडीक जमिनीना मोठया खोल अशा भेगा पडलेल्या असतात. सकाळी गार असणारी धूळ तापू लागते. माशांचा थवा नायकाच्या डोक्यावर घोंघावू लागतो.

बनगरवाडी म्हणजे आजूबाजूला मोकळा माळ, बाजरीची तांबडी राने आणि मध्येच गबाळे पडावे तशी तीस-पस्तीस घरे असलेली वस्ती असते. वाडीतले रस्ते म्हणजे घरे बांधून उरलेली जागा. तीच चालण्यासाठी वापरली जाते. घरांपुढे मुले खेळत असतात.

**शाळा -**

शाळा म्हणजे लांबलचक चावडीतले दोन खण. ती बरेच दिवसापासून बंद असते. नायकाने दार उघडल्या वर कुबट वास येऊ लागतो. जागोजागी उखणलेली असते. धुळीने आणि चिमण्यांच्या विष्ठेने भरुन गेली असते. शाळेच्या तुळयावरुन खडूने म्हणी लिहून ठेवलेल्या असतात. दिशांच्या नावाच्या पाटया चिकटवल्या असतात. शाळेत चिमण्यांनी मिळेल त्या ठिकाणी घरटी केली असतात. त्यातून वाखाचे दोर, चिंध्या लोंबत असतात. आढयाला असलेल्या फांदीवर चिलटांचे पुंजके बसून राहिले असतात. शाळेत एक टेबल, खुर्ची, एक फळा हे साहित्य असते. टेबलाला लागून असलेल्या लाकडी पेटीत फळा पुसायचे फडके, रूळ, जुने रजिष्टर, खडू इत्यादी साहित्य असते.

**वाडीतील संध्याकाळ**

संध्याकाळ झाल्यावर वाडीत रानातून परत येणाऱ्या मेंढरांचा आवाज येत असतो. मेंढक्यांच्या आरोळया, भुंकणाऱ्या कुत्र्यांचे, माणसांचे बोलण्याचे आवाज येत असतात. कोंबडे, कावळे चिमण्या ओरडत असतात. दुपारी निर्जीव वाटणारी वाडी एकदम जिवंत वाटू लागते.

सगळया वाटा मेंढरांनी भरुन गेल्या असतात. त्यांच्या पायांचा आवाज येत असतो. धुळ उडत असते. धुळीवर शेकडो खूर उधळत असतात. आणि धोतर खोचलेले, खांद्यावर आडवी काठी घेतलेले काळेभोर धनगर तोंडाने आवाज काढत मेंढरांमागून येत असतात. मेंढरे आल्याबरोबर कळपातल्या लेकुरवाळया मेंढया घरी राहिलेल्या पिलांकडे धावत जाऊ लागतात. पिलं आपल्या गुलाबी जिभा बाहेर काढून कातर आवाजात ओरडू लागतात. मेंढयांच्या कासेत शिरून ढुशा देऊ लागतात.

घरोघरच्या धनगरणी चुली पेटवतात. मेंढरांना कोंडू लागतात. बघता बघता गर्द काळोख होतो. सगळीकडे शांत होते.

**पावसाचे आगमन :-**

उन्हाळा संपतो आणि नेमोचि येणारा पावसाळा येतो. आभाळ झाकोळून येते. स्वच्छ ऊन दिसेनासे होते. वारा सुटुन सगळीकडे धूळ उडू लागते. आणि बघताबघता पावसाच्या धारा कोसळू लागतात. 'घनघनमाला नभी दाटल्या, कोसळती धारा.' अशी वाडीत स्थिती येते. मृगाचा पाऊस बनगरवाडीला झोडपत राहतो. भिजू लागणारी भटकी कुत्री आडोशाला उभी राहतात. वाडयात भिजणाऱ्या मेंढरांना धनगर झोपडीत आणतात. भिजलेल्या लोकरीचा वास धनगरांच्या घरात दरवळतो. पावसाच्या सरीवर सरी येतात. तापलेल्या जमिनीतून वाफा निघू लागतात. चिखल होतो.

काडाने शाकारलेली धनगरांनी घरे गळू लागतात. सारवलेली जमीन ओली होऊन उरवणू लागते. गळणाऱ्या जागी धनगरणी भांडी ठेवतात. भांडयात ठिबकणाऱ्या पाण्याचा आवाज येऊ लागतो.

पोपटी रंगाचे गवत जमिनीतून डोके वर काढते. सर्वत्र झगझगीत पोपटी रंग दिसू लागतो. बारक्या बेडक्या दिसू लागतात. त्यांच्यावर कावळे झडपा घालू लागतात. विटकरी रंगाच्या वाण्यांना पोरे हात लावून ते गोल झाले की पैसा म्हणून हातावर घेऊ लागतात. माळरान भिजते आणि हिरव्यागार माळावर काळीभोर मेंढरे हिंडू लागतात.

वाडीत पडणाऱ्या पावसाचे व त्यामुळे रंग बदलणाऱ्या वाडीचे दर्शन अतिशय आल्हाददायक वाटते. तसेच वाडीतील लोकांच्या जीवनाविषयी माहिती मिळते. वाडीतील वातावरण नजरेसमोर साकारते.

**बनगरवाडीतील शेते, पिके.**

बनगरवाडीत बहुतेक वस्ती धनगरांनी असली तरी काही शेतकरी ही तिथे राहत असतात. शेतात ज्वारी, बाजरी, तूर, हरबरा, कडधान्ये इत्यादी पिकं निघतात. या पिकाचे सुंदर वर्णन या कादंबरीत येते.

बाजरीला कणसे आल्यावर ती वाऱ्याने डोलू लागतात. आणि जांभळया फुलोऱ्यानी फुलून जातात. कणसांवर मुंग्या चढू लागतात. मधमाशा फिरु लागतात. तुरीच्या झाडांवर सावळया शेंगा येतात तर बांधावर कुर्डुचे पांढरेजांभळे तुरे येतात. ज्यांची राने असतात ते राखणीसाठी रानात जाऊ लागतात.

हिरवेहिरवे खाऊन मेंढरे गुबगुबीत होतात. दसरा झाल्यावर बाजरीची काढणी सुरु होते. ज्वारीची पिकं मोठी होतात. आणि ठिकठिकाणी आगटया पेटवून लोक हुरडा भाजून खाऊ लागतात. हरबऱ्याला जांभळी फुले येतात. करडयाला पिवळी फुले येतात.

परदेशी पारखरांचा थवा पिकातले दाणे खाण्यासाठी येतो तर शेतकरी त्यांना पटके उडवून पळवू लावतात. रामोशी, त्यांची पोरे या गुबगुबीत पक्षांची शिकार करण्याचा प्रयत्न करु लागतात. फुललेल्या करडयाच्या फुलांवरील मध गोळा करुन मधमाशा पोवळी तयार करु लागतात. ज्वारीचे पीक निघते खळी तयार होतात. कणसांवर मोगलीचे धाव पडून मोत्यासारखी ज्वारी तयार होते. राशी मोजल्या जातात. धान्य घरात येते शेतातून पडलेले उरलेले धान्य गोरगरीब नेतात. पाखरं खातात. जमिन पुन्हा काळीभोर दिसू लागते. शेतकरी कोल्हाटी, दरवेशीचे खेळ पाहू लागतात. गजी नाचू लागतात. ढोल वाजवून त्याच्या तालावर मागे-पुढे पावलं टाकू लागतात. हळूहळू गती वाढत जाते.

वाडीतील सुगीच्या दिवसातील वातावरण अशा प्रकारे उभे केले आहे.

अविनाश सप्रे म्हणतात- 'माडगूळकरांच्या कादंबऱ्या म्हणजे प्रथमपुरुषी निवेदनातून ओसंडून वाहणारे अमृतानुभव आहेत. माणसाचे स्वतःशी, निसर्गाशी आणि समाजाशी असलेले अनुबंध या कादंबऱ्यांतून माडगूळकर नेमकेपणाने दाखवून देतात. आणि माणूसकीचा गहिवर निर्माण करतात. (प्रदक्षिणा-खंड-२,स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीःप्रवृत्ती आणि प्रवाह पृ.१८२

**दुष्काळाचे सावट :-**

बनगरवाडीत त्या वर्षी अजिबात पाऊस पडत नाही. तापलेल्या जमिनी तशाच राहतात. झाडेझुडपे वाळून जातात. विहिरीचे पाणी आटते. हेळ आटतात. अगदी थोडया पाण्यासाठी हेळावर लोकांची गर्दी होते.

जनावरांची उपासमार होऊ लागते. जनावरे रोड होतात. लोकर कातरलेल्या मेंढया बारीक दिसू लागतात. पाण्यासाठी मेंढरांना खूप लांब न्यावे लागू लागते. चिमण्या, कावळे, होले असे पक्षी दिसेनाचे होतात. रानात खायला न मिळाल्याने उंदीर गावात येऊन उच्छाद मांडू लागतात.

लोकांच्या तोंडावरची कळा जाते. डोळयांत भूक दिसू लागते. रामोशांची वाईट दशा होते. दोनदोन दिवस त्यांच्या घरात चूल पेटत नाही. शाळा, तालीम, ओस पडते. अन्न मिळवण्यासाठी सगळयांची धडपड सुरु होते. खाण्याची आबाळ झालेल्या मेंढरात रोगराई पसरते. साथीच्या रोगाने अनेकांची मेंढरं दगावू लागतात. ह्या मेलेल्या मेढरांचे रानात पडून राहिलेले मुडदे खाण्यासाठी गिधाडे येऊ लागतात.

धान्य, वैरण विकत आणणे अशक्य झाल्यावर काही लोक गुरांना बाजार दाखवू लागतात. त्यातून धान्य आणून पोट भरु लागतात. वाडीत राहणे अशक्य झाल्यावर जीव जगवण्यासाठी माणसें गाव सोडून जातात.

वाडीतून बाहेर पडणारी आणि परत येणार मेंढरे, मेंढके दिसनासे होतात आणि वाडी भकास होते. झोपडयांमधून धूर निघत नाही, माणसांचे आवाज येत नाहीत, चावडीसमोर सभा भरत नाही. वाडी निर्जीव होते. शाळा, तालीम, तिथेच राहाते. घरे, झाडे राहातात. माणसे मात्र निघून जातात.

जोरदार वारा घोंघांवत राहातो. वाऱ्याने आलेली धूळ घरांच्या दारांवर, भितींवर बसते. धनगरांची सारवलेली अंगणे धुळीनें, कचऱ्याने भरुन जातात. वाऱ्याने घराची दारे वाजू लागली. तालमीत धूळ साचते. हौद्यातल्या लाल मातीवर धुळीचा भर साचतो. गंजीचा ढोल उंदीर, कुरडतात. शाळा उरवणते.

पोपडयांनी, धुळीने भरुन जाते. फळा, टेबल, खुर्ची सगळीकडे धूळ पसरते. तांबडा मारुती धुळीने माखून जातो. लिंबाच्या झाडच्या टोकावर येणार बगळे येईनासे होतात. शाळेत गोंधळ घालणाऱ्या चिमण्या दिसेनाशा होतात.

अशा प्रकारे दुष्काळाने वाडीच्या झालेल्या दशेचे विषण्ण करणारे वर्णन या कादंबरीत येते.

❖ ❖ ❖

# प्रकरण १६

## सत्तान्तर : कथानक

प्रस्तुत पाठात आपण 'सत्तान्तर' या कादंबरीचे कथानक समजून घेणार आहोत.

'सत्तांतर' ह्या शीर्षकावरून ह्या कादंबरीच्या कथानकाविषयीची कल्पना येते. पण हे सत्तान्तर राजकीय स्वरुपाचे, माणसामाणसांमधले नसून वानरांसंबंधीचे आहे. मुखपृष्ठावरील वानरांच्या रेखाटनामधूनच हे सूचित होते.

लेखक व्यंकटेश माडगूळकरांनी दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे ही वेगळया प्रकारची कादंबरी आहे. ह्यातील कथानक प्रामुख्याने वानरांभोवतीच फिरते. 'हनुमान लंगूर' ह्या जातीच्या वानरांच्या टोळया त्यांचे दैनंदिन व्यवहार, तसेच सत्ता मिळवण्यासाठीचे प्रयत्न इत्यादीचे दर्शन ह्या कादंबरीतून होते. माडगूळकरांनी भंडारा जिल्हयातील 'नागझिरा' अभयारण्यात जवळजवळ महिनाभर वास्तव्य केले त्या वेळी त्यांनी वन्यप्राणिजीवनाचे केलेले सूक्ष्म निरीक्षण, वानरांचे खाणे पिणे, विश्रांती घेणे, इतर प्राण्यांचे शिकार करणे या कादंबरीतून प्रत्ययास येते.

ह्या कादंबरीतील वानरांना लेखकाने त्यांच्या शरीर-वैशिष्ट्यांनुसार नावे दिली आहेत. उदा. शेपूट तुटलेली लांडी तर दंडापर्यंतच डावा हात असलेली थोटी. यामुळे या वानरांना एक व्यक्तिमत्त्व प्राप्त झाले आहे.

मुडया कानाचा नर मुडा, त्याची अनेक वानरी व लहान पिलं असलेली मिश्र टोळी व दुसरी मोगा व त्याच्या पाच साथीदारांची नरटोळी यांच्यात चाललेल्या सत्तासंघर्षाचे चित्रण या कादंबरीत येते.

**संघर्षाची सुरवात :-**

जंगलामध्येही सत्ता मिळवण्यासाठी चाललेला संघर्ष व तोदेखील एकाच जातीच्या प्राण्यांमध्ये, सुरवातीपासूनच दिसतो. ओढंयाच्या काठावर असलेल्या विस्तीर्ण अशा जांभळीच्या झाडावर, दुपारच्या वेळी मुडया वानराची टोळी आराम करीत असते. सगळीकडे शांतता पसरलेली असते. साळुंक्या, कोतवाल यांसारखे पक्षीही गप्प झालेले असतात. आणि त्याच वेळी उंबराच्या झाडावर, जे ओढयाच्या पलीकडे थोडयाच अंतरावर असतं, मोगा ह्या भटक्या नराची टोळी आपल्या हालचालीना सुरवात करते. दात खाणे, गुरगुरणे, नैसर्गिक विधी करणे यासोबतच फांद्याही हलवणे, फांद्यांवरुन उडया मारणे यामुळे कोलाहल होतो. मुडाच्या टोळी वर हल्ला करण्याचा ह्या घुसखोर वानरांचा उद्देश असतो. त्यांच्या आवाजामुळे मुडाच्या टोळीतील वानरात भीतीचे वातावरण पसरते. पण त्याचा नेता मुडा वारुळावर उभा राहून ह्या घुसखोरांकडे पाहून कराकरा दात खात स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव करून देतो. तेव्हा घुसखोर माकडे पळून जातात. टोळीवरचा धोका टळतो. वानरी एकमेकींना मिठया मारतात. मुडा वारूळाखाली येऊन शांत बसतो.

मध्य भारतातील एका मोठया- पानगळी वृक्षाच्या जंगलात हे कथानक घडते. (अर्थात असे कोणत्याही जंगलात घडू शकते) ह्या जंगलात तऱ्हेतऱ्हेचे अनेक वृक्ष, वेली असतात. आंबा, चिंच, जांभूळ, उंबर अशी फळझाडे असतात. तशीच पळस, पांगारा, वृक्षही असतात. अनेक जातीचे पक्षी, जंगली प्राणी सगळयांचे ते वसतीस्थान असते. दयाळ पक्षी, होले, साळुंक्या याचे सुस्वर गायन पहाटे ऐकू येत असते.

ह्याच जंगलातला एक मोठा भूप्रदेश म्हणजे 'मुडा' ह्या वानराचं राज्य असतं. ह्या प्रदेशातील झाड, त्यांची फळं, हिरवळ, पाणी. ह्या सगळयावर त्याची सत्ता असते सोळा जणाची टोळी त्याच्या टोळीतल्या वानरी, लहान-मोठी इतर वानरे यांच्यावर ही त्याचा सत्ता असते. ही सत्ता त्याने स्वतःच्या सामर्थ्यावर मिळवली असते व ती टिकवून ठेवण्यासाठी त्याला नेहमीच सावध राहावे लागते कारण जंगलात इतरही अनेक वानर-टोळया असतात. ह्या टोळयांमध्ये कायमच सत्तेसाठी संघर्ष सुरू असतो. वानरांच्या टोळीतील नवीन जन्मलेल्या नर असलेल्या पिलाला टोळीतून बहुतेक हाकलून दिले जाते. माद्या मात्र त्याच टोळीत वर्षानुवर्ष राहत असत. नर म्हणून जन्माला आलेली पोरे हाणामाऱ्या करत, घुसखोरी करत सत्ता मिळवायचा प्रयत्न करतात. कधी त्यात त्यांना यश मिळते कधी पराभूत होऊन पळून जाणं किंवा जीव गमावणं वाटयाला येई.

ह्या कादंबरीत घटना / प्रसंग फारसे नाहीत. पण त्या घटनांच्या निवेदनाबरोबर जंगलातील प्राण्यांच्या वागण्यातील बारीक सारीक तपशील माडगूळकरांनी रंगवले आहेत. साधा पाणी पिण्याचा प्रसंग. पण तो ही किती जोखमीचा असू शकतो. जीवन देणारे पाणी पितांना मरण येण्याची शक्यता नाही खूप जास्त असते. इत्यारी बाबी कुशलतेने चित्रित केल्या आहेत

**पाणी हे जीवन ?**

ते उन्हाळयाचे दिवस असतात. दुपारच्या वेळी सर्वच वानरे तहानेने व्याकुळ होतात. पण पाणी पिण्यासाठी तळयावर जाणे म्हणजे जीव धोक्यात घालणंच असते. इतर ओढे, नाले डबकी सगळयातले पाणी आटल्यामुळे तळे हा एकच पर्याय असतो. तळयाजवळच्या गर्द झाडीत एखादा हिंस्त्र पशू दबा धरुन बसला असल्याची शक्यता असते. त्यामुळे पाणी पिण्यासाठी जाताना वानरे खूप काळजी घेतात. आधी मुडा हा टोळीप्रमुख तळयाकाठच्या उंच सागाच्या झाडावर थोडा वेळ बसून आजूबाजूचा कानोसा घेतो. परिस्थितीचा अंदाज घेत हळूहळू खाली उतरतो. पाणी पिण्यासाठी जाण्याची जोखीम टोळीप्रमुख असल्याने मुडानेच घ्यायची असते. आधी तो पाण्यापासून दहा-पंधरा पावलं अंतरावर थोडा वेळ बसून राहतो. मग पाण्याच्या काठाशी जातो. चौफेर बघून घेतो. पण वाकून पाण्याला तोंड लावून पाणी पिण्यातही जोखीमच असते. कारण मागून कोणी आले जर ते त्याला दिसणार नसतं:मग त्या टोळीतील तरणी वानरी जी जरा धीट असते ती सागावरुन उतरुन खाली येते व मुडाच्या मागे हातभर अंतरावर बसते. मागे तरणी आली आहे हे बघून मग.मुडा खाली वाकून पाणी पितो.

मग टोळीतील तीन पोरे खाली उतरतात. मुडा पाणी पिऊन गेल्यावर तरणी, मग त्या तीन पोरातील एक पोरे पाणी पिते. बाकी दोघे मागे राखण करतात. अशा प्रकारे सगळी वानरे पाणी पितात. जवळजवळ अर्धातास हा विधी सुरु असतो.

**बोथरीचा मृत्यू :-**

संध्याकाळी काकडवृक्षावर वानरांची टोळी बसली असतात अचानक मोराच्या ओरडण्याचा, केकाचा आवाज पलीकडच्या नाल्यातून ऐकू येतो. त्या आवाजाने, टोळी सावध होते व स्तब्ध बसून राहते. नंतर चितळ-हरणांचाही 'पुक - पुक असा आवाज येतो. मादी आणि तिचे पाडस वानराची टोळी जिथे बसली असते त्या झाडाखालून वेगात धावत जातात. कोणीतरी हिंस्त्र पशू आला असल्याचं वानरांना कळते. कोणाचा तरी जीव आज जाणारच असतो.

मुडा वानरांना सावधानतेचा इशारा देतो.'खकर्रखक' वानरांना बरोबर कळतो. 'खाली काळ टपून बसला आहे तेव्हा झाडावरच थांबा सावध राहा.' असा इशारा मिळाल्यावर वानरे गप्प बसून राहतात.

पण बोथरीला (म्हातारी वानरी) काय बुद्धी सुचते की ती ज्या झाडावर उंच फांदी धरुन बसली असते ती सोडून दुसऱ्या सुरक्षित झाडावर जायचं ठरवते. ती खाली येऊन पंचवीस एक पावलावरच्या त्या झाडावर जाणार तेवढ्यात एक रानकुत्रा तिच्यावर झेप घेतो. आपल्या पोलादी जबड्यात तिचा गळा पकडतो. पकड घट्ट करून तिच्या छातीवर एक पंजा ठेवतो. शेपूट जमिनीवर आपटत थोडा प्रतिकार करत असलेल्या बोथरीचं अंग लुळं पडत. मग एक कुत्री धावत येऊन तिच्या मांडीचा लचका तोडते. मग त्याची सहा पिलं येतात. व बोथरीवर तुटुन पडतात. बोथरी म्हातारी असते. व तिच्याजवळ ना अक्राळविक्राळ जबडा असतो ना तीक्ष्ण नख्या. स्वतःचं संरक्षण करण्याचं कोणतही हत्यार तिच्याजवळ नसतं ती प्राणाला मुकते. तिथे वासाखेरीज काही उरत नाही. रानकुत्री तिचे आतडे, हाडे सगळं खाऊन टाकतात. हा सारा प्रकार पाहून घाबरलेली इतर वानरे बराच वेळ दात वाजवत, फांद्या हालवत राहतात. जंगलात असे प्रकार नेहमीच चाललेले असतात.

**मुडाच्या शेजारी लालबुड्या**

लालबुड्या हा मुडाच्या शेजारी राहणारा. तो ताकदवान होता. सात वानरी दोन कळती पोर.त्याच्या टोळीत असतात. मुडासारखाच तो त्याच्या टोळीचा प्रमुख होता. मुडा रोज सकाळी झाडाच्या सर्वात उंच फांदीवर चढून, आभाळाकडे तोंड करून 'हुप्प .......... हुप्प' असा जोरात आवाच करत असे. हा आवाज ऐकून त्याला आजूबाजूच्या भागातून उत्तर ऐकू येई. त्यात एक लालबुड्याचे उत्तर असायचे.हे ऐकल्यानंतर आज खाणे शोधायला कुठे जायचे ते मुडा ठरवायचा व बाकीचे त्याच्या मागे जायचे.

एक दिवस उंच झाडावरील फळे खाण्यापेक्षा एका चारोळीच्या झाडाखाली पडलेल्या चारोळ्या मुडाच्या टोळीतील सर्व खात असतात.हे खात असताना टोळीचा प्रमुख आला की, इतरांनी बाजूला होऊन त्याला जागा करून द्यायची ही नेत्याला अदब दाखवण्याची त्यांची पद्धत असते. तशी ते आज प्रथम तरणीला व नंतर मुडाला दाखवतात. चारोळया खाण्यात, सर्व गुंग असतानाच लालबुड्याला उंच, झाडाच्या फांदीवरुन ते दिसतात. तो हूप्प हूप्प असे आधी अंतरांअंतरानं व नंतर जलद असे तीन वेळा आवाज करतो. फांद्या जोरजारात हलवतो. करकर दात चावतो, गुरगुराट करतो. ह्या आवाजाने मुडाची टोळी सावध होते. मुडाही झाडावर चढून फांद्या हलवतो. आवाज करतो. आव्हान प्रतिआव्हान देण्याची ती त्यांची पद्धत असते. थोड्याच वेळात दोन्ही टोळया एकमेकांसमोर येतात. लहान पोरे एकमेकांवर धावून जातात. लालबुड्या व मुडा यांच्यात आता चांगली लढाई होणार असे वाटत असतानाच लालबुड्या माघार घेऊन

पळून जातो. मुडा त्याचा थोडा पाठलाग करतो. दोन्ही टोळयातील वानरी पण एकमेकांवर खेकसत भांडतात. असे बराच वेळ थोड्या थोड्या अंतराने सुरु राहते.

लालबुड्याच्या टोळीत लहान तान्हं पोर नसतं. मुडाच्या टोळीतील थोटीचे तान्हे पोर लालबुड्याच्या टोळीतील काळी वानरी हिसकावून नेते. थोडा वेळ ते सर्व वानरींकडे फिरत राहते, किंचाळत राहते मग थोटीसोबत उनाडी, लाजरी धावून जातात व पिलाला सोडवून आणतात.

दोन टोळयांमधील ही लढाई लुटुपुटुच्या लढाईसारखी असते. ती विकोपाला जाऊ न देण्याची ते खबरदारी घेतात अशा तऱ्हेचे त्या दोन टोळयातले सहजीवन असते.

**लालबुड्या नाहीसा होतो**

लालबुड्या वानर एक दिवस अचानक नाहीसा होतो. नेहमीप्रमाणे रात्री झोपण्याचे झाड ठरविण्यासाठी सर्व जाणत्या माद्या त्याची वाट पाहतात. पण त्याचा आवाज येत नाही. तेव्हा माद्यापैकी एक जरा वरचढ असते ती एक झाड शोधते, जे उंच असते व त्याच्या खाली एक सांबर बसलेला असतो. वानरे झोपण्यासाठी जे झाड शोधतात ते, मोठे उंच असे व त्याच्या बुडाशी काही इतर प्राणी म्हणजे गाई, वासरे, गवे बसलेले असत, ते झाड सुरक्षित समजले जायचे.

सकाळी उठल्यावर खाण्यासाठी कुठे जायचं ते ठरवण्याचं कामही लालबुड्या नसल्याने थोराड व वरचढ वानरीच करत.

खाण्यासाठी झाडाच्या शेंड्यावरून कधी कधी टोळीपासून, आपल्या हद्दीपासून थोडं दूर जाण्याची लालबुड्याला सवयं असते.तो झाडाच्या ढोलीत हात घालून रानकोंबडीनं किंवा लोंडोरीनं घातलेली अंडी शोधून फस्त करायचा ह्यात जिवाची जोखीम होतीच. कारण अशी पाखरांची अंडी शोधायला इतरही प्राणी उदा. कोल्हे, रानडुक्कर, वाघ येण्याच शक्यता असायची. असाच अंड्याच्या शोधात जात असताना अचानक त्याचा हात एका सापावर पडतो व साप त्याच्या हाताला चावतो. साप विषारी असतो. थोड्याच वेळात त्याचा हात सुजतो. त्याला अतिशय वेदना होऊ लागतात.साप चावल्याचं लालबुड्याला कळलं असतं पण त्याच्यावर उपाय मात्र त्याला माहीत नसतो. वेदना असह्य होतात. शेवटी श्वास घ्यायलाही त्रास होत त्याचा मृत्यू होतो.

जंगलात असा एखाद्या प्राण्याचा शेवट झाल्यावर जे होतं तेच लालबुड्याचही होत. तांबड्या मुंग्या त्याच्या शरीरावर गोळा होतात. सकाळ झाल्यावर पाखरे माश्या त्याच्या भोवती गोळा होतात. पाखरे त्याच्या शरीरात, तोंडात चोची खुपसतात. गिधाडे, मग, तरस कोल्हे सगळे येऊन लालबुड्याच्या मृत शरीराचे लचके तोडतात. तरस तर बरगड्यांची हाडंही उचलून नेतात. टोळीचा राजा असलेला लालबुड्याच्या अस्तित्वाचा मागमुसही शिल्लक राहत नाही.

**लालबुड्याची बेवारशी टोळी / सत्तासंघर्ष**

लालबुड्या नाहीसा झाल्याचे कळल्यावर मुडा त्या टोळीला आपल्या टोळीत सामावून घेण्याचा विचार करतो. त्याचे साम्राज्य, प्रजा ह्यामुळे वाढणार असते. अन्न वाढणार असते व तो अधिक सामर्थ्यवान शक्तिशाली असा प्रमुख होणार असतो. त्यामुळे तो दिवसा लालबुड्याच्या टोळीतील दोन नुकत्या शहाण्या

झालेल्या वानरीबरोबर बराच वेळ घालवतो व संध्याकाळी आपल्या टोळीत परत येतो. अशा प्रकारे तो दोन्ही टोळयांवर वर्चस्व गाजवण्याचा प्रयत्न करतो. दोन्ही टोळयातील माद्या एकत्र येतील असे त्याला वाटत असते. पण मुडाच्या टोळीतल्या वानरींना हे एकत्र येणे नको असते. त्यामुळे त्या लालबुड्याच्या टोळीतील वानरींवर हल्ला करतात. कारण मोठी टोळी सांभाळणे एका नराला शक्य होणार नाही व मग इतर घुसखोर वानरांच्या हल्ल्याला तोंड द्यावे लागेल व त्यातून विनाश होईल हे त्यांना कळत असतं. तर लालबुड्याच्या टोळीतील वानरींना संरक्षणासाठी एक नर हवा असतो. मुडाच्या टोळीतील पोरं पळवून आणल्यास पोरांपाठोपाठ त्यांच्या आया येतील, आपल्यात राहतील व मुडाचं संरक्षण मिळेल अस लालबुड्याच्या टोळीतील वानरींना वाटत असल्याने त्या मुडाच्या टोळीतील लांडी, थोटी वगैरेंची मुल पळवून नेण्याचा प्रयत्न करतात.

याच वेळी मोगा हा घुसखोरही लालबुड्याच्या टोळीचे प्रमुखपद मिळवण्याच्या विचारात असतो. लालबुड्या नाहीसा झाल्याचं त्यालाही कळले असतेच एकदा मोगा दबकत दबकत लालबुड्याच्या कळपात शिरतो. तो शरीराने भक्कम व तीक्ष्ण दृष्टीचा असा असतो. लालबुड्याच्या टोळीतील एक वानरी त्याच्याशी जवळीक करते ती इतर वानरींच्या देखतच. त्या तिकडे दुर्लक्ष करतात कदाचित असे होणे त्यांनी गृहीतच धरले असावे. पण काही वेळाने अचानकच मोगाच्या आणि वानरीच्या लक्षात येते की पलीकडच्या उंच फांदीवरून मुडा त्यांच्याकडे बघत असतो. आता या दोघांमध्ये हाणामारी व जोराची लढाई होणार, कोणीतरी एक जखमी, पराभूत होणार याची सर्वांनाच कल्पना येते पण मोगा न लढता पळून जातो. मुडा त्याचा पाठलाग करत त्याच्या मागे धावतो.

मोगा पळून गेला तरी पुनः पुनः लालबुड्याच्या टोळीवर वर्चस्व मिळवण्याचा त्याचा प्रयत्न सुरुच ठेवतो. त्याला मुडा बुभूःकाराने इशारा देत असे आणि त्याच्या आव्हानाला प्रतिआव्हान न देता मोगा पळून जात असे. पण नंतर मोगा आपल्या पाच साथीदारांसह दोन तीन वेळा हद्द ओलांडून मुडाच्या ताकदीचा अंदाज घेतो. लालबुड्याच्या टोळीत वानरी असल्या तरी त्यांचे बळ काही फारसे नसते. मुडाच्या टोळीत किती धाकटे नर वानरी किती याची व्यवस्थित कल्पना त्यांना येते काही काळ जाऊ दिल्यावर एक दिवस मोगा आपल्या पाच साथीदारांसह मुडाच्या टोळीवर हल्ला करतो. ह्या पाच साथीदारांपैकी एक चांगला तरुण, तगडा असा असतो. तो मुडावर चाल करून जातो. तो फार चलाख व चपळ असतो. तो मुडाला चावे घेऊन बेजार करतो. तर मुडाही त्याच्यावर हल्ला चढवतो व त्याला पळवून लावतो पण त्याचवेळी मोगा त्याच्यावर चाल करून येतो व त्याला जखमी करतो. रक्तबंबाळ झालेला मुडा खाली कोसळतो. मोगा आपल्या साथीदारांसह पळ काढतो. तरी टोळीतील वानरांची भीती कमी होत नाही. काही पोरांनी मार खाल्ला असतो. एकाच बोट तुटतं. काही जणांच्या अंगावर ओरखडे उमटतात.

रात्री झोपायला झाड शोधायचे काम तरणीच करते. मुडा गळून गेला असतो. त्याच्या अंगातून बरेच रक्त वाहून गेले असते. सगळी टोळी गप्प असते.

यानंतर मोगा व त्याचे साथीदार मुडावर पुनः हल्ला करतात. यावेळी मुडा जास्त जखमी होतो व पळून जातो तेव्हा मोगा त्याचा पाठलाग करतो. मुडाच्या अंगातून खूप रक्त वाहून जातं. खाली झुडपाची पान लाल होत जातात. पाणी पिण्यासाठी मुडा पाण्याच्या काठावर येतो. थोडं पाणी पितो व तिथेच मरुन पडतो. त्याच्या रक्ताचा रंग पाण्यात मिसळतो. मुडाचं प्रमुखपद मोगाकडे जातं.

नंतर मोगा मुडाच्या टोळीतल्या चारही नर पोरांना मारून टाकतो. लांडी, बोथरी विरोध करतात, जखमी होतात. थोटी आपली पोर घेऊन दूर पळून जाते.

चार वर्षापूर्वी मोगा ज्या टोळीत होता त्या टोळीच्या प्रमुखाला, मुडानं हाणामारीत पराभव करून पळून जायला भाग पाडलं असत आपल्या टोळीतल्या बायका पोरांना सोडून तो पळाल्यावर मुडानं मोगा व त्याच्या पाच नर साथीदारांनाही पळवून लावलं असतं मोगाच्या ह्या टोळीला स्वतःचा प्रदेश नसतो, सत्ता नसते. इतरांच्या भूमीत शिरून ते खात असतो. पण आता तो मुडाला मारून त्याची सत्ता काबीज करतो. त्याच्या वानरी, त्याची भूमी सर्व मोगाचं होत. सत्तेच चक्र फिरलेले असते.

**संघर्षाचे रहाटगाडगे :**

काही दिवसांनी एका रात्री मुडाच्या टोळीतील तरणी विते. ते पोर नर आहे की मादी? ती उत्सुकतेने पहाते. वानरांच्या साम्राज्यात नर असण्याला एक विशेष महत्त्व असतं. तरणीचे पोर नर असते. कदाचित पुढे मोठा होऊन हा मोगाशी लढेल आणि टोळीचा प्रमुख होऊ शकेल. आज मोगाचे झालेलं मुडाचे असलेले साम्राज्य त्याचे होऊ शकेल.

सत्तासंघर्षाचे हे रहाटगाडगे असेच सुरु राहणार असते.

कथानकाची सुरवात संघर्षानं, बोथरीच्या मृत्यूने होते. तर शेवट तरणीच्या पोराच्या जन्माने होतो.

दि.बा.मोकाशी यांच्या 'आमोद सुनासी आले' ह्या कथेची आठवण ह्या सुरवात व शेवटामुळे होते

❖ ❖ ❖

# प्रकरण १७

## सत्तान्तर : व्यक्तिरेखा

प्रस्तुत पाठात आपण 'सत्तान्तर'या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखांचा परिचय करून घेणार आहोत.

**व्यक्तिरेखा परिचय :**

कादंबरी हा जीवन व्यवहाराबरोबर प्रवास करणारा प्रवाही असा साहित्यप्रकार आहे. जीवनव्यवहारांच्या केंद्रस्थानी मनुष्य असतो. त्याच्या क्रिया - प्रतिक्रिया, वाद - संवाद, साद - प्रतिसादांमुळे जीवनाला विविध रंग प्राप्त होतात आणि मग मनुष्याचे व्यक्तिमत्त्व तयार होते. अशी व्यक्तिमत्त्वांच्या, पात्रांच्या इच्छा-आकांक्षा, क्रिया प्रतिक्रिया यांचे दर्शन घडवून ते खरेखुरे वाटावेत असा प्रयत्न कादंबरीकार करीत असतो.

पात्रांच्या कृती उक्तीतून, संवादातून पात्रांचे स्वभावविशेष वाचकांना समजतात. या पात्रांशी निगडित अशा आणि पात्रांना प्रभावित करतील अशा घटना कथानकात दाखविलेल्या असतात. निवेदन, पात्रांचे बोलणे आणि वागणे यातून कथानक पुढे सरकत असते.

'सत्तान्तर' कादंबरी ही वानरांच्या जीवनावर आधारित आहे. त्यामुळे यातील व्यक्तिरेखा म्हणजे वानरेच आहेत. कादंबरीचे कथानक ज्या पात्रांभोवती फिरते ती प्रमुख पात्रे. ती कादंबरीच्या केंद्रस्थानी असतात. यातील प्रमुख व्यक्तिरेखा म्हणजे मुडा वानर, त्याचा प्रतिस्पर्धी 'मोगा' मुडाच्या शेजारी टोळीप्रमुख लालबुड्या ह्या आहेत.

याशिवाय मुडाच्या टोळीतील तरणी, लांडी, उनाडी अशा सात वानरी, मोगाचा दाढीवाला साथीदार अशा गौण व्यक्तिरेखा आहेत.

**मुडा :**

मुडा हा ह्या जंगलातील एका वानर टोळीचा प्रमुख होता. त्याच्या डाव्या कानाचा, वरच्या बाजूचा मोठा तुकडा मारामारीत तुटला होता. आणि तो मुड्या झाला होता. तो पिळदार स्नायुंचा, खैराच्या गाठीसारखा टणक आणि वजनदार शरीर असलेला असा होता. त्याच्या शरीरावर मारामारीच्या अनेक खूणा होत्या. शेपटीवर सुद्धा मोठा लांब वण होता.

स्वभावाने तो फार संतापी होता. तो संतापला म्हणजे जवळ जाण्याचं धैर्य वानरींना होत नसे. फक्त तरणी वानरीच त्याच्यापाशी धीटपणाने जायची.

ह्या अरण्यात त्याचे म्हणावे असे राज्य होते. तळे आणि नाला यामधला एक मैलभर असा भूप्रदेश त्याचा होता. व हे राज्य त्याने स्वतःच्या सामर्थ्यावर मिळवलेले होते. नर म्हणून जन्माला आलेल्या वानाराच्या पोराला टोळीत जास्त काळ राहता येत नसे. थोडा मोठा झाल्यावर टोळीतून हाकलून दिले जात असे. मग ह्या पोराने हाणामाऱ्या करून, इतर वानरांशी लढून टोळी बनवावी. अर्थात तो जंगलात

वाचला तरच. आणि हे राज्य, टोळीप्रमुखपद ज्याच्या अंगात शक्ती जास्त त्यालाच मिळत असे. दुसऱ्या एखाद्या टोळीच्या वयस्कर अशा प्रमुखाला मारुन किंवा पळवून लावून त्याची टोळी आपली म्हणून त्यावर राज्य करायचं, त्या टोळीचं भूमी, वानरी सगळे ह्या जिंकणाऱ्या वानराला मिळत असे. त्या टोळीतील नर पोरांना हा नवीन प्रमुख एक तर हाकलून देत असे किंवा मारुन टाकत असे.

मूडाही असाच टोळीप्रमुख बनला होता. त्याच्या प्रदेशातील फळझाडे, झाडांची कोवळी पालवी, डिंक, फळेफुले सगळे त्याचे होते. इथली खारमाती त्याला चाटण्यासाठी होती. टोळीतील सगळ्या वानरी, पोरंबाळे सगळी त्याची होती.

त्याची सोळा जणांची टोळी होती. त्यात सात वानरी, चार लहान पोरं, तीन वर्षा सव्वा वर्षाची नरपोर होती आणि दोन वयात आलेल्या पोरी होत्या.

मुडाने मिळवलेले राज्य टिकवून ठेवणे जंगलात फार कठीण होते. कारण इतर वानर टोळीमधील हाकून दिलेली पोरे मोठी होऊन त्याला आव्हान देत होती.

आपल्या टोळीचे संरक्षण करणे रोजचे खाणे, अन्न पाणी शोधणे, रात्री झोपण्यासाठी सुरक्षित असे उंच झाड शोधणे हे त्याला टोळीप्रमुख म्हणून करावे लागायचे. मुडा शक्तीशाली असतो. त्यामुळे प्रतिस्पर्धी पळ काढतात.

उदा. एखादा मोगा व त्याचे साथीदार मुडाच्या टोळीवर हल्ला करण्याच्या उद्देशाने, उंबराच्या झाडावर गुरगुराट करतात. नैसर्गिक विधी करून उग्र भपकारा हवेत सोडतात. दात खातात. हुप्प हुप्प असा आवाज करतात. वरच्या फांद्यावरून खालच्या फांदीवर दणादण उड्या टाकतात. थोडक्यात सारा परिसर दणाणून सोडतात. पण मुडा अचानक झाडीतून बाहेर येतो व या धुसखोरांच्या समोरच वारुळावर बसून करकरा दात खातो. गुरगुराट करतो आणि मोगा व त्याचे साथीदार घाबरून पळ काढतात. ते गेल्यावरही मुडा त्या दिशेकडे बघत गुरगुर करत रहातो.

टोळीचं संरक्षण करण्याबरोबरच राज्याचा विस्तार करण्याचा तो विचार करतो. त्याचा शेजारी लालबुड्या जेव्हा अचानक नाहीसा होतो व सहा सात दिवस झाल्यावरही येत नाही तेव्हा मुडा त्याच्या टोळीवर वर्चस्व गाजवण्याचा प्रयत्न करतो. उघड्या पडलेल्या लालबुड्याच्या टोळीतील वानरींना तो वश करून घेतो. दोन्ही टोळयांचे एकत्रीकरण करण्यासाठी दिवसा लालबुड्याच्या टोळीत व रात्री स्वतःच्या टोळीत राहतो.

पण त्याच साम्राज्य फार काळ टिकत नाही. दोन टोळयांचं एकत्रीकरण होत नाही. मोगा आपल्या साथीदारांसह हल्ले करतच असतो. एका हल्ल्यात मुडा जबर जखमी होतो. अंगातून खूप रक्त वाहून जातं. रात्री झोपायचं झाड सुद्धा तो शोधू शकत नाही. अशा जखमी अवस्थेत असतानाच मोगा पुनः हल्ला करून त्याच्या उजव्या बरगडीजवळ जखम करतो. मुडा पराभव पत्करून पळून जातो. मोगा त्याचा पाठलाग करतो मुडाच्या शरीरातल खूप रक्त वाहून जातं त्याला पळण अशक्य होत.

पाणी पिण्यासाठी तो पाण्याजवळ येतो पाणी पितो. अशाही स्थितीत तो इकडे तिकडे पाहून घेतो. पण पाण्यात स्वतःचे प्रतिबिंब पाहतो. तिथेच तोल जाऊन पडतो व एकटाच तिथे मरुन पडतो. त्याची टोळी दूरच राहते. (दुःखद अंत)

ज्या मोगाला मुडानं त्याच्या टोळीवर हल्ला करून हाकलून लावल होतं तोच मोगा आता मुडाला मारून स्वतः टोळीप्रमुख बनतो.

'बळी तो कान पिळी' चं प्रत्यंतर यातून येतं. हाच जंगलाचा कायदा असतो.

लालबुडया:-

लालबुड्या हा मुडाचा शेजारी होता. त्याची तेरा जणांची वानर-टोळी होती. मुडाच्या शेजारचा जवळपास कोसभर अरण्याचा भाग ही त्याची भूमी होती. हा सुध्दा चांगला ताकदवान व वजनदार असा सात वर्षे वयाचा नर होता. त्याच्या बुडावर दोन्ही बाजूला लालसर रंगाची ठिगळं होती व उडया मारीत निघाला की ती स्पष्ट. दिसायची. त्याच्या ह्या वैशिष्टयामुळे त्याला लालबुडया हे नाव लेखकाने दिले.

लालबुडयाचा जन्म झाला त्यावेळी जंगलातील एका भागाला आग लागली होती. ह्या आगीने जंगलातील झाडाझुडपांबरोबरच लहान किडे, मोर, रानकोंबडया, ससे, घोरपडी पिकं, टिटवीची, अंडी यांचा विनाश केला होता. आगीच्या उष्णतेमुळे हरणीचे गर्भपात झाले होते. पण लालबुडया मात्र त्याच्या आईच्या पोटात सुरक्षित राहिला होता.

वानरांच्या टोळीतील इतर वानरी त्याला लहान होता, तेव्हापासून आईजवळून ओढून नेत व फांद्यावरनं उडया घेत. तेव्हा लालबुडयाला खूप भीती वाटायची. मात्र आईची उब, दूध मिळालं की तो सुखावायचा. जंगलात इतरही हिंस्त्र प्राणी, पक्षी वानरांवर हल्ला करत. ते बघतच लालबुडया मोठा झाला होता. त्याच्या बरोबरीच्या त्याच्या खेळगडयाला एका बाज पक्षाने झडप घालून, दोन पायांच्या नरव्यात पकडून नेताना लालबुडयाने पाहिलं होतं. तेव्हापासून पक्ष्यांच्या सावलीचीदेखील त्याला भीती वाढू लागली होती.

खाण्यापिण्याचे धडे त्याला लहान वयातच मिळाले. तो लवकरच स्वतंत्र झाला होता. त्याच्या वयाच्या इतर वानरांबरोबर मस्ती करत, कुस्त्या खेळत तो मोठा होत होता. थोडा मोठा झाल्यावर त्याच्या स्वभावातली आक्रमकता दिसून येऊ लागते. खाण्यापिण्यासाठी, झोपण्यासाठी, बसण्यासाठी, जे उत्तम असेल तेच त्याला हवं असायचं. त्यासाठी तो इतरांशी मारामारी, धक्कीबुक्की करुन हवं ते मिळवू लागला. इतर वानरी, पोर त्याला भिऊ लागले. होते. त्याच्यातले हे नेतृत्वगुण दिसल्यामुळेच की काय त्याची त्याच्या भावासकट टोळीतून हकालपट्टी झाली होती. जसं वानरांच्या टोळी होतं की नर असलेल्या पिलांना थोडे मोठे झाल्यावर हाकलून देण्यांत येतं. मग त्यांनी जे काय मिळवायचं ते स्वतःच्या बळावर, नाहीतर, मार खावा, इतर कोल्हा-तरस वाघ यांचं शिकार व्हावं. त्यांच्या बाबतीत जीवन हा अपघात असायचा!

लालबुडया हा शक्तीशाली व आक्रमक स्वभावाचा असल्याने एका टोळीचे प्रमुख पद मिळवतो. त्याच्या हद्दीत घुसाणाऱ्यांवर तो चाल करुन जातो.

सकाळी उठून झाडाच्या उंच फांदीवर जाऊन 'हुप्प हुप्प' असा आवाज करण्याची त्याची पध्दत होती. त्याचा आवाज आला की मुडा ही तसाच आवाज काढत असे. सकाळी खाणं मिळण्यासाठी कोणत्या दिशेला जायचं ते तो ठरवत असे व टोळी त्याच्या मागून जायची. रात्री झोपायाचं झाडही तो ठरवायचा. पुढे त्याच्या व मुडाच्या टोळीत लुटपुटुची भांडणं होत असत. अर्थात, निकराच्या लढाईचं स्वरुप त्या भांडणाला दोन्ही

टोळी प्रमुख येऊ देत नसत. कारण त्यातून विनाश अटळ होता. तो टाळून आपापल्या बळाची कल्पना प्रतिस्पर्धी टोळीला यावी अशा उद्देशाने ह्या लढाया खेळल्या जायच्या.

लालबुडया थोडा साहसी होता. स्वतःची टोळी व हद्द सोडून फार लांब कुठे तो जात नसे. पण थोडे दूरपर्यंत झाडांच्या शेंडयावरून उडया घेत जायची त्याला सवय होती व असे करताना तो कधीकधी टोळीपासून दूर जात असे. झाडावर, जमिनीवर वेगवेगळया पक्षांनी घातलेली अंडी शोधून ती फस्त करणं ह्यात त्याला मजा वाटायची, आनंद वाटायचा हा आनंद मिळवण्यासाठी तो थोडी जोखीमही पत्करत असे. पण हीच जोखीम घेण्याच्या भरात, अंडी शोधण्याच्या नादात लालबुडयाला आपला जीव गमवावा लागतो.

चितूर पक्षिणीनं घातलेली अंडी खाण्यासाठी जाताना त्याचा हात एका सापावर पडतो. विषारी साप त्याच्या हाताचा चावा घेतो. सापाने चावा घेतल्याचं त्याला कळत. तो बडबडत झाडावर जाऊन बसतो. पण थोडयाच वेळात त्याचा हात सुजतो. वेदना त्याला असह्य होतात. श्वास घेणंही कठीण होतं. आणि कधीतरी त्याचा जीव जातो. आपल्या टोळीपासून दूर एकटाच तो मरून पडतो.

त्याच्या निर्जीव शरीरावर लाल मुंग्या, टकाचोर पक्षी, तरस, कोल्हे, गिधाडे सगळे हल्ला चढवतात. दुसऱ्या दिवसापर्यंत तिथे काहीही उरत नाही. वानरटोळीच्या राजाची दुर्दैवी अखेर होते. हाय जंगलचा न्याय असतो.

**थोटी**

ही मुडाच्या टोळीतली एक लेकुरवाळी वानरी होती. ती लहान असतानाच एका घुसखोर वानरानं तिच्यावर हल्ला केला. होता. तिच्या आईकडून तिला पळवून तिच्या डावा हाताचा चावा घेतला होता. व नंतर टाकून दिले होते. त्यामुळे तिचा डावा हात दंडापर्यंतच होता. तशा एका हाताने ती आपल्या पिलाला सांभाळायची, त्याला घेऊन फिरायची. थोटया हाताची पर्वा न करता भांडणात पुढे व्हायची.

भांडणाची खुमखुमी तिच्यात होती. एकदा मुडा व त्याचा शेजारी लालबुडया यांच्यातलं लुटुपुटीचं भांडण संपलं असताना ती आपल्या पोराला दुसऱ्या उनाडी ह्या वानरीजवळ सोडून चवताळून लालबुडयाच्या टोळीतल्या वानरीच्या अंगावर धावून जाते. बराच वेळ वानरींच भांडण, केस ओढणं, चापटया मारणं अशा स्वरूपात सुरु असतं.

आपल्या पोरावर तिचा फार जीव असतो. इतर वानरी तिच्या पोराला नेऊन हिंडवायच्या तेव्हा पोराचे हाल होऊन ते ओरडू लागलं की ही धावत जाऊन त्याला घ्यायची. पण लालबुड्याच्या टोळीतली एक वानरी येऊन तिच्या पिलाला हात घालते तेव्हा ती पिलाला घट्ट छातीशी धरून ठेवते. परक्याच्या हातात आपल्या लेकराला तिला जाऊ द्यायचं नसतं. पण ओढाताणीत पोराचें हाल होतात. काळतोंडी वानरी पिलाच्या मांडीला चावा घेते. तेव्हा पोर जिवाच्या आकांताने रडू लागतं. तेव्हा त्याचे हाल होऊ नयेत म्हणून थोटी आपली पकड सैल करते व पिलाला नेऊ देते. पण काही वेळानंतर उनाडी व लाजरीला सोबत घेऊन आपल्या पिलाला परत आणते. त्यावेळी काळतोंडीच्या फटक्याने तिला जखम होते. वरचा ओठ फाटतो. रक्त येऊ लागतं तरी ती पिलाला घेऊन परत येते. लालबुड्या नाहीसा झाल्यावर त्याच्या व मुडाच्या टोळीतील वानरीमध्ये संघर्ष सुरू होतो. मुडाच्या वानरटोळीतील वानरी लालबुड्याच्या हद्दीत जाऊन त्या

वानरीशी भांडू लागतात. त्यांच्यावर चाल करुन जातात तेव्हा थोटी मात्र आपल्या पोराला जखमा होतील म्हणून भांडणात पडत नाही.

मुडाला मारल्यानंतर मोगा त्यांच्या टोळीतल्या लहान पोरांना मारायचा सपाटा सुरु करतो. लांडीचं पोर आधी मारतो. नंतर इतर पोरांना मारतो. तेव्हा थोटी आपलं पोर घेऊन, टोळी सोडून दूर जंगलात निघून जाते. तात्पुरती तरी भोगाच्या धोक्यातून पिलाची सुटका होते.

पण पिलाला सांभाळणं तिला कठीण जाऊ लागतं. तिला स्वतःचं खाणंपिणं ही नीट करता येत नाही. कारण टोळीतल्या इतर वानरी आता नसतात आणि रात्री एकटं झोपायची भीती वाटू लागते. शेवटी एक दिवस दाढीवाल्याच्या टोळीच्या जवळ जातो. हा दाढीवाला म्हणजे मोगाच्या टोळीतला बलवान, असा नर असतो. तो लालबुडयाच्या बेवारशी टोळीचा नायक झालेला असतो व इतर चौघांना त्याने हाकलून दिलं असतं. दाढीवाल्याच्या टोळीतील म्हणजे लालबुडयाच्या टोळीतील वानरी थोटीच्या पोराला जवळ घेतात. त्याचा लोभ करतात. थोटीला दाढीवाल्याची भीती वाटत असते की, तो धावून येऊन पोराला हिसकून मारतो की काय ! पण तो तसे काही करत नाही. त्या टोळीत लहान पोर नसतेच. तिच्या पोरामुळे थोटीचा ह्या शेजारी टोळीत प्रवेश होतो.

**मोगा**

बुटका, भक्कम शरीर, तीक्ष्ण दृष्टी, त्याच्या तोंडाभोवती खूप केस असतात. मोगा हा एका टोळीतून हाकलून लावलेला एक वानर असतो. त्या टोळीप्रमुखाला मुडानं जखमी करुन पळवून लावलं असतं. व त्याच्या टोळीवर कब्जा केलेला असतो. मोगाबरोबरच अजून पाच नर-पोरांनाही हाकलून लावले असते. आता ते मोठे झाले असतात. मोगा व त्याचे साथीदार तेव्हापासून रानोमाळ भटकत असतात. त्यांना स्वतःचा प्रदेश नसतो. त्यामुळे खाण्यासाठी नेहमीच दुसऱ्याच्या हद्दीत शिरावं लागत असे. मोगा त्या टोळीचं नेतृत्व करत असतो. दिशाहीन भटकत असतानाच एखाद्या टोळीवर हल्ला करुन त्या टोळीचं प्रमुखपद मिळवण्याच्या प्रयत्नात तो असतो. मुडाने त्याला हाकलल्यामुळे तो मुडाच्या टोळीवर हल्ला करत असतो.

मोगा हा शक्तीमान व दणकट, रागीट असतो. तसेच धोरणी असतो. जांभळाच्या झाडावर बसलेल्या - मुडाच्या टोळीवर हल्ला करण्यासाठी तो उंबराच्या झाडावर बसून साथीदारांबरोबर दंगा करतो. डहाळयावरुन उडय टाकतो. दात कराकरा वाजवतो. पण टोळीचा प्रमुख मुडा झाडीतून बाहेर येऊन वारुळावर बसतो व मोगा व त्याच्या सोबत्यांकडे बघून गुरगुराट करतो. मोगाला प्रतिआव्हान देतो. तेव्हा मोगा पळून जातो. आपला निभाव लागणार नाही हे त्याला कळत असते.

पण तो पुनःपुनः मुडाच्या टोळीभोवती वावरत राहतो. व संधीची वाट पाहतो. (सत्ताकांक्षा) मोगाला टोळीप्रमुख व्हायचे असते. त्यासाठी प्रदेश, हवा असतो. माद्या हव्या असतात. निवडक फळ, निवडक जागा, साथीदारांकडून अदब असं सगळ त्याला हवं असतं.ते सत्ता अर्थातच दुसऱ्या टोळीप्रमुखाला मारून किंवा पराभूत करुन हाकलून लावूनच मिळणार असते. त्यासाठीच तो प्रयत्न करत राहतो.

लालबुडया नाहीसा झाल्याचे कळल्यावर तो त्या बेवारस टोळीत शिरतो. त्या टोळीतील एक वानरी

लगेच त्याला वश होते. पण तिच्यासोबत एकत्र असताना, मुडा आपल्याकडे पाहतो हे कळताच तो पळून जातो. मुडाच्या शक्तीचा त्याला अंदाज असतो.

मोगाला सत्ता मिळवायची असते. पण त्यासाठी तो आपला जीव जोखमीत टाकत नाही. प्रतिस्पर्धी शक्तीशाली आहे हे पाहून पळून जाण्याचं माघार घेण्याचं शहाणपण त्याच्यात असतं. तसचं लालबुडयाची रिकामी जागा मिळते का याचीही तो चाचपणी करतो. त्याचबरोबर लालबुडयाच्या टोळीतल्या वानरी आपल्या सोबत्यांना न दाखवण्याचं चातुर्यही त्याच्यात असतं. माद्या बघून आपले साथीदार चेकाळून आपल्यालाच मारतील हे समजत असल्याने तो त्यांना वानरी दिसू देत नाही. एकटाच त्या कळपात शिरतो. पण मुडाला मारायला, साथीदारांची गरजही आहे याची ही त्याला कल्पना असते. त्यामुळे तो कधीकधी पराभव पत्करून बाजूला होतो.

मुडाच्या ताकदीचा तो अंदाज घेतो. त्याच्या टोळीत वानरी असल्यातरी त्या फार धोकादायक नाहीत. नरासारखे खंजिरी सुळे त्यांच्याजवळ नसल्याने त्यांनी जखमी केलं तरी प्राणावर बेतणार नाही. लालबुडयाची व मुडाची टोळी एक झाली तरी लालबुडयाच्या टोळीत वानरींचीच संख्य जास्त होत होती व त्यामुळे मुडाचं बळ कमी होतं. हे तो ओळखतो. एके दिवशी दुपारच्या वेळी तो टेकडीच्या पायाथ्याशी विश्रांती घेत असलेल्या मुडाच्या टोळीवर हल्ला करतो. त्याआधी तो व त्याचे साथीदार उंबराच्या झाडावर मोठमोठयाने आवाज करतात. फांद्या हलवतात. बरच्या फांद्यांवरून खाली उडया घेतात. मुडाच्या टोळीत घबराट पसरते. मोगा मुडाच्या टोळीत घुसतो. लहान पोरं, त्यांच्या आया इतर वानरी, म्हातारी बोथरी सगळयांना तो मारतो. मोगाचा साथीदार मुडावर चाल करून जातो. त्याच्याशी लढून मुडा थकल्यावर मोगा त्याच्यावर त्वेषांनि हल्ला करतो. त्याच्या खांद्याचे, पाठीचे लचके तोडतो, नखांनी त्याचा चेहरा ओरबाडतो. मुडा ग्लानी येऊन खाली कोसळतो. अशा जखमी मुडावर दुसऱ्या दिवशी मोगा. पुनः हल्ला करतो. मुडा प्रतिकार करू शकत नाही. तो रक्तबंबाळ होऊन पळून जातो व पाण्याच्या तळयाच्या काठावर मरुन पडतो.

मुडाला मारल्यावर मोगाला त्याच्या टोळीचं प्रमुखपद मिळतं हे टिकवण्यासाठी तो इतर लहान नर-पोरांना मारुन टाकतो. वानरीना धाक दाखवण्यासाठी गुरगुरूत, बडबडत राहतो. त्याला आता सत्ता मिळाली असते. ती टिकवायची असते.

जांभळीच्या झाडावर त्याची टोळी जांभळं खात असताना तो उंच फांदीवर बसलेला असतो. दुरुन त्याला बिबटया येतांना दिसतो तेव्हा तो टोळीला 'खकर्रखक' असा आवाज करून इशारा करतो. टोळी सावध होते. वानरे उंच फांद्यांआड लपून बसतात. पूर्वी मुडा व लालबुडया जसे सकाळी एकमेकांना साद-प्रतिसाद देत असत. तसे आता दाढीवाला हा मोगाचा सोबती व मोगा देतात.

कालचे लुटारू, पेंढारे असलेले आता सत्ताधीश झाले असतात.

सर्व स्थिरस्थावर झाल्यावर मोगा मुडाच्या टोळीतील वानरींच्या मागे लागतो. त्याही आता त्याच्या झालेल्या असतात.

सत्तांतरातले एक वर्तुळ मोगा पूर्ण करतो.

**गौण-पात्रे.**

'जी पात्रे केंद्रस्थानी नसतात, त्यांच्या भोवती कथानक फिरत नाही. तरी त्यांच्या अस्तित्वाला महत्त्व असते.' अशी चार प्रमुख पात्रांशिवाय काही गौण पात्रेही 'सत्तान्तर' ह्या कादंबरीत आहेत. ती म्हणजे मुडाच्या टोळीतील वानरी. हयांना माडगूळकरांनी काणी, तरणी, लांडी अशी नावे ठेवली आहेत. सत्ता मिळवण्यासाठी ह्या संघर्षात त्यांचाही थोडा वाटा आहेच.

**लांडीः-**

मुडाच्या टोळीतील ही एक वानरी असते. ती चांगली चपळ असते. धडधाकट असते. धीट असते.जिला एक तान्हं पोर असतं. एकदा पहाटे थोडा अंधार असतानाच एका बिबटयाचं लक्ष हिच्याकडे जातो. जमिनीपासून उंच अशा झाडावर झोपली असल्याने आपल्याला काही धोका नाही असं ती समजत असते. पण खाली लोंबकळत असलेली शेवटी बिबटयाला दिसते. पंधरा-वीस पावलांच्या अंतरावर तो तिच्यावर झेप घेतो. पण वानरी त्याच्या पकडीत येत नाही. त्याच्या पंज्याच्या तडाख्यातून तुटलेलं शेपूट त्याच्या जबडयात येतं. लांडी बचावते.

टोळीला हादरवून टाकणारा हा प्रसंग लांडीच्या बाबतीत घडतो.

लालबुडया हा मुडाचा शेजारी नाहीसा झाल्यावर मुडाला त्या टोळीवरही सत्ता गाजवावीशी वाटत असते. तर लालबुडयाच्या टोळीतील वानरीना स्वसंरक्षणासाठी एक नर हवा असतो. पोरांच्या पाठोपाठ त्यांच्या आयाही येतील व आपण एकत्र राहू असा विचार त्या करत असतात. त्यामुळे त्या मुडाच्या टोळीतील लहान पोरांना पळवत असतात. एकदा लांडीचंही पोर पळवण्यासाठी एक जाडी वानरी तिचा पाठलाग करते. लांडी पळते व एका झाडाच्या फांदीवर बसते. जाडी तिथे आल्यावर ती जाडीला शरण जाते व तिचे केस विंचरू लागते. हे उपजत शहाणपण वानरी कडे असतं. जेव्हा लढणे शक्य नसते तेव्हा पराभव मान्य करणे. पण तरी जाडीने पोराला पळवल्यावर लांडी तिच्या हद्दीत जाऊन पोराला सोडवून आणते.

ती चांगली धीट असते. मुडाला मारल्यावर मोगा काणीचं पोर हिसकावून नेतो व त्याला ओरबाडतो तेव्हा ती इतर वानरीबरोबर काणीच्या मदतीला जाते. आपल्या पोरावर तिचं खूप प्रेम असतं. मोगा तिच्याही पोराला पळवतो तेव्हा त्याच्या मागे धावते व पोराला सोडवायचा प्रयत्न करते. पण मोगापुढे तिचं काही चालत नाही. मोगा तिच्या मुलाला मारुन, जखमी करुन तडफडत खाली ठेवतो. तेव्हा ती परत पोराकडे जाते. पण मोगा दातओठ खात तिच्यावर धावतो. शेवटी तिचा सगळा आक्रोश तिच्या चेहऱ्यावर उमटतो.

मूल मेलं हे तिला कळत नाही. चार दिवस ती त्या पोराला घेऊन फिरते. पोर मेलं तरी तिचं आईपण मरत नव्हतं / नाही.

**तरणी, काणी, लाजरी, उनाडी.**

ह्या वानरी कादंबरीतल्या गौण व्यक्तिरेखा आहेत. ह्या सर्व मुडाच्या टोळीतच असतात. यातील तरणी ही विशेष धीट असते. अंगानं थोराड पण नाकी, डोळी नीटस, चपळ, बळकट दातांची व अगदी तरुण अशी असते. धीट असल्याने रागात असलेल्या मुडाजवळ जाण्याचं धैर्य तिच्याकडेच असतं. इतर वानरी तिला घाबरत असत. मुडाच्या खालोखाल टोळीत तिला मान असतो. तिच्या पोटात दोन महिन्यांचा गर्भ असतो.

पाणी पिण्यासाठी तळयावर सगळी टोळी जाणार असते. बाकीचे झाडावर थांबतात व मुडा एकटा पुढे जातो. तळयाच्या काठापर्यंत आल्यावरही पाणी पिण्यासाठी वाकायची त्याची हिंमत होत नसते तेव्हा ही तरणीच खाली उतरते व मुडाच्या मागे हातभर अंतरावर बसते. ती मागे आहे हे पाहिल्यावर लगेच मुडा पाणी पिण्यास सुरवात करतो. त्याचं झाल्यावर ती पाणी पिते.

मोगाकडून मुडा जेव्हा जखमी होतो. तेव्हा रात्री झोपण्यासाठी झाड शोधायचं त्राण त्याच्यात नसतं. तेव्हा तरणीच हे काम करते. मुडा मेल्यानंतर मोगा त्यांच्या टोळीचा प्रमुख होतो. व टोळीतील लहान नर-पोरांना मारायला सुरवात करतो. तरणीला होणाऱ्या पिलालाही त्याने नंतर मारलं असतं. तरणी ह्या विचारातून मोगाला वश करण्याचा प्रयत्न करते. पण तो दाद देत नाही.

एका रात्री ती एका चिमुरडया पोराला जन्म देते. हे पोर मुडाचं असतं. थोडे मोठा झाल्यावर जगला वाचला तर हा मोगाला पराभूत करणार होता.

उनाडी ही एक महत्त्वाची वानरी असते. ही अंगानं लहानखुरी असते. पण वयात आल्यावर ही टोळीप्रमुखाचा डोळा चुकवून दुसऱ्या टोळीतील वानरांशी सूत जमवण्याचा प्रयत्न करत असते. त्यामुळे टोळीतल्या इतर वानरी तिच्याकडे लक्ष देत असतात.

काणी एका डोळयाने अधू असलेली ही वानरी लाजरी होती. तिच्यात कोणतही व्यंग नव्हतं पण नेहमीपेक्षा काही वेगळा प्रसंग घडला तर ती कुठे तरी लपून बसत असे. कोणत्याही संकटाच्या चाहुलीने घाबरुन झाडाच्या खोडामागे, पानांमागे नाहीतर एखाद्या वानरीच्या मागे लपायची. बोकांडी ही अंगाने धडधाकट, चपळ अशी वानरी असते. ती खूप भांडकुदळ असते. टोळीतल्या वानरींशीही तर ती भांडतेच. पण दुसऱ्या टोळीतल्या वानरीशीही भांडण उकरून काढतं असते. एखाद्या वानरीला बेसावध असताना गाठून तिच्यावर उडी घेत असते. त्यामुळे इतर वानरी तिला खूप भीत असायच्या.

❖ ❖ ❖

## प्रकरण १८

# सत्तान्तर : वाङ्मयीन वैशिष्ट्ये

**वाङ्मयीन वैशिष्ट्येः-**

प्रस्तुत पाठात आपण 'सत्तान्तर' या कादंबरीची वाङ्मयीत वैशिष्ट्ये अभ्यासणार आहोत. 'सत्तांतर' ही व्यंकटेश माडगूळकर यांची एक अतिशय वेगळया प्रकारची व वेगळया विषयावरील कादंबरी आहे. यातील सत्तांतर हे माणसांमधले नसून, राजकीय स्वरूपाचे नसून जंगलात वास्तव्य करणाऱ्या 'हनुमान लंगूर' ह्या जातीच्या वानरांमधील आहे. कादंबरीच्या मुखपृष्ठावरील वानराच्या चित्रावरुन हे सूचित होते.

मनुष्याप्राण्यांमध्ये जशी सत्ता मिळवण्यासाठी चढाओढ असते, त्यासाठी संघर्ष होतो, युध्दे होतात, तसेच जंगलात वानरांमध्ये ही टोळीचे प्रमुखपद मिळवण्यासाठी, एखाद्या विशिष्ट भूप्रदेशावर मालकी हक्क स्थापण्यासाठी संघर्ष सुरू असतो, हे ह्या कादंबरीचे मुख्य सूत्र आहे. सत्ता मिळवल्यावरही ती टिकवण्यासाठी सतत कसे सावधान राहावे लागते. ते ह्या कादंबरीत प्रत्ययकारीरित्या चित्रित केले आहे.

लेखक ह्या जंगलाशी, येथील जीवनाशी, वातावरणाशी अत्यंत समरस झालेले या कादंबरीतून दिसून येते. तसेच त्यांची सूक्ष्म निरीक्षणशक्तीही यातून प्रत्ययाला येते. वानरांशी ते इतके समरस होतात, ते वानरांना ओळखू लागतात, नावे देतात. वानरांच्या हालचालीतून, त्यांच्या ओरडण्यावरून, त्यांच्या मनातील विचार, भावनासुध्दा लेखकाला कळतात.

जंगलातील झाडाझुडपांच्या वर्णनाबरोबरच जंगलात घडणाऱ्या छोटया-मोठया घटना, प्रसंग, प्राण्यांची वागणूक, बदलणाऱ्या ऋतुबरोबर बदलणारे जंगलाचे रूप, त्याचे जंगलातील प्राण्यांवर-पक्षांवर होणारे परिणाम या साऱ्याचे अत्यंत सूक्ष्म तपशीलवार वर्णन या कादबरीत आहे.

जंगलाच्या पार्श्वभूमीवर असलेल्या ह्या कादंबरीची प्रमुख वैशिष्टये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) निसर्ग चित्रण, जंगलाचे वर्णन. (वातावरण निर्मिती)

२) वानरांचे दैनंदिन जीवन, त्यांचे व्यवहार त्यांचे स्वभाव, त्यांच्यातील संघर्ष.

३) इतर प्राण्यांचे जीवन

४) भाषाशैली.

**निर्सग चित्रणः-**

ह्या कादंबरीतील जंगल म्हणजे कथानकाचा एक अविभाज्य असा भाग आहे. जंगलातील साग, बिजा, करू, ऐन अशा दहा बारा पुरूष उंचीच्या झाडांच्या वर्णनाबरोबरच यात आंबा, चिंच, जांभूळ, चारोळी अशा मोठमोठया फळांनी लगडलेल्या वृक्षांच वर्णने येतात. उंबर, वड, पिंपळ हे वृक्ष तसेच सावरी, पळस-पांगारा,

बहावा, मोह अशा फुलणाऱ्या झाडांचे त्यांच्या, रंगांचे, गंधाचे वर्णन येत. उदा., मोहाच्या झाडांना लालचुटुक पालवी आली होती. बाहाव्याला पिवळे धम्मक फुलांचे लोंगर लोंबू लागले होते (पृ.७१) सावरीची बोंडं फुटून त्यातून म्हाताऱ्या तरंगत बाहेर पडल्या होत्या.(पृ.३८) वानरांचे वास्तव्य, दुपारचा आराम, रात्रीची झोप हे झाडांवरच असल्याने वृक्षांनाही ह्या कादंबरीत महत्त्वाचे स्थान आहे. वानरांच्या जीवनातील घटना वृक्षांच्या साथीने घडतात. कधी जांभळीच्या झाडावर विसावलेल्या वानरांवर उंबराच्या झाडावर डुलकी घेणारे धुसघोर वानर हल्ला करतात तर कधी पाणी पिण्यासाठी तळयावर जाण्याआधी सर्व वानरटोळी तळयाकाठच्या सागाच्या झाडावर विसावते.

वानरांचे बहुतांश खाद्यही त्यांना झाडांवरच मिळते. वडाचीफळं, जांभळं खाणारी वानरं, चारोळीच्या झाडाखाली चारोळया खाणारी वानरं असे वर्णन या कादंबरीत येते.

या कादंबरीची सुरुवात उन्हाळा ह्या ऋतुने होते तर शेवट होतो तेव्हा पावसाळा सुरु झालेला असतो. उन्हाळयात इतर झाडे निष्पर्ण होत असली सागाचे वृक्ष हिरवेगार असल्याचं लेखक नोंदवतात. कडक, रखरखीत अशा उन्हाळयात वाळून गेलेल्या गवताचं वर्णन, पहिल्या पावसाचं मनोवेधक वर्णन वाचून जंगल डोळयापुढे उभे राहतं. उदाः- १) मोठमोठया थेंबांनी आभाळातून खाली तिरकस उडया घेतल्या. २) तळयाच्या पाण्यावर पांढऱ्या लाह्या फुटू लागल्याः पावसाच्या चाहुलीने पाखरांची झालेली धावपळ, आसरा शोधण्यासाठीची धांदल याचं मनोहारी वर्णन यात केलेलं आहे.

**वानरांचे जीवनः-**

वानरांमधील सत्तासंघर्षाबरोबरच त्यांच्या जीवनातील इतर घटना, त्यांचे एकमेकांशी वागणे, टोळीप्रमुखाशी वागणे, त्यांचे रागलोभ, वात्सल्य, त्यांचे दुर्दैवी मृत्यू, शेजारच्या टोळीप्रमुखाशी होणारी लुटुपुटुची हाणामारी, भांडणे, वानरांच्या पिलांचे बागडणे या साऱ्यांचे सूक्ष्म असे तपशीलवार वर्णन यात येते.

१) सकाळ झाल्यावर खाद्य मिळवायला कुठे जायचे ते टोळीप्रमुख ठरवतो. तसेच स्वतःचे अस्तित्व जाणवून देण्यासाठी, झाडावरील उंच फांदी वर जाऊन 'हुप्पहुप्प' असा जोरात आवाज करतो त्याला बाकीचे टोळीप्रमुख उत्तर देतात.

२) नर म्हणून जन्माला आलेलं वानराचं पोर थोडं मोठं झाल्यावर टोळीतून हाकलल्या जातं. मांद्या मात्र वीसवीस वर्षे त्याच टोळीत राहतात.

३) एखादं जिवावरचं संकट टळल्यानंतर वानरी एकमेकींना मिठया मारतात. व त्यांच्यात खेळीमेळीचं वातावरण तयार होतं लहान पोरं खेळू बागडू लागतात.

४) एका टोळीप्रमुखाला माराल्यावर किंवा पराभूत केल्यावर, पराभूताच्या टोळीतल्या नर पिलांना जिंकलेला वानर मारुन टाकतो.

५) वानरी दुसऱ्या वानरीचे पोर पळवतात थोडा वेळ त्याच्याशी खेळतात. हे स्वतःच्या तसेच दुसऱ्या टोळीबाबतही घडते.

६) वानरे रानकुत्र्यांचे भक्ष्य बनतात. रानकुत्री वानराचे कोणतेही अवशेष, मारल्यावर शिल्लक ठेवत नाहीत.

७) वानरींचा आपल्या पिलांवर फार जीव असतो. दुसऱ्या टोळीतील वानरीने पिलाला पळवल्यास त्या पाठलाग करुन आपल्या पिलाला सोडवून आणतात. पिलू मरण पावल्याचे वानरींना कळत नाही.

८) पावसाळयात वानरं जमिनीवर उतरत नाहीत. झाडावरच एकमेकांच्या अंगाची ऊब घेत बसून राहतात.

**इतर प्राण्यांचे जीवनः-**

जंगलचा न्याय म्हणजे 'बळी तो कान पिळी,' ह्याचे प्रत्यंतर यात येते. कांचनमृगाच्या मागे वाघ लागल्यानंतर तो जिवाच्या आकांताने पळत सुटतो. वाघाला चुकविण्यासाठी पाण्यात उडी घेतो. पण त्याला पैलतीर गाठता येत नाही. वाघ परत जातो पण मृग मगरीच्या तावडीत सापडतो. चित्रदर्शी शैलीतील हे वर्णन मनाला चटका लावून जाणारे आहे. (पृ ३८ ते ४०)

जंगलातील साळुंक्या, मैना, बगळे, उदी रंगाची बदकं, कोतवाल पक्षी, लाजरे हरेल, धनेश, तांबट, बुलबुल या पक्षांच्या खाण्याचे, उडून जाण्याचे, गप्प राहण्याचे उल्लेख येतात. उन्हाळा संपत आल्यावर पावसाळा सुरू होताच होणारा सृजनाचा सोहळा यात दिसतो. पाऊस पडायच्या आधी ढोकरी पक्षांमधले नर घरटी बांधतात. इतर पाणपक्षी ही चिंचेच्या झाडावर घरटी बांधतात मग माद्यांचे आगमन, अंडी देणे इत्यादीचे वर्णन मनोरंजक आहे. मगर तळयाच्या काठावर कशी अंडी घालते, नंतर पिलांना कसे घेऊन जाते हे वाचून लेखकाने केलेल्या जंगल वाचनाचा प्रत्यय येतो.

वानरांची अनेक रेखाटनंही ह्या कादंबरी आहेत. त्याबरोबरच बाज पक्षाचे, मृगांच्या कळपाचे, शिकारीसाठी जाणाऱ्या बिबटयाचे अशी अनेक रेखाटने आहेत जी प्रसंगाला अनुरूप अशी आहेत.

ह्यातील प्रसंगांची गुंफण सुबक व व्यवस्थितरित्या केलेली आहे. १ ल्या प्रकरणापासूनच संघर्षाला तोंड फुटते. व तो उत्तरोत्तर वाढतच जाते.१ ल्या प्रकरणात 'बोथरी' ह्या वानरीचा मृत्यू, २ ऱ्या प्रकरणांत लालबुडयाचे नाहीसे होणे नंतर ६ व्या प्रकरण पर्यंत लालबुडया, मुडा, मृग, लांडीचे पोर असे मृत्यू होत जातात. सातव्या प्रकरणात. मोगा व त्याच्या साथीदाराची सत्ता प्रस्थापित होते व आठव्यात पाऊस व जननाचा सोहळा यांचे वर्णन आहे. एकंदरीत नाटयमय अशी मांडणी ह्या कादंबरीची आहे.

**भाषाशैली :-**

कथानक, पात्रचित्रण व वातावरणनिर्मिती यांच्याप्रमाणेच भाषा' हाही कादंबरीचा एक महत्वाचा घटक आहे. भाषा आणि कादंबरीची शैली यावर कादंबरीची परिणामकारकता अवलंबून असते. कादंबरीकाराचे अनुभव समाजातून समृध्द होत असतात. हे अनुभव तो कादंबरीमधून मांडतो तेव्हा त्याच्याजवळ भाषा हे माध्यम असते. साहित्यकृतीच्या यशात भाषा ही महत्त्वाची भूमिका पार पाडते. कादंबरीची निवेदनाची भाषा वेगळी असते व संवादाची वेगळी असते.

आशयानुसार कादंबरीची भाषा बदलताना दिसते. लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा, त्याच्या जीवनविषयक भूमिकेचा त्याच्या भाषाशैलीवर परिणाम होत असतो.

'सत्तान्तर' ह्या कादंबरीची भाषा प्रवाही आहे शैली साधी, सोपी, सुटसुटीत आहे. पूर्वीच्या कहाण्यांमधील

वाक्यांप्रमाणे (उदा. आटपाट नगर होतं.) छोटी छोटी वाक्यं यात येतात. उदा- १) टळटळीत दुपार होती. २) सगळीकडंच चुपचाप झालं ३) ही तरणी. ही गर्भार होती.

प्रवाही असण्याबरोबरच या कादंबरीची शैली चित्रदर्शी आहे. उदा :- १) ते जाणतं पोर टवकारुन बसलं होतं २) पावसाच्या धारानी तुषारांनी वातावरण धुरटून गेलं. ३) आणि उघडीप झाली. भिजलेल्या पाखरांनी पंख फडफडवून भराऱ्या घेतल्या.

४) उदी रंगाच्या बदकांचा थवा माना वर काढून बघत होता. पाण्याच्या पृष्ठभागावर खळबळाट झाला. तुषार चौफेर उडाले.

काही अलंकारिक वाक्यंही यात आहेत. उदा :- १) हे जांभळीचं झाड, फळांनी फणसांचं झाड लहडावं, तसं आता वानरांनी लहडलं होतं

२) सोनरी पाठीवर पांढऱ्या चांदण्या असलेला मृग मोठमोठी उड्डाणं घेत सैरावैरा धावत होता आणि त्याच्यामागं आगीचा लोळ झेपावावा, तसा वाघ झेपावला होता.

३) सगळ तळचं जणू दचकलं.

४) मोठमोठया थेंबानी आभाळातून खाली तिरकस उडया घेतल्या. तळयाच्या पाण्यावर पांढऱ्या लाहया फुटू लागल्या.

५) सृष्टी अन्नब्रह्माच्या पूजेला बसणार होती.

६) छाया प्रकाशाची पाठशिवणी सारखी चालू होती.

काही वेगळे शब्द ह्या कादंबरीत आले आहेत.

१) उष्णकाळ

२) भीजपाऊस, ३) पातेरा (पाचोळा) ४) धगार इ. त्यामुळे त्या वातावरणाला जिवंतपणा प्राप्त होतो.

पक्षांच वर्णन करताना विशेषणांचा विशेष वापर केला आहे. हिरवे रावे, लाजरे हरेल, निळेगर्द नीलकंठ, पिवळयारंजन रंगाच्या धोबिणी, कुलूकुलू बोलणाऱ्या साळुंक्या इत्यादी

**निवेदनः-**

निवेदन हा कादंबरीचा महत्त्वाचा व आधारभूत घटक आहे. कादंबरीत हे निवेदन कोणीतरी करीत असते. निवेदन म्हणजे घटनांची मालिका. निवेदनात सातत्य व सूत्र असावे लागते. कादंबरीचे निवेदन कधीकधी पात्राच्या तोंडून केले जाते उदा. 'पण लक्षात कोण घेतो.' वा. म. जोशी यांची 'इंदू काळे सरला भोळे' ही कादंबरी पत्रात्म आहे. तीत अनेक पात्रे एकमेकांना पाठवलेल्या पत्रांतून घटनांचे वा कृतींचे निवेदन करतात.

**निवेदनाच्या दोन पध्दती आहेत.**

**१) प्रथमपुरुषी निवेदन** :- उदा - कोसला: 'पांडुरंग सांगवीकर' या पुरूषपात्राने केलेले निवेदन

प्रथमपुरूषी निवेदन एका पात्राने केलेले असल्याने कादंबरीतल्या इतर पात्रांच्या चित्रणात एक प्रकारची. तटस्थता निर्माण होते. 'क्रौंचवध' या कादंबरीत वेगवेगळया पात्रांनी लिहिलेल्या पत्रांमधून, डायरीमधून आलेली आत्मनिवेदने आहेत.

**२) तृतीयपुरूषी निवेदनः-** या प्रकारच्या निवेदनातला निवेदक हा सर्वत्र संचार करीत असतो. सर्व पात्रांच्या स्वभावाचे, त्यांच्यात घडणाऱ्या संभाषणांचे, प्रसंगांचे, घटनाचे त्याला ज्ञान असते. पात्रांच्या मनात प्रवेश करून त्यांचे विचार तो मांडू शकतो.

'सत्तांतर' या कादंबरीचे निवेदन तृतीयपुरुषी आहे. घटना ज्या प्रमाने घडल्या, त्याच क्रमाने म्हणजे अनुलोम पधतीने सांगितल्या आहेत. फक्त 'लालबुडया' ह्या वानराची कथा विलोम पध्दतीने सांगितली आहे. आधी त्याच्या नाहीसं होण्याची हकीकत येते नंतर त्याच्या जन्माची, त्याच्या वाढण्याची, टोळीप्रमुख बनण्याची हकीकत येऊन पुनःहा धागा त्याच्या नाहीसं होण्याशी जोडला जातो.

ह्यातील निवेदन प्रवाही असल्याने कादंबरीला एक गती प्राप्त झाली आहे.

निवेदनाबरोबरच लेखकाचं भाष्य ह्या कादंबरीत अनेक ठिकाणी आलं आहे.

उदाः- १) कोणतीही धारिष्टाची गोष्ट करताना आणिबाणीचे क्षण अगदी थोडे असतात. आणि त्यांना सामोरं जाणं हीच खरी परीक्षा असते. (पृ.१२)

२) सत्ता काबीज करणं ही एकटया-दुकटया- ची कामगिरीच नसते. दोन हात झोपडी उभारू शकतात, प्रासाद उभा करायचा, तर हजारो हात लागतात. (पृ.३७)

३) संघटित राहण्यासाठी खऱ्या व काल्पनिक अशा शत्रूची धास्ती असावीच लागते. (पृ.४६)

४) पळून गेलं, की सगळया धोक्यातून सुटका होते, असं थोडंच आहे ?

धोक्यामुळं तर दहाजण एकत्र येतात आणि एकत्र राहू लागतात. एकत्र राहण्यासाठी धाक लागतोच. बाहेरचा नसला तरी घरातला. घरातला नसला, तर मनातला.

मनं धाक वितात आणि झोटिंग, हडळी जन्माला येतात. (पृ.६२)

५) काळाबरोबर संघर्षही सतत वाहतच असतो. त्याला खंड असा नसतोच. असलीच तर भरती असते, पूर असतो.

संघर्ष सर्वत्र भरून राहिलेला असतो.इ. यातून लेखकाची चिंतनशीलता प्रकटते.

**वातावरणनिर्मितीः-**

कादंबरीतील पात्रे कोठेतरी वावरत असतात. त्यांच्याभोवती एक विविध वस्तूंनी भरलेले जग असते. त्यालाच आपण वातावरण ('ॲटमॉसफिअर') म्हणतो. हे वातावरण आभासात्मक असते. म्हणजे खरे असल्याचा भास निर्माण केलेला असतो. कादंबरीला असणारी स्थल कालाचो चौकट, भौगोलिक, सांस्कृतिक परिसपात्रे वावरतात ती घरे; रस्ते.हा सारा वातावरणाचाच भाग समजला जातो.

'वातावरणनिर्मिती' ह्या कादंबरीच्या घटकाविषयीची कल्पना हळूहळू बदलत गेलेली दिसते. हा घटक पात्रचित्रणाच्या आणि एकूणच कादंबरीचा परिणाम होण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा घटक असतो.

'सत्तान्तर' ही कादंबरी वानरांवर आधारित आहे. त्यामुळे ह्या कादंबरीतले कथानक एका जंगलात घडलेले आहे. मध्य भारतातील एका पानगळीच्या जंगलात उन्हाळयाच्या दिवसात या कथानकास सुरवात होते. ह्या कादंबरीतील आशयाला वातावरणामुळे अर्थपूर्णता लाभली आहे.

मुडा ह्या वानराच्या टोळीवर हल्ला करण्यासाठी जेव्हा मोगा व त्याचे साथीदार यांच्या हालचाली सुरू होतात. त्यापूर्वीचे जंगलातील दुपारच्या शांततेचे, निवांतपणाचे वर्णन सुरवातीला आले आहे.

दुपारची वेळ असते. दुपारच्या विश्रांतीसाठी मुडाची टोळी विसावली असते. सदा कुलूकुलू बोलणाऱ्या साळुंक्या सुध्दा गप्प होतात. वारा वाहत नसतो. डहाळया हालत नसतात. पारवरं मोठयांदा बोलत नसतात. अशा शांततेला मोगाच्या टोळीच्या दंग्यामुळे तडा जातो. ते उंबराच्या झाडावरून खाली धारा सोडतात, लेंडकं टाकतात, त्याचा उग्र भपकारा पसरतो. पाचोळयावर आवाज होतो. वानरांचा गुरगुराट सुरू होतो. वरच्या फांद्यांवरून खालच्या फांद्यावर दाणदाण उडया मारणं सुरू होतं फांद्या तुटतात. पानं गिरगिरत खाली येतात.

अशा प्रकारे संघर्षाला फुटणारे तोंड या वर्णनातून सूचित होते. पाणी पिण्याचा प्रसंग (पृ१२,१३) ही त्याला पूरक ठरतो.

**मृगाची शिकार (पृ.३८,३९)**

'बळी तो कान पिळी' हाच जंगलचा न्याय असतो व ह्या न्यायाला अनुसरूनच जंगलात सत्तान्तर घडत असते. हा आशय गडद करणारा ह्यातील प्रसंग म्हणजे 'सोनेरी पाठीवर पांढऱ्या चांदण्या असलेल्या कांचनमृगाची शिकार केली जाते तो प्रसंग.

जंगल दणाणून सोडणारी, ढाण्या वाघाची आरोळी ऐकल्यावर जंगलात एकदम भीतीचे वातावरण पसरते. बार होताच पारवरांचा थवा उडावा तशी वानरं उडतात. जमिन सोडून झाडांच्या उंच शेंडयावर जाऊन बसतात. पारवरं, हरणं ओरडू लागतात. एकमेकांना इशारे देतात. 'संभाळा रे संभाळ वैरी आला' वाघ पाठलाग करत असलेल्या मृग धावत तळयाकडे येतो व जिवाच्या भयाने पाण्यात शिरतो. तेव्हा वर माना करून बघत असलेला उदी रंगाचा बदकांचा थवा कलकलाट करत आभाळात उडतो. गाट बगळे, ढोक उडतात आणि इशारेवजा ओरडत पाण्यावर गोलाकार फिरत राहतात. सगळं तळचं जणू दचकतं.

आणि वाघाच्या तावडीतून सुटलेल्या पण मगरीचे भक्ष्य बनलेला मृग पाण्याखाली खेचला जातो. प्राणभयानं तो ओरडतो पाण्यावर काही क्षण धडाधड आवाज होतात आणि मग सगळं शांत होतं. सावरीच्या पर्णहीन वृक्षावर भयचकित वानरं गप्प बसून राहतात.

अतिशय परिणामकारक वर्णनातून तळयाचं, शिकारीचं व भीतीचं वातावरण उभे झालं आहे. असे प्रसंग तुम्ही शोधून काढा.

उन्हाळयात जंगलात वणवा पसरतो. त्यामुळे झाडे करपतात. अनेक प्राणी, पक्षी आगीच्या भक्ष्यस्थानी

पडतात. ह्या उष्णतेमुळे हरणीचे गर्भपात होतात. जंगलातील तीव्र जीवनसंघर्षाची ह्यातून जाणीव करून दिली आहे.

**मुडाचा मृत्यू :-**

मुडा ह्या टोळीप्रमुखाला मारल्यानंतर त्याच्या टोळीमध्ये पसरलेल्या घबराटीचे वर्णनही परिणाम कारक आहे.

उदा. लांडी-लाजरी, उनाडी, बोकांडी, थोटी, काणी, तरणी सगळया वानरी गपचूप चरत होत्या. पोरं खेळत नव्हती. लहान पोरांना आया पोटापासून दूर सोडतच नव्हत्या. वानरी संशयित नजरेने सारख्या इकडेतिकडे बघत होत्या. तरण्या पोरी डहाळयात लपून पलिकडच्या झाडाकडे डोकावत होत्या. घडायचं ते घडून गेलं होतं तरी टोळीला कसली तरी धास्ती आहे, असं दिसत होतं.

टोळीप्रमुखाला मारल्यानंतर त्या टोळीतल्या नर-पोरांना वानरं मारतात हे वानरींना माहित असतं. त्यामुळे त्या घाबरत असतात.

**रात्रंदिन युध्दाचा प्रसंग :-**

जंगलात प्राण्यांना नेहमीच जिवाला धोका असतो. 'रात्रंदिन आम्हा युध्दाचा प्रसंग' अशी त्यांची स्थिती असते. त्यामुळे ते कायमच सावध असतात व काही धोका दिसल्यास एकमेकांना इशारे करतात. जांभळाच्या झाडावर वानरं व खाली चितळांचा कळप चरत असताना, दूर फांदीवर बसलेल्या मोगाला संकटाची चाहूल लागते. झुडपातून दबकत पुढे येणाऱ्या बिबटयाचं अंग व काळे ठिपके दिसतात. तो इशारा करतो-'खकर्र खक, खकर्र खक' आणि चितळांची म्होरकी सावध होते. वास घेते आणि विरूध्द दिशेला धूम ठोकते सगळा कळपही तिच्यामागे उधळतो. वानरं ऊंच झाडावर डहाळयांआड लपून गप्प बसतात. बिबटया येतो आणि चितळांचा कळप उधळला त्या दिशेकडे पाहतो. नंतर जांभळीच्या खोडाजवळ जातो व खोडावर नखं घासून ती धारदार करतो व आपली हद्द दाखवणारं निशाण म्हणून उग्र वासाची मुताची धार खोडावर सोडून निघून जातो.

**जनन-सोहळा :-**

उन्हाळा संपून पावसाळा सुरू होतो. जंगल हळूहळू फुलू लागलं असतं. मोहाच्या झाडांना लालचुटुक पालवी फुटते. बहाव्याला पिवळे धम्मक फुले लोंबू लागतात. जंगलात आता वेगवेगळे रंग दिसू लागतात. पारवरांचं गाणं रान धुमवू लागतं.

पाणपारवरांची घरटी बांधण्यासाठी धांदल उडते. तळयाच्या पाण्यात एरवी कधीकधी दिसणाऱ्या ढोकरी पक्ष्याच्या जनन-सोहळयाला सुरवात होते. हळूहळू पक्षी जमू लागतात. सृष्टीत बदल झाल्यावर त्यांच्यातही बदल होतो. घरटी बांधायच्या तयारीला नर पक्षी लागतात. मग माधांचा थवा येतो. जोडीदार निवडला जातो. माद्या घरटी नीटनेटकी करतात व नंतर अंडी घालतात. अंडी फुटून त्यातून पोरं बाहेर येतात.

तळयाच्या काठावरच्या खड्डयांत मगर तीस-चाळीस अंडी घालते. त्यांची राखण करते. मग त्यांना पाण्यात घेऊन जातो.

आणि एका मध्यरात्री तरणीचं व मुडाचं पोर जन्म घेतं. मोगाच्या कदाचित सत्तेला आव्हान देणारा प्रतिस्पर्धी या जगात येतो.

अशा प्रकारे उत्कृष्ट वातारणनिर्मिती ह्या कादंबरीत साधली आहे.

विद्यार्थी मित्रांनो, आपण अशाप्रकारे व्यंकटेश माडगूळकरांच्या सहा पुस्तकांचा *सविस्तर अभ्यास* केला. त्यांची इतरही पुस्तकं तुम्ही वाचावी, अशी अपेक्षा आहे. सुरुवातीला त्यांच्या समग्र साहित्याची यादी दिली आहेच.

रामा मैलकुली, शिदा चांभार, देवा, गोविंदा कातकरी, गोपा व्हरल अशी कितीतरी व्यक्तिचित्रे त्यांनी कथांतून रंगवली आहेत. जिवंत केली आहेत. सवर्ण, ब्राह्मण, मराठा, दलित, बलुतेदार हे सगळेच गावगाड्याचे घटक असतात. एकमेकांवर अवलंबून असतात. आज हे चित्र फक्त खेड्यापाड्यातच तेही काही प्रमाणातच दिसते. शहरातून त्याचा मागमूसही उरलेला नाही. आता ग्रामजीवनाचे काही विशेष आपण समजून घेऊ.

**कथेतील वातावरण :** माडगूळकरांची संवेदनशीलता ग्रामजीवनातील वैशिष्ट्यांनी घडलेली आहे. ग्रामजीवनाचे सूक्ष्म निरिक्षण आणि त्यातून डोळयापूढे उभे रहाणारे वातावरण हा त्यांच्या कथांचा महत्त्वाचा विशेष आहे. खेड्यांचे, खेड्यातील महार वस्तीचे, वडारवाडीचे, तिथल्या घरांचे, माणसांचे आणि निसर्गाचे वर्णन जिथे जिथे येते तिथे हे वैशिष्ट्य ठळकपणे नजरेत भरते.

उदा. 'देवा सटवा महार' या कथेतील सुरुवातीचे निवेदन पहा.

''नुकतीच

माणदेशातील 'मराठी बोली' हा त्यांच्या भाषा शैलीचा महत्त्वाचा विशेष आहे. 'च्या बाइलीला, खान्यापेन्याच्या आबाळीने गडी खराप झाला.' असे ते सहज लिहितात. शुद्ध ग्रांथिक भाषेपेक्षा बोली नेहमीच जिवंतपणे आणि रससशीतपणे अनुभव व्यक्त करतात. तमासगिराची ढंगदार मोमिनाची मुसलमानी कुलकर्ण्याची मेढी अशा नानापरी ते आवश्यक तिथे वापरतात. माडगूळकर प्रामण भाषेचाही वापर करतात. 'तारेवर चिमण्या बसाव्या तशी पोरं दाटीवाटीनं बसली.' 'हातातल्या कंदीलाच तेवढा भुताच्या दिवटीसारखा अधांतरी जात राहिला.' अशा प्रतीमा ते सहज वापरतात. त्यांची संवेदनाप्रधान भाषा अनुभव साक्षात उभा करते. 'मग मुसलमानाचे धीट पोर पुढे झाले आणि आपले नकंटे नाक खाजवीत आरडले,''अरं वांऽर वांऽर हुप तुझ्या शेंडीला पावशेर तुप!'' किंवा 'एका गावकऱ्यापुढं बदकन धोंडा पडला.

साधी सुधी अलंकार अगर चमत्कृती यांच्या यांचा मुळीच सोस नसलेली, सरळ गाभ्यालाच हात घालणारी त्यांची शैली सुचवते. खूप मेंढरांचा, जोंधळयांचा शेताचा घरट्यांचा असे वेगळे वास ते बारकाईने व्यक्त करतात. रसगंधाचा अनुभव देतात.

त्यांच्या भाषेविषयी अरविंद गोखले म्हणतात, ''भाषेचा अस्सल मराठी वाण, शद्बांची मोजकी व नेमकी ठेवण, दोनचार वाक्यात निसर्ग अगर व्यक्ती सजीव करण्याचे सामर्थ्य, आटोपशीर पण बोलके संवाद स्वप्नाळू, भावविवश व बोधपूर्ण लेखनापासून मुक्त निवेदन, खिळवून टाकणारे जीवनदर्शन ......'' त्यांची कथा घडवते.

❖ ❖ ❖

## प्रश्नपेढी

१) व्यंकटेश माडगूळकरांच्या लौकिक चरित्राचा व त्यांच्या साहित्यसंपदेचा परिचय करून द्या.
२) व्यंकटेश माडगूळकरांच्या साहित्याचे समालोचन करा.
३) 'एक ग्रामीण लेखक' या दृष्टीने व्यंकटेश माडगूळकरांची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.
४) व्यंकटेश माडगूळकरांचे व्यक्तिमत्त्व 'माणदेशी माणसं' मधून कसे प्रकटते ते साधार लिहा.
५) 'माणदेशी माणसं' मधून ललित गद्याचे कोणते विशेष प्रकटतात ते साधार लिहा.
६) 'माणदेशी माणसं' मधील तुम्हाला आवडलेल्या कोणत्याही दोन व्यक्तिरेखांचा परिचय करून द्या.
७) 'बनगरवाडी' या कादंबरीची वाङ्मयीन वैशिष्ट्ये विशद करा.
८) 'बनगरवाडी' या कादंबरीमध्ये माडगूळकरांनी समाजजीवनाचे चित्रण कसे केले आहे ते विवेचनपूर्वक लिहा.
९) 'बनगरवाडी' या कादंबरीतील प्रधान व्यक्तिरेखांचा परिचय करून द्या.
१०) एक प्रादेशिक कादंबरी या दृष्टीने 'बनगरवाडी' चे परीक्षण करा.
११) ''सत्तांतर' मधून सत्तासंघर्ष प्रभावीपणे व्यक्त होतो'' या विधानाची चर्चा करा.
१२) 'सत्तांतर' मधील प्रधान व गौण व्यक्तिरेखांचा परिचय करून द्या.
१३) एक आत्मचरित्रात्मक कादंबरी या दृष्टीने 'करूणाष्टक' चे परीक्षण करा.
१४) 'करूणाष्टक' या शीर्षकाची अन्वर्थकता स्पष्ट करा.
१५) 'ओझं' या कथासंग्रहातून दलितांच्या जीवनाचे चित्रण लेखकाने कशाप्रकारे केले आहे ते सविस्तर लिहा.
१६) 'ओझं' या कथासंग्रहातून ग्रामीण जीवनाचे दर्शन कसे घडते ते सविस्तर लिहा.
१७) ''प्रवास एका लेखकाचा' मधून माडगूळकरांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व समोर येते'' या विधानाची चर्चा करा.
१८) ''प्रवास एका लेखकाचा' मधून येणारे विविध कलांचे संदर्भ सविस्तर लिहा.
१९) ''माडगूळकरांच्या साहित्यात निसर्ग 'पात्र' म्हणून येतो'' हे विधान तुम्हाला पटते का? चर्चा करा.
२०) टिपा लिहा.
   १) झेल्या
   २) धर्मा रामोशी
   ३) 'बनगरवाडी' ची निवेदन पद्धती
   ४) 'बनगरवाडी'तील प्रतिमासृष्टी
   ५) 'करुणाष्टक' मधील कविराज
   ६) 'करुणाष्टक' मधील आईची व्यक्तिरेखा
   ७) 'करुणाष्टक' मधून घडणारे एकत्र कुटुंबाचे दर्शन
   ८) 'माणदेशी माणसं' मधील प्रादेशिकता
   ९) 'सत्तांतर' ची भाषाशैली
   १०) माडगूळकरांचे निसर्गप्रेम

❖ ❖ ❖